# १

# भारताची राज्यघटना

## (Indian Constitution)

## भारतीय राज्यघटनेचे विकसित तत्वज्ञान आणि विकास

## (Its evolving philosophy and development)

**प्रकरणाची रचना :-**

१.० उद्दीष्ट
१.१ प्रस्तावना
१.२ राज्यघटनेचे महत्व
१.३ राज्यघटनेचे उगमस्थाने
१.४ राज्यघटनेची वैशिष्ट्ये
१.५ राज्यघटनेचे तत्वज्ञान
१.६ भारतीय राज्यघटनेचा विकास आणि विकसित तत्वज्ञान

## १.० उद्दीष्ट :

भारताची राज्यघटना जगातील इतर राज्यघटनांपेक्षा अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना त्याविषयी माहिती व्हावी, ते उद्याचे जागरूक नागरीक व्हावेत हे मुख्य उद्दिष्ट आहे.

## १.१ प्रस्तावना :

राज्यघटना (Constitution) म्हणजे देशाचा मूलभूत व सर्वश्रेष्ठ कायदा होय. देशाच्या शासनाची मूलभूत बैठक निश्चित करणारी, शासनाचे अधिकार आणि जनतेचे हक्क स्पष्ट करणारी नियमावली म्हणजे राज्यघटना होय. भारतीय राज्यघटनेची २६ जानेवारी १९५० पासून अंमलबजावणी सुरू झाली.

## १.२ राज्यघटनेचे महत्व :

राज्यघटना लोकशाही व्यवस्थेचा आधार आहे. प्रत्येक देशाची स्वतःची राज्यघटना असते. प्रत्येक देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती आणि देशाच्या गरजांप्रमाणे त्या देशाच्या राज्यघटनेला आकार आलेला असतो. राज्यघटनेमुळे राज्यात कायद्याचे राज्य निर्माण होते. राज्यामध्ये सातत्य आणि स्थिरता येते. तसेच लोकांना हक्कांची हमी मिळते.

## १.३ भारतीय राज्यघटनेची उगमस्थाने (Sources) :

भारतीय राज्यघटना "घटनासमिती" ने बनविली आहे. घटनासमितीमध्ये एकूण ३८९ सभासद होते. भारतातील विविध प्रांतांच्या समित्यांनी अप्रत्यक्ष पद्धतीने या सभासदांची निवड केली होती. ९ डिसेंबर १९४६ रोजी घटनासमितीची पहिली बैठक भरली. त्याअर्थाने भारतीय राज्यघटनेचे कायदेशीर आणि मुख्य उगमस्थान घटनासमिती आहे परंतु भारतीय राज्यघटनेच्या विकासाची मुळे ब्रिटिश राजवटीतील १९१९ च्या आणि १९३५ च्या कायद्यामध्ये दिसून येतात. १९३५ चा कायदा तर घटना बनवितांना घटनासमितीपुढे एक नमुना (Model) म्हणून ठेवण्यात आला होता. घटनासमितीमध्ये तज्ज्ञ आणि कायदेपंडित अशा भारतीय प्रतिनिधींचा समावेश होता. त्यांनी भारतीय राज्यघटना निर्माण करताना इतर देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला. ज्या तरतुदी भारताच्या दृष्टीने त्याना योग्य वाटल्या त्या तरतुदी भारतीय परिस्थिती आणि गरजांशी जुळवून स्वीकारल्या. उदा. अमेरिकेपासून संघराज्यकल्पना, उद्देशपत्रिकेची कल्पना, इंग्लंडपासून संसदीय पद्धत, आयर्लंडपासून मार्गदर्शक तत्त्वे इत्यादी स्वीकारण्यात आले. याशिवाय भारतीय घटनेवर गांधी तत्त्वज्ञानाचा प्रभाव, समाजवादी विचारांचा प्रभावही दिसून येतो. डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली १९४६ साली घटना तयार करण्याचे काम घटनासमितीने सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटनासमितीच्या (मसुदा समितीचे) ड्राफ्टिंग कमिटीचे अध्यक्ष होते. भारतीय घटना तयार करण्यासाठी एकूण २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवस एवढा कालावधी लागला. मूळ राज्यघटनेमध्ये ३९५ कलमे होती, २२ भागांमध्ये विभागलेली आणि ८ शेड्यूल होते.

सध्या भारतीय राज्यघटनेमध्ये एकूण ४५० कलमे, २४ भागांमध्ये विभागलेली आहेत आणि १२ परिशीष्ट्ये आहेत.

## १.४ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये :

१) जगातील सर्वांत व्यापक, विस्तृत आणि लिखित राज्यघटना
२) परिदृढ आणि परिवर्तनीय राज्यघटनेचा मेळ
३) केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य
४) सांसदीय शासनपद्धती
५) न्यायालयीन पुनर्विलोकन आणि सांसदीय सार्वभौमत्व यांची तडजोड
६) स्वतंत्र व एकेरी न्यायव्यवस्था
७) मूलभूत हक्कांची तरतूद
८) राज्याची मार्गदर्शक तत्त्वे
९) मूलभूत कर्तव्ये
१०) धर्मनिरपेक्ष राज्य
११) प्रौढ मतदानपद्धती
१२) एकेरी नागरिकत्व
१३) राज्याचे स्वरूप - सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य
१४) स्वतंत्र शाखा व विभागांची निर्मिती
१५) आणीबाणीविषयक तरतुदी

१६) त्रि-स्तरीय राज्यव्यवस्था
१७) क्रांतीकारी स्वरूप
१८) सार्वभौमसत्ता लोकांच्या हाती आहे.

भारतीय राज्यघटनेच्या या वैशिष्ट्यांमुळे भारतीय राज्यघटना जगामध्ये वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

## १) जगातील सर्वात व्यापक, विस्तृत आणि लिखित राज्यघटना (The Longest and Written Constitution in the World) :

जगातील आतापर्यंतच्या सर्व राजयघटनांमध्ये भारताची राज्यघटना सर्वात मोठी आहे. भारताची मूळ राज्यघटना २२ भागात विभागलेली आहे. मूळ घटनेची ३९५ कलमे व ८ परिशिष्टे आहेत. इतर देशांच्या राज्यघटनेमध्ये पुढीलप्रमाणे कलमे आहेत. अमेरिका ७, कॅनडा १४७, ऑस्ट्रेलिया १२८, चीन १०६, या देशांच्या तुलनेने अमेरिकेची राज्यघटना जगातील सर्वात छोटी घटना आहे तर भारतीय राज्यघटना अतिशय व्यापक आहे. भारताची राज्यघटना व्यापक असल्यामुळे या घटनेला हत्तीच्या आकाराची घटना म्हणतात. १) सविस्तर प्रशासकीय तरतुदी २) इतर देशांतील राज्यघटनांच्या अनुभवाचा उपयोग ३) अनुसूचित जातीजमाती व इतर मागासवर्गीयांच्या समस्यांचे निराकरण ४) जम्मू काश्मीर, नागालँड, आसाम, सिक्किम या राज्यांसाठी विशेष तरतुदी ५) संघराज्य व घटकराज्यांसंबंधी सविस्तर तरतुदी ६) सविस्तर मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वांची तरतूद ७) निवडणुका, अल्पसंख्यांकांचा प्रश्न, आणिबाणीविषयक तरतुदी इत्यादी विषयी सविस्तर तरतुदींमुळे भारताची राज्यघटना विस्तृत झाली आहे. घटना निर्मात्यांनी प्रत्येक गोष्ट स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जानेवारी २००३ पर्यंत भारतीय राज्यघटनेत एकूण ९३ घटनादुरूस्त्या झाल्यामुळे सध्या घटनेत ४५० कलमे २४ भागात विभागलेली आहेत आणि १२ परिशिष्ट आहेत.

भारताची राज्यघटना लिखित आहे. भारतीय घटना समितीने अभ्यास करून घटना तयार केली आहे. ९ डिसेंबर १९४६ या दिवशी राज्यघटनेच्या निर्मितीच्या चर्चेस सुरूवात झाली होती २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना मंजूर करण्यात आली. भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून करण्यात आली. घटना समितीचे कामकाज २ वर्षे ११ महिने व १८ दिवस चालले. भारतीय राज्यघटना निर्मित (enacted)आणि लिखित आहे. इंग्लंड देशाच्या घटनेप्रमाणे काळाच्या ओघात प्रथा परंपरांतून निर्माण झाली नाही.

## २) परिदृढ आणि परिवर्तनीय राज्यघटनेचा मेळ :(Unique blend of rigid and flexible Constitution) :

ज्या घटनेमध्ये साध्या कायद्याप्रमाणे परिवर्तन होऊ शकते ती परिवर्तनीय घटना होय. परिवर्तनीय राज्यघटनेचे उत्कृष्ट उदाहरण इंग्लंड होय. ज्या घटनेत घटनादुरूस्तीसाठी कठीण व विशिष्ट प्रक्रियेचा अवलंब करण्यात येतो त्या घटनेला परिदृढ राज्यघटना म्हणतात. उदा. अमेरिका. भारताची राज्यघटना लिखीत असली तरी बहुअंशी परिवर्तनीय व अल्पअंशी परिदृढ आहे. राज्यघटनेच्या ३६८ व्या कलमामध्ये घटनादुरूस्तीच्या विशिष्ट प्रक्रियेचा समावेश आहे. त्या प्रक्रियेप्रमाणे घटकराज्याचे नाव, सीमा बदलणे, सर्वोच्च व उच्च न्यायालयातील

न्यायाधीशांची संख्या ठरविणे इत्यादींसाठी घटनादुरूस्तीची पद्धती अतिशय सोपी आहे. तर राष्ट्रपतींची निवडणूक, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र, केंद्र व घटकराज्यांची अधिकारविभागणी इत्यादीबाबतीत कठीण व परिदृढ पद्धतीची तरतूद आहे. म्हणजेच भारतीय राज्यघटनेत परिदृढ आणि परिवर्तनीय दोन्हींचा मेळ दिसून येतो.

### ३) केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य (A Federal System with Unitary Bias) :

अमेरिकेत संघराज्य पद्धतीचे राज्य आहे. इंग्लंडमध्ये एककेंद्री पद्धतीचे राज्य आहे. भारतात केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य आहे. भारतीय राज्याची चौकट संघराज्याची आहे. १) केंद्र शासन आणि राज्य शासन अशी दुहेरी व्यवस्था भारतात आहे. २) त्यांच्यात अधिकार विभागणी आहे. ३) घटनेची सर्वोच्चता स्वीकारण्यात आली आहे. लिखित राज्यघटना आहे. ४) न्यायालयाचे स्वातंत्र्य व स्वतंत्र न्यायव्यवस्था आहे. या वैशिष्ट्यांवरून भारतीय राज्याची चौकट संघराज्याची आहे हे स्पष्ट होते. भारताचे संघराज्य केंद्रात्मक प्रवृत्तीचे राज्य आहे.

**केंद्राकर्षी वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

१) केंद्र व राज्य यांच्यातील अधिकारविभागणी केंद्राकडे झुकणारी आहे. २) एकच राज्यघटना ३) एकच नागरिकत्व ४) एकेरी न्यायव्यवस्था ५) राष्ट्रपतींचा आणीबाणीचा अधिकार ६) राज्यपालविषयक तरतूद यावरून भारतीय राज्याच्या केंद्राकर्षी वृत्ती आहेत असे दिसून येते. भारतात अशा प्रकारच्या केंद्राकर्षी संघराज्याची निर्मिती केली आहे कारण भारत हा बहूभाषिक, बहूधर्मीय, अनेक विविधता असलेला देश आहे. अशा देशात विघटनवादी शक्तींना तोंड देण्यासाठी केंद्राला जास्त अधिकार देण्यात आले आहेत.

### ४) सांसदीय शासनपद्धती (Parliamentary form of Govt. with Republic)

भारतात केंद्रात आणि राज्यात सांसदीय शासनपद्धतीचा स्वीकार राज्यघटनेप्रमाणे केला आहे. सांसदीय शासनपद्धती म्हणजे कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) आणि कायदेमंडळ (संसद) यांचा घनिष्ठ संबंध असलेली शासनपद्धती होय. १) भारतीय शासनपद्धतीमध्ये पंतप्रधान व मंत्री लोकसभेचे सभासद असतात. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर बहुमत प्राप्त पक्ष सत्तेवर येतो. २) संसद विविध मार्गांच्याद्वारे उदा. प्रश्न विचारणे इत्यादींद्वारे कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवते. ३) संसदेला जबाबदार राहूण कार्य करणे मंत्रिमंडळाची जबाबदारी असते. ४) सांसदीय पद्धतीत दोन प्रमुख असतात. एक नाममात्र आणि एक वास्तविक. भारतात राष्ट्रपती नाममात्र प्रमुख आहे आणि पंतप्रधान वास्तविक प्रमुख आहे. भारताच्या या संसदीय पद्धतीचा गणराज्य पद्धतीशी मेळ घालण्यात आला आहे. गणराज्य म्हणजे देशाचा सर्वोच्च प्रमुख, राष्ट्रपती, निर्वाचित (elected) असतो. इंग्लंडमध्ये संसदीय शासनपद्धती आहे. परंतु राजेशाही आहे. भारताच्या संसदीय पद्धतीत राज्यप्रमुख लोकनिर्वाचित आहे.

### ५) न्यायालयीन पुनर्विलोकन आणि संसदीय सार्वभौमत्व यांची सांगड (Reconciled Parliamentary Sovereignty and the Power of Judical Review of Judicary) :

भारतातील सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आहे. न्यायालय या अधिकाराप्रमाणे कायदेमंडळाने केलेले कायदे व कार्यकारी मंडळाची कृती घटनेच्या मूलभूत रचनेप्रमाणे नसेल तर रद्द ठरवू शकते. संसदेला घटनादुरूस्तीचा अधिकार घटनेप्रमाणे

देण्यात आला आहे. संसद या अधिकाराप्रमाणे घटनादुरूस्ती करून न्यायालयीन अधिकारांमध्ये योग्य बदल करू शकते. अशाप्रकारे एका बाजूला न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे न्यायालयाचे वर्चस्व प्रस्थापित केले आहे. दुसऱ्या बाजूस संसदेला घटनादुरूस्तीअधिकार देऊन सार्वभौमत्व दिले आहे. आपल्या राज्यघटनेत न्यायालयीन सर्वोच्चता आणि सांसदीय सर्वोच्चता यांचा मेळ आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेत पूर्णपणे न्यायालयाची सर्वोच्चता आहे तर इंग्लंडच्या राज्यघटनेमध्ये संसदेची सर्वोच्चता आहे.

### ६) स्वतंत्र व एकेरी न्यावव्यवस्था (Independent and Single integrated Judiciary) :

साधारणपणे संघराज्य पद्धती असलेल्या देशात संघराज्याची वेगळी व राज्यांची वेगळी अशाी दुहेरी न्यायव्यवस्था असते. भारतात एकेरी आणि स्वतंत्र न्यायमंडळाची स्थापना केली आहे. भारतीय न्यायमंडळ स्वतंत्र आहे म्हणजे कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडलाच्या वर्चस्वापासून व हस्तक्षेपापासून पूर्णपणे मुक्त आणि स्वतंत्र आहे. त्यासाठी राज्यघटनेत काही खास तरतुदी करण्यात आल्या आहेत. उदा न्यायाधीशांची नियुक्ती, कार्यकाळ, वेतन, नियम याबाबतीत विशेष तरतुदीराज्यघटनेद्वारे केल्या आहेत. सर्व प्रकारची भीती व दडपणांपासून मुक्त राहून न्यायाधिशांना कार्य करता यावे म्हणून स्वतंत्र न्यायव्यवस्थेची तरतूद करण्यात आली आहे. भारतात एकेरी न्यायव्यवस्था आहे म्हणजे सर्वोच्च न्यायालय अंतिम व सर्वोच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली उच्च न्यायालये, दुय्यम न्यायालये आहेत याप्रमाणे एकाखाली एक याप्रमाणे एकच न्यायालयीन साखळी आहे. सर्वोच्च न्यायालय अंतिम न्यायालय आणि संघिय न्यायालय म्हणून कार्य करते.

### ७) मूलभूत हक्कांची तरतूद (Provision of Fundamental Rights) :

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३१ मध्ये मूलभूत हक्कांची यादी आणि मूलभूत हक्कांच्या रक्षणाची तरतूद केलेली आहे. भारतीय नागरिकांना विविध प्रकारची स्वातंत्र्य या हक्कांच्या रूपाने मिळाले आहे. १) समतेचा हक्क २) व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क, ३) शोषणाविरूद्धचा हक्क, ४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, ५) सांस्कृतिक व शिक्षणाच्या हक्क. ६) या हक्कांवर अतिक्रमण झाल्यास घटनात्मक उपाययोजना या हक्कांद्वारे न्यायालयाकडून दाद मागण्याचा हक्कही देण्यात आला आहे. राज्याघटनेत मूलभूत हक्कांची सविस्तर यादी हे भारतीय राज्यघटनेचे विशेष वैशिष्ट्य आहे. या हक्कांवर काही मर्यादा आहेत. उदा. सामाजिक शांतता, सुव्यवस्था, देशाची एकता व सार्वभौमत्व, नैतिकता इत्यादींच्या मर्यादा राखून स्वातंत्र्य उपभोगण्याचा लोकांना हक्क आहे.

### मूलभूत हक्कांवर वाजवी मर्यादा घालण्याचा संसदेला हक्क (Fundamental Rights subject to reasonable regulation by Legislature) :

राष्ट्राची एकात्मता, ऐक्य राखण्याच्या दृष्टीने, सामाजिक सुरक्षा, न्याय, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मूलभूत हक्कांवर मर्यादा घालण्याचा हक्क संसदेला घटनेप्रमाणे देण्यात आला आहे.

### ८) राज्याची मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles of State Policy) :

राज्यकर्त्यांनी राज्य कसे चालववे, शासन करताना कोणती ध्येयधोरणे समोर ठेवावीत यासंबंधी मार्गदर्शन करणारी तत्त्वे भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागामध्ये ३६ ते ५१

कलमांमध्ये आहेत. कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी शासनाने कोणते कार्य करावे याबद्दलच्या सूचना या तत्त्वामध्ये दिलेल्या आहेत. मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप नैतिक आहे. राज्याने या तत्त्वांप्रमाणे कायदे व धोरणे ठरवावी; परंतु ती त्यांची नैतिक जबाबदारी आहे. त्यासाठी न्यायालयात दाद मागता येत नाही परंतु लोकमताद्वारे या तत्त्वांच्यासंबंधी राज्यकर्त्यांवर दडपण आणता येते.

### ९) मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties) :

१९७६ साली ४२ व्या घटनादुरूस्तीद्वारे भारतीय घटनेत दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला आहे. घटनेने मूलभूत हक्कांची हमी दिली त्याचबरोबर मूलभूत कर्तव्यांचेही बंधन नागरिकांवर घातले आहे. उदा. राष्ट्रध्वजाचा आदर राखणे, आपल्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे व एकात्मतेचे रक्षण करणे, राष्ट्रसेवेसाठी तयार असणे, पर्यावरणाचे संतुलन ठेवणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे इत्यादी कर्तव्यांचा समावेश घटनेच्या चौथ्या भागात कलम ५१ अ मध्ये आहे. स्वातंत्र्य आणि हक्कांचा उपभोग घेताना नागरिकांनी देशाप्रती व समाजाप्रती असलेल्या या कर्तव्यांचा विसर पडू देता कामा नये. या कर्तव्यांचे स्वरूप नैतिक आहे.

### १०) धर्मनिरपेक्ष राज्य (A Secular State) :

धर्मनिरपेक्ष राज्य हे भारतीय घटनेचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. भारत अनेकधर्मीय देश आहे. सर्व धार्मांच्या लोकांना संरक्षण मिळावे त्याचबरोबर देशाचे ऐक्य कायम राहावे या दृष्टीने भारतात धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना स्वीकारली आहे. पाकिस्तानने इस्लाम धर्म राज्याचा धर्म म्हणून घोषित केला आहे. १) भारताने राज्याचा असा कोणताही धर्म घोषित केला नाही. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये ❛धर्मनिरपेक्ष“ असा शब्दप्रयोग १९७६ साली ४२ व्या घटनादुरूस्तीप्रमाणे करण्यात आला आहे. २) सर्व धर्मांना समान वागणूक आणि संरक्षण भारतात आहे. शासनाचा धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप नाही. ३) सर्व नागरिकांना आपापल्या धर्मानुसार पूजा-अर्चा, श्रद्धा बाळगण्याचा अधिकार आहे म्हणजेच घटनेद्वारे धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला आहे.

### ११) प्रौढ मताधीकार (The Adoption of Universal Adult Suffrage) :

भारतीय राज्याचा विस्तारित भूप्रदेश, भारताची वाढती लोकसंख्या, दारिद्र्य, अशिक्षितता इत्यादी अडचणी असून सुद्धा भारतीय घटनाकारांनी भारतात प्रौढ मतदान पद्धती स्वीकारली आहे. भारतात निरक्षरता असूनही प्रौढ मतदानपद्धती स्वीकारणे हा घटनाकारांचा अतिशय धीट निर्णय होता. त्यामागे त्यांचा हेतू होता की जास्तीतजास्त लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळावी आणि खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही प्रस्थापित व्हावी. प्रौढ मताधिकार म्हणजे जात, धर्म, लिंग, शिक्षण, मालमत्ता यापैकी कोणतीही अट न ठेवता प्रत्येक १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या भारतीय नागरिकाला मतदानाचा हक्क प्राप्त होणे. वयाची अट पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाला राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी त्यामुळे प्राप्त झाली आहे. भारतीय लोकशाहीचा पाया व्यापक झाला आहे. समता प्रस्थापित झाली आहे.

### १२) एकेरी नागरिकत्व (Single Citizenship) :

भारतात अमेरिकेप्रमाणे दुहेरी नागरिकत्व नाही. भारतात संघराज्यपद्धती असूनसुद्धा भारतातील विशिष्ट परिस्थितीचा विचार करून एकेरी नागरिकत्वाची, फक्त राष्ट्रीय

नागरिकत्वाची तरतूद केलेली आहे. लोकांमध्ये एकात्मतेची भावना व राष्ट्रीय ऐक्य वाढावे हा त्यामागचा उद्देश होता.

**१३) राज्याचे स्वरूप सार्वभौम, लोकशाही, गणराज्य आहे :**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत भारत सार्वभौम प्रजासत्तात्मक, गणराज्य आहे असे म्हटले आहे. भारताची राज्यघटना लोकांनी निर्माण केली आणि लोकांनी स्वीकारली आहे. भारतीय गणराज्याचे पालकत्व भारतीय जनतेकडे आहे. भारत सार्वभौम आहे म्हणजे भरत स्वतंत्र देश आहे. कोणत्याही परकीय देशाचे वर्चस्व भारतावर नाही. भारत कॉमनवेल्थ राष्ट्रांचा सभासद असला तरी त्याचा कोणताही परिणाम भारताच्या सार्वभौमत्वावर होत नाही. भारतात लोकशाही आहे म्हणजे भारतात प्रातिनिधिक आणि जबाबदार शासनपद्धती आहे. भारतात गणराज्य आहे म्हणजे भारतीय राज्याचा प्रमुख राष्ट्रपती लोकांनी अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून दिलेला आहे.

**१४) स्वतंत्र शाखा आणि विभागांची निर्मिती :**

भारतीय राज्यघटनेने काही स्वतंत्र विभाग आणि शाखांची निर्मिती केली आहे.

१) मुक्त आणि स्वतंत्र निवडणुका व्हाव्यात म्हणून स्वतंत्र निवडणूक आयोगाची निर्मिती केली आहे.

२) केंद्र आणि राज्य शासनाचे (अकांऊन्टस) हिशेब तपासण्यासाठी (कंट्रोलर आणि ऑडीटर-जनरल) महालेखापाल.

३) अखिल भारतीय सेवांमध्ये नियुक्ती करण्यासाठी “युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन“ **U.P.S.C.**

४) राज्यसेवांमध्ये नियुक्ती करण्यास प्रत्येक राज्यामध्ये “स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशन“ उदा. महाराष्ट्रात M.P.S.C.

या सर्व शाखा सर्व प्रकारच्या दडपणांपासून मुक्त राहून स्वतंत्रपणे कार्य करतात. त्यासाठी राज्यघटनेद्वारे त्यांना त्यांच्या कार्यकालाची सुरक्षितता, नेमणूक यासंबंधी वेगळ्या तरतुदी केल्या आहेत.

**१५) आणीबाणीविषयक तरतुदी :**

देशाची सुरक्षा, एकात्मता, एकता आणि सार्वभौमत्वाच्या संरक्षणासाठी राज्यघटनेमध्ये आणिबाणीविषयक तरतुदी केल्या आहेत. अंतर्गत बंडाळी किंवा परकीय आक्रमण, युद्ध यामुळे राष्ट्राचे सार्वभौमत्व धोक्यात आले तर राष्ट्रीय आणीबाणी घोषित करून, सर्व सत्ता केंद्र शासनाकडे देण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे. या परिस्थितीत संघराज्याचे स्वरूप एकात्मक (Unitary State) राज्यामध्ये होऊन सर्व सत्ता केंद्र शासनाकडे असते. सर्व राज्यांना केंद्राच्या नियंत्रणाखाली कार्य करावे लागते.

**१६) त्रि-स्तरीय शासनव्यवस्था :**

भारतात केंद्र आणि राज्य अशी दुहेरी राज्यव्यवस्था आहे परंतु १९९२ साली ७३ वी आणि ७४ वी घटनादुरूस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्रि-स्तरीय व्यवस्था निर्माण

केली आहे. अशी व्यवस्था जगातील कोणत्याही देशात आढळून येत नाही. ७३ वी घटनादुरूस्ती पंचायतराज्य व्यवस्था यासंबंधी आणि ७४ वी घटनादुरूस्ती शहरी नागरी व्यवस्थेसंबंधी आहे. केंद्र, राज्य, स्थानिक अशा तीन स्तरांवर भारतीय शासनव्यवस्था आहे.

**१७) क्रांतीकारी स्वरूप :**

ज्या परंपरा, रूढी, प्रथा लोकांचे अन्याय व शोषणास कारणीभूत होत होत्या त्या प्रथा, परंपरा नष्ट करून समाजरचना, समता, न्याय मानवता निर्माण करण्याच्या दृष्टीने भारतीय राज्यघटनेमध्ये अनेक तरतुदी केल्या आहेत. दुर्बल घटकांसाठी, त्यांच्या उद्धारासाठी अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. हे सर्व बदल अतिशय क्रांतीकारी आहेत. भारतीय राज्यघटनेचे स्वरूप म्हणूनच क्रांतीकारी आहे असे दिसते.

## १.५ भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान (Philosophy of the Indian Constitution) :

### १.५.१ प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान म्हणजे घटनेची मूलभूत मूल्ये ज्यावर राज्य घटना आधारलेली आहे. प्रत्येक देशाच्या राज्यघटनेत स्वतःचे तत्त्वज्ञान असते. भारतीय राज्यघटनासुद्धा विशिष्ट तत्त्वे व मूल्यांवर आधारित आहे. ही तत्त्वे व मूल्ये आपल्या राज्यघङटनेचा पाया आहे त्यालाच आपण भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान म्हणतो. उद्देशपत्रिका, मूलभूत हक्क मार्गदर्शक तत्त्वांवरून भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान दिसून येते.

### १.५.२ तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकणारा ठराव :

घटनासमितीच्या पहिल्याच अधिवेशनात पंडित नेहरूंनी १३ डिसेंबर १९४६ या दिवशी ध्येयधोरणांविषयक ठराव मांडला होता. या ठरावात भारतीय राज्यघटनेची तात्त्विक बैठक स्पष्ट करण्यात आली होती. घटनासमितीने हा ठराव २२ जानेवारी १९४७ साली स्विकारला होता. ध्येयधोरणविषयक हा ठराव घटनासमितीच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य उगमस्थान आहे.

ध्येयधोरणविषयक ठरावात (Objective resolution) खालील मूल्यांचा उल्लेख होता.

१) भारतात एक स्वतंत्र, सार्वभौम, गणतंत्र निर्माण करणे.
२) भारताचे संघराज्य निर्माण करणे India shall be Union of States.
३) जनतेचे सार्वभौमत्व जाहीर करणे.
४) मूलभूत हक्कांची निर्मिती करणे आणि स्वातंत्र्य, समता, न्यायाची हमी लोकांना देणे.
५) अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांना खास सवलती देणे.
६) भारताची एकात्मता राखणे (maintained the integrity of the territory of the Republic)
७) जागतिक शांतता व मानवी कल्याणाला योगदान करून जगात मानाचे स्थान प्राप्त करणे.

राज्यघटनेच्या, ध्येयधोरणविषयक वरील ठरावामध्ये जे तत्त्वज्ञान दिसून येते तेच तत्त्वज्ञान राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये (सरनामा Preamble) मध्ये स्पष्ट झाले आहे.

### **१.५.३ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका (Preamble of the Indian Constitution)**

राज्यघटनेची प्रारंभीची प्रस्तावना किंवा सारांश म्हणजे राज्यघटनेची उद्देशपत्रिका होय. या उद्देशपत्रिकेवरून भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान आणि मुख्ये तत्त्वे दिसुन येतात.

**उद्देशपत्रिकेचे महत्त्व :**

घटनात्मक कायद्यांची शब्दरचना अंसदिग्ध असते तेव्हा त्या कायद्यांचा अर्थ लावण्यात सरनाम्याचा किंवा उद्देशपत्रिकेचा आधार न्यायालयाला घेता येतो. १९७३ साली 'केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य" या खटल्याचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने अशी भूमिका घेतली होती की, "सरनाम्यात शब्दांकित केलेली तत्त्वे, ही घटनेची प्राणभूत तत्त्वे असून, भारताच्या संसदेस घटनादुरूस्ती करताना या तत्त्वांची जाण ठेवावी लागेल. ही तत्त्वे ओलांडून जाणारी म्हणजेच घटनेच्या मूलभूत चौकटीस धक्का लावणारी वा घटनेच्या मूलभूत रचनेवर आघात करणारी दुरूस्ती न्यायालये मान्य करणार नाहीत."

यावरून उद्देशपत्रिकेचे महत्त्व लक्षात येते. भारतीय राज्यघटनेची मूलभूत चौकट (basic structure) उद्देशपत्रिकेत अंतर्भूत आहे. उद्देशपत्रिकेला भारतीय राज्यघटनेचा आत्मा म्हणतात, त्यावरून संपूर्ण राज्यघटनेचे तत्त्वज्ञान आणि सारांश स्पष्ट होतो. स्वतंत्र भारतात घटनाकार कोणत्या प्रकारचे राजकीय, सामाजिक, आर्थिक वातावरण निर्माण करू इच्छित होते याची जाणीव उद्देशपत्रिकेवरून होते. घटनाकर्त्यांची दृष्टी(vision) आणि स्वप्न उद्देशपत्रिकेतून व्यक्त होतात.

**भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका :**

उद्देशपत्रिकेची शब्दरचना खालीलप्रमाणे आहे.

"आम्ही भारतीय जनता, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारताच्या सर्व नागरिकांना

**न्याय** - सामाजिक, अर्थिक आणि राजकीय

**स्वातंत्र्य** - विचार, उच्चार, विश्वास, श्रद्धा, पूजा, उपासना यांचे


**समता** - दर्जा व संधीबाबत

**बंधुता** - व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता राखणारी ही उद्दिष्टे प्राप्त करून देण्याचा आमच्या या घटनासमितीत आज २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी निर्धार करीत आहोत. ही घटना आमच्यासाठी तयार, मंजूर व स्वीकृत करून ती आम्हाला अर्पण करीत आहोत."

'समाजवादी" आणि 'धर्मनिरपेक्ष" या शब्दांचा समावेश घटनेत बेचाळीसाव्या घटनादुरूस्तीनुसार करण्यात आला.

**उद्देशपत्रिकेचे विश्लेषण व राज्यघटनेचे तत्त्वज्ञान :**

**भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेवरून तीन गोष्टी स्पष्ट होतात.**




**१) भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान (Sources) :**

भारतीय घटनेची निर्मिती भारतीय जनतेच्या इच्छेतून झाली आहे. लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या घटनासमितीने घटनेची निर्मिती केली आहे. भारताची राज्यघटना ब्रिटिशांनी निर्माण केली नाही. उद्देशपत्रिकेतील सुरूवातीचे शब्द "आम्ही भारतीय लोक.... ही घटना आमच्यासाठी तयार, मान्य व स्वीकृत करीत आहोत" या शब्दप्रयोगावरून स्पष्ट होते की भारतीय घटनेचे उगमस्थान भारतीय जनताच आहे. जनतेचे सार्वभौमत्व भारतात आहे.

**२) भारतीय राज्याचे स्वरूप (Nature of the State) :**

उद्देशपत्रिकेच्या दुसऱ्या ओळीवरून भारतीय राज्याचे स्वरूप सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य असल्याचे स्पष्ट होते.

**१) सार्वभौम** - कोणत्याही देशांचे नियंत्रण किंवा परकीय वर्चस्व भारतावर नाही. अंतर्गत आणि बाह्य बाबतीत भारत सर्वोच्य आहे. देशांतील सर्व व्यक्ती व संस्था यांच्यावर भारतीय राज्याची सत्ता आहे. परराष्ट्रांशी भारताचे संबंध ठरविण्याचा हक्क भारतीय राज्याला आहे. भारत ब्रिटिश राष्ट्रकुल सभासद राष्ट्रसंघाचा (British Common Wealth) सभासद आहे. परंतु यामुळे भारताच्या सार्वभौमत्वावर कोणतीही मर्यादा येत नाही कारण हा स्वतंत्र राष्ट्राचा संघ आहे. या संघाचे भारताचे सभासदत्व ऐच्छिक आहे. इंग्रजांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे एवढाच उद्देश या संघाचे सभासदत्व घेण्यामागे आहे.

**२) समाजवादी** - भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये "समाजवाद" हा शब्द १९७६ च्या ४२ व्या घटनादुरूस्तीद्वारे समाविष्ट करण्यात आला आहे. संपत्ती आणि उत्पन्न यातील विषमता नष्ट करणे, सर्व लोकांना योग्य राहणीमानाचा दर्जा उपलब्ध करून देणे हा त्यामागे उद्देश होता. भारतीय समाजवाद खाजगी संपत्ती नष्ट करण्यास सांगत नाही परंतु खाजगी मालमत्तेच्या नियंत्रणावर भर देतो. संपत्ती व कारखान्यांचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण न करता मिश्र अर्थव्यवस्था आणि लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्यावर भर देतो. १९९२ नंतर भारतीय समाजवादी व्यवस्था खाजगीकरण आणि उदारीकरणावर भर देत आहे.

**३) धर्मनिरपेक्ष** - १९७६ साली ४२ व्या घटनादुरूस्तीद्वारे "धर्मनिरपेक्ष" हा शब्द भारतीय घटनेत समाविष्ट केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा तो एक भाग आहे. भारतीय राज्याने सर्व धर्मांना सारखेच संरक्षण दिले आहे. राज्याचा धर्म म्हणून कोणत्याही विशिष्ट धर्माला मान्यता दिली नाही. लोकांना पूजाअर्चा, श्रद्धा, उपासना इत्यादींचे स्वातंत्र्य,

धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काद्वारे देण्यात आले. भारतीय राज्यघटनेतील २५ ते २८ ही कलमे धार्मिक स्वातंत्र्यासंबंधी आहेत. याउलट पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, बर्मा, नेपाळ इत्यादी भारताच्या शेजारच्या राष्ट्रांनी विशिष्ट धर्माला मान्यता दिली. ही राष्ट्रे धर्मातीत राष्ट्रे आहेत. भारतीय राज्य धर्मनिरपेक्ष राज्य आहे.

**४) प्रजासत्ताक (लोकशाही)** - उद्देशपत्रिकेतील प्रजासत्ताक लोकशाही यामध्ये राजकीय लोकशाहीबरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही समाविष्ट आहे. भारतात प्रजासत्ताक राज्यपद्धती (a republic democracy) स्वीकारण्यात आली आहे. भारतीय लोकशाही राज्यपद्धतीच्या दोन बाजू आहेत. अ) लोकशाही एक शासनाचा प्रकार आहे २) दुसरे म्हणजे लोकशाही शासनास आवश्यक लोकशाही समाजाची स्थापना म्हणजेच आर्थिक आणि राजकीय लोकशाही होय. लोकशाही ही एक प्रातिनिधिक शासनपद्धती आहे. लोक आपले प्रतिनिधी निवडून देतात आणि ते प्रतिनिधी राज्यकारभार करतात. लोक या प्रातिनिधिक शासनावर संसदेद्वारे प्रत्यक्ष नियंत्रण ठेवतात. प्रातिनिधिक व जबाबदार शासनपद्धती म्हणजे लोकशाही होय. प्रौढ मताधिकारांमुळे प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळतो. प्रौढ मताधिकाराच्या माध्यमातून जनता शासनात सहभागी होऊ शकते. यालाच Political equality and justice म्हणतात. ब) लोकशाही समाजाची स्थापना (Social democracy) करणे. राजकीय लोकशाहीसाठी आवश्यक असते. त्यासाठी समान दर्जा व संधी, आर्थिक न्याय, संपत्तीचे समान वितरण, स्वातंत्र्य व समतेचा हक्क इत्यादींच्या तरतुदी राज्यघटनेत करण्यात आल्या आहेत. की ज्याच्यामुळे सामाजिक आणि आर्थिक लोकशाही भारतात निर्माण होऊ शकेल. सामाजिक लोकशाही म्हणजे जात, धर्म, लिंग, वंश इत्यादी कोणत्याही आधारांवर भेदभाव न करणे. आर्थिक लोकशाही म्हणजे श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी करणे. म्हणजेच भारतात democratic form of government बरोबरच democratic society स्थापन केली आहे.

**५) गणराज्य** - भारतात गणराज्य आहे म्हणजे भारतीय राज्याचा प्रमुख (राष्ट्रपती) अनुवंशिक नाही तर लोकांनी निवडून दिलेला आहे. शासन लोकांनी निवडून दिलेले व लोकांसाठी कार्य करणारे आहे.

### ३) भारतीय राज्याची उद्दिष्टे (Objectives of the Indians State) :

उद्देशपत्रिकेवरून भारतीय राज्याची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट होतात. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची अखंडता व एकात्मता राखणे भारतीय राज्याची मुख्य उद्दिष्टे आहेत.

**१) न्याय** - सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात न्याय प्रस्थापित करणे भारतीय राज्याचे उद्दिष्ट आहे. व्यक्तिहित आणि समाजहिताचा मेळ म्हणजे न्याय होय. सामाजिक न्याय म्हणजे समाजात कोणताही भेदभाव न करणे आणि सर्वांना समान वागणूक होय. आर्थिक न्याय म्हणजे आर्थिक क्षेत्रात समान संधी आणि दर्जा देणे होय. राजकीय न्यय म्हणजे कायद्यापुढे सर्व समान, सर्वांना समान राजकीय हक्क होय. सामाजिक आणि आर्थिक न्यायातून (Distributive Justice) ची कल्पना साकारते. सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय भारतात प्रस्थापित व्हावा म्हणूनच मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक क्षेत्रात भेदभाव न करणे, आर्थिक क्षेत्रात समान संधी व दर्जा उपलब्ध करून देणे, इत्यादी तरतुदी घटनेत करण्यात आल्या आहेत.

**२) स्वातंत्र्य** - व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास स्वातंत्र्याशिवाय शक्य नाही. म्हणून राज्यघटनेमध्ये विचार, संचार, पूजा, विश्वास, श्रद्धा इत्यादी प्रकारचे स्वातंत्र्य मूलभूत हक्कांच्या स्वरूपात नागरिकांना दिले आहे. व्यक्ती व सामाजाच्या विकासासाठी अशा तऱ्हेचे स्वातंत्र्य आवश्यक असते. स्वातंत्र्यामुळे व्यक्तीविकासाला पोषक वातावरण निर्माण होते. लोकशाही शासनपद्धतीसाठी नागरिकांना स्वातंत्र्य असणे आवश्यक असते परंतु स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही.

**३) समता** - समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नसतो म्हणूनच भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांमध्ये पहिलाच हक्क "समानतेचा" आहे. या हक्कानुसार कायद्यापुढे समानता, कायद्याचे सर्व नागरिकांना समान संरक्षण, प्रत्येकाला समान संधी व दर्जा देण्यात आला आहे. स्वातंत्र्य उपभोगण्याची व विकासाची समान संधी प्रत्येक नागरिकाला उपलब्ध करून देणे हा त्यामागे उद्देश आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीला विशेषाधिकार न देता; सर्व लोकांना कोणताही भेदभाव न करता विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजेच समता होय.

**४) बंधुता** - स्वातंत्र्य, समता, बंधुता या तिन्ही तत्त्वांचा मेळ साधला जातो तेव्हा व्यक्तीची प्रतिष्ठा राखली जाते आणि देशाची एकता आणि एकात्मतेचे रक्षण होते. प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठा मिळावी, माणूस म्हणून जगता यावे, प्रत्येकाला मानवी वागणूक मिळावी, न्याय मिळावा यासाठी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता राखणारा बंधुभाव निर्माण करणे भारतीय राज्याचे उद्दिष्ट आहे. भारत विविध धर्म, जाती, वंश असलेला देश आहे. या विविधतेतून भारतात एकता निर्माण व्हावी आणि राष्ट्राचे ऐक्य कायम राहावे यासाठी 'बंधुभाव' निर्माण करण्यावर भर आहे. राष्ट्राची एकता आणि एकात्मता राखण्यासाठी लोकांमध्ये बंधुभाव असावा लागतो. त्यासाठीच भारतीय संघराज्यातून फुटून वेगळे राज्य निर्माण करण्याचा कोणत्याही राज्याला अधिकार नाही.

भारतीय राज्यघटनेचे मूलभूत तत्त्वज्ञान उद्देशपत्रिकेमध्ये वरीलप्रमाणे मोजक्या शब्दात व्यक्त झाले आहे. या तत्त्वांच्या उद्दिष्टप्राप्तीसाठीच मार्गदर्शक तत्त्वांची यादी, मूलभूत हक्क इत्यादी तरतुदी घटनेत आहेत. देशाचे सार्वभौमत्व, ऐक्य व एकात्मता, धर्मनिरपेक्षता राखण्यासाठी मूलभूत कर्तव्यांचाही समावेश घटनेत आहे.

राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेवरून घटनेच्या मूलभूत चौकटीची वैशिष्ट्ये व्यक्त होतात. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता टिकविणे.
२) राज्याचे धर्मनिरपेक्ष स्वरूप कायम राखणे.
३) शासन सांसदीय पद्धतीचे ठेवणे.
४) प्रजासत्ताक, गणराज्याला धक्का न लावणे
५) नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करणे.
६) स्वतंत्र न्यायव्यवस्था राखणे.
७) देशात सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण करणे

**सारांश तक्ता : उद्देशपत्रिका आणि राज्यघटनेचे तत्त्वज्ञान**

- उद्देशपत्रिकेचा अर्थ आणि महत्त्व
- शब्दांकित उद्देशपत्रिका
- घटनेचे तत्त्वज्ञान
  - घटनेचे उगमस्थान लोकांचे सार्वभौमत्त्व
  - राज्याचे स्वरुप
    - १. सार्वभौम
    - २. समाजवादी
    - ३. धर्मनिरपेक्ष
    - ४. लोकशाही
    - ५. गणराज्य
  - घटनेचे उद्दिष्ट
    - १. न्याय
    - २. स्वातंत्र्य
    - ३. समता
    - ४. बंधुता
    - ५. राज्याची एकता व एकात्मता
- निष्कर्ष

## १.६ भारतीय राज्यघटनेचा विकास आणि विकसित तत्त्वज्ञान

भारतीय राज्यघटनेचा विकास घटना अंमलात आल्यापासून होत आहे. भारतीय राज्यघटनेच्या तत्त्वज्ञानामध्ये खालील बाबतीत विकास झाला आहे.

१) मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील संबंध

२) संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कांतून वगळण्यात आला आहे.

३) सांसदीय सर्वोच्चता आणि राज्यघटनेची मूळ (basic) रचना

४) सांसदीय सर्वोच्चता, आणि न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनचा अधिकार आणि न्यायालयाची सक्रियता (activism)

५) मूलभूत कर्तव्ये

६) राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये काही सुधारणा

### १) मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील संबंध

मूलभूत हक्क न्यायाधिष्ठित आहे. म्हणजे मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी आपण न्यायालयात जाऊ शकतो. मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप नैतिक आहे म्हणजे मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात जाता येत नाही. शासकीय धोरणे ठरविताना कायदे बनविताना मार्गदर्शक तत्त्वांचे भान शासनकर्त्यांना ठेवावे लागते. मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी; म्हणजेच सामाजिक, आर्थिक सुधारणांसाठी घटनेत दुरूस्ती करून उदा. १९७१ साली २५ वी घटनादुरूस्ती करून मूलभूत हक्कांमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या, आणि मूलभूत हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्त्वांना अधिक महत्त्व देण्यात आले.

१९७६ साली ४२ व्या घटनादुरूस्तीद्वारे असे नमूद करण्यात आले की राज्यघटनेच्या चौथ्या भागात असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी हक्कांच्यासाठी सुसंगत नाही म्हणून कोणताही कायदा अवैध घोषीत केला जाणार नाही. या दोन्ही घटनादुरूस्तींद्वारे राज्यघटनेच्या तत्त्वज्ञानात खुप मोठा बदल करण्यात आला आहे.

### २) संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कातून वगळण्यात आला

१९७९ मध्ये ४४ वी घटनादुरूस्तीद्वारे ‘संपत्तीचा हक्क“ मूलभूत हक्कांच्या यादीतून काढण्यात आला (कलम १९ (f) आणि कलम ३१ वगळण्यात आले.) संपत्तीचा हक्क घटनेतील नविन कलम ३०० (अ) प्रमाणे कायदेशीर हक्क म्हणून स्वीकारण्यात आला आहे.

### ३) सांसदीय सर्वोच्चता आणि राज्यघटनेची मूळ (Basic) रचना

भारतीय राज्यघटनेतील कलम ३६८ प्रमाणे घटनादुरूस्तीप्रक्रियेद्वारे राज्यघटनेत दुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे.

परंतु १९६७ साली गोलकनाथ विरूद्ध पंजाब राज्य या खटल्याच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने असा न्याय दिला होता की राज्यघटनेच्या भाग तीन मध्ये मूलभूत हक्कांसंदर्भात दुरूस्ती करण्यास संसद पात्र नाही.

त्यानंतर १९७१ साली २४ वी घटनादुरूस्ती घटनेत करण्यात आली. या घटनादुरूस्तीद्वारे राज्यघटनेतील घटनादुरूस्तीसंबंधीच्या कलम ३६८ मध्ये दुरूस्ती करण्यात येऊन असे नमूद करण्यात आले की राज्यघटनेतील कोणत्याही तरतूदीमध्ये (any provision) सुधारणा करण्याचा संसदेला अधिकार आहे. त्यानंतर १९७३ साली सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य संदर्भात पुन्हा एकदा असा न्याय दिला की संसदेला घटनेत दुरूस्तीकरण्याचा अधिकार असला तरी राज्यघटनेच्या मूळ रचनेमध्ये (basic structure) दुरूस्ती करण्याचा संसदेला अधिकार नाही. राज्यघटनेच्या मूळ रचनेमध्ये कोणत्या वैशिष्ट्यांचा समावेश होतो हे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयांद्वारे स्पष्ट केले आहे. ती वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) राज्याची सार्वभौम, लोकशाही, गणराज्य
२) सांसदीय शासनपद्धती
३) राज्याची धर्मनिरपेक्षता
४) संघराज्य
५) न्यायालयाचे स्वातंत्र्य
६) न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार
७) राज्यघटनेची सर्वोच्चता
८) कायद्याचे राज्य
९) राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये नमूद केलेली उद्दिष्टे
१०) व्यक्तीस्वातंत्र्य आणि व्यक्तिचा आदर
११) देशाची एकता आणि एकात्मकता.

### ४) सांसदीय सर्वोच्चता, न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आणि न्यायालयाची सक्रियता (activism) :

कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यातील बदलते संबंध भारतीय राज्यघटनेच्या विकसित तत्त्वज्ञानाची एक बाजू आहे. १९७१ साली २५ वी घटनादुरूस्तीद्वारे राज्यघटनेत कलम ३१ (क) समाविष्ट केले. त्या कलमाद्वारे असे नमूद करण्यात आले की ”मार्गदर्शक

तत्त्वांच्या अंमलबजावणी करणाऱ्या कोणत्याही कायद्याला न्यायालयाला अयोग्य ठरविण्याचा अधिकार नाही " याप्रमाणे या कलमाद्वारे सांसदीय सर्वोच्चतेला न्यायालयापेक्षा अधिक महत्त्व देण्यात आले होते.

१९७९ साली ४४ वी घटनादुरूस्ती करून पुन्हा एकदा न्यायालयीन पुनर्विलोकनाला महत्त्व देऊन न्यायालयीन सर्वोच्चता प्रस्थापित करण्यात आली. या न्यायालयीन पुनर्विलोकनच्या सर्वोच्चतेतून न्यायालयाची सक्रियता (judicial activism) च्या उदयास चालना मिळाली आहे. एका बाजूला न्यायव्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळ यांच्यातील मतभेदाचा उदय झाला.

### ५) मूलभूत कर्तव्ये :

१९७६ साली, ४२ वी घटनादुरूस्तीद्वारे, राज्यघटनेमध्ये कलम ५१ (अ) समावेश करण्यात आला आहे; ज्याद्वारे 'मूलभूत कर्तव्ये“ राज्यघटनेत समाविष्ट केली.

### ६) राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये (preamble) दुरुस्ती :

१९७६ साली, ४२ वी घटनादुरूस्ती करून भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये ९समाजवदी“ (socialist) या शब्दाची भर घालून भारतीय राज्याचे स्वरूप समाजवादी असल्याचे स्पष्ट केले. आर्थिक समता प्रस्थापित करणे हे त्यामागे उद्दिष्ट होते. संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कातून काढून, कायदेशीर हक्क करण्यात आला आणि संपत्तीच्या हक्कावर अनेक मर्यादा टाकण्यात आल्या. मिश्र अर्थव्यवस्थेला महत्त्व देण्यात आले होते. १९९२ पासून पुन्हा एकदा समाजवादाच्या ऐवजी खाजगीकरणाला (privatisation) महत्त्व देण्यात आले आहे.

४२ व्या घटनादुरूस्तीद्वारे राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये "धर्मनिरपेक्षता" या शब्दाची भर घालण्यात आली. सर्व धर्मांना राज्याचे समान स्थान राहील राज्याने कोणताही धर्म राज्याचा धर्म म्हणून घोषीत केला नाही. सर्व धर्मांना समान स्थान आणि आदर देण्यात आला. राज्यघटनेच्या कलम २५ ते २९ प्रमाणे 'धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क“ देण्यात आला आहे. धमर्निरपेक्षता राज्यघटनेच्या मूळ रचनेचा एक भाग आहे.

### १.७.१ : सारांश तक्ता

भारताची राज्यघटना

प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये

१) राज्यघटनेचा अर्थ

२) राज्यघटनेचे महत्त्व

### १.७.२ भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान

प्रस्तावना

राज्यघटेचे तत्त्वज्ञान

१) तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकणारा ठराव

२) भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका व त्यावरुन स्पष्ट होणारे राज्यघटनेचे तत्त्वज्ञान

### १.७.३ भारतीय राज्यघटनेचा विकास आणि विकसित तत्त्वज्ञान

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे संबंध | संपत्तीचा हक्क | सांसदीय सर्वोच्यता आणि राज्यघटनेची मूळ रचना | न्यायालयीन सक्रियता | मूलभूत कर्तव्ये | राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये सुधारणा |

## १.८ प्रश्न :

१) भारतीय राज्यघटनेच्या मुख्य वैशिष्ट्यांचे परीक्षण करा.

२) भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका सांगून त्यावरून स्पष्ट होणारे राज्यघटनेचे तत्त्वज्ञान सांगा

३) भारतीय राज्यघटनेचा विकास आणि विकसित तत्त्वज्ञानावर प्रकाश टाका.

❖❖❖❖

# २

# मूलभूत हक्क

## (Fundamental Rights)

**प्रकरणाची रचना :-**

२.१ उद्दीष्ट
२.२ प्रस्तावना
२.३ मूलभूत हक्कांचा अर्थ
२.४ मूलभूत हक्कांचे महत्त्व
२.५ मूलभूत हक्कांचे वर्गीकरण
२.६ समतेचा हक्क
२.७ स्वातंत्र्याचा हक्क
२.८ शोषणाविरूद्धचा हक्क
२.९ धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क
२.१० सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क
२.११ घटनात्मक उपाययोजनेचा हक्क
२.१२ ४४ वी घटनादुरूस्ती आणि संपत्तीचा हक्क
२.१३ मूलभूत हक्कांची वैशिष्ट्ये
२.१४ प्रश्न

## २.१ उद्दिष्ट

प्रत्येक नागरिकासाठी मूलभूत हक्कांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. मानवी व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी मूलभूत हक्क आवश्यक असतात त्यादृष्टीने मूलभूत हक्कांचा अभ्यास गरजेचा आहे.

## २.२ प्रस्तावना

घटनाकारांनी व्यक्तिस्वातंत्र्याला संरक्षण मिळावे आणि समाजातील प्रत्येकाला सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय मिळावा, प्रत्येकाला स्वविकास करता यावा यादृष्टीने भारतीय नागरिकांसाठी मूलभूत हक्कांची यादी घटनेमध्ये समाविष्ट केली आहे.

## २.३ मूलभूत हक्क म्हणजे काय?

ज्या हक्कांना राज्यघटनेद्वारे हमी आणि संरक्षण असते अशा हक्कांना मूलभूत हक्क म्हणतात. व्यक्तीसाठी आवश्यक असणाऱ्या स्वातंत्र्याचा; जी स्वातंत्र्ये माणूस म्हणून


जगण्यासाठी (essential) आवश्यक आणि मूलभूत (basic) असतात; त्या स्वतंत्र्याचा मूलभूत हक्कांमध्ये समावेश असतो.

## २.४ मूलभूत हक्कांचे महत्त्व :

नागरिकांना आवश्यक स्वातंत्र्ये हक्कांच्या स्वरूपात मिळतात; राज्याकडून हक्क स्वातंत्र्याच्या संरक्षणाची हमी मिळते तेव्हा अर्थपूर्ण जीवन जगणे व्यक्तीला शक्य होते. १) हक्कांमुळे सुसंस्कृत जीवन जगण्यास अनुकूल परिस्थिती नागरिकांना उपलब्ध होते. २) लोकशाही यशस्वी होण्यासाठी मूलभूत हक्कांची आवश्यकता असते कारण या हक्कांमुळे लोकांना स्वातंत्र्यप्राप्ती होते. त्याचा उपयोग जागरूक लोकमत व लोकांचा विकास होण्यास लोकांचा शासनातील सहभाग वाढण्यास होते. ३) हक्कांमुळे लोकांना स्वातंत्र्याची हमी मिळते. भारतासारख्या धर्म, जात, भाषा इत्यादी विविधता असलेल्या देशांमध्ये लोकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी, लोकांमध्ये सलोख्याचे, सामंजस्याचे वातावरण निर्माण होण्यासाठी, समाजात एकसंघता येण्यास हक्कांची हमी आवश्यक असते. हक्कांमुळे स्वातंत्र्याबरोबरच व्यक्तीला सामाजिक, आर्थिक न्यायाची हमी मिळते. ४) अल्पसंख्याक आणि दुर्बलवंचित घटकांना संरक्षण मिळते. ५) मूलभूत हक्कांमुळे शासनावर मर्यादा येतात. अनिर्बंध शासनाला पायबंद घातला जातो. राज्यात कायद्याचे राज्य निर्माण होण्यास मदत होते.

## २.५ मूलभूत हक्कांचे वर्गिकरण :

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम नं. १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची यादी समाविष्ट आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागाला ७भारताची मॅग्नाचार्टा“ म्हणतात. मॅग्नाचार्टा म्हणजे मूलभूत हक्कांसंबंधीचे पहिले लिखित डॉक्युमेन्ट होय. जे १२१५ साली इंग्लंडच्या राजाने इंग्लंडमध्ये केले होते. मूलभूत हक्कांच्या बाबतीत घटनाकर्त्यांनी अमेरिकेच्या घटनेतील “बिल ऑफ राईट्स” पासून प्रेरणा घेतली होती. मूळ भारतीय राज्यघटनेनुसार ७ मूलभूत हक्क होते. परंतु १९७८ साली; ४४ व्या घटनादुरूस्तीनुसार राज्यघटनेतील ७संपत्तीचा हक्क“ मूलभूत हक्कांतून काढून टाकण्यात आला आहे. आता एकूण ६ मूलभूत हक्क आहेत. जगातील सर्व राज्यघटनांपेक्षा भारतात मूलभूत हक्क अतिशय सविस्तरपणे घटनेत नमूद केले आहेत.




## २.६ समतेचा हक्क (Right to Equiality)

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीमध्ये पहिलाच मूलभूत हक्क समतेचा हक्क आहे.

**२.६.१ समतेच्या हक्काचे महत्त्व** - समान संधी व दर्जा असल्याशिवाय समाजातील प्रत्येक व्यक्तीला विकास करणे शक्य नसते. लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होण्यास समतेचा हक्क असणे अतिशय महत्त्वाचे आहे. या हक्कांशिवाय इतर हक्कांना काहीच अर्थ उरत नाही. राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ या कलमांमध्ये या हक्कांचा समावेश आहे.

**२.६.२ समतेच्या हक्काच्या पाच बाजू (Five Aspects) आहेत.**

| कलम १४ | कलम १५ | कलम १६ | कलम १७ | कलम १८ |
|---|---|---|---|---|
| कायद्यापुढे समता<br>Equality before Law | सार्वजनिक स्थळी भेदभाव नाही<br>No Discrimination at Public Places | समान संधी व दर्जा<br>(Equal status and opportunity) | अस्पृश्यता पाळणे गुन्हा | पदव्यांचे संपुष्टीकरण |

**१) कायद्यापुढे समता (Equality before Law) कलम १४ -**

समतेच्या हक्कांची पहिली बाजू म्हणजे कायद्यापुढे समता होय. सर्व नागरिकांना कायद्याचे समान संरक्षण होय. कायद्यापुढे जात, धर्म, लिंग इत्यादी आधारावर भेदभाव करण्यात येणार नाही. याचाच अर्थ कायद्याची सर्वोच्चता असेल. कायद्यापुढे श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव असणार नाही. कायद्यापुढे सर्व नागरिकांना समान वागविण्यात येईल. म्हणजेच ९कायद्याचे राज्य" होय. कायद्याचे सर्व नागरिकांना समान संरक्षण; ज्यामुळे कायद्याप्रमाणे सर्व नागरिकांना समान दर्जा व संधी होय.

**अपवाद** - राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती, पंतप्रधान यांना वेगळे स्थान काही बाबतीत असू शकेल.

**२) सार्वजनिक स्थळी भेदभाव नाही (No Discrimination at Public Places) कलम १५ -**

कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी उदा. स्टेशन, करमणुकीची जागा, विहिर, तलाव, रस्ता इत्यादी ठिकाणी धर्म, जात, लिंग, स्थान यावरून भेदभाव करण्यात येणार नाही.

**अपवाद** - सामाजिक व आर्थिक दृष्टीने मागासलेल्या वर्गांसाठी स्त्रियांसाठी, लहान मुलांसाठी विशेष तरतुद राज्य करू शकते.

**३) सार्वजनीक नोकऱ्यांमधील समान संधी व दर्जा (equal status and opportunity) कलम १६**

राज्यातील सरकारी नोकऱ्यांमध्ये नोकरीची समान संधी सर्व नागरिकांना देण्यात येईल. कोणत्याही पदावर काही जागा राखून ठेवता येतात.

**अपवाद** - मागासलेल्या जाती जमातींच्यासाठी सरकारी नोकरीत पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी राज्याला काही जागा राखून ठेवता येतात.

### ४) अस्पृश्यता निवारण (Abolition of Untouchability) कलम १७ -

अस्पृश्यता पाळणे कायद्याप्रमाणे गुन्हा मानला जातो. अस्पृश्यतेचे पालन करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरते. १९५५ साली अस्पृश्यता निवारण कायदा करण्यात आला आहे. या कायद्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीला अस्पृश्य म्हणून शाळा, दवाखाना किंवा इतर ठिकाणी प्रवेश नाकारता येणार नाही. अस्पृश्य व्यक्तीचा अपमान करणे, कनिष्ठ प्रतीची वागणूक देणे, अस्पृश्यतेचे समर्थन करणे गुन्हा आहे.

### ५) पदव्यांची समाप्ती (Abolition of Titles) कलम १८ -

पूर्वी सरकारतर्फे रावसाहेब, रावबहादुर इत्यादी पदव्या दिल्या जात. पदवीबरोबरच त्या व्यक्तीला विशेष अधिकार व दर्जा देण्यात येत असे त्यामुळे सामाजिक विषमता आणि भेदभाव निर्माण झाला होता. असा भेदभाव नष्ट करण्यासाठीच पदव्या देणे कायद्याने बंद केले आहे. आता शैक्षणिक व सैनिक क्षेत्रांतील विशेष कामगिरीसाठी पदव्या देण्यात येतात पण त्यामुळे त्या व्यक्तीला विशेष अधिकार आणि सवलती प्राप्त होत नाहीत.

**सारांश** - भारतातील जातीभेद, लिंगभेद इत्यादी मानवनिर्मित भेदभाव व विषमता नष्ट करणे आणि राज्यात व समाजात समता स्थापित करणे हे या हक्कांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## २.७ स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom)

भारतीय राज्यघटनेतील नागरिकांचा दुसरा महत्त्वाचा हक्क म्हणजे स्वातंत्र्याचा हक्क होय.

### २.७.१ स्वातंत्र्याच्या हक्काचे महत्त्व :

लोकांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आधार आहे हा हक्क सर्व हक्कांचा आत्मा आहे. या हक्कांशिवाय व्यक्तीचा सर्वांगिण विकास होणे शक्यच नाही. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ ते २२ मध्ये या हक्कांच्या तरतुदी आहेत. उद्देशपत्रिकेचे 'स्वातंत्र्य' राज्यघटनेचे उद्दिष्ट आहे ते उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राज्यघटनेद्वारे लोकांना स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क देण्यात आला आहे.

### २.७.२ स्वातंत्र्याच्या हक्कांच्या विविध बाजू खालीलप्रमाणे आहेत :

| कलम १९ नुसार खालील सहा प्रकारचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकाला प्राप्त झाले. | कलम २० अपराधी व्यक्तीला दोष सिद्ध करण्याचे स्वातंत्र्य (Protection in respect of conversion for Offences) | कलम २१ जीवित स्वातंत्र्य (Protection of Life) | कलम २२ बेकायदेशीर अटकेबाबत (Protection against Arrest & Detention) |
|---|---|---|---|
| १) भाषण आणि विचार स्वातंत्र्य (Freedom of Speech & Expression)<br>२) सभा भरविण्याचे स्वातंत्र्य (To Assemble Peacefully)<br>३) संस्था आणि संघ स्थापन करण्याचे (To form Associations or Unions)<br>४) संचार स्वातंत्र्य (Freedom of Movements)<br>५) भारताच्या कोणत्याहीभागात वास्तव करण्याचे, स्थायी होण्याचे स्वातंत्र्य (To reside and Settle in any Part of the Indian Territory)<br>६) कोणताही व्यवसाय व व्यापार करण्याचे (To Practise any Profession, Trade or Business) | | | |

**२.७.३** कलम १९ प्रमाणे भारतातील प्रत्येक नागरिकाला ६ प्रकारचे स्वातंत्र्य आहे.

१) भाषणस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य
२) सभा घेण्याचे स्वातंत्र्य
३) संस्था आणि संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य
४) संचार स्वातंत्र्य.
५) स्थायी होण्यचे वास्तव करण्याचे स्वातंत्र्य
६) कोणतेही व्यापार व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य

मूळ राज्यघटनेप्रमाणे कलम १९ मध्ये सात प्रकारच्या व्यक्तीस्वातंत्र्यांचा समावेश होता परंतु मालमत्तेचा अधिकार त्यातून काढून टाकल्यामुळे स्वातंत्र्याच्या हक्कामध्ये सहा प्रकारच्या स्वातंत्र्याचा समावेश होतो.

**१) भाषण आणि विचार स्वातंत्र्य :** भाषण करण्याचा आणि विचार व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्यामध्येच मुद्रणस्वातंत्र्याचा (freedom of press) हक्क अंतर्भूत आहे. या हक्कांवर खालील मर्यादा आहेत. राज्याचे संरक्षण, परराज्याशी असलेले मित्रत्वाचे संबंध, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था ह्यांना बाधा आणणारे आणि भारताची एकात्मता, सभ्यता नीतीमत्ता, कोर्टाचा अवमान करणाऱ्या, कोणाची बदनामी करणाऱ्या, गुन्ह्यास उत्तेजन देणाऱ्या भाषणांवर व विचारस्वातंत्र्यावर बंधने आहेत. कायदा करून 'योग्य ती बंधने" घालण्याचा अधिकार शासनाला आहे.

**२) सभा घेण्याचे स्वातंत्र्य -** शांततापूर्वक परंतु शस्त्राशिवाय सभा भरविण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला आहे. मिरवणुका व संमेलने नागरिकांना भरविता येतात परंतु या हक्कावर भारताची एकात्मता, सार्वभौमत्व, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी योग्य ती बंधने सरकार घालू शकते.

**३) संस्था आणि संघ स्थापन करण्याचा हक्क -** संस्था आणि संघ स्थापन करण्याचा हक्क भारतीय नागरिकांना आहे. त्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वरूपाच्या संघटना स्थापन करता येतात. परंतु एखाद्या संघ व संस्थेद्वारे सार्वजनिक शांततेला धोका उत्पन्न होत असेल किंवा भारताची एकात्मता, ऐक्य ह्यांना बाधा निर्माण होत असेल तर तो संघ अथवा संस्था बेकायदेशीर घोषीत करण्याचा सरकारला हक्क आहे. उदा. १९७५ च्या आणीबाणीच्या काळी तत्कालीन शासनाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) व इतर संस्था व संघटनांवर सार्वजनिक शांततेला धोका निर्माण करणारे म्हणून बंदी घातली होती.

**४) संचार स्वातंत्र्य -** भारतीय प्रदेशात संचार करण्याचे स्वातंत्र्य आहे परंतु हा हक्क अमर्यादित नाही. लोकहिताच्या आणि मागासलेल्या जातींच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती बंधने सरकारला घालता येतात. कायद्याने स्थानबद्ध केलेल्या व्यक्तींचे संचारस्वातंत्र्य नष्ट होते. सरकारने 'सुरक्षित' म्हणून घोषित केलेल्या जागी सरकारच्या परवानगीशिवाय संचार करता येत नाही.

**५) स्थायी होण्याचे, वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य -** भारताच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचे आणि स्थायी होण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु सार्वजनिक हितासाठी या स्वातंत्र्यावर सरकार बंधने घालू शकेल.

**६) व्यवसाय स्वातंत्र्य -** कोणताही धंदा, व्यवसाय किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य नागरिकांना आहे. एखादा व्यवसाय करण्यासाठक्ष विशिष्ट पात्रतेची अट सरकार घालू शकेल. एखादा व्यवसाय अंशतः अथवा पूर्णतः स्वतःकडे घेण्याचा अधिकार सरकारला आहे.

राज्यघटनेच्या १९ व्या कलमामध्ये वरील सहा प्रकारच्या स्वातंत्र्यांचा समावेश आहे घटनेच्या २०, २१ आणि २२ व्या कलमाप्रमाणे वरील १९ व्या कलमातील व्यक्तिस्वातंत्र्याची हमी देण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेने व्यक्तिस्वातंत्र्य (individual liberty) आणि सामाजिक नियंत्रण (Social Control) यांचा मेळ घातला आहे. म्हणूनच मूलभूत हक्कांची यादी राज्यघटनेने व्यक्तिस्वातंत्र्यासाठी दिली आहे आणि सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने त्यावर बंधने घातली आहे.

**कलम २० गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्यासंदर्भातील संरक्षण (Act - 20 Protection in respect of conviction for offence) :**

अपराधी व्यक्तीला दोष सिद्ध करण्याबाबत संरक्षण देण्यात आले आहे.

१) जोपर्यंत कायद्यानुसार एखाद्याने गुन्हा केला आहे असे सिद्ध होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला अपराधासाठी शिक्षा देता येत नाही.

२) एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त शिक्षा दिली जाणार नाही.

३) कायद्याने सांगितलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा व्यक्तीला देता येत नाही.

४) स्वतःविरूद्ध साक्ष देण्यासाठी एखाद्याला भाग पाडले जाणार नाही किंवा सक्ती केली जाऊ शकत नाही.

**कलम २१ जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण (Protection of Life and Personal Liberty) :**

स्वातंत्र्याच्या हक्काची तिसरी बाजू म्हणजे जीवित स्वातंत्र्य होय. कोणत्याही व्यक्तीचे जीवनस्वातंत्र्य अथवा वैयक्तिक स्वातंत्र्य कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीशिवाय अन्य तऱ्हेने हिरावून घेतले जाणार नाही.

**कलम २१ )अ) - शिक्षणाचा हक्क (Right to Education) :**

६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षणाचा मूलभूत हक्क आहे. २००२ साली ८६ वी घटनादुरूस्ती 'करून प्राथमिक शिक्षणाचा हक्क' मूलभूत हक्क करण्यात आला. त्यासाठी २१ 'अ' घटनेत समाविष्ट करण्यात आले.

**कलम २२ अटक व स्थानबद्धतेविरुद्ध संरक्षण (Protection against arrest and Detention) :**

बेकायदेशीर अटकेपासून संरक्षण देण्यात आले आहे. या कलमाच्या तीन बाजू आहेत.

१) सर्वसाधारण कायद्याप्रमाणे अटक झाल्यास.

२) प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याप्रमाणे अटक झाल्यास

३) सर्वसाधारण कायद्याप्रमाणे अटक झाल्यास

१) अटक झालेल्या व्यक्तीस, कोणत्या कारणांसाठी अटक झाली हे जाणून घेण्याचा अधिकार आहे.
२) स्वतःच्या पसंतीनुसार वकिलाचा सल्ला घेऊन त्यांच्यामार्फत आपला बचाव करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला आहे.
३) एखाद्या व्यक्तीला अटक केल्यानंतर चोवीस तासांच्या आत आपला बचाव करणे आवश्यक असते. न्यायाधीशाच्या परवानगीशिवाय अधिक काळ व्यक्तीला स्थानबद्धतेत ठेवता येत नाही.

प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायद्यानुसार अटक झालेल्या व्यक्तीला वरील नियम लागू होत नाहीत.

**कलम २२ चा दुसरा भाग -** प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायद्याप्रमाणे अटक झाल्यास - प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायदा (Preventive Detention Act) खालीलप्रमाणे आहे.

१९५० साली हा कायदा पास झाला. भारताच्या सुरक्षिततेला धोका उत्पन्न करणाऱ्या, राज्यातील शांतता आणि सुरक्षिततेला बाधा आणणाऱ्या, देशाच्या आवश्यक सेवांना विरोध करणाऱ्या व्यक्तींना ह्या कायद्यानुसार स्थानबद्ध करता येते. स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीला कोणत्या कारणासाठी स्थानबद्ध केले ते सांगण्याचे बंधन सरकारवर नाही.


व्यक्तीला एखाद्या गुन्ह्यासाठी शिक्षा देणे हा या कायद्याचा उद्देश नाही तर व्यक्तीला गुन्ह्यापासून प्रतिबंध करणे (To prevent from crime) हा उद्देश या कायद्याचा आहे.

ह्या कायद्याखाली अटक केलेल्या व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी स्थानबद्ध करता येत नाही.

हा कायदा व्यक्तीस्वातंत्र्याला बाधक आहे. विरोधकांना नेस्तनाबुत करण्यासाठी या कायद्याचा उपयोग सत्ताधारी करू शकतात असे टीकाकारांचे मत आहे.

भारतामध्ये फुटीर प्रवृत्तींना पायबंद घालण्याच्या दृष्टीने आणि भारताची एकता व स्वातंत्र्य राखण्याच्या दृष्टीने हा कायदा योग्य आहे. ह्या कायद्यामध्ये १९७१ साली (MISA) "मिसा" 'अंतर्गत सुरक्षा कायदा' १९८५ साली (TADA टाडा) 'टेररीस्ट अॅन्ड डिसक्रीप्टीव्ह अॅक्टीव्हिटीज अॅक्ट" याप्रमाणे बदल करण्यात आले होते.

## २.८ शोषणाविरूद्ध हक्क (Right Against Exploitation) :



**२.८.१ महत्त्व** - भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये 'व्यक्तीची प्रतिष्ठा' जपली जाईल असे आश्वासन दिले आहे. भारतामध्ये फार पूर्वीपासून वेठबिगारी, देवदासी पद्धती होती. जमीनदारांचे नियंत्रण मजूर वर्गावर होते. मागासलेल्या जाती, स्त्रिया यांचे शोषण होत होते. अशा प्रकारच्या शोषणाला प्रतिबंध करण्यासाठी हा हक्क देण्यात आला आहे. या हक्कामुळे कोणतीही व्यक्ति किंवा राज्य समाजातील दुर्बल घटकांचे शोषण करू शकत नाही आणि त्यामुळे व्यक्ति प्रतिष्ठा (dignity of the individual) जपली जाईल याची हमी देण्यात आली आहे.

**२.८.२ या हक्काच्या बाजू** -

**१) मानवाची क्रयविक्रयास बंदी** - कलम २३ प्रमाणे माणसांची विक्री, वेठबिगारी, जबरदस्तीने काम करून घेणे. मुलींची विक्री यांना प्रतिबंध आहे. या कलमाचे उल्लंघन करणाऱ्याला कायद्यानुसार शिक्षा आहे.

**२) १४ वर्षांखालील मुलांना धोक्याच्या ठिकाणी कामास ठेवण्याची बंदी** - कलम २४ प्रमाणे १४ वर्षांच्या आतील मुलामुलींना खाणी किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी आहे.

**२.८.३ मर्यादा** - सार्वजनिक हिताच्या दृष्टीने विशिष्ट परिस्थितीमध्ये सरकार लोकांकडून सक्तीने काम करून घेऊ शकतात. उदा. ळाष्करात भरती होण्यास सक्ती करणे.

## २.९ धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom of Religion)

**२.९.१ धार्मिक स्वातंत्र्याच्या विविध बाजू :**

| कलम २५ | कलम २६ | कलम २७ | कलम २८ |
|---|---|---|---|
| स्वमतानुसार कोणताही धर्म स्वीकारण्याचा, त्याप्रमाणे आचार प्रचार, उपासना, करण्याचे स्वातंत्र्य आहे. | धर्मसंस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य | कोणत्याही धर्मांच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा गोळा करण्यात येणार नाही | शिक्षणसंस्थामध्ये धार्मिक शिक्षण देण्यावर बंदी |

**२.९.२ धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा :**

१) हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्था, नीती, आरोग्य यांच्या आड येता कामा नये.

२) समाजसुधारणा करण्यासाठी आणि समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी सरकार वाईट प्रथांवर बंदी घालू शकते.

**२.९.३ धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व :** राज्यघटनेवर 'धर्मनिरपेक्ष' (Secularism) राज्याची हमी देण्यात आली.

भारत अनेकधर्मियांचा देश असल्यामुळे सर्व नागरिकांना धर्मस्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यामुळे सर्वच धर्मीय लोकांमध्ये सुरक्षिततेची व ऐक्याची भावना निर्माण होण्यास मदत झाली आहे. या हक्कामुळे भारतात 'धर्मनिरपेक्ष राज्याची' स्थापना झालेली आहे.

## २.१० सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (Cultural and Educational Rights) :

२.१०.१ या हक्काच्या बाजू :

**कलम २९**

१. भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वतःची भाषा, लिपी व संस्कृती जोपासना करण्याचा हक्क आहे.

२. जात, धर्म, भाषा, वंश इत्यादी आधारांवर भेदभाव करून कोणत्याही राज्याच्या मदतीवर चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत कुणालाही प्रवेश नाकारला जाऊ शकत नाही.
करण्यात आली आहे.

**कलम ३०**

या कलमाप्रमाणे भाषिक व धार्मिक अल्पसंख्याकांना शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचा हक्क आहे. अशा संस्थांमध्ये अल्प संख्याकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेतून शिक्षण देण्याचा अधिकार आहे. अशा शिक्षणसंस्थांना अनुदान देतेवेळी राज्य कसलाही भेदभाव करणार नाही अशी तरतूद आहे.

**२.१०.२ या हक्काचे महत्त्व** - भारत विविध भाषीक, धर्मीय, वंशीय देश आहे. प्रत्येकाला आपल्या संस्कृतीचे रक्षण व्हावे असे वाटते. अल्पसंख्यांकांना संरक्षण मिळावे. त्यांना त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करता यावे म्हणून हा हक्क देण्यात आला आहे. या हक्कामुळे अल्पसंख्यांकांना न्याय तर मिळालाच त्याशिवाय भारतात "विविधतेतून एकता" निर्माण होण्यास मदत झाली आहे.

## २.११ घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (Right to Constitutional Remedies) :

**२.११.१** भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ ते ३५ मूलभूत हक्कांचे संरक्षण करणारा घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे. हक्कांना संरक्षणात्मक हमी नसेल तर प्रत्येक्षात हक्कांना अर्थ उरत नाही. मूलभूत हक्कांवर आक्रमण झाले तर घटनात्मक उपाययोजनेच्या हक्काप्रमाणे नागरिक सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात दाद मागू शकतात. सर्वोच्च न्यायालयात (कलम ३२ प्रमाणे) आणि उच्च न्यायालयात (कलम २२६ प्रमाणे) मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी खालील पांच प्रकारचे आदेश देतात. हा हक्क आपल्या राज्यघटनेचा आत्मा व हृदय आहे. राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीत कलम ३२ चा समावेश होतो. कलम ३२ प्रमाणे मूलभूत हक्कांची हमी नागरिकांना देण्यात आली ्हे. मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांना न्यायालयाकडे पांच प्रकारचे अर्ज करता येतात. हे अर्ज खालीलप्रमाणे आहेत.

**२.११.२**

| बंदी प्रत्यक्षीकरण | परमादेश | प्रतिषेद | अधिकारपृच्छा | उत्प्रेक्षण |
|---|---|---|---|---|
| (Hebeas Corpus) बेकायदेशीर अटकेविरुद्ध संरक्षण | (Mandamus) कर्तव्ये करण्यास भाग पाडणारा आदेश देणे | (Prohibition) वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयाला आदेश देतात | (Quo-Warranto) बेकायदेशीर पदग्रहणाला आव्हानात्मक विचारणा | (Certiorari) न्यायालयाचा आदेश |

१) **बंदी प्रत्यक्षीकरण (Hebeas Cropus)** - एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीर अटक झाली असेल किंवा अन्यायपूर्वक दंड झाला असेल तर, अटकेचे कारण विचारण्यासाठी त्या व्यक्तीला अगर तिच्या नातेवाईकांना न्यायालयाकडे अर्ज करता येतो. अटक झालेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर करावे असा आदेश न्यायालय देते. त्यानंतर न्यायालय त्या व्यक्तीवर झालेल्या अन्यायाची चौकशी करते. अटक बेकायदेशीर आहे असे सिद्ध झाल्यास त्या व्यक्तीची तात्काळ सुटका करावी असा आदेश न्यायालय देते. या तरतुदीमुळे कोणत्याही व्यक्तीला सरकार अगर कोणतीही संस्था बेकायदेशीरीत्या अटकेत ठेवू शकत नाही.

२) **परमादेश (Mandamus)** - शब्दशः 'आम्ही आज्ञा देतो' असा त्याचा अर्थ आहे. शासन किंवा एखादी व्यक्ती, संस्था आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसल्यामुळे एखाद्यावर अन्याय होत असेल तर; तो अन्याय दूर व्हावा म्हणून न्यायालयाकडे हा अर्ज करता येतो. न्यायालय चौकशी करून त्याप्रमाणे ताबडतोब अन्याय नाहीसा करावा असा आदेश देते. उदा. फॅक्टरी ॲक्टप्रमाणे कायद्यानुसार मजुराला नुकसानभरपाई द्यावी लागते. ती देण्याची टाळाटाळ मालक करीत असेल तर असा अर्ज न्यायालयाकडे करता येतो.

३) **प्रतिषेद (Prohibition)** - उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला एखादा खटला चालविण्यास मनाई हुकूम देणे म्हणजे प्रतिषेद होय. कनिष्ठ न्यायालयाला एखादा खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकार नसेल तर त्या खटल्याची सुनावणी स्थगित करण्यासाठी उच्च न्यायालयाकडे असा अर्ज करता येतो.

४) **अधिकारपृच्छा (Quo-Warranto)** - बेकायदेशीर पदग्रहणाला आव्हानात्मक विचारणा करण्याचा हक्क या अर्जामुळे प्राप्त होतो. कोणतेही सरकारी किंवा सार्वजनिक पद पात्रता नसताना जर कोणी भूषवीत असेल त्या व्यक्तीच्या पदग्रहणाला विचारणा करण्याचा अधिकार व्यक्तीला आहे. परंतु ज्या पदाच्या बाबतीत वाद असेल त्या पदाशी त्या व्यक्तीचे हितसंबंध गुंतलेले असावे. न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास बेकायदेशीरपणे पद धारण करणाऱ्या व्यक्तीला ते पद सोडण्याची न्यायालय आज्ञा देते.

५) **उत्प्रेक्षण (Certiorari)** - कनिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज म्हणजे उत्प्रेक्षण होय. या पाच प्रकारच्या अर्जाद्वारे कोणतीही व्यक्ती मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयात जाऊ शकते.

**कलम ३३ -** लष्कर आणि पोलीस दलातील लोकांच्या मूलभूत हक्कांसंबंधी हे कलम आहे. कलम ३३ प्रमाणे संसदेला लष्कर आणि पोलीस दलातील लोकाच्या मूलभूत हक्कांवर बंधने घालण्याचा अधिकार आहे.

**कलम ३४ -** घटक राज्यांमध्ये किंवा केंद्रात कुठेही लष्करी कायदा पुकारला असेल तर त्यावेळी मूलभूत हक्कांवर बंधने घालण्याचा अधिकार संसदेला या कलमाप्रमाणे मिळतो.

**कलम ३५ -** ज्या मूलभूत हक्कांच्या संदर्भात संसदेने कायदा करावा अशी अपेक्षा असते त्याबाबतीत कायदा करून शिक्षेची तरतूद करण्याचा अधिकार कलम ३५ प्रमाणे संसदेत प्राप्त झाला आहे.

## २.१२ - ४२ वी घटनादुरूस्ती आणि संपत्तीचा हक्क (Right to Property) :

घटनेच्या ३१ व्या कलमाप्रमाणे भारतीय नागरिकांना संपत्तीचा हक्क होता. शासनाने या कलमांमध्ये अनेकदा दुरूस्त्या केल्या आणि या हक्कांवर मर्यादा टाकल्या होत्या. १९७८ साली ४४ व्या घटनादुरूस्ती कायद्याप्रमाणे हा हक्क मूलभूत हक्कांतून काढून टाकण्यात आला. आता या हक्काला कायदेशीर हक्काचे स्वरूप देण्यात आले. सामाजिक न्याय आणि आर्थिक समता आणणे या उद्दिष्टांच्या आड हक्क येतो असे शासनाचे मत होते.

## २.१३ मूलभूत हक्कांची वैशिष्ट्ये (Features of Fundamental Rights) :

१) जगातील सर्व घटनांपेक्षा भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची यादी अतिशय विस्तृत आहे. घटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीवरून भारतातील मूलभूत हक्कांच्या स्वरूपाची कल्पना येते. भारतीय समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि राज्यव्यवस्थेमध्ये समता, न्याय, मानवता आणणयाच्या दृष्टीने मूलभूत हक्कांचे स्वरूप व आशय आहे.

२) मूलभूत हक्क अनिर्बंध व अमयार्दित स्वरूपाचे नाहीत. समाजहित व देशहिताच्या दृष्टीने प्रत्येक हक्कावर मर्यादा आहेत.

३) हक्क स्थितीशील (Static) नाही तर गतीशील आहेत. देशाच्या बदलत्या परिस्थितीप्रमाणे मूलभूत हक्कविषयक तरतुदींमध्ये राज्यघटनेची चौकट न बदलता संसद त्यामध्ये दुरूस्ती करू शकते. अर्थात घटनादुरूस्ती प्रक्रियेनुसारच संसदेला घटनेत दुरूस्ती करता येते.

४) सर्व हक्क न्यायालयीन संरक्षणास पात्र आहेत. भारतीय घटनेने नागरिकांना फक्त हक्क दिले नाहीत तर, घटनात्मक उपाययोजना या हक्काद्वारे मूलभूत हक्कांची हमीही दिली आहे. मूलभूत हक्कांचा भंग झाल्यास त्यासाठी नागरिकांना न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे.

५) भारतीय सैन्यदल, पोलीस वा अन्य सुरक्षा दलातील सेवकांचे हक्क मर्यादित करण्याचा अधिकार घटनेच्या कलम ३३ व ३४ नुसार भारताच्या संसदेस आहे.

६) काही हक्कांचे स्वरूप नकारात्मक स्वरूपाचे म्हणजे काय करू नये हे सांगणारे आहेत. काही हक्कांचे स्वरूप सकारात्मक स्वरूपाचे आहेत.

७) हक्कांचे स्वरूप सार्वजनिक आहे. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान, वास्तव्य इत्यादी कारणांवरून भेद न करता प्रत्येक भारतीय नागरिकाला हक्क देण्यात आले आहेत.

८) आणीबाणीच्या काळात हे हक्क तहकूब केले जातात.

९) ५१ (अ) 'मूलभूत कर्तव्ये' समाविष्ट आहेत. ही कर्तव्ये सर्वसाधारणपणे मुलभूत हक्कांच्या आड येत नाहीत. परंतु एखाद्या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात गेल्यास न्यायालय मूलभूत कर्तव्यांच्या संदर्भात त्या हक्कांचा विचार करीत असते.

१०) एखाद्या भागात मार्शल लॉ लागू केल्यास हक्क स्थगित होतात.

११) काही मूलभूत हक्क भारतीय नागरिकांप्रमाणेच तात्पुरत्या काळासाठी भारतात निवास करणाऱ्या परकीयांनादेखील उपभोगता येतात. भाषणस्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य इत्यादी हक्क परकीयांना नाही.

## २.१४ प्रश्न :

१) समतेच्या हक्कांसंबंधी लिहा
२) स्वातंत्र्याच्या हक्काचे महत्त्व सांगून सविस्तर स्पष्ट करा.
३) शोषणाविरूद्धचा हक्कांचे विश्लेषण करा
४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क सांगा
५) सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्कांचे मूल्यमापण करा
६) घटनात्मक उपाययोजनेच्या हक्काचे महत्त्व सांगा.
७) मूलभूत हक्कांसंबंधी थोडक्यात लिहा.

❖❖❖❖

# ३

# मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये

**प्रकरणाची रचना :-**

३.१ उद्दीष्ट
३.२ प्रस्तावना
३.३ मार्गदर्शक तत्त्वांचा अर्थ
३.४ मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दीष्ट आणि महत्त्व
३.५ मार्गदर्शक तत्त्वांचे उगमस्थान
३.६ मार्गदर्शक तत्त्व्चे स्वरूप
३.७ मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण
३.८ मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी
३.९ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांमधील संबंध आणि भेद
३.१० मूलभूत कर्तव्ये
३.११ प्रश्न

## ३.१ उद्दीष्ट -

मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्यांचा अभ्यास करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. कारण कोणत्याही देशात न्याय, आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती समान असल्याशिवाय राजकीय लोकशाहीला अर्थ नसतो. मार्गदर्शक तत्त्वामुळे आर्थिक आणि सामाजिक न्याय लोकांना प्राप्त होतो व लोककल्याणकारी राज्य स्थापन होण्यास मदत होते.

## ३.२ प्रस्तावना -

भारतीय राज्यघटनेच्या भाग ४; कलम क्र. ३६ ते ५० मध्ये राज्याची मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत.

## ३.३ मार्गदर्शक तत्त्वांचा अर्थ -

मार्गदर्शक तत्त्वे राज्यास आपल्या कर्तव्यांची जाणीव करून देतात. शासन करताना, कायदे करताना, प्रशासकीय धोरणे व योजनांची अंमलबजावणी करताना राज्यकर्त्यांना मार्गदर्शन

करणारी तत्त्वे म्हणजे मार्गदर्शक तत्त्वे होय. ही तत्वे म्हणजे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाला असलेल्या "सूचना" (instructions) होय.

## ३.४ मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट आणि महत्त्व (significance)

१) **लोक कल्याणकारी राज्य (welfare state) निर्माण करणे** - शांतता व सुव्यवस्था राखणारे पोलीस राज्य निर्माण करणे आणि त्यापुढे जाऊन लोकांना "न्याय" देणारे, लोकांची सर्वांगीण प्रगती होण्यास आवश्यक परिस्थिती निर्माण करणारे राज्य निर्माण करणे मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट आहे.

२) **आर्थिक आणि सामाजिक लोकशाही निर्माण करणे** - राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने येण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये समता, न्याय, स्वातंत्र्य प्रस्थापित करणे आवश्यक असते. अशी लोकशाही आणणे हे मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट आहे.

३) **मूलभूत हक्कांना पूरक** - मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत हक्कांच्या द्वारे यांच्यात भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान साध्य होते. मूलभूत हक्कांतून व्यक्तिस्वातंत्र्य मिळते. मूलभूत हक्कांतून राजकीय लोकशाहीचा अविष्कार होतो तर मार्गदर्शक तत्त्वांतून आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रतीत होते.

४) **सातत्य आणि स्थिरता** - मार्गदर्शक तत्त्वांमुळे सत्तेवर कोणताही पक्ष असला तरी राज्याच्या ध्येधोरणात सातत्य व स्थिरता येण्यास मदत झाली आहे. कोणत्याही पक्षाचे शासन सत्तेवर असले तरी त्यांना या तत्त्वांच्या आधारावरच ध्येयधोरणे आखावी लागतात.

५) राजकर्त्यांना विकासाचा मार्ग ही तत्वे दाखवितात

६) **उच्चन्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाला मदत** - न्यायालयांना न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकाराची अंमलबजावणी करताना एखाद्या कायद्याची घटनात्मकता व वैधता तपासताना मार्गदर्शक तत्त्वांची मदत होते.

## ३.५ मार्गदर्शक तत्त्वांचे उगमस्थान (Sources of the Directive Principles)

१) आयर्लंडच्या घटनेतून भारताने मार्गदर्शक तत्त्वांची कल्पना स्वीकारली आहे.

२) संयुक्त राष्ट्रसंघाचे मानवी अधिकारपत्र (Universal Charter of Human Rights) याचाही प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांवर दिसून येतो.

३) गांधी विचारांचा प्रभाव - ग्रामपंचायत, कुटीरउद्योग, नशाबंदी, शांतता व न्यायाचे धोरण इत्यादी तरतुदींवर गांधी विचारांचा प्रभाव आहे.

४) १९३५ चा कायदा - ब्रिटीश सरकारतर्फे गव्हर्नर जनरलला जे सूचनापत्र असायचे त्याप्रमाणे सूचनात्मक स्वरूप या तत्त्वाचे आहे.

५) समाजवादी विचारसारणीचा प्रभाव

## ३.६ मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप (Nature of Directive Principles)

**१) नैतिक (Moral)** - या तत्त्वांचे पालन करणे अथवा न करणे राज्याची नैतिक जबाबदारी आहे. राज्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणे या तत्त्वांची अंमलबजावणी होते. णार्गदर्शक तत्वांचे स्वरूप नैतिक आहे.

**२) न्यायप्रविष्ठ नाही (Non-Justicible)** - राज्यकर्त्यांनी या तत्त्वांचे पालन केले नाही म्हणून त्यांच्यावर कोणतीही न्यायालयीन कारवाई करता येत नाही. कारण मार्गदर्शक तत्वांचे स्वरूप नैतीक आहे.

**३) आचारसंहिता (Rule of Conduct)** - प्रशासक व राज्यकर्ते यांच्या दृष्टीने ही तत्त्वे म्हणजे "अनुदेशपत्र" (Instrument of Instructions) आहेत. ही तत्त्वे राज्यकर्त्यांसाठी मूलभूत व महत्त्वाची कर्तव्ये आहेत. त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केल्यास जनता निवडणुकीमध्ये त्यांना निवडून देत नाही. ही तत्त्वे म्हणजे राज्यकर्त्यांसाठी एकप्रकारे आचारसंहिता आहे.

**४) न्यायालयांसाठी आरसा** - न्यायालयाला कायदेमंडळाच्या कायद्यांचा व कार्यकारी मंडळाच्या कृतीचा विचार या तत्वांच्या संदर्भात न्याय देताना करावा लागतो.

**५) सर्वसमावेशक** - सत्ता कोणत्याही राजकीय पक्षामध्ये असली तरी आणि त्या पक्षाची वैचारिक भूमिका व कार्यक्रम कोणताही असला तरी मार्गदर्शक तत्त्वांचा विचार सत्तेवर येणाऱ्यांना करावाच लागतो कारण ही तत्वे राज्याचे मौलिक सिद्धांत आहेत.

## ३.७ मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण

**मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण**

**(Classification of the Directive Prionciples)**

- **१ आर्थिक तत्त्वे**
- **२ सामाजिक तत्त्वे**
- **३ राजकीय तत्त्वे**
- **४ आंतरराष्ट्रीय संबंधविषयक तत्त्वे**

अभ्यासाच्या सोयीसाठी मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण ४ भागात केले आहे.

**१) आर्थिक तत्त्वे** - आर्थिक स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये खालील तत्त्वांचा समावेश होतो.

अ) प्रत्येक भारतीय नागरिकाला उपजीविकेची साधने प्राप्त होतील अशी व्यवस्था सरकारने करावी.

ब) उत्पादनाची साधने व संपत्ती ह्यांचे विकेंद्रीकरण करावे.

क) प्रत्येक स्त्री-पुरूषाला समान कामासाठी समान वेतन दिले जावे.

ड) कामाच्या ठिकाणी न्याय आणि मानवी परिस्थिती निर्माण करणे, स्त्रियांना प्रसूती सहाय्य देण्याचा दृष्टीने राज्याने योग्य ती व्यवस्था करावी.

इ) औद्योगिक संस्था, संघटना यांच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभागी होता यावे यासाठी राज्य उपाययोजना करील.

ई) राज्य शेती व पशूसंवर्धन यांची योग्य व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करील.

उ) पर्यावरणाचे संरक्षण व विकास आणि वनसंपत्ती व वन्य प्राण्यांचे रक्षण करण्याचा राज्य प्रयत्न करील.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३९, ४१, ४२, ४३, ४८ मध्ये आर्थिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे नमूद केलेली आहेत.

**२) सामाजिक तत्त्वे** -

अ) १४ वर्षाखालील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे

ब) पौष्टिकतेचा आणि राहणीमानाचा दर्जा उंचावणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

क) राष्ट्रीय स्मारके, स्थाने आणि ऐतिहासिक वास्तूंचे रक्षण करावे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५, ४६, ४७ आणि ४९ मध्ये सामाजिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

**३) राजकीय तत्त्वे** -

राज्यघटनेच्या कलम ४०, ४४, ५०, ५१ मध्ये राजकीय स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

अ) राज्य ग्रामपंचायतीची स्थापना करून त्यांना आवश्यक ती सत्ता देईल.

ब) संपूर्ण भारतासाठी समान नागरी कायदा करण्याचा राज्य प्रयत्न करील.

क) न्यायमंडळाची कार्यकारी मंडळापासून फारकत.

**४) आंतराष्ट्रीय तत्त्वे** - आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राज्याने कोणती धोरणे स्वीकारावीत ते कलम ५१ मध्ये आहे. राज्यात आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता वाढविणे, राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्याय व परस्परांविषयी आदरयूक्त संबंध राखणे.

१९७६ साली ४२ व्या घटनेनुसार चार नवीन मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश मूळ यादीत केला आहे.

१) मुलांचा सुदृढ विकास होण्यासाठी प्रयत्न करणे.
२) गरिबांना न्याय मिळावा म्हणून कायद्याचे मोफत साहाय्य देण्याचा राज्य प्रयत्न करील
३) पर्यावरणात सुधारणा घडवून आणणे. जंगले व जंगली श्वापदे यांचे संरक्षण करणे
४) औद्योगिक क्षेत्रात आवश्यक ते कायदे करून कामगारांना उद्योगधंदे, कारखाने यांच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेण्यासाठी राज्य प्रयत्न करील.

## ३.८ मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी -

**आर्थिक स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी** - पंचवार्षिक योजनांद्वारे देशाची आर्थिक प्रगती घडवून आणण्याचा दृष्टीने राज्याने प्रयत्न केला आहे. मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभारले आहेत. स्वयंरोजगार, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. देशशतील संपत्तीचे

केंद्रीकरण होऊ नये म्हणून शासनाने कूळ कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, जमीनदारी निर्मूलन कायदा केला. श्रीमंतांवर प्राप्तीकर, संपत्तीकर लावला आहे. कामगारांचे कामाचे तास, वेतन, रजा, सुट्ट्या, निवृत्तीवेतन इत्यादींसारखी धोरणे व कायदे शासनाने केले आहेत. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना कायद्याचा मोफत सल्ला मिळावा म्हणून शासना मार्फत सोय केली आहे.

**सामाजिक स्वरूपाच्या तत्त्वांची अंमलबजावणी :**

१४ वर्षांखालील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याच्या दृष्टीने शासनाने शाळा सुरू केलेल्या आहेत. प्रौढ शिक्षणयोजना राबविल्या. मागासलेल्या जातीच्या लोकांना शैक्षणिक फी माफी सवलत देण्यात येते. नोकऱ्यांमध्ये त्यांचासाठी राखीव जागा ठेवल्या आहेत शासकीय रूग्णालये स्थापन केली.

**राजकीय स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी :**

१) आर्थिक अडचण, पैसा प्रत्येक योजना राबविण्यासाठी लागतो. अनेकदा आर्थिक अडचणींमुळे या तत्त्वांची अंमलबजावणी शक्य होत नाही. २) मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने केलेले कायदे बरेचदा न्यायालयाने रद्द ठरविले आहेत, ही अडचण लक्षात घेऊन शासनाने ४२ वी घटनादुरूस्ती करून मूलभूत हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीला शासन प्राधान्य देईल असे स्पष्ट केले. ३) शासन आणि प्रशासनातील लोकांमध्ये या तत्त्वांच्या अंमलबजावणीबाबतीत निष्ठा दिसून येत नाही.

## ३.९ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांतीलसंबंध आणि भेद :

**सबंध** - मूलभूत हक्क नागरिकांना विविध प्रकारची स्वातंत्र्ये देतात. मार्गदर्शक तत्त्वे नागरिकांना स्वातंत्र्य उपभोगता यावे अशी परिस्थिती आणि वातावरण निर्माण करण्यास सहाय्य करतात. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांचा घनिष्ठ संबंध आहे परंतु मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे एकमेकांच्या विरोधी आहेत काय? दोन्ही एकमेकांना पूरक आहेत काय? असे प्रश्न विचारवंत उपस्थित करतात. वास्तविकपणे मूलभूत हक्क वा मार्गदर्शक तत्त्वेविषयक तरतुदी, एकत्रितरीत्या, भारतीय राज्यघटनेचा आत्मा (Soul) आणि आधारभूत शीला (Cornerstone) आहेत. मूलभूत हक्कांमुळे नागरिकांना स्वातंत्र्याची हमी मिळते आणि मार्गदर्शक तत्त्वांमुळे हे स्वातंत्र्य उपभोगण्यास जी 'न्याय" परिस्थिती आवश्यक असते ती निर्माण होते. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांमुळे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामान्यांचे हित दोन्हीचा मध्य साधला जातो. दोन्ही एकमेकांच्या विरोधी नाहीत तर एकमेकांना पूरक आहेत.

**भेद - मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात खालीलप्रमाणे भेद आहेत :**

| | मूलभूत हक्क | | मागदर्शक तत्त्वे |
|---|---|---|---|
| १. | नकारात्मक स्वरूपाचे आहेत. (Negative) मूलभूत हक्कांमुळे सरकारच्या कृतीवर मर्यादा येतात. हक्कांना बाधा येईल असे शासनाने वागू नये हा अर्थ त्यात आहे. | १. | सकारात्मक (Positive) स्वरूपाची आहेत. सरकारने अमूक गोष्टी कराव्या असा आदेश देणारे मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | न्यायालयीन निर्णययोग्य (Justiciable) आहेत. मूलभूत हक्कांवर अतिक्रमण झाल्यास त्याविरूद्ध न्याय मागण्याचा अधिकार प्रत्येक नागरीकाला आहे. त्यासाठी नागरिक न्यायालयाकडे जाऊ शकतात. मूलभूत हक्कांना judicial protection आहे. | २. | न्याप्रविष्ट नाहीत (Non-Justiciable) शासनाने या तत्त्वांचे पालन केले नाही तर त्यासाठी शासनाला कुणीही न्यायालयात खेचू शकत नाही. |
| ३. | मूलभूत हक्क व्यक्तीवादी आहेत. लोकांना नागरी स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे आणि व्यक्तीहिताचे संरक्षण करणे यावर मूलभूत हक्कांचा भर आहे. | ३. | मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप (awider) व्यापक आहे. राज्याला मार्गदर्शन करणारी ही तत्त्वे आहेत. समाजहिताचा विचार त्यात आहे. guidelines for the state आहेत. |
| ४. | मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करणे राज्याची कायदेशीर जबाबदारी आहे. (Legal responsibility) | ४. | मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करणे शासनांची नैतिक जबाबदारी आहे. (Moral responsibility) |
| ५. | मूलभूत हक्कांचे उद्दिष्ट लोकशाही राज्य (democratic state) निर्माण करणे आहे. | ५. | मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट कल्याणकारी राज्य निर्माण करणे आहे. |
| ६. | मूलभूत हक्क आणीबाणीच्या परिस्थितीत स्थगित होतात. | ६. | मार्गदर्शक तत्त्वे आणीबाणीच्या परिस्थितीत स्थगित होत नाहीत. |
| ७. | मूलभूत हक्कापेक्षा मार्गदर्शक तत्त्वांना अधिक प्राधान्य आहे. मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी मूलभूत हक्कांवर (उदा. कलम १४, १९, ३१ समता, स्वातंत्र्य) बंधने आली. मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणी करणाऱ्या शासनाच्या कृती व कायद्यांना न्यायालयात आव्हान करता येणार नाही असे घटनादुरुस्ती करुन स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु शासनाला घटनेच्या मूळ चौकटीला धक्का लावता येणार नाही. | ७. | मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीला अधिक प्राधान्य देण्यात येते. |
| ८. | मूलभूत हक्कांचा संबंध नागरिकांशी आहे. | ८. | मार्गदर्शक तत्त्वांचा संबंध शासनाशी व राज्याशी आहे. |

मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे दोन्हींच्या स्वरूपात फरक असला तरी दोघांचे ध्येय्य एकच आहे. भारतीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी दोन्हींची गरज आहे.

## ३.१० मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties) :

**प्रस्तावना :** समाजाचा एक घटक या नात्याने व्यक्तीला हक्क स्वातंत्र्ये प्राप्त होतात. त्याचप्रमाणे सामाजाचा एक घटक या नात्याने व्यक्तीकडून कर्तव्य पालनाचीही अपेक्षा असते. लोकशाही राज्यात फक्त हक्कांच्या बाबतीत अपाण जागृत असून चालत नाही तर कर्तव्यांच्या बाबतीतही जागरूक असायला हवे. भारतीय जनतेमध्ये कर्तव्यांविषयी जागरूकता यावी यादृष्टीनेच भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत कर्तव्यांची यादी दिली आहे. १९७६ साली ४२ वी घटनादुरूस्ती करून राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ५१ (अ) मध्ये मूलभूत कर्तव्यांची यादी समाविष्ट केली आहे.

भारत हा असा देश आहे की ज्यांच्या राज्यघटनेमध्ये हक्कांप्रमाणेच कर्तव्यांची यादी समाविष्ट केली आहे. मूलभूत कर्तव्यांची यादी खालीलप्रमाणे आहे.

१) राज्यघटनेचे पालन करणे आणि राज्यघटनेची मूल्ये, आदर्श, संस्था राष्ट्रध्वज यांचा आदर करणे.

२) आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यास स्फूर्तिप्रद ठरलेल्या आदर्शाची जोपासना करणे - उदा. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, अहिंसा इत्यादी

३) भारताची सार्वभौमसत्ता, एकता व एकात्मता यांचे संरक्षण करणे.

४) देशाचे संरक्षण करणे आणि आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

५) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक भेदभाव न करणे आणि जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

६) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे जतन करणे.

७) वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे आणि प्राणिमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे.

८) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद, संशोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

९) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०) राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल, अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रांत पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

११) पालकांनी आपल्या पाल्यास, अपत्यास वय वर्षे ६ ते १४ पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

**मूल्यमापन :**

वरील सर्व कर्तव्यांची प्रत्येक भारतीयाने जाणीव ठेवून ती आचरणात आणायला हवी. परंतु ही कर्तव्ये पालन करणे अथवा न करणे सर्वस्वी व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून आहे. कर्तव्ये पालनाची सक्ती घटनेद्वारा करण्यात आली नाही. शिक्षण, जागरूकता आणि व्यक्तीतील परिपक्वता याद्वारेच नागरिकांमध्ये कर्तव्यपालनाची जबाबदारी वाढीस लागेल.

राज्यघटनेमध्ये मूलभूत कर्तव्ये समाविष्ट केल्यामुळे आपल्या देशाची लोकशाही मजबूत होण्यासाठी मदतच झाली आहे.

## ३.११ प्रश्न :

१) मार्गदर्शक तत्त्वांचे अर्थ आणि महत्त्व सांगा

२) मार्गदर्शक तत्त्वांच्या वर्गीकरणाची चर्चा करा.

३) थोडक्यात लिहा.

१) मूलभूत कर्तव्ये

२) मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांचा संबंध आणि भेद स्पष्ट करा.

३) मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी

❖❖❖❖

# ४

# संसदेची रचना, कार्ये आणि अधिकार

## (Structure, and Functioning of Parliment)

**प्रकरणाची रचना :-**

४.० उद्दीष्ट

४.१ प्रस्तावना

४.२ संसदेची रचना

४.३ संसदेची सत्ता आणि अधिकार

४.४ संसद सदस्यांचे विशेषाधिकार

४.५ लोकसभा व राज्यसभेचे घटनात्मक स्थान आणि संबंध

४.६ कायद्याची प्रक्रिया

४.७ प्रश्न

## ४.० उद्दिष्ट :

संसद म्हणजे शासनाची कायदे करणारी शाखा होय. शासनाच्या कायदे करणाऱ्या शाखेचा अभ्यास करणे हे मुख्य उद्दीष्ट आहे.

## ४.१ प्रस्तावना :

संसद, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ तीनही शाखांचा समावेश शासनसंस्थेमध्ये होतो. संसद शासनाची कायदे करणारी शाखा आहे. कार्यकारी मंडळामध्ये मंत्री आणि प्रशासनाचा समावेश होतो. कायदे अंमलात आणणे आणि दैनंदिन प्रशासकीय कार्ये करणे ही त्यांची कार्ये आहेत.

## ४.२ संसदेची रचना (Parliment) :

शासनाच्या कायदे करणाऱ्या शाखेला म्हणजेच कायदेमंडळाला "संसद" (Parliament) म्हणतात. भारतीय संसद ब्रिटिश पार्लमेंटप्रमाणे सार्वभौम नाही. भारतीय राज्यघटनेच्या मर्यादेतच संसदेला कार्य करावे लागते. भारतात सांसदीय शासनपद्धती असल्यामुळे कायदेमंडळआणि कार्यकारीमंडळ यांचा घनिष्ट संबंध आहे.

भारतीय राज्यघटनेच्या भाग पाचमधील कलम ७९ ते १२२ मध्ये संसदेसंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. संसदेत तीन भागांचा समावेश होतो.

१) राष्ट्रपती २) लोकसभा ३) राज्यसभा

**संसदेची रचना (Composition of Parliment)**

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रपती | लोकसभा | राज्यसभा |

**४.२.१ राष्ट्रपती** - भारतात सांसदीय पद्धती असल्यामुळे कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळाचा घनिष्ट संबंध आहे. त्यामुळेच राष्ट्रपतीचा अंतर्भाव संसदेमध्ये होतो. संसदेमध्ये राष्ट्रपती, राज्यसभा आणि लोकसभा यांचा समावेश होतो. भारताचे राष्ट्रपती संसदेचा अविभाज्य घटक आहेत. राष्ट्रपती संसदेचे सभासद नाही. ते संसदेच्या कामकाजात भाग घेत नाहीत परंतु कोणतेही विधेयक राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीशिवाय कायदा होऊ शकत नाही. संसदेचे अधिवेशन बोलाविणे, लोकसभेचा भंग करणे, संसदेच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी भाषण देणे इत्यादी संसदेशी संबंधित कार्ये राष्ट्रपती करतात. भारतात संसद द्विगृही आहे. १) लोकसभा २) राज्यसभा या दोन गृहांचा संसदेमध्ये समावेश होतो.

**४.२.२ लोकसभेची रचना (House of People)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लोकसभेची सभासद संख्या | सभासदांची निवड पद्धती | सभासदांची पात्रता | सभासदांचा कार्यकाल | लोकसभेचा पदाधिकारी |

लोकसभा संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. लोकांचे प्रतिनिधित्व करणारे गृह म्हणजे लोकसभा होय. लोकसभेतील सभासदांना 'खासदार' (M.P.) म्हणतात.

**लोकसभेची सभासद संख्या :**

लोकसभेची एकूण सभासदसंख्या ५५२ आहे. लोकसभेत अँग्लोइंडियन समुहाचे दोन प्रतिनिधी नियुक्त करण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे. घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेश यांच्यात लोकसंख्येच्या आधारे जागांचे वाटप करण्यात येते. घटकराज्याचे ५३०, केंद्रशासित प्रदेशांचे २० आणि अँग्लोइंडियन जमातीचे २ याप्रमाणे लोकसभेची सभासदसंख्या ५५२ आहे.

**लोकसभेची निवडणूक :**

प्रत्यक्षपणे, प्रौढ मतदान पद्धतीने भारतीय नागरिकांकडून लोकसभेचे प्रतिनिधी निवडले जातात. ही निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने आणि प्रौढ मताधिकाराप्रमाणे होते. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेला प्रत्येक भारतीय नागरिक मतदान करण्यास पात्र असतो. परंतु ज्या मतदारसंघातून तो मतदान करणार आहे त्या मतदार संघात त्यांचे वास्तव्य आणि मतदारयादीत त्याचे नाव असावयास पाहिजे.

**प्रादेशिक एकप्रतिनिधी मतदारसंघ पद्धती :**

राज्यामध्ये प्रादेशिक मतदार-संघ लोकसभेच्या निवडणुकीसाठी ठरविण्यात येतात. प्रत्येक राज्याला राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात येते. उदा. उत्तरप्रदेशाला

८० तर अतिशय कमी लोकसंख्या असलेल्या मिझोराम, नागालँड आणि सिक्कीम यांना एक प्रतिनिधी लोकसभेत निवडून पाठविता येतो. महाराष्ट्राला ४८ प्रतिनिधी लोकसभेसाठी निवडून पाठविता येतात. प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या तिथे दिल्या गेलेल्या लोकसभेच्या जागा यांचे प्रमाण सर्व राज्यांना समान राहील याची काळजी घेण्यात येते. देशाच्या लोकसंख्येच्या आधारे देशाची ५५० मतदारसंघांत विभागणी करण्यात येते. जितके सभासद निवडायचे असतील तितके देशाचे 'मतदारसंघ' पाडले जातात. प्रत्येक मतदारसंघातून एक प्रतिनिधी निवडण्यात येतो. मतदारसंघाविषयी कायदा करण्याचा अधिकार संसदेस आहे.

**लोकसभा सदस्यत्वासाठी पात्रता :**

१) भारताचा नागरिक असावा. २) त्याचे वय २५ वर्षापेक्षा कमी असावे. ३) शासकीय सेवेतील कर्मचारी, सरकारतर्फे आर्थिक लाभ प्राप्त करणाऱ्या व्यक्ती, न्यायालयाने गुन्हेगार ठरविलेल्या व्यक्ती निवडणुकीसाठी उभ्या राहू शकत नाहीत. ४) संसदेने वेळोवेळी लावलेल्या अटी पूर्ण कराव्या. ५) राखीव जागेतून निवडणूक लढविणारा उमेदवार हा ज्या जातीजमातीसाठी ती जागा राखीव असेल त्याच जातीजमातीचा असला पाहिजे.

**लोकसभेचा कार्यकाल :**

हा कार्यकाल ५ वर्षे आहे. १९७६ साली ४२ व्या घटनादुरूस्तीप्रमाणे हा कार्यकाल ६ वर्षे करण्यात आला होता. परंतु १९७९ मधील ४४ व्या घटनादुरूस्तीने हा कार्यकाल पुन्हा ५ वर्षे केला आहे. देशात आणीबाणीची परिस्थिती जाहीर केल्यास लोकसभेचा कार्यकाल एकावेळी एक वर्षासाठी वाढविला जातो.

**लोकसभेचा पदाधिकारी :**

लोकसभेचे अध्यक्षपद धारण करणाऱ्या व्यक्तीला सभापती (स्पीकर) म्हणतात. लोकसभा सदस्यांमधुनच सभापतीची निवड करण्यात येते. सभागृहाचे अधिवेशन चालू असताना सभापती अध्यक्षस्थानी असतो.

**सभापतीची कार्ये :**

१) सभागृहात शांतता व शिस्तीचे वातावरण ठेवून सभागृहाची प्रतिष्ठा सांभाळणे हे त्यांचे मुख्य काम आहे .२) सभागृहाचे कामकाज पार पाडण्यासाठी शिस्तभंग करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार सभापतीला आहेत. ३) कार्यक्रम पत्रिकेनुसार सभागृहाचे कामकाज चालविणे, विधेयकावर चर्चा घडवून आणणे, ते मताला टाकून मतमोजणी करणे, स्वीकृत विधेयकावर स्वाक्षरी करून पुढील कार्यवाईसाठी ते विधेयक पाठविणे. ४) प्रश्नोत्तराच्या तासाला सर्व सभासदांना बोलण्याची संधी देणे. ५) गणसंख्या पूर्ण आहे की नाही ते पाहाणे. ६) दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनाच्या वेळी अध्यक्षस्थान स्वीकारणे. ७) सभागृहात खूपच गोंधळ झाल्यास सभागृहाचे कामकाज स्थगित करणे इत्यादी कार्ये सभापतींना करावी लागतात.

**सभापतीचे स्थान व भूमिका :**

सभासदांनी सभागृहात उपस्थित केलेल्या सूचना निकालात काढण्याचा सभापतीला अधिकार आहे. व त्यावर सभापतीचा निर्णय अखेरचा असतो. सभापतींच्या निर्णयाला कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येत नाही. सभापती स्वतः कामकाजात भाग घेत नाही परंतु निर्णायक मत देण्याचा त्यांना अधिकार आहे.

भारतातील सभापतींचे पद इंग्लंडमधील सभापतींच्या धर्तीवर निर्माण केलेले आहे. इंग्लंडमध्ये सभापतीला आपले काम तटस्थपणे व निपक्षपातीपणे करता यावे यासाठी सभापतीची निवड एकमताने केली जाते. इंग्लंडमध्ये एखाद्या सदस्याची सभापती म्हणून निवड होताच तो सदस्य आपल्या पक्षाचा राजीनामा देतो. भारतात हे संकेत पाळले जात नाहीत.

**४.२.३ राज्यसभा :**

राज्यसभेची रचना खालीलप्रमाणे आहे.

**राज्यसभेची रचना (Council of States)**

1. राज्यसभा घटक राज्याचे प्रनिनिधित्व करणारे सभागृह आहे.
2. संख्या
3. निवडणूक
4. कार्यकाल
5. पात्रता
6. पदाधिकारी

**१)** राज्यसभा संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. भारतीय संघराज्यात घटकराज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणजेच राज्यसभा होय.

**२) राज्यसभेची सभासदसंख्या** - राज्यसभेची सभासदसंख्या एकूण २५० आहे त्यापैकी २३८ सभासद घटकराज्यांकडून निवडून दिले असतात आणि १२ सभासद राष्ट्रपतींकडून नियुक्त केले जातात. कला, साहित्य, समाजसेवा, विज्ञान इत्यादी क्षेत्रांत नावाजलेल्या व्यक्तींची नियुक्ती राज्यसभेमध्ये राष्ट्रपती करतात. ज्या व्यक्ती सहसा निवडणुकीच्या राजकारणात पडत नाहीत परंतु त्यांच्या ज्ञानाचा देशाला उपयोग व्हावा या हेतूने त्यांना राज्यसभेवर नेमले जाते.

**३) राज्यसभेची निवडणूक** - राज्यसभेची निवडणूक अप्रत्यक्ष पद्धतीने होते. विधानसभा सदस्य राज्यसभेच्या सदस्यांची निवड करतात. राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडणुकीसाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या क्रमदेय मतदान पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. कोणत्या घटकराज्याने किती प्रतिनिधींची राज्यसभेसाठी निवड करावयाची हे त्या राज्याच्या लोकसंख्येच्या आधारावर ठरविण्यात येते. उदा. उत्तरप्रदेश राज्याचे ३४ सदस्य, आसाम राज्याला ७ सदस्य, महाराष्ट्राला १९ सदस्य राज्यसभेसाठी निवडून देता येतात. याप्रमाणे राज्यसभेत राज्याराज्यांप्रमाणे प्रतिनिधींची संख्या आहे. सात केंद्रशासित प्रदेशांपैकी दिल्ली आणि पांडेचेरी या दोन केंद्रशासित प्रदेशांना राज्यसभेत प्रतिनिधित्व आहे. बाकीच्या केंद्रशासित प्रदेशांची लोकसंख्या अतिशय कमी असल्यामुळे त्यांना राज्यसभेत प्रतिनिधित्व नाही. अमेरिकेप्रमाणे प्रत्येक राज्याला समान प्रतिनिधित्व भारतात देण्यात आले नाही.

**४) राज्यसभेचा कार्यकाल** - राज्यसभा हे स्थायी (a permanent) सभागृह आहे. लोकसभेप्रमाणे राज्यसभा दर पाच वर्षांनी बरखास्त होत नाही. राज्यसभेतील सभासद इंग्लंडच्या लॉर्डस सभागृहातील सभासदांसारखे वांशिक किंवा आजन्म सभासद नसतात. अमेरिकेच्या सिनेटप्रमाणे सहा वर्षांसाठी राज्यसभेच्या सभासदांना निवडून देण्यात येते. एकाचवेळी राज्यसभेच्या सर्व सभासदांचा कार्यकाल संपत नाही. दर दोन वर्षांनी ज्या

सभासदांचा सहा वर्षे कार्यकाल संपला असे १/३ सभासद निवृत्त होतात व त्यांच्या जागी तेवढेच नवीन सभासद येतात. सभासद निवृत्त होताना एकाचवेळी एकाच घटक राज्यातील सर्वच सभासद निवृत्त होत नाहीत. याप्रमाणे जुन्या अणि नव्या सभासदांचा मेळ या सभागृहात असतो.

**राज्यसभा सदस्यत्वासाठी पात्रता :**


१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी २) वय ३० वर्षांपेक्षा कमी नसावे ३) संसदेने कायद्याद्वारे ठरविलेली पात्रता त्यांच्याकडे असावी. उदा. उमेदवाराचे नाव संबंधित घटकराज्याच्या संसदीय मतदारसंघामध्ये असावे, सरकारी नोकर, शासकीय लाभांचे पद धारण करणारी व्यक्ती असू नये, न्यायालयाने दोषी ठरविलेली व्यक्ती सहा वर्षेपर्यंत अपात्र समजण्यात येते.

**राज्यसभेचा पदाधिकारी :**

भारताचे उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. अमेरिकेतही उपराष्ट्रपती सिनेटचे अध्यक्ष असतात परंतु अमेरिकेतील उपराष्ट्रपतीप्रमाणे भारताचे उपराष्ट्रपती राज्यसभेचे सदस्य नसतात. सभागृहामध्ये शांतता पाळणे, चर्चा घडविणे इत्यादि कार्ये ते करतात. राज्यसभा आपल्या सदस्यांमधूनचे एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करते.

## ४.३ संसदेचे अधिकार व कार्ये (Powers and Functions of Parliment)

**संसदेचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे विभागता येतात.**




### ४.३.१ कायदेविषयक अधिकार :

शासनाची कायदे करणारी शाखा म्हणजे कायदेमंडळ होय. कायदेमंडळाचे म्हणजेच संसेदेचे मुख्य कार्य म्हणजे कायदे करणे होय.

संसदेला खालील विषयांच्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार आहे.

अ) केंद्रसूचीमध्ये समाविष्ट ९९ विषयांवर जे विषय राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे आहेत; त्यावर कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे.

ब) समवर्तीसूचीमध्ये असलेल्या ५२ विषयांवर कायदे करण्याचा अधिकार संसद व राज्याच्या कायदेमंडळाला आहे परंतु संसदेने केलेले कायदे घटकराज्याने त्याच विषयावर केलेल्या कायद्यांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात.

क) राज्यसूचीतील विषयांवरही संसद पुढील परिस्थितीत कायदे करू शकते.

ड) उवर्रित (Residual) विषयांवर म्हणजेच कोणत्याही सूचीत उल्लेख नसलेल्या विषयांवर कायदा करण्याचा अधिकार संसदेस आहे.

१) ज्यावेळी देशात आणीबाणी असते. २) राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव पास करून तशी विनंती केल्यास ३) दोन किंवा अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास ४) परराष्ट्राबरोबर केलेला करार किंवा तहाच्या कार्यवाहीसाठी आवश्यकता असेल तेव्हा संसद राज्यसूचीतील विषयांवरही कायदे करीत असते. कायदे करणे हे संसदेचे प्रमुख कार्य आहे. सर्वसामान्य विधेयक प्रथम संसदेच्या कोणत्याही सभागृहासमोर मांडतात. विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांची संमती आवश्यक असते.

**४.३.२ मंत्रिमंडळ निर्मिती** - लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर लोकसभेत बहुमत मिळालेल्या पक्षाला मंत्रिमंडळ निर्मिती करण्यास सांगितले जाते. मंत्रिमंडळ आणि पंतप्रधान म्हणजेच कार्यकारी मंडळाची नियुक्ती संसदेमधून होते. मंत्रिमंडळाच्या रचनेमध्ये लोकसभेला प्राधान्य असते.

**४.३.३ कार्यकारी व प्रशासकीय अधिकार** - भारताच्या संसदीय शासनप्रणालीमध्ये संसदेचे हे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे ते म्हणजे मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे होय. मंत्रिमंडळ लोकसभेचा विश्वास असेपर्यंतच अधिकारपदावर असते. लोकसभा विविध मार्गाने मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवते. उदा. प्रश्न विचारणे, शासकीय धोरणांवर टीका करणे, कामरोको प्रस्ताव (Adjournment Motion) आणणे, सभागृहाबाहेर निघून जाणे, सभागृहात गोंधळ माजविणे, निंदाव्यंजक ठराव पास करणे, सरकारवर अविश्वास ठराव आणणे (No Confidence Motion) इत्यादी. विविध मार्गांनी मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवून लोकमत जागृत करणे हे संसदेचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार राहून कार्य करीत असते. अविश्वासाचा ठराव संमत करून मंत्रिमंडळास पदच्युत करण्याचा अधिकार मात्र केवळ लोकसभेस आहे; राज्यसभेस नाही.

**४.३.४) आर्थिक अधिकार** - सर्व तऱ्हेच्या आर्थिक विधेयकांना संसदेची संमती आवश्यक असते. देशाच्या अर्थव्यवस्थेवर संसदेचे पूर्ण नियंत्रण असते. संसदेच्या संमतीशिवाय मंत्रिमंडळ एक पैसाही खर्च करू शकत नाही. खर्च नेमका कोणत्या कारणासाठी केला जातो, केला जातो किंवा नाही हे पाहण्याचा अधिकार संसदेला आहे. अंदाजसमिती, महालेखापाल यांच्याद्वारे संसद हा खर्च तपासते. विविध करांची आकारणी आणि वसुली, पंचवार्षिक योजनांना मान्यता देणे, अंदाजपत्रक मंजूर करणे इत्यादी. कोणतेही धनविषयक विधेयक प्रथम लोकसभेतच मांडण्यात येते. एखादे विधेयक धनविधेयक आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार लोकसभेच्या सभापतींना असतो. शासकीय मागण्यांना मान्यता देणे त्यानंतर त्यांच्या हिशोबावर नियंत्रण ठेवणे हे संसदेचे कार्य आहे.

**४.३.५) न्यायालयीन अधिकार** - राष्ट्रपती, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, निवडणूक आयुक्त यांच्याबाबतीत चौकशी करण्याचा आणि त्यांना पदच्युत करण्याचा संसदेला अधिकार आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी तशा तऱ्हेचा ठराव मंजूर करावा लागतो.

**४.३ ६) घटनादुरूस्तीचे अधिकार** - राज्यघटनेच्या कलम ३६८ मध्ये विषद करण्यात आलेल्या पद्धतीनुसार राज्यघटनेत दुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेस आहे. घटनादुरूस्तीबाबतचे विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडले जाते. दोन्ही सभागृहांची स्वतंत्र मंजुरी त्यासाठी आवश्यक असते.

**४.३.७) निवडणूकविषयक** - राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची निवड करणे

**४.३.८) लोकांचे प्रतिनिधित्व** - संसदेत विविध प्रश्नांची चर्चा होते. ही चर्चा करताना सभासदांना भाषणस्वातंत्र्य असते. संसदेत व्यक्त केलेल्या कोणत्याही मताबद्दल न्यायालयीन कारवाई करता येत नाही. संसदेत होणाऱ्या चर्चा व वादविवादांमुळे लोकांना विविध विषयांची माहिती मिळते. त्यातूनच लोकमत जागृत व संघटित होते.

**४.३.९) आणीबाणीविषयक** - राष्ट्रपतीने घोषित केलेल्या आणीबाणीच्या घोषणेला संसदेची मंजुरी आवश्यक असते. संसदेने संमती नाकरली तर आणीबाणी रद्द होते.

**निष्कर्ष :** संसदेच्या अधिकार व कार्याचा घटनेत समावेश आहे. देशाला चांगले शासन देणे, देशाची अर्थव्यवस्था निकोप ठेवणे, शासनात जेथे भ्रष्टाचार आढळेल तो शोधून त्यावर टीका करून तो निपटून काढण्याचा प्रयत्न करणे, नागरिकांच्या तक्रारींना वाचा फोडणे ही संसदेची जबाबदारी व कार्य आहेत.

## ४.४ संसद सदस्यांचे विशेषाधिकार (Privileages of Parliment and its Members) :

संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या सभासदांना काही विशेषाधिकार आहेत. संसदेची आणि संसद सदस्यांची प्रतिष्ठा जोपासली जावी याकरिता राज्यघटनेत विशेष तरतुदी संसद सदस्यांच्या विशेषाधिकारासंबंधी करण्यात आल्या आहेत.

या तरतुदी दोन भागात विभागता येतात.

**संसदेचे विशेषाधिकार सामूहीकपणे (Collective Privileges)**

१. सभागृहातील संभाषण व कामकाजवृत्त छापू न देण्याचा अधिकार
२. सभागृहात प्रेक्षक गॅलरीत एखाद्याला प्रवेश नाकरण्याचा अधिकार
३. सभागृहाची अप्रतिष्ठा करणाऱ्याला शासन करण्याचा अधिकार
४. मंत्र्याकडून जर सभागृहाची दिशाभूल करण्यात आली, हेतूपूरस्सर चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्याविरूद्ध हक्कभंगांचा ठराव पास करण्याचा अधिकार

**संसद सदस्यांना वैयक्तिकपणे असणारे अधिकार (Individual Privileges)**

१. भाषणस्वातंत्र्य-सभागृहातील प्रतिनिधींना पूर्ण भाषणस्वातंत्र्य आहे. विचार, मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. याबाबतचा कोणत्याही न्यायालयात त्यांच्यावर कारवाई करता येत नाही.
२. अटकेपासून स्वातंत्र्य-संसदेच्या अधिवेशनाच्या ४० दिवस आधी व नंतर दिवाणी दाव्यासाठी संसद सदस्यांना अटक करता येत नाही.

संसद सदस्यांच्या या विशेषाधिकारांचा भंग करणाऱ्याला संसदेचा अपमान केला या कारणासाठी शिक्षा करण्याचा संसदेला अधिकार आहे.

## ४.५ लोकसभेचे आणि राज्यसभेचे घटनात्मक स्थान आणि दोन्ही गृहांचे संबंध (Constitutional Position and relationship of the Lok-Sabha and Rajya -Sabha) :

संसद, राज्यसभा आणि लोकसभा दोन्ही गृहांची मिळून तयार होते. संसदेच्या एका गृहाला (राज्यसभेला) वरिष्ठ गृह व एकाला (लोकसभेला) कनिष्ठ गृह म्हणतात. संसदेचे राज्यसभा हे सभागृह लोकसभेपेक्षा अधिकाऱ्यांच्या दृष्टीने काही बाबतीत कमी आहे. अमेरिकन सिनेटप्रमाणे राज्यसभा शक्तिशाली गृह नाही तसेच इंग्लंडच्या हाऊस ऑफ लॉर्डसप्रमाणे कमी दर्जाचेही नाही. राज्यसभा आणि लोकसभा यांच्या कार्य व भूमिकेची तुलना करता असे आढळते की राज्यसभेपेक्षा लोकसभेला खालील बाबतीत जास्त अधिकार आहेत.

१) सर्वसाधारण विधेयके संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येतात तरीही साधारणपणे बहुतेक विधेयके लोकसभेतच मांडण्यात येतात. एखाद्या विधेयकाच्या बाबतीत लोकसभा व राज्यसभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास संयुक्त अधिवेशन राष्ट्रपती बोलवितात. संयुक्त अधिवेशनात निर्णय बहुमताने घेण्यात येतात. लोकसभेची सभासदसंख्या जास्त असल्यामुळे संयुक्त अधिवेशनात निर्णय लोकसभेच्या बाजून लागतो.

**२) अर्थ विधेयकांच्या बाबतीत** - लोकसभेला जास्त अधिकार आहेत. अर्थविधेयके प्रथम लोकसभेतच मांडण्यात येतात राज्यसभेत कधीही नाही. लोकसभेने अर्थविधेयके पास केल्यानंतर ती राज्यसभेच्या संमतीसाठी पाठविण्यात येतात. राज्यसभेला १४ दिवसांच्या आत ती विधेयके लोकसभेकडे परत पाठवायची असतात. अर्थविधेयकाच्या बाबतीत राज्यसभेने सुचविलेल्या शिफारशी लोकसभेने स्वीकारल्या पाहिजे असे बंधन लोकसभेवर नाही. यावरून असे दिसते की १४ दिवस विलंब लावणे एवढाच अधिकार अर्थविधेयकाच्या बाबतीत राज्यसभेला आहे. लोकशाहीच्या आर्थिक अधिकारवर राज्यसभा व राष्ट्रपती मर्यादा ठेवू शकत नाही. सांसदीय लोकशाहीत कनिष्ठ सभागृह अधिक मानाचे आणि महत्त्वाचे असते.

**३) मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे** - याबाबतीत लोकसभा व राज्यसभा यांच्या अधिकारात फरक आहे. राज्यसभेत मंत्र्यांना प्रश्न विचारले जाऊ शकतात, अविश्वासाचा ठराव पास केला जाऊ शकत नाही. लोकसभा विविध मार्गांच्याद्वारे मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवू शकते. मंत्रिमंडळ खऱ्या अर्थाने लोकसभेला जबाबदार असते. लोकसभा मंत्रिमंडळ पदच्युत करू शकते. अशाप्रकारे लोकसभेच्या तुलनेने राज्यसभेला कमी अधिकार असल्याचे स्पष्ट होते. याच अर्थ राज्यसभा हे गृह कुचकामी आहे किंवा निरूपयोगी आहे असे नाही. राज्यसभेलाही काही विशेष अधिकार आहेत.

**राज्यसभेला असलेले विशेष अधिकार आणि स्थान** - भारताच्या संघराज्यपद्धतीत संसदेचे वरिष्ठ सभागृह राज्यसभा घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह असल्यामुळे राज्यसभेला त्या संदर्भात जास्त अधिकार प्राप्त होतात.

**१) घटक राज्यासंबंधी कायदा करणे** - सामान्यतः राज्यसूचीतील विषयांवर कायदा करण्याचा अधिकार घटकराज्याचा विधिमंडळास आहे. परंतु राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने राज्यसूचीतील विषयावर संसदेने कायदा करणे आवश्यक असेल त्याप्रमाणे राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव संमत केला तरच संसद राज्यसूचीतील विषयांवर कायदा करू शकते.

**२)** घटनादुरूस्ती विधेयक राज्यसभेने मंजूर केले नाही तर घटनादुरूस्ती होऊ शकत नाही कारण घटनादुरूस्ती विधेयकांच्या बाबतीत संयुक्त अधिवेशनाची तरतूद नाही.

**३) अखिल भारतीय सनदी सेवा निर्माण करणे** - भारतीय राज्यघटनेतील कलम ३१२ मधील तरतुदीनुसार एखादी नविन अखिल भारतीय स्वरूपाची सेवा निर्माण करावयाची असेल तर तशी शिफारस राज्यसभा करू शकते आणि त्यानुसार संसद कायदा करते. या तरतुदीनुसारच भारतीय वन सेवा (Indian Forest Services) आणि भारतीय न्याय सेवा (Indian Judicial Services) या सेवा निर्माण केल्या आहेत.

**४) सातत्य राज्यसभेचा गुण आहे.** - राज्यसभा विसर्जित करता येत नाही. लोकसभा विसर्जित असेल त्यावेळी राज्यसभा कार्यकारीमंडळावर अंकुश ठेवू शकते.

दोन्ही सभागृहांची मिळून संसद बनते. संसदेच्या दोन्ही गृहांना घटनेनुसार विशिष्ट स्थान आहे. लोकसभेतून पास होणाऱ्या विधेयक राज्यसभेकडे पाठविण्यात येतात. राज्यसभेमध्ये विधेयकाचा पुनर्विचार होतो. राज्यसभा राज्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करून घटक राज्यांमध्ये केंद्राच्या अतिहस्तक्षेपाला मर्यादा घालते. त्यामुळे संघीय शासनपद्धतीचा समतोल साधला जातो.

## ४.६ कायद्याची प्रक्रिया (**Law - Making Procedure**) :

कायदे करणे संसदेचे मुख्य कार्य आहे. कोणताही कायदा पास होण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांची मंजुरी विधेयकाला (Bill) आवश्यक असते. त्यानंतर त्यावर राष्ट्रपतींची सही झाली की त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. संसदेमध्ये सादर होणारी विधेयके खालील प्रकारची आहेत.

**४.६.१ विधेयकांचे प्रकार -** विधेयकांचे तीन भागात वर्गीकरण करता येते.

| | | |
|---|---|---|
| सर्वसाधारण विधेयके (Ordinary Bill) | आर्थिक विधेयके (Money Bills) | घटनादुरूस्ती विधेयके (Constitution Amendment Bill) |

सर्वसाधारण विधेयके :

- खाजगी विधेयक
- सार्वजनिक विधेयके

**४.६.२ सर्वसाधारण विधेयके -** संसदेच्या कोणत्याही सभागृहात माडता येतात. जेव्हा एखादा मंत्री संसदेच्या गृहामध्ये विधेयक मांडतो तेव्हा त्या विधेयकाला शासकीय किंवा सार्वजनिक विधेयक म्हणतात. जेव्हा संसदेतील एखादा सभासद विधेयक मांडतो तेव्हा त्या विधेयकाला खाजगी विधेयक म्हणतात. आर्थिक विषयांशिवाय असलेल्या इतर सर्व विधेयकांना सार्वजनिक विधेयक म्हणतात.

सार्वजनिक विधेयकाची कायदा बनण्याची प्रक्रिया होताना विधेयक प्रत्येक गृहात खालील पाच अवस्थांतून जाते.

(Procedure for Passing Ordinary Bills) विधेयकाच्या पाच अवस्था

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १. पहिले वाचन विधेयकाची प्रस्तावना (Introduction of the Bill) विधेयकाच्या पहिल्या अवस्थेत सभागृहाच्या अध्यक्षाच्या संमतीने विधेयक कोणासही गृहात मांडता येते. त्यात त्या विधेयकाची चौकट असते. त्याला सभागृहाची मान्यता मिळाल्यानंतर विधेयक दुसऱ्या | २. दुसरे वाचन विधेयकांच्या कलमांवर चर्चा (Discussion of the Bill) या अवस्थेत विधेयकावर सविस्तर चर्चा करण्यात येते | ३. समिती अवस्था (Commitee Stage) या अवस्थेत विधेयक त्या विषयीच्या संबंधित निवड समितीकडे पाठविण्यात येते समिती त्या विधेयकांचा खोलवर अभ्यास करते | ४. समितीच्या अहवालावर चर्चा (Detailed Discussion on the Report of the Committee) या अवस्थेत समिती आपला अहवाल गृहाला सादर करते त्यावर गृहात चर्चा होते. | ५. तिसरे वाचन या अवस्थेत विधेयक मंजूर करून दुसऱ्या गृहात पाठविण्यात येते. |

Passage of the Bill in the other House

एका गृहातून विधेयक पास झाले की ते विधेयक दुसऱ्या गृहाकडे पाठविण्यात येते. दुसऱ्या सभागृहामध्ये ते विधेयक वरील पाच अवस्थांतून जाते त्यानंतर ते राष्ट्रपतींच्या सहीसाठी पाठविण्यात येते. राष्ट्रपतींच्या सहीनंतर त्या विधेयकाचे रूपांतर होते. त्यानंतर स्टॅट्यूट बुकमध्ये त्याचा समावेश करण्यात येतो आणि भारताच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात येते.

### ४.६.३ आर्थिक विधेयक :

अर्थविधेयक कशाला म्हणावे यासंबंधी कलम ११० मध्ये स्पष्टीकरण आहे. एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही याविषयी वाद उपस्थित झाल्यास ते विधेयक आर्थिक विधेयक आहे हे लोकसभेचा सभापती ठरवितो. अर्थविधेयकांची कायदा बनण्याची प्रक्रिया सर्वसाधारण विधेयकाप्रमाणेच आहे. परंतु खालील बाबी अर्थविधेयकाबाबतीत सर्वसाधारण विधेयकापेक्षा वेगळ्या आहेत.

१) राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीनेच अर्थविधेयक मांडले जाते.

२) अर्थविधेयके फक्त लोकसभेतच मांडण्यात येतात.

३) अर्थविधेयके मंत्रीच मांडू शकतात.

४) लोकसभेने अर्थविधेयक पास केल्यानंतर ते राज्यसभेकडे पाठविण्यात येते. राज्यसभेला ते विधेयक १४ दिवसांच्या आत लोकसभेकडे परत पाठवायचे असते.

५) राज्यसभेने जर अर्थविधेयकांच्या बाबतीत काही शिफारशी सुचविल्या तर त्या मान्य करणे अथवा न करणे पूर्णपणे लोकसभेवर अवलंबून असते.

६) अर्थविधेयक राष्ट्रपतींच्या सहीसाठी आल्यानंतर राष्ट्रपती नकार देऊ शकत नाही.

७) फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवशी अंदाजपत्रक अर्थमंत्री मांडतो.

## ४.७ प्रश्न

१) संसदेच्या रचनेविषयी चर्चा करा.
२) संसदेचे अधिकार आणि सत्ता यावर लिहा.
३) टिपा द्या.
   १) भारतीय सांसदीय पद्धतीत संसदेचे महत्त्व.
   २) सभापति
   ३) कायदेविषयक प्रक्रिया
   ४) संसद सदस्यांचे विशेषाधिकार
४) संसदेच्या दोन्ही ग्रहांचे संबध आणि स्थान याविषयी समालोचन करा.

❖❖❖❖

# ५

# संसदेची बदलती भूमिका

## (Changing role of the Parliament)

**प्रकरणाची रचना :-**

५.० उद्दिष्ट
५.१ प्रस्तावना
५.२ संसदेची सार्वभौमसत्ता
५.३ भारतीय संसदेची भूमिका
५.४ संसदेचा ऱ्हास
५.५ सारांश
५.६ संसदेतील समिती पद्धत
५.७ प्रश्न

## ५.० उद्दिष्ट :

संसदेचे सार्वभौमत्व, संसदेची भूमिका समजून घेऊन संसदेचा ऱ्हास का होत आहे याचा अभ्यास करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

## ५.१ प्रस्तावना :

प्रातिनिधीक लोकशाही पद्धतीचे हृदय म्हणजे संसद होय. कायदे करणे संसदेचे मुख्य कार्य आहे. संपूर्ण शासनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य संसद करते. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये संसद लोकांचे सहकार्य शासनाला मिळविण्यासाठी आणि विकसनशील कृतीसाठी महत्त्वाची भूमिका करीत असते. परंतु २० व्या शतकामध्ये संसदेचे महत्त्व व सत्तेचा ऱ्हास होत आहे असे दिसते. भारतात संसदेचे सार्वभौमत्व, संसदेची भूमिका, आणि संसदेचा ऱ्हास याचा अभ्यास त्या अनुषंगाने आपण करणार आहोत.

## ५.२ संसदेचे सार्वभौमत्व (Sovereignity of Parliament) :

सार्वभौमत्व म्हणजे राज्याची सर्वोच्च सत्ता होय. भारतीय राज्यघटनेप्रमाणे संसद सार्वभौम आहे परंतु भारतीय सांसदीय सार्वभौमत्वावर अनेक मर्यादा आहेत.

## ५.३ भारतीय संसदेची भूमिका (Role of Parliament) :

भारतीय सांसदीय लोकशाहीमध्ये संसदेचे कार्य, सत्ता आणि भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारतीय सांसदीय शासनपद्धतीमध्ये संसदेला प्रत्यक्ष लोकांच्या संमतीने सत्ता प्राप्त होते. संसद लोकांचे प्रतिनिधित्व करणारी शासनाची शाखा आहे. लोकांच्या इच्छाआकांक्षा, दुःखांना वाट करून देण्याचे कार्य संसद करते. मंत्रिमंडळ निर्मिती करणे आणि मंत्रिमंडळावर विविध मार्गांच्याद्वारे नियंत्रण ठेवण्याचे कार्य व भूमिका संसद करते. मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार असते. संसद बहुविध कार्ये करणारी संस्था आहे. भारतीय राजकीय व्यवस्थेचे हृदय संसदेला म्हणतात. समाजाच्या मतांचे प्रतिबिंब संसदेमध्ये दिसून येते.

**५.३.१** संसद खालील महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. संसदेची महत्त्वाची कार्ये आणि भूमिका खालील आहेत.

१) कायदे तयार करणे
२) मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे आणि मंत्रिमंडळाला जबाबदार बनविणे
३) अंदाजपत्रकावर नियंत्रण व आर्थिक नियंत्रण ठेवणे.
४) राज्यघटनेमध्ये दुरूस्ती करणे.
५) लोकांचे प्रतिनिधित्व करणे, लोकांच्या दुःखांना वाचा फोडणे.
६) सांसदीय कामकाजपद्धतीद्वारे लोकांना राजकीय शिक्षण देणे.
७) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांची निवड करणे.
८) आणीबाणीच्या घोषणेला मान्यता देणे.
९) मंत्रिमंडळ निर्मिती करणे.

अमेरिकेप्रमाणे घटनेचे श्रेष्ठत्व आणि ब्रिटनप्रमाणे संसदेचे सार्वभौमत्व या दोन्हीचा मेळ भारतीय संसदेच्या स्थिती बाबतीत दिसून येतो.

### ५.३.२ ब्रिटिश पार्लमेन्ट :

ब्रिटिश राज्यघटनेनुसार संसद सार्वभौम (Parliament is supreme) आहे. पार्लमेन्टने केलेले कायदे त्या देशातील सर्वश्रेष्ठ कायदे समजले जातात. न्यायालये कोणत्याही कारणांवरून त्या कायद्यांना रद्द करू शकत नाहीत. पार्लमेन्टच्या सार्वभौमत्वावर कोणाचेही नियंत्रण नाही. इंग्लंडची संसद काहीही करू शकते.

**अमेरिकन काँग्रेस :** अमेरिकेत घटनेची सर्वोच्चता आहे. घटनेचा अर्थ लावण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. त्यामुळे अमेरिकेत न्यायालयाचे सार्वभौमत्व आहे. अमेरिकन काँग्रेसने केलेला कायदा अवैध ठरविण्याचा अधिकार तेथील सर्वोच्च न्यायालयाला आहे. काँग्रेसने केलेला कायदा योग्य की अयोग्य तेही ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.

**भारतीय संसद :**

भारतीय राज्यघटनेने सांसदीय सार्वभौमत्वाच्या बाबतीत अमेरिकन व ब्रिटिश राज्यघटनांच्या मधील सुवर्णमध्य गाठला आहे. भारतात घटनेची श्रेष्ठत्व सर्वश्रुत आहे. संसदेने केलेला कायदा राज्यघटनांच्या तरतुदींच्या विरोधात असेल तर भारतीय न्यायालयाना अशा

कायद्याला अवैध घोषित करण्याचा अधिकार आहे. दुसऱ्या बाजूला संसदेला विशिष्ट प्रक्रियेनुसार राज्यघटनेतील तरतुदींमध्ये दुरूस्ती करता येते आणि न्यायालयीन निर्णयातून निर्माण झालेल्या अडचणींतून मार्ग काढता येतो. संसदेने असे आतापर्यंत अनेकदा करून संसदेचे सार्वभौमत्व सिद्ध केले आहे. ४२ वी घटनादुरूस्ती करून कलम ३६८ ला (४) व (५) उपकलमे जोडण्यात आली. या कलमाप्रमाणे संसदेच्या घटनादुरूस्ती अधिकारावर कसलीही मर्यादा असणार नाही आणि कोणत्याही घटनादुरूस्तीच्या कायद्याची वैधता कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कारणाने उपस्थित केली जाणार नाही अशी घटनादुरूस्ती करण्यात आली. त्यानंतर ४४ व्या घटनादुरूस्तीद्वारे कलम ३६८ मध्ये जोडलेली (४) व (५) ही कलमे रद्द केली. अशाप्रकारे राज्यघटनेद्वारे भारतात संसदीय सार्वभौमत्व व न्यायालयीन पुनर्विलोकन यामधील समतोल पुन्हा प्रस्थापित करण्यात आला आहे.

### ५.३.३ भारतीय संसदेवरील मर्यादा (Limitations on the powers of Parliament) :

भारतीय राज्यघटनेप्रमाणे संसदेला विस्तृत कार्ये व अधिकार दिलेले असले तरी भारतीय संसद ब्रिटिश पार्लमेन्टप्रमाणे सार्वभौम नाही. भारतीय संसदेच्या अधिकारावर पुढील मर्यादा आहेत.

**१) घटनेचे श्रेष्ठत्व (Supremacy of the constitution) आणि घटनात्मक बंधन** - भारताने लिखित घटनेचा स्वीकार केला आहे. भारतीय घटनेद्वाराच संसदेचे अधिकार व कार्ये मर्यादित केली आहेत. घटनेचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयावर आहे. संसदेने घटनाबाह्य कायदे करण्याचा प्रयत्न केल्यास न्यायालय त्या कायद्यांना अवैध ठरवू शकते म्हणजेच घटनेने घालून दिलेल्या मर्यादेतच संसद कार्य करू शकते. घटनेच्या मूलभूत चौकटीत संसदेला कार्य करावे लागते.

**२) न्यायालयीन पुनर्विलोकन** - संसदेचे कार्यक्षेत्र घटनेने आखून दिले आहे. त्याच घटनेने, संसदेने संमत केलेला कायदा घटनेशी सुसंगत आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार न्यायसंस्थेस दिला आहे. न्यायालयीन पुनर्विलोकनाचा न्यायालयाचा हा अधिकार संसदेच्या सार्वभौमत्वावरील महत्त्वाची मर्यादा होय.

**३) घटनादुरूस्ती** - संसदेला घटनादुरूस्तीचा अधिकार असला तरी संसद सहजासहजी घटनेत दुरूस्ती करू शकत नाही. घटनेच्या ३६८ व्या कलमांमध्ये दिलेल्या प्रक्रियेनुसारच संसदेला घटनेत दुरूस्ती करता येते. घटनादुरूस्ती करताना संसदेला घटनेच्या मूळ चौकटीत बदल करता येत नाही.

**४) राष्ट्रपतींची संमती** - संसदेने मंजूर केलेल्या विधेयकाला राष्ट्रपतींची स्वाक्षरी आवश्यक असते. त्यानंतरच त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. राष्ट्रपती विधेयक पुनर्विचारासाठी संसदेकडे परत पाठवू शकतात किंवा त्या विधेयकाला त्यांची मंजुरी नाकारू शकतात.

**५) संसदेच्या आर्थिक अधिकारावर मर्यादा** - संसदेच्या मंजुरीशिवाय कोणताही खर्च शासनाला करता येत नाही. परंतु संसदेला अंदाजपत्रकातील काही रकमांना संमती देण्याचा

अधिकार नाही. अंदाजपत्रक संसद संमत करू शकते किंवा नाकारू शकते परंतु त्यामध्ये बदल करण्याचा संसदेला अधिकार नाही.

**६) पंतप्रधानांचे आणि मंत्रिमंडळाचे नेतृत्व आणि वर्चस्व** - संसदेमध्ये पंतप्रधान व मंत्रिमंडळाला बहुमत असल्यामुळे संसदेवर पंतप्रधानांचे वर्चस्व प्रस्थापित होते. एकपक्षीय वर्चस्वाच्या काळात हा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. पंतप्रधान व मंत्रिमंडळाने संसदेमध्ये सादर केलेल्या विधेयकाला संसदेची बरेचदा फक्त औपचारिक संमती असते. वास्तविकपणे असे दिसून येते की हळूहळू संसदीय शासनाचे परिवर्तन मंत्रिमंडळाचे शासन याकडे होऊ लागले आहे. मंत्रिमंडळाने निर्णय घ्यावयाचे, विधेयकांचे प्रपोजल मांडायचे अणि संसदेने त्याला फक्त मान्यता द्यावयाची. भारतात संसदेच्या सार्वभौमत्वावर अनेक मर्यादा आहेत हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. संसदेवर असलेल्या वरील मर्यादांशिवाय संसदेचा दिवसेंदिवस अनेक कारणांमुळे ऱ्हास होत आहे.

**७) जनतेचा अंकुश** - लोकशाहीमध्ये अंतिम सार्वभौमत्व जनतेच्या ठायी असते. संसद जनतेच्या सार्वभौमत्वाची प्रतीक आहे. संसदेचा व्यवहार लोकमताविरूद्ध झाल्यास लोकक्षोभ होतो व त्यापुढे संसदेला नमावे लागते. वृत्तपत्रे, टीव्ही इत्यादीद्वारे लोकमत घडविले जाते. या लोकमताचा संसदेच्या सार्वभौमत्वावर अप्रत्यक्षपणे अंकुश असतो. सभा-संमेलने मोर्चे, हरताळ, अर्ज या मार्गांनी संसदेवर दडपण आणले जाते. परिणामी लोकमतास अनुसरून संसदेस कार्य करावे लागते.

## ५.४ संसदेच्या ऱ्हासास कारणीभूत घटक : (Decline of Parliament)

दिवसेंदिवस भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये संसदेचे महत्त्व आणि प्रभाव कमी होत आहे. त्याची कारणे खालील आहेत.

### १) कार्यकारी मंडळाची वाढती सत्ता (Usurpation of Powers by the executive) -

अ) संसद कायदे करण्याचे कार्य करते परंतु विधेयक मांडताना बहुतेक ऑफिशियल विधेयके संसदेमध्ये मंत्री मांडतात. ब) सभापती संसदेच्या कामाची साप्ताहिक कार्यक्रमपत्रिका ठरविताना संसदीय कामकाजमंत्र्यांबरोबर सल्लामसलत व चर्चा करून ठरवितात. मार्गदर्शनासाठी व मदतीसाठी संसद कार्यकारी मंडळावर अवलंबून असते. क) कायद्यातील (प्रदत्तविधी) बारीकसारीक त्रुटी भरुन काढण्यास कायदे निर्माण करण्याची सत्ता देखील कार्यकारी मंडळाला आहे. ड) राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसारच संसदेची अधिवेशने बोलावतात, स्थगित करतात. राष्ट्रपती त्यांच्या अभिभाषणाच्या वेळी मंत्रिमंडलाचा कार्यक्रम संसदेपुढे ठेवतात. संसदेचे अधिवेशन चालू नसलेल्या काळात वटहुकूम काढण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे. एकूणच संसदेच्या कार्यपद्धतीवर कार्यकारी मंडळाचे प्रभुत्व आहे त्यामुळे संसदेचे महत्त्व कमी होत आहे.

**२) न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क (Judicial Review)** - न्यायालयीन पुनर्विलोकन या अधिकाऱ्याद्वारे न्यायालय संसदेच्या कामामध्ये हस्तक्षेप करीत असतात. संसदेने मंजूर केलेल्या असंख्य कायद्यांना न्यायालयाने न्यायालयीन पुनर्विलोकन या हक्काप्रमाणे घटनाबाह्य आहेत असे सांगून रद्द ठरविले. १९६७ साली सर्वोच्य नायालयाने संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारावर मर्यादा आणल्या. १९७४ साली सर्वोच्च न्यायालयाने संसदेवर अशी मर्यादा घातली की संसद घटनादुरूस्ती करताना घटनेच्या मूलभूत चौकटीला (Basic structure) धक्का न लावता घटनादुरूस्ती करतील. १९८० मध्ये ४२ व्या घटनादुरूस्तीचा काही भाग सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविला. न्यायालयाच्या न्यायालयीन पुनर्विलोकन हक्कांमुळे संसदेवर मर्यादा येतातच.

**३) संसद सदस्यांमधील अनास्था (Disinterested Attitude)** दिवसेंदिवस संसदसदस्यांची संसदीय कामकाजात, संसदेतील चर्चेत भाग घेण्याची आवड कमी होत आहे असे दिसते. अनेकांना संसदीय कामकाजाचे ज्ञान नाही. स्वतःची सत्ता व प्राप्ती याकडेच त्यांचे लक्ष असल्याचे दिसते.

**४) शासनाची गुंतागुंतीची कार्यपद्धती** - शासनाची कामकाजपद्धती वास्तवमध्ये बरीचशी गुंतागुंतीची आणि औपचारिक स्वरूपाची आहे. बहुतेक संसदसदस्यांच्या आकलनापलीकडे या गोष्टी असतात. त्यामुळे शासकीय नोकरवर्गावर ते सर्व जबाबदारी सोपवितात. शासकीय नोकरवर्ग अनुभवी, तज्ज्ञ असतो त्यामुळे त्यांच्या सल्ल्याप्रमाणे औपचारिकपणे संसदेचे सर्व कामकाज होत असते. प्रदत्त अधिकार, बारीक सारीक कायद्यातीत गोष्टी भरण्याचे काम हा शासकीय वर्गच करतो.

**५) पक्षशिस्तीच्या नावाखाली होयबा वृत्ती (Rigid Party discipline)** - पक्षनेतृत्वाच्या आदेशांप्रमाणे व सूचनांप्रमाणे त्या त्या पक्षाच्या संसद सदस्यांना वागावे लागते व मतदान करावे लागते. पक्षनेतृत्वाच्या जो विरोधी असतो त्याला त्या पक्षाचा राजीनामा द्यावा लागतो त्यामुळे पक्षशिस्तीच्या नावाखाली संसद सदस्यांमध्ये सुद्धा होयबा वृत्ती वाढली आहे.

**६) एकपक्षीय वर्चस्व (One Party Dominance System)** - १९७७ ते १९७९ आणि १९८९ ते १९९१ हा कालखंड वगळता संसदेमध्ये एकाच पक्षाचे वर्चस्व होते. संसदेमध्ये कार्यकारी मंडळाला बहुमत असल्यामुळे बहुतेक विधेयक औपचारिक मंजुरीसाठीच फक्त संसदेपुढे येत असे. संसदेमध्ये कार्यकारी मंडळाने मांडलेली सर्व विधेयके आपोआपच पास होत असे.

**७) दुर्बल विरोध पक्ष (weak opposition)** - सांसदीय शासनपद्धतीमध्ये सत्तारूढ पक्षाएवढाच विरोधी पक्ष प्रबळ असणे आवश्यक असते तरच संसदेच्या कामकाजात जीवंतपणा येतो. भारतामध्ये अनेक पक्ष आहेत परंतु तुल्यबळ असे दोन पक्ष नाहीत त्याचा परिणाम संसदेच्या कार्यावर होतोच.

**८) अनेक संसद सदस्यांची गृहामध्ये नाममात्र उपस्थिती** - अधिवेशनकाळात अनेक संसद सदस्य अधिवेशनाला जातात परंतु त्यांचे लक्ष संसदेच्या कार्याऐवजी इतर गोष्टींकडे असते.

**९) पंतप्रधानांची उपस्थिती** - संसदेमध्ये पंतप्रधानांची उपस्थिती असेल तर तेथील कार्यपद्धतीवर एकप्रकारे वचक राहतो परंतु पंतप्रधान बरेचदा संसदेमध्ये उपस्थित नसतात.

**१०) गुन्हेगारी प्रवृत्तीचे संसद सदस्य** - हल्लीच्या संसदेमध्ये पं. नेहरू, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी, डॉ. आंबेडकर यासारखे तज्ज्ञ व उत्कृष्ट संसद सदस्यांची उणीव दिसून येते. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या संसद सदस्यांची संख्या वाढत आहे. त्यांच्यात नियमांचा व शिस्तीचा भंग करण्याची वृत्ती दिसून येते. गुंड प्रवृत्तीचे लोक पैशाच्या व दंडाच्या जोरावर संसदेत निवडून येतात. अशी मंडळी निवडून आल्यानंतर संसदेची प्रतिष्ठा कमी होणारच.

**११)** अंतर्गत आणीबाणी (Internal Emergency) अंतर्गत आणीबाणीच्या काळात संसद कॅबीनेट मंत्र्यांच्या हातातील 'रबरस्टॅप' होते.

**सारांश** - संसदेचे मंत्रिमंडळावर आणि प्रशासनावर नियंत्रण आहे परंतु ते फक्त सैद्धान्तिक (Theoretical) आणि सर्वसाधारण (general) स्वरूपाचे आहे. संसदेच्या अधिकारांचा आणि सार्वभौमत्वाचा ऱ्हास हळूहळू होत आहे ही भारतीय राजकारणाची वस्तुस्थिती आहे. परंतु तरीही अनेकदा संसदेने महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे राजकारणात संसद महत्त्वपूर्ण राहणार आहे. भारतीय राजकीय व्यवस्थेचे औपचारिक केंद्र संसदच आहे.

## ५.६ सारांश टेबल - भारतीय संसदेची भूमिका आणि संसदेचा ऱ्हास

| ब्रिटन आणि अमेरिकन पद्धतीचा मध्यबिंदू | संसदेची भूमिका आणि स्थान | संसदेवरील मर्यादा | संसदेच्या ऱ्हासाची कारणे | सारांश |
|---|---|---|---|---|
| | १. कायदे करणे | १. घटनेची सर्वोच्चता | १. मंत्रिमंडळ सत्ताधारी व वर्चस्ववादी | संसदेला महत्त्व आहे परंतु एकप्रकारे त्याला औपचारिकतेचे स्वरूप |
| | २. मंत्रिमंडळ निर्मिती | २. न्यायालयीन पुनर्विलोकन | २. न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकार | |
| | ३. मंत्रिमंडळावर | ३. घटनादुरूस्ती | ३. संसद सदस्य | |
| | ४. आर्थिक नियंत्रण | ४. राष्ट्रपतींची संमती | ४. क्लिष्ट कामकाजपद्धती | |
| | ५. घटनादुरूस्ती | ५. आर्थिक सत्तेवर मर्यादा | ५. पक्षशिस्तीचा बडगा | |
| | ६. निवडणूकविषयक | ६. पंतप्रधानाचे वर्चस्व | ६. कमकुवत विरोधी पक्ष | |
| | ७. आणीबाणीविषयक | ७. जनतेचा अंकुश | ७. एकपक्षीय वर्चस्व | |
| | ८. लोकांचे प्रतिनिधित्व | | ८. सदस्यांची नाममात्र उपस्थिती | |
| | ९. लोकांना राजकीय शिक्षण देणे. | | ९. पंतप्रधानांची अनुस्पस्थिती | |
| | | | १०. गुन्हेगारी प्रवृत्तीचे संसद सदस्य | |

## ५.६ संसदेतील समितीपद्धती (Parliamentry Committees) :

संसदेच्या कामकाजात मदत करण्यासाठी संसदेमध्ये अनेक प्रकारच्या संसदीय समित्या असतात. या समित्या आवश्यक व महत्त्वपूर्ण आहेत.

### ५.६.१ संसेदेतील समितीपद्धतीचे महत्त्व :

१) संसदेच्या कामाचा व्याप प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्या मानाने संसदेचे कामकाज पूर्ण करण्यासाठी मिळणारा वेळ मर्यादित आहे. प्रत्येक विधेयकावर सविस्तर चर्चा करून, मर्यादित काळात विधेयकाला मंजुरी देणे कठीण असते. त्यामुळे संसदीय समित्यांची मदत घेण्यात येते.

२) संसदेतील सर्वच सदस्यांना प्रत्येक विषयाचे ज्ञान व अनुभव असतोच असे नाही. त्यामुळे संसदेतील तज्ज्ञ व अनुभवी सदस्यांच्या मिळून समित्या स्थापन करण्यात येतात. समितीतील संसद सदस्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा कायदे करताना उपयोग होतो.
३) कायदे कार्यक्षमतेने व्हावेत. त्यात शक्यतोवर उणिवा राहू नये याची काळजी घेण्याच्या दृष्टीने संसदीय समित्या आवश्यक ठरतात.

**५.६.२ समित्यांची विभागणी** - भारतीय संसदीय समित्या तीन प्रकारात विभागता येतात.

| आर्थिक समित्या | सर्वसाधारण समित्या | विधिसमित्या |
|---|---|---|
| १. सार्वजनिक लेखा समिती | १. कामकाज सल्लागार समित्या | १. प्रदत्तविधेयक समिती |
| २. अंदाज समिती | २. अर्ज समिती | २. प्रवर समिती |
| ३. सार्वजनिक उपक्रम समिती | ३. आश्वासन समिती | ३. नियम समिती |
| | ४. अनुसूचित जाती-जमाती कल्याण समिती | |
| | ५. विशेषाधिकार समिती | |

**१) आर्थिक समित्या** - कार्यकारी मंडळाच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याचे काम संसद करते. संसदेच्या या कामात मदत करणाऱ्या महत्त्वपूर्ण आर्थिक समित्या म्हणजे

१) सार्वजनिक लेखा (Public Accounts Committee)
२) अंदाज समिती (Estimates Committee)
३) सार्वजनिक उपक्रम समिती (Public Undertaking Commitee)

### १) सार्वजनिक लेखा समिती (Public Accounts Committee)

**रचना :** या समितीची सभासद संख्या १५ असते. त्याची निवड सभागृहाचे सभासद त्यांच्यातूनच प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्रमणिय मतदान पद्धतीने करतात. सत्तारूढ पक्षाची व्यक्ती किंवा मंत्री या समितीचा सभासद राहू शकत नाही. समितीचा कार्यकाल एक वर्षाचा असतो.

**कार्य -** हिशेब तपासणे हे या समितीचे मुख्य कार्य आहे.
१) संसदेने जी रक्कम मंजूर केलेली असते ती त्याच कामासाठी व सेवेसाठी कायदेशीररीत्या खर्च झाली किंवा नाही. ज्या अधिकाऱ्याला ती विशिष्ट रक्कम खर्च करण्याचा अधिकार कायद्याने दिला असेल, त्यानेच तो खर्च केलेला आहे किंवा नाही, खरी नियमाप्रमाणे झाला काय इत्यादी हिशोबाच्या बाबतीतील कार्य ही समिती बघते.

२) निरनिराळे शासकीय व्यापार, स्वायत्त व समस्वायत्त संस्थांचे हिशेब, नफातोटा पत्रके इत्यादिंची छाननी करण्याचेही काम ही समिती करते.

३) महालेखापालाने दिलेले रिपोर्ट तपशीलवार बघून ते लोकसभेला सादर करणे हेही काम ही समिती करते.

**२) अंदाजसमिती (Estimate Committee) :**

**रचना** - या समितीत ३० सभासद असतात. सर्व सभासद एक वर्षासाठी लोकसभेतूनच निवडण्यात येतात. या समितीत राज्यसभेचा एकही सभासद नसतो. राजकीय पक्षांना त्यांच्या सदस्यसंख्येच्या प्रमाणात या समितीवर सदस्यत्व मिळते. या समितीमध्ये एकही मंत्री नसतो.

**कार्य** - विविध खात्यांचे अर्थविषयक अंदाजाची तपासणी करून ही समिती काटकसरीची सूचना करते आणि प्रशासकींय कार्यक्षमता वाढविते.
१) संसदेला कोणत्या स्वरूपात अंदाजपत्रक सादर करावे याबाबत सूचना करणे
२) अंदाजपत्रकाची तपासणी करून काटकसरीची सूचना करणे
३) धोरणानुसार जो पैशाचा अंदाज केला आहे तो पुरेसा आहे किंवा नाही त्याची पाहणी करणे.

या समितीने अनेक प्रकारच्या प्रशासकीय व आर्थिक सुधारणा सुचविल्या आहेत. परंतु या समितीच्या शिफारशी लोकसभेने स्वीकारण्याचे बंधन नाही त्यामुळे या समितीचे कार्य मार्गदर्शक स्वरूपाचे आहे.

**३) सार्वजनिक उपक्रम समिती (Committee on Public Undertaking)**

या समितीत दहा सभासद असतात. लोकसभेतून या सभासदांची निवड करण्यात येते मंत्री या समितीवर नसतात.

**कार्य -**

१) सार्वजनिक उद्योगधंद्याचे हिशेब व अहवाल यांची छाननी करणे.
२) सार्वजनिक उद्योगांबाबत नियंत्रक व महालेखा परीक्षकाने सादर केलेल्या अहवालांची छाननी करणे.
३) व्यापारी तत्त्वे आणि वाणिज्य व्यवहारांप्रमाणे उद्योगांचे कामकाज चालते किंवा नाही याची छाननी करणे.

**सर्वसाधारण समित्या :**

**१) कामकाज सल्लागार समिती (Business Advisory Committee)** - या समितीचे मुख्य काम म्हणजे सभागृहाचे वेळापत्रक ठरविण्यामध्ये सल्ला देणे, निरनिराळ्या विधेयकांवर केव्हा व किती चर्चा व्हावी याबाबतचे वेळापत्रक ही समिती तयार करीत असते. सभागृहाच्या नेत्यांशी चर्चा व सल्लामसलत करून ह्या बाबी ठरविल्या जातात.

**२) अर्ज समिती (Committee on Petitions)** - देशातील नागरिकांना अध्यक्षांमार्फत सभागृहाला अर्ज सादर करता येतात. सार्वजनिकदृष्ट्या एखादी महत्त्वाची बाब, सभागृहासमोर

असलेले एखादे विधेयक याबाबतीत गृहाकडे अर्ज करता येतो. समितीकडे सोपविण्यात आलेल्या प्रत्येक अर्जाची छाननी करणे हे या समितीचे काम आहे. काही तक्रार असल्यास त्याबाबत योग्य ती चौकशी करून आवश्यक उपाय करण्याविषयी शिफारशी करणे हे या समितीचे काम आहे.

**३) आश्वासन समिती (Assurance Committee)** - सभागृहामध्ये सरकारतर्फे मंत्र्यांनी जी आश्वासने, वचने दिले असतील त्यांची अंमलबजावणी कितपत झालेली आहे याची पाहणी करणे हे या समितीचे मुख्य काम आहे.

**४) अनुसूचित जाती-जमाती कल्याण समिती (Welfare of SC and ST Committee) -** अनुसूचित जाती - जमाती आयुक्त यांनी सादर केलेल्या अहवालावर विचार करणे या जातीजमातींच्या कल्याणासाठी केंद्राने कोणती उपाययोजना ते सुचविणे हे या समितीचे कार्य आहे.

**५) विशेषाधिकार समिती (Privileges Committe) -** सभागृहाचे वेळापत्रक ठरविण्यामध्ये सल्ला देणे.

**विधिसमित्या (Legislative Committee)**

**१) प्रदत्त विधेयक समिती (Committee on Subordinate Legislation) -** कायदे करताना त्यात ढोबळमानाने तरतुदी केल्या जातात. त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी निरनिराळे नियम करण्याचे अधिकार सत्ताधाऱ्यांना दिलेले असतात. हे नियम मुळ कायद्यांशी विसंगत असणार नाहीत यावर लक्ष ठेवण्याचे काम ही समिती करते.

**२) प्रवर समिती (Select Committee) -** एखाद्या विधेयकावर चर्चा सुरू असताना ते विधेयक प्रवर समितीकडे पाठविले जावे असा ठराव सभागृहाने मंजूर केल्यास अशी समिती नेमली जाते. या समितीच्या सभासदांची संख्या ठरलेली नाही. ती संख्या विधेयकाचा विषय व महत्त्व पाहून वेळेवर ठरविली जाते. त्या विशिष्ट विधेयकाच्या बाबतीत जाणकार सभासदत्व बहुदा या समितीवर सभागृहाकडून घेतले जातात. विधेयकाची तपशीलवार छाननी ही समिती करते. एका वेळेला एकापेक्षा जास्त प्रवरसमित्या असू शकतात. या समित्या फक्त त्या त्या विधेयकापुरत्याच असतात.

**निष्कर्ष -** अंदाजसमिती व सार्वजनिक उद्योग समिती या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समित्या आहेत. राज्यसभेच्याही लोकसभेप्रमाणे समित्या असतात.

## ५.७ प्रश्न :

१) संसदेची भूमिका सांगा
२) भारतीय संसदेच्या बदलत्या भूमिकेचा आढावा घ्या
३) संसदेच्या ऱ्हासाची कारणे यावर विश्लेषणात्मक लिहा.
४) संसदेतील समिती पद्धती यावर विवेचन करा.

❖❖❖❖

# ६

# कार्यकारीमंडळ
# (EXECUTIVE)

**प्रकरणाची रचना :-**

६.१ प्रस्तावना
६.२ राष्ट्रपती, अधिकार, सत्ता आणि स्थान व भूमिका
६.३ उपराष्ट्रपती
६.४ पंतप्रधान स्थान, सत्ता आणि भूमिका
६.५ मंत्रिमंडळ
६.६ प्रश्न

## ६.१ प्रस्तावना :

आधुनिक जगात विविध प्रकारची शासनव्यवस्था दिसून येते. उदा. राजेशाही, एकपक्षपद्धतीशासन, हुकुमशाही, लोकशाही इत्यादी. लोकशाही शासनपद्धतीमध्ये दोन उपप्रकार दिसून येतात. एक म्हणजे सांसदीय शासनपद्धती आणि दुसरी अध्यक्षीय शासनपद्धती, भारतात सांसदीय शासनपद्धती स्वीकारण्यात आली आहे. सांसदीय शासनपद्धती असलेल्या देशांमध्ये राजेशाही असलेली लोकशाही इंग्लडमध्ये आहे आणि गणराज्यात्मक लोकशाही भारतात आहे. राजेशाही असलेल्या लोकशाहीमध्ये म्हणजेच इंग्लडमध्ये राज्याचा प्रमुख वंशपरापंरागत असतो आणि गणराज्यात्मक लोकशाहीमध्ये म्हणजे भारतात राज्याच्या प्रमुख (राष्ट्रपती) अप्रत्यक्षपणे लोकांनी निवडून दिलेला असतो. शासनाचा प्रमुख पंतप्रधान बहुमत प्राप्त नेता असतो त्याला लोकांनी प्रत्यक्षपणे निवडून दिलेला असतो.

## ६.२ भारताचे राष्ट्रपती (The president of the India) :

राष्ट्रपती भारताचे सर्वोच्च प्रमुख आणि भारताचे पहिले नागरिक आहेत. राष्ट्राची एकता आणि एकात्मकतेचे ते 'प्रतीक' आहेत. संपूर्ण राज्यकारभार राष्ट्रपतींच्या नावे चालतो. घटनेतील कलम ५३ नुसार 'भारतातील केंद्र सरकारचे अधिकार राष्ट्रपतींना आहेत.' मात्र राष्ट्रपती स्वतःहून हे अधिकार वापरू शकत नाही. हे अधिकार घटनेतील तरतुदीनुसार त्यांना वापरावे लागतात. (President represents the nation but he does not rule it)

### ६.२.१ राष्ट्रपतींची निवडणूक :

कलम ५४ नुसार राष्ट्रपतींची निवड प्रत्यक्ष पद्धतीने न होता अप्रत्यक्ष पद्धतीने केली जाते. 'निर्वाचन मंडळ' (Electoral College) त्यांची निवड करतात. निर्वाचन मंडळात लोकसभा व राज्यसभांतील सर्व खासदार आणि देशांतील विधानसभांचे आमदार मतदार म्हणून मतदान करतात. विधानपरिषदेचे सभासद (MLCs) आणि केंद्रशासित प्रदेशांचे (MLAs) हे राष्ट्रपतीच्या निवडणूकीमध्ये मतदान करु शकत नाही. निर्वाचन मंडळातील प्रत्येकाला एकच मत असते. प्रत्येक खासदार आणि आमदारांच्या मताचे मूल्य ठरविण्यात येते. हे मूल्य विशिष्ट सूत्राप्रमाणे ठरविण्यात येते. हे सूत्र राज्याच्या लोकसंख्येवर आधारित असते. राष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी 'प्रमाणशीर, क्रमदेय, एकमतदान पद्धती' वापरतात. प्रत्येक मतदाराला मत देतांना पसंतीचे क्रमांक उमेदाराच्या नावापुढे टाकावे लागतात. जेवढे उमेदवार तेवढे पसंतीचे क्रमांक टाकण्यात येतात. यातील पहिल्या पसंतीचे क्रमांक आधी मोजतात. ज्या उमेदवाराला पहिल्या पसंतीची मते निश्चित कोट्याएवढी मिळाली तो उमेदवार निवडून येतो. कोटा खालील सूत्राप्रमाणे ठरवितात.

एकूण वैध मतांची संख्या + १

१ + १ = (२)

उदा. एकूण वैध मते १०० = ५१ + १

राष्ट्रपतीपदाची संख्या १ + १

= ५१ कोटा

### ६.२.२ राष्ट्रपतीपदासाठी पात्रता :

(१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

(२) वयाची ३५ वर्षे पूर्ण असावी.

(३) लोकसभा सदस्य म्हणून निवडून येण्यास आवश्यक असलेल्या इतर पात्रता असाव्यात.

(४) कोणत्याही शासकीय पदावर असू नये.

(५) राष्ट्रपतीपदाच्या नामांकन पत्रावर शंभर सदस्यांचा किंवा विधानसभा सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांची आवश्यकता असते.

### ६.२.३ कार्यकाल :

राष्ट्रपतीपदाचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. राष्ट्रपतीला महाभियोगाच्या प्रक्रियेनुसार; घटनेचा भंग केला या कारणासाठी पदच्युत केले जाऊ शकते. भारतात राष्ट्रपतीपदावर एखाद्याने कितीवेळा निवडून यावे याचे नियम नाही पण अमेरिकेतील राष्ट्राध्याक्षाला फक्त दोन वेळाच त्या पदावर निवडून येता येते.

राष्ट्रपतीच्या निवासस्थानाला 'राष्ट्रपती भवन' म्हणतात. ते दिल्लीला आहे. राष्ट्रपतींना निवृत्तीवेतन आहे. राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे.

### ६.२.४ राष्ट्रपतीला असलेल्या विशेष सवलती :

राष्ट्रपतीच्या कार्यकालात राष्ट्रपती जे कार्य करतात त्या कार्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयामध्ये खटला केला जाऊ शकत नाही.

### ६.२.५ राष्ट्रपतींचे घटनात्मक अधिकार आणि कार्य (Functions and Powers) :

भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकार आणि कार्य व्यवस्थित समजून घेण्यासाठी कलम ५३ आणि कलम ७४ यांचे एकत्र वाचन केले पाहिजे.

राष्ट्रपतींच्या अधिकारांचे विभाजन खालील प्रमाणे आहे :

१) कार्यकारी अधिकार
२) कायदेविषयक अधिकार
३) वित्त अधिकार
४) न्यायालयीन अधिकार
५) राज्यांबद्दलचे अधिकार
६) आणीबाणीविषयक अधिकार
७) व्हेटोचा अधिकार

### १) कार्यकारी अधिकार (Executive and Administrative Powers) :

१) कलम ५३ नुसार भारत सरकारचे सर्व अधिकार राष्ट्रपतींच्याकडे असतात. कलम ७७ नुसार भारत सरकारचा सर्व शासन कारभार राष्ट्रपतींच्या नावाने करावा अशी तरतुद आहे.

२) देशाचा कार्यकारी प्रमुख या नात्याने राष्ट्रपती अनेक महत्त्वाच्या नेमणुका करतात. उदा. ॲटर्नी-जनरल, युपीएससीचे अध्यक्ष आणि सभासद इत्यादी.

३) कलम ५३ नुसार राष्ट्रपती भारतीय सैन्याचे सेनापती असतात. त्यांच्या हाताखाली नौसेना, भूसेना आणि वायूसेना असते. राष्ट्रपती देशाच्या वतीने युद्ध घोषित करू शकतात. शंतता करार करू शकतात. अर्थात यासाठी संसदेची संमती असावी लागते.

४) कलम ७८ नुसार राष्ट्रपतींना देशाच्या कारभाराबद्दल माहिती घेण्याचा हक्क आहे.

५) परराष्ट्राशी असलेला संबंधांचा विचार करता राष्ट्रपतींना आपल्या देशाचे परदेशातील राजदूत नेमण्याचा हक्क आहे. त्याचप्रमाणे परदेशाने आपल्या देशात पाठवलेल्या राजदुतांना मान्यता देण्याचा हक्क आहे.

### २) संसदीय अधिकार किंवा कायदेविषयक अधिकार (Legislative Powers) :

कलम ७९ नुसार दोन सभागृह आणि राष्ट्रपती यांचा समावेश संसदेत असतो. राष्ट्रपती संसदेचे सभासद नसेल तरी त्यांना संसदीय अधिकार असतात.

१) राष्ट्रपती संसदेचे अधिवेशन बोलवितात आणि अधिवेशन ते स्थगित करू शकतात. ते लोकसभा विसर्जित करू शकतात.

२) कलम ८५ नुसार संसदेच्या दोन अधिवेशनात सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ गेला नाही याची खात्री राष्ट्रपती करतात.

३) एखाद्या बिगर - वित्तविषयक विधेयकाबद्दल वाद असेल तर राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यसभा यांचे संयुक्त अधिवेशन बोलवू शकतात.

४) प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर अस्तित्वात आलेल्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनांचे उद्घाटन राष्ट्रपती करतात त्याचप्रमाणे दरवर्षी लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रपती करतात. या उद्घाटनपर भाषणात राष्ट्रपती सरकारच्या परराष्ट्रीय, राष्ट्रीय धोरणातील महत्त्वाचे मुद्दे मांडतात.

५) कलम ८६ नुसार संसदेत पेन्डींग असलेल्या विधेयकाबद्दल राष्ट्रपती संसदेला 'निरोप' पाठवू शकतात आणि ते विधेयक महत्त्वाचे आहे असे सांगू शकतात.

६) संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केलेले प्रत्येक विधेयक राष्ट्रपतींकडे स्वाक्षरीसाठी जाते. राष्ट्रपती वित्तविषयक विधेयक परत पाठवू शकत नाही. त्याचे कारण सर्व वित्तविषयक विधेयके राष्ट्रपतींच्या परवानगीनंतरच सभागृहात मांडली जातात. मात्र राष्ट्रपती बिगर - वित्त विधेयक परत पाठवू शकतात. राष्ट्रपतीच्या सहीशिवाय कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रुपातंर होऊ शकत नाही.

७) राष्ट्रपतींना राज्यसभेवर बारा खासदार नेमण्याचा हक्क आहे. साहित्य, कला, समाजकारण वगैरेसारख्या क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना अशाप्रकारे राज्यसभेवर नेमतात. आर. के. नारायण (साहित्य), शबाना आझमी (चित्रपट) ही या संदर्भात चटकन आठवणारी नावे.

८) वित्त विधेयकांप्रमाणे काही बाबी अशा आहेत की ज्यासाठी राष्ट्रपतींची पूर्वपरवानगी आवश्यक असते. उदा. नवीन राज्य निर्माण करणारे विधेयक किंवा विद्यमान राज्यांच्या सीमा बदलणारे विधेयक (कलम ३).

## ३) वित्त अधिकार (Financial Powers) :

. १) कोणतेही वित्त विधेयक राष्ट्रपतींना दाखविल्याशिवाय संसदेत सादर करता येत नाही. कलम ११२ नुसार राष्ट्रपती दरवर्षी संसदेत वार्षिक अंदाजपत्रक सादर केले जाईल याची काळजी घेतात.

२) राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमतात. वित्त आयोग केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील उत्पन्नाचे वाटप कसे असावे ? याबद्दल वित्त आयोग सूचना करते.

३) राष्ट्रपती आणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठी करावयाच्या खर्चाला मंजुरी देतात. महापूर, भूकंप, त्सुनामी वगैरेंसारख्या संकटांचा सामना करण्यासाठी संचित निधीतून खर्च करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे

## ४) न्यायालयीन अधिकार (Judicial Powers) :

१) जर एखाद्या न्यायमूर्तींच्या विरोधात महाभियोगाची कारवाई झाली तर त्या न्यायमूर्तींच्या बडतर्फीचा आदेश राष्ट्रपती काढतात.

२) राष्ट्रपती उच्च न्यायालयांच्या न्यायमूर्तींच्या बदल्या करतात.

३) राष्ट्रपतींना गुन्हेगाराची शिक्षा कमी करण्याचा अधिकार आहे.

## ५) घटक राज्यांबद्दलचे अधिकार (Powers relating to the states) :

१) राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठवलेले विधेयक मंजूर किंवा नामंजूर करणे.

२) राष्ट्रपती राज्यांच्या राज्यपालांची नेमणूक करतात. राज्यपाल राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत पदावर राहू शकतात.

३) राष्ट्रपती राज्यपालांना सुचना पाठवू शकतात. या सूचना पाळणे राज्यपालांना बंधनकारक आहे.

**६) आणीबाणीतील अधिकार (Emergency Powers) :**

आणीबाणीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राष्ट्रपतीना काही खास अधिकार देण्यात आले आहेत :-

१) देशात जर युद्ध, अंतर्गत सशस्त्र बंडामुळे आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर राष्ट्रपती साऱ्या देशभर किंवा देशाच्या काही भागांत आणीबाणी जाहीर करू शकतात. (कलम - ३५२)

२) भारतीय संघराज्यातील एखाद्या घटक राज्याचा कारभार घटनेनुसार सुरू नसेल तर राज्यपालांच्या अहवालाचा आधार घेऊन किंवा अहवाल नसला तरी ते राज्य सरकार बडतर्फ करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. त्यानंतर त्या राज्यात राष्ट्रपतींची राजवट सुरू होते. (कलम ३५६)

३) जर देशाचे आर्थिक स्थैर्य धोक्यात आले असेल तर राष्ट्रपती 'आर्थिक आणीबाणी' घोषित करू शकतात. आर्थिक आणीबाणी एक महिना ठेवता असणे पण संसदेच्या ठरावाद्वारे वाढवता येते. (कलम ३६०).

**७) नकाराधीकार अधिकार :**

संसदेने पास केलेल्या एखाद्या विधेयकाला नकाराधिकार देण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे.

## ६.२.६ राष्ट्रपतींच्या अधिकारांवर घटनात्मक मर्यादा (Constitutional limitations on President Powers) :

राष्ट्रपतीच्या वरील अधिकारांवर घटनात्मक मर्यादा आहेत. राष्ट्रपतींना भरपूर घटनात्मक अधिकार आहेत परंतु वास्तवात राष्ट्रपती हे अधिकार कसे व कितपत वापरू शकतात? राज्यघटनेनुसार राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी आणि घटनात्मक अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी पंतप्रधान व मंत्रिमंडळ असेल अशी तरतूद आहे. भारतात सांसदीय शासनपद्धती आहे. या पद्धतीप्रमाणे राष्ट्रपती नाममात्र आणि पंतप्रधान वास्तविक प्रमुख आहेत. राष्ट्रपतींची भूमिका समजून घेण्यासाठी घटनेतील खालील तरतुदी समूजन घेतल्या पाहिजेत. कलम ५३, कलम ७५ आणि कलम ७४ वाचल्यानंतर राष्ट्रपतींची घटनात्मक भूमिका व स्थान यावर प्रकाश पडतो.

१) **कलम ५३** नुसार शासनाची कार्यकारी सत्ता राष्ट्रपतींकडे असतील. हे अधिकार राष्ट्रपती प्रत्यक्ष वापरतील किंवा त्यांना कनिष्ठ असलेल्या अधिकारी वर्गांकडून वापरतील. **कलम ७५** नमूद करते की 'इतर मंत्री', (पंतप्रधानांचा अपवाद वगळता) राष्ट्रपती पंतप्रधानांचा सल्ल्यानुसार नेमतील.'

२) कलम ७४ नुसार राष्ट्रपतींना मदत करण्यासाठी, सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल. हे कलम काळजीपूर्वक वाचल्यास जाणवते की मंत्रिमंडळ 'राष्ट्रपतींना सल्ला' देण्याचे काम करतात. मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपती नाकारू शकतात का, याबद्दल वाद होताच. ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे यात स्पष्टता आणली. १९७६ साली ४२ वी घटनादुरूस्तीद्वारे मान्य झाले की मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असेल.

३) कलम ७४ (२) नुसार मंत्रिमंडळाने राष्ट्रपतींना कोणता सल्ला दिला? त्यात काय नमूद केले होते वैगरे विचारण्याचा कोणाला अधिकार नाही.

वरील कलमांच्या अभ्यासानंतर स्पष्ट होते की राष्ट्रपती राज्याचे प्रमुख आहेत; कार्यकारिणीचे प्रमुख नव्हेत. (Head of the State but not of the executive). ते राष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतात परंतू राष्ट्रावर राज्य करीत नाहीत. (Represents the Nation but does not rule the Nation).

घटनात्मक तरतुदींचा उपयोग करून राष्ट्रपती हुकूमशहा होऊ शकतील काय? अर्थात राष्ट्रपतीपदी असलेल्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व या संदर्भात महत्त्वाचे आहे कारण आणीबाणी जाहीर करण्याचे राष्ट्रपतींचे अधिकार अमर्याद आहेत. लष्करी दलाचे सर्वोच्च नियंत्रण राष्ट्रपतींच्या हतीी असल्याने सत्ताभिलाषी राष्ट्रपती या अधिकारांचा वापर करून आपले स्थान दृढ करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दुसरा प्रश्न राष्ट्रपतींचे स्थान इंग्लंडच्या राजासारखे रबरी शिक्क्याप्रमाणे आहे काय? इंग्लंडच्या राजाप्रमाणे भारताचे राष्ट्रपती फक्त रबरी शिक्का नाही. भारताचे राष्ट्रपती जनतेने अप्रत्यक्षरीत्या निवडून दिलेले राष्ट्रप्रमुख आहेत. त्यादृष्टीने त्यांचे घटनात्मक स्थान इंग्लंडच्या राजाहून अधिक महत्त्वाचे आहे. याशिवाय भारताच्या राष्ट्रपतीला 'स्वविवेकाधिकार' - (Discretionary Powers) आहेत.

राष्ट्रपतींचे स्वविवेकाधिकार खालील आहेत.

१) ज्यावेळी लोकसभेत कोणत्याही एका पक्षास निर्विवाद बहुमत नसते अशावेळी पंतप्रधानांची नेमणूक करण्याचे अधिकार राष्ट्रपतींना आहेत.

२) लोकसभेमध्ये मंत्रिमंडळाने बहुमत गमावल्यास त्या मंत्रिमंडळाचा भंग करण्याचा अधिकार आहे.

३) पंतप्रधान व मंत्रिमंडळाकडून घेतलेल्या निर्णयाचे व कारभारविषयक अन्य माहिती मिळविण्याचे राष्ट्रपतींना अधिकार आहेत.

४) केंद्रीय मंत्रिमंडळ आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करून घटनेच्या मूळ तत्त्वांना धक्का लावत असतील तर; (घटनेच्या चौकटीत राहून राष्ट्रपती प्रभावी व परिणामकारक कार्य करू शकतात.) निर्णायक भूमिका बजावून राष्ट्रपती देशाच्या राजकारणाला योग्य दिशा देऊ शकतात. अर्थात राष्ट्रपतीपदावर आरूढ होणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर हे अवलंबून असते.

## ६.३ उपराष्ट्रपती (Vice-President) :

देशातील दुसऱ्या नंबरचे सर्वोच्च पद म्हणजे उपराष्ट्रपतीचे होय.

उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. त्यांची निवड संसदेच्या दोन्ही सभागृहांतील निर्वाचित सदस्यांकडून प्रमाणशीर, एक मतदान पद्धतीने व गुप्त मतदानाने होते.

**कामे व अधिकार :**

१) सामान्य परिस्थितीत उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने काम पाहतात.

२) राष्ट्रपती ज्यावेळी राजीनामा, आजारपण अथवा मृत्यू यांसारख्या कारणांनी कार्यभार सांभाळू शकत नाहीत त्यावेळी उपराष्ट्रपती राष्ट्रपतीपदाचा कारभार पाहतात. याकाळात राष्ट्रपतींचे सर्व अधिकार त्यांना प्राप्त होतात व राष्ट्रपतीपदाच्या सर्व घटनात्मक तरतुदी त्यांना लागू होतात.

यावरून स्पष्ट होते की उपराष्ट्रपदीपदाला औपचारिक स्थान व महत्त्व आहे; परंतु भारतीय राज्यामध्ये राजकीय सातत्य आणण्याच्या दृष्टीने या पदाची निर्मिती केली आहे.

## ६.४ पंतप्रधान (Prime-Minister) :

**६.४.१ पंतप्रधानाचे स्थान** - भारताच्या सांसदीय शासनपद्धतीमध्ये पंतप्रधान व मंत्रिमंडळ देशाची खरी वास्तविक कार्यकारिणी (Real Executive) आहेत. देशाचा वास्तविक प्रमुख पंतप्रधान होय. पंतप्रधान मंत्रिमंडळाचा अध्यक्ष, संसदेचा नेता, सत्तारूढ पक्षाचा नेता, राष्ट्रीय नेता अशा अनेकविध भूमिका करतात.

कलम ७४ नुसार राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल. ४२ वी घटनादुरुस्तीप्रमाणे मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे. 'पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ' हे घटनेतील शब्दप्रयोग स्पष्ट करतात की मंत्रिमंडळात पंतप्रधानांचे स्थान सर्वोच्च आहे.

### ६.४.२ पंतप्रधानांची नेमणूक :

संसदीय शासनपद्धतीतील परंपरांनुसार निवडणूकीनंतर लोकसभेत बहुमत मिळालेल्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधान म्हणून राष्ट्रपती नेमणूक करतात. मात्र जेव्हा कोणत्याच पक्षाला बहुमत मिळालेले नसते. तेव्हा मात्र राष्ट्रपती कोणाला पंतप्रधान करायचे याचा निर्णय घेऊ शकतो. असा प्रसंग १९८९ साली आला होता. लोकसभा निवडणुकीनंतर कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत नव्हते परिणामी राष्ट्रपतींनी व्ही. पी. सिंग यांना पंतप्रधान केले होते.

### ६.४.३ पंतप्रधानाचे अधिकार आणि कार्ये :

पंतप्रधानांची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) संसद, राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यांच्यातील कडी किंवा दुवा.
२) मंत्रिमंडळाचा प्रमुख
३) कॅबिनेटचा नेता
४) संसदेचे नेतृत्व
५) संघराज्यात्मक कार्य
६) परराष्ट्रीय धोरण
७) मुख्य प्रशासक
८) राज्यपालाची नेमणूक
९) निवडणुका
१०) सत्तारूढ पक्षाचे नेतृत्व
११) जननेते

**१) संसद, राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यांच्यातील कडी/दुवा** (**Link between the President and council of ministers and the Parliament**) - संसद, राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून पंतप्रधान महत्त्वाची भूमिका बजावतात. कलम ७८ नमूद करते की पंतप्रधान राष्ट्रपतींना शासनाच्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती देतील, राष्ट्रपतींना मागितलेली माहिती पुरवतील, राष्ट्रपतींच्या सूचना मंत्रिमंडळासमोर मांडतील. राष्ट्रपती (घटनात्मक प्रमुख) आणि पंतप्रधान (खरे सर्वोच्च प्रशासक) यांच्यात सतत संपर्क असतो.

पंतप्रधान संसदेचेही सभासद असतात, त्यामुळे संसद, मंत्रिमंडळ, राष्ट्रपती या सर्वांना जोडणारी कडी म्हणजे पंतप्रधान होय.

**२) मंत्रिमंडळाचा निर्माता आणि प्रमुख** (**Ministry maker**) - अ) राष्ट्रपतींनी पंतप्रधानांची नेमणूक केली की मग मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांच्या नेमणुकीत पंतप्रधान महत्त्वाची भूमिका बजावतात. मंत्रिमंडळ निवड करताना पंतप्रधानांना अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. संमिश्र मंत्रिमंडळात अनेक पक्षांना स्थान द्यावे लागत असल्याने ही निवड करणे अधिकच अवघड असते. मंत्रिमंडळाच्या नेतेपदी पंतप्रधान असतात. ब) मंत्र्यांच्या नेमणुकीप्रमाणेच मंत्र्यांचे खातेवाटप पंतप्रधान करतात. सर्व मंत्र्यांना पंतप्रधानांच्या सूचनेप्रमाणे काम करावे लागते. क) कलम ७५ प्रमाणे मंत्री राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत मंत्रिपदावर राहतील परंतु प्रत्यक्षांत पंतप्रधानांची मर्जी असेपर्यंत होय, पंतप्रधान एखाद्या मंत्र्याला काढू शकतात. ड) एखाद्या मंत्र्याने राजीनामा दिल्यास तो व्यक्तिगत त्या मंत्र्याचा राजीनामा असतो परंतु पंतप्रधानाने राजीनामा दिल्यास तो संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा असतो म्हणजेच मंत्रिमंडळांची निर्मिती, त्यांच्यात खातेवाटप, त्यांची पदोन्नती, कार्यकाल सर्वच पंतप्रधानांच्या अधिकारात असते. संपूर्ण मंत्रिमंडळाचा पंतप्रधान प्रमुख असतो.

**(३) कॅबिनेटचा नेता** (**Leader of the Cabinet**) - मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्र्यांचा एक छोटा गट म्हणजे कॅबिनेट. मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट मंत्री, उपमंत्री, राज्यमंत्री यांचा समावेश होतो. कॅबिनेटमध्ये कॅबिनेट मंत्री असतात, जे आपापल्या विभागाचे/खात्याचे प्रमुख असतात. कॅबिनेटमध्ये व्यापक, धोरणात्मक चर्चा होते. कॅबिनेटच्या बैठकांच्या अध्यक्षस्थानी पंतप्रधान असतात. कॅबिनेटच्या काही उप-समित्या असतात. संरक्षणविषयक उपसमिती, अर्थविषयक उपसमिती या उपसमितींच्या अध्यक्षपदी पंतप्रधान असतात. म्हणूनच लॉर्ड मोर्ले यांनी विधान केले होते की, ''पंतप्रधान कॅबिनेटच्या कमानीची आधारभूत शिला (Stone) होय.''

**४) संसदेचे नेतृत्व** (**Leader of Lok-sabha and Leader of Parliament**) - पंतप्रधान लोकसभेचे सभासद असतात. त्यांच्याकडे संपूर्ण संसदेचे नेतृत्व असते. लोकसभेचे सभापदी आणि राज्यसभेचे अध्यक्ष पंतप्रधानांशी चर्चा करून आपापल्या सभागृहाचे कामकाज ठरवितात. मंत्रिमंडळाचा नेता व प्रवक्ता या नात्याने संसदेतील सर्व कामकाजात सरकारी धोरणाचे समर्थन व स्पष्टीकरण पंतप्रधानाना द्यावे लागते.

**५) संघराज्यात्मक कार्य** - पंतप्रधानांना भारतीय संघराज्य व्यवस्थेमध्ये केंद्रसरकार आणि घटकसरकारे यांच्यात समन्वय आणि सहकार्य निर्माण करणे, केंद्र आणि राज्य यांच्यात कोणताही वाद विकोपाला जाणार नाही याची काळजी घेणे ही कार्ये करावी लागतात.

भारतीय काही राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था आहेत. उदा. योजना आयोग, राष्ट्रीय विकास परिषद इ. अशा ठिकाणी पंतप्रधानांना प्रांताच्या नेत्यांबरोबर चर्चा करता येते.

**६) परराष्ट्रीय धोरण** (**Foreign policy**) - देशाचे परराष्ट्रीय धोरण ठरविण्यामध्ये मूख्य भूमिका पंतप्रधान करतात. पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या काळापासून पंतप्रधान देशाच्या परराष्ट्र धोरणात रस घेतात. आपल्या देशात परराष्ट्र खात्यांसाठी वेगळा मंत्री असतो पण महत्त्वाच्या धोरणांवर पंतप्रधानांची छाप जाणवते. पंडित नेहरूंनी अतिप्रशासनवादी धोरणांद्वारे भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा पाया घातला. पंतप्रधान संयुक्त राष्ट्रसंघ, सार्क वगैरे महत्त्वाच्या संस्थांच्या बैठकींना भारताचे प्रतिनिधीत्व करतो.

**७) मुख्य प्रशासक** (**Main administrator**) - देशाचे प्रमुख म्हणून पंतप्रधानांना प्रशासनावर लक्ष ठेवावे लागते. यासाठी त्यांना संरक्षण, व्यापार, वित्त, गृह वगैरे सर्व विभागांकडे लक्ष ठेवावे लागते. त्याचप्रमाणे भारताची परदेशात हेरगिरी करणारी (रिसर्च ॲन्ड ॲनॅलेसिस विंग), देशातंर्गत हेरगिरी करणारी 'इंटेलिजन्स ब्युरो' वगैरेंसारख्या संस्थांकडून महत्त्वाची माहिती पंतप्रधानांना मिळत असते.

**८) राज्यपालाची नेमणूक** - देशातील महत्त्वाच्या नेमणुका जरी राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने होत असल्या तरी त्यामागे पंतप्रधानांचा सल्ला असतोच. थोडक्यात म्हणजे पंतप्रधानांच्या हाता राज्यपाल, राजदूत वगैरे नेमणुका असतात याचप्रमाणे पंतप्रधान एखाद्या उद्योगसमूहाला खास मदत करू शकतात किंवा दुर्लक्ष करू शकतात.

**९) निवडणुका** - लोकशाहीत निवडणुका अतिशय महत्त्वाच्या असतात. सत्ता संपादनासाठी निवडणुका जिंकणे महत्त्वाचे असते. पंतप्रधानपदी बसलेल्या व्यक्तीला निवडणुकांत सत्तारूढ पक्षाचे नेतृत्व करावेलागते, दौरे काढावे लागतात, पक्षाचा प्रचार करावा लागतो. पक्षाला पुन्हा एकदा सत्ता मिळवून देण्यासाठी पंतप्रधानांना महत्त्वाची जबाबादरी उचलावी लागते.

**१०) सत्तारूढ पक्षाचे नेतृत्व** (**Leader of ruling party**) - परंपरेनुसार सत्तारूढ पक्षाचा नेता पंतप्रधान होतो. पक्षाच्या जाहीरनाम्यात अभिप्रेत असलेले आर्थिक, सामाजिक कार्यक्रम आखणे, त्या कार्यक्रमांची अंमलबजावणी होण्यासाठी पक्षयंत्रणा उभारणे, संबंधित कार्यक्रमांची अंमलबजावणी योग्यप्रकारे होते आहे की नाही हे तपासणे तर दुसऱ्या बाजूला पक्षाने जो कार्यक्रम स्वीकारला असेल त्याच्या अनुषंगाने कायदे संमत करवून घेणे, त्यांची अंमलबजावणी करणे हेही पंतप्रधानास पाहावे लागते. याचाच अर्थ असा की पंतप्रधान सत्तारूढ पक्षाचा नेता होतो. यामुळे पंतप्रधानांवर आणखी एक जबाबदारी येऊन पडते आणि ती म्हणजे सरकार आणि सत्तारूढ पक्ष यांच्यात कडी म्हणून काम करणे.

**११) जन नेते** (**Public Opinion**) - पंतप्रधान राष्ट्राच्या एकात्म भावनेचे प्रतीक असतात. त्यांच्या प्रत्येक हालचालीला, उद्‌गारांना प्रसिद्धी मिळते आणि त्यातून सरकारी धोरणांचा मागोवा घेण्यात येतो. अंतिमतः पंतप्रधानांना साऱ्या देशाचे नेतृत्व करावे लागते. या भूमिकेतून त्यांना जनमतावर प्रभाव टाकता येतो, समाजात पुरोगामी मूल्ये रुजवता येतात याचे ताजे उदाहरण म्हणजे महिला आरक्षण विधेयक, सध्या सत्तारूढ असलेली काँग्रेस-प्रणित आघाडी हे विधेयक संमत करून घेण्याच्या प्रयत्नात आहे. पंतप्रधान समाजात पुरोगामी वातावरण निर्माण करू शकतात.

### ६.४.४ पंतप्रधानांची भूमिका (Role of the Prime Minister) :

संसदीय शासनपद्धीमध्ये पंतप्रधानांचे स्थान महत्त्वाचे असते. भारतासारख्या समाजात पंतप्रधानांचे स्थान अतोनात महत्त्वाचे असते. मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्र्याला पंतप्रधानांच्या सूचना ऐकाव्याच लागतात. ते मंत्रिमंडळाच्या खात्यांची रचना, पुनर्रचना करतात. ते एखाद्या मंत्र्याला डच्चू देऊ शकतात. याबद्दल त्यांचा शब्द अंतिम समजला जातो. संसदेमध्ये पंतप्रधान चर्चेला दिशा देऊ शकतात, त्यात मौलिक भर घालू शकतात. मंत्रिमंडळाचा प्रमुख म्हणून ते राष्ट्रपती, संसद आणि मंत्रिमंडळ यांच्यातील कडी असतात. पंतप्रधान देशाचा, वास्तविक (Real) शासनप्रमुख आहे. 'शासनाची मुख्य आधारशीला (Keystone)', 'ग्रहमालेतील सूर्य' याप्रमाणे पंतप्रधानपदाला उपमा देण्यात येतात.

पंतप्रधानपदाला व ते पदावर असणाऱ्या व्यक्तीला खूप अधिकार असतात. पंतप्रधान शक्तीशाली असतो. जर सत्तारूढ पक्षाला स्पष्ट बहुमत नसेल आणि सत्तेसाठी इतर पक्षांवर अवलंबून राहावे लागत असेल तर पंतप्रधान फारसे अधिकार गाजवू शकत नाहीत. पंतप्रधानपदी बसलेल्या व्यक्तिचे व्यक्तिमत्त्व कसे आहे, यावरही बरेचसे अवलंबून असते.

भारतीय लोकशहीचा विचार केल्यास पंतप्रधानपदाचे दोन टप्पे दाखवता येतात. १९७७ सालापर्यंत पंतप्रधानांना खूप अधिकार होते. आता भारतात आघाडीची आणि युती सरकारे आल्यामुळे पंतप्रधानपद कमकुवत झाले आहे. याचे कारण म्हणजे सत्ता टिकविण्यासाठी पंतप्रधानांना अनेक पक्षांना खूष ठेवावे लागते.

## ६.५ मंत्रिमंडळ (The Council of Ministers) :

भारताच्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेमध्ये पंतप्रधान व मंत्रिमंडळ वास्तविक कार्यकारी आहेत.

संसदीय पद्धतीमध्ये मंत्रिमंडळ हा महत्त्वाचा घटक असतो. कलम ७४(१) नुसार राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असते. या कलमाद्वारे मंत्रिमंडळाचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार कारभार करावा लागतो. याबद्दलची कायदेशीर भाषा काळजीपूर्वक वाचली तर असे दिसते की मंत्रिमंडळ राष्ट्रपतींना 'सल्ला' देते, 'हुकूम' नाही. कायदेशीररीत्या विचार केल्यास 'सल्ला' नाकारता येतो जर राष्ट्रपतींनी मंत्रिमंडळाचा सल्ला नाकारला तर काय होईल? सुरुवातीला असे वाटत होते की अशी स्थिती उद्भवणार नाही. ४२ वी घटनादुरुस्ती (१९७६) मुळे राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाचा सल्ला पाळणे बंधनकारक करण्यात आले यामुळे भारतीय राष्ट्रपती 'होयबा' झाले. ४४ वी घटनादुरुस्ती (१९७९) मुळे यात किंचित बदल करण्यात आला. मंत्रिमंडळाचा सल्ला पूर्णपणे किंवा काही बदलांसह राष्ट्रपतींकडे परत आला तर मात्र राष्ट्रपतींना हा सल्ला मानावाच लागतो. मार्च १९९१ मध्ये पंतप्रधान चंद्रशेखर यांनी पंजाबमध्ये निवडणुका घ्याव्या असा सल्ला दिला. राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांना हा सल्ला मान्य नव्हता. त्यांनी हा सल्ला परत पाठवला. मंत्रिमंडळाने हा सल्ला पुन्हा एकदा राष्ट्रपतींकडे पाठवला तेव्हा मात्र राष्ट्रपतींना मान्य करावा लागला.

**६.५.१ मंत्रिमंडळाची निर्मिती** - कलम ७५ मंत्रिमंडळाच्या निर्मितीसंबंधी आहे. मंत्र्यांची नेमणूक राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्लानुसार करतील. या कलम ७५ मध्ये असलेल्या तरतुदीतून स्पष्ट जाणवते की, मंत्रिमंडळ बनवणे हा पंतप्रधानांचा खास अधिकार असतो, पंतप्रधान त्यांच्यामध्ये खातेवाटप करतात, मंत्रिमंडळाची फेररचना करू शकतात, एखाद्या मंत्र्याला बडतर्फ करू शकतात.

**मंत्रिमंडळाची रचना** - मंत्रिमंडळाच्या रचनेमध्ये विविध स्तर असतात. १) कॅबिनेट मंत्री, २) खात्याचे राज्यमंत्री (३) उपमंत्री (४) संसदीय सचिव या सर्वांचा मुख्य पंतप्रधान असतो.

**१) कॅबिनेट मंत्री** - कॅबिनेट मंत्री म्हणजे खात्याचे प्रमुख असतात. हे पद सहसा सत्तेत निवडून आलेल्यापक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना देण्यात येते. कॅबिनेट म्हणजे अतिशय महत्त्वाचे निर्णय घेण्याची यंत्रणा होय. यात अगदी निवडक मंत्री असतात. ही संख्या १५-२० असते. ते स्वतंत्रपणे आपापल्या खात्यांचा कारभार करतात. मात्र महत्त्वाचे निर्णय, धोरणाबद्दल कॅबिनेट मंत्री पंतप्रधानांचा सल्ला घेतात.

**२) खात्याचे राज्यमंत्री** - मंत्रिमंडळाचा हा दुसरा स्तर असतो. ते कॅबिनेट मंत्र्यांना मदत करतात. जर खाते मोठे असेल तर खात्याच्या राज्यमंत्र्यांवर एखाद्या विभागाची स्वतंत्र जबाबदारी देण्यात येते. जर खाते मोठे नसेल तर हे मंत्री कॅबिनेट मंत्र्यांना दैनंदिन कामात मदत करतात.

**३) उपमंत्री** - हा मंत्रिमंडळाचा तिसरा स्तर असतो. ते एक तर कॅबिनेट मंत्र्यांना किंवा राज्यमंत्र्यांना मदत करतात. त्यांच्याकडे स्वतंत्र जबाबदारी नसते.

**४) संसदीय सचिव** - म्हणजे 'प्रशिक्षणार्थी मंत्री' या पदावर तरुण राजकारण्यांची नेमणूक केली जाते याद्वारे त्यांना प्रशसनाचा अनुभव मिळतो.

**६.५.२ कॅबिनेटचे अधिकार, कार्य आणि भूमिका :**

महत्त्वाचे निर्णय घेण्याचे, धोरण ठरवण्याचे अंतिम स्थान म्हणजे 'कॅबिनेट' होय. कॅबिनेटच्या बैठकांना फक्त कॅबिनेट मंत्री उपस्थित राहतात. कॅबिनेटने घेतलेले निर्णय मंत्रिमंडळाने घेतले असे मानण्यात येते. याशिवाय सर्व मंत्र्यांवर सामूहिक जबाबदारीचे तत्त्व लागू होते.

संसदीय शासनपद्धतीत कॅबिनेट सर्वोच्च यंत्रणा असते. कॅबिनेटची बैठक दर आठवड्याला होते. या बैठकीची कार्यक्रमपत्रिका (अजेंडा) कॅबिनेट सचिव तयार करतात. कॅबिनेट सचिव हे पद नोकरशाहीतील सर्वोच्च पद आहे, जे ज्येष्ठ आय.ए.एस. अधिकाऱ्याला मिळते. कॅबिनेट बैठकीचे इतिवृत्त कॅबिनेट सचिव तयार करतात. कॅबिनेटमधील निर्णय सर्वसहमतीने घेतले जातात. जर एखाद्या मंत्र्याला कॅबिनेटचा निर्णय मान्य नसेल तर त्याला राजीनामा द्यावा लागतो. यालाच सामूहिक जबाबदारीचे तत्त्व म्हणतात. जर एखाद्या मंत्र्याला कॅबिनेटचा निर्णय मान्य नसेल तर पंतप्रधान त्याला राजीनामा द्यायला सांगतात.

**कॅबिनेटची कार्ये :** कॅबिनेटला खाली नमूद केलेली कार्य करावी लागतात.

**१) धोरण ठरवणे** - कॅबिनेट ही धोरण ठरवणारी सर्वोच्च यंत्रणा आहे. कॅबिनेटमध्ये राष्ट्रीय, परराष्ट्रीय विषयांची चर्चा होते आणि यातून धोरण ठरते. धोरणावर आधारित निर्णय घेतले

जातात आणि योग्य त्या विभागाकडे कळवण्यात येतात. ही जबाबदारी कॅबिनेट सचिवांची असते. जर एखाद्या राज्यमंत्र्यांची किंवा उपमंत्र्यांची उपस्थिती गरजेची असते तर त्या व्यक्तीला कॅबिनेट बैठकीला बोलावण्यात येते.

**२) नवीन कायदे** - संसदीय पद्धतीत कायदा करणे ही कॅबिनेटची महत्त्वाची जबाबदारी असते. नवीन कायद्याचा कच्चा मसुदा कॅबिनेट बैठकीत चर्चेला येतो. येथे प्रस्तावित कायद्याच्या सर्व बाजू तपासल्या जातात. कच्चा मसुदा नंतर पक्का होतो आणि संसदेसमोर येतो.

**३) अंतिम नियंत्रण** - धोरण ठरविल्याप्रमाणे कॅबिनेटला देशाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. कॅबिनेट नियंत्रणाद्वारे देशातील महत्त्वाची प्रकल्पे, योजना यांच्या अंमलबजावणीवर देखरेख केली जाते.

**४) समन्वय** - कॅबिनेटमध्ये तपशीलवार चर्चा होते. यातून व्यापक पातळीवर समन्वय साधला जातो. योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना काही अडथळे येऊ शकतात, कामाची पुनरुक्ती होऊ शकते. हे सर्व कॅबिनेटमध्ये चर्चेद्वारे सोडवले जाते.

**५) आर्थिक नियंत्रण** - एका बाजूने कॅबिनेट धोरण ठरवणारी सर्वोच्च यंत्रणा असते तर दुसऱ्या बाजूने कॅबिनेट देशाच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवते. कॅबिनेट बैठकांत योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा सतत घेतला जातो, जर खर्च हाताबाहेर जात असेल तर उपाययोजना केली जाते.

**६) राष्ट्रपतीची राजवट** - कलम ३५६ नुसार राज्यांत राष्ट्रपतीची राजवट लागू करता येते. जर घटक राज्य सरकार घटनेतील तरतुदीप्रमाणे चालत नसेल तर ते राज्य सरकार बडतर्फ करून राष्ट्रवादीची राजवट लादता येते. असे निर्णय कॅबिनेट बैठकीत घेतले जातात.

**७) नेमणुका** - कॅबिनेट बैठकांत महत्त्वाच्या नेमणुका पक्क्या केल्या जातात. राज्यपाल, राजदूत, मुख्य निवडणूक आयुक्त वगैरे, नेमणुकांबद्दलचे निर्णय कॅबिनेट बैठकींमध्ये घेतले जातात. त्यासाठी कॅबिनेटची एक उपसमिती असते.

## ६.६ प्रश्न :

(१) भारतीय राज्यघटनेप्रमाणे राष्ट्रपतीच्या भूमिकेचे टिकात्मक परिक्षण करा.
(२) राष्ट्रपतीचे अधिकार, कार्ये, स्थान याविषयी सविस्तर विवेचन करा.
(३) भारतीय राज्यव्यवस्थेप्रमाणे पंतप्रधानांच्या भूमिकेची चर्चा करा.
(४) भारतीय पंतप्रधानाचे अधिकार आणि कार्याचा मागोवा घ्या.
(५) मंत्रिमंडळाची निर्मिती आणि रचना सांगून अधिकार आणि कार्ये सांगा.
(६) टिपा द्या : (१) उपराष्ट्रपती, (२) राष्ट्रपतींचे घटनात्मक स्थान.

❖❖❖❖

# ७

# भारतीय न्यायव्यवस्था आणि निवडणूक आयोग
# (INDIAN JUDICIARY)

**प्रकरणाची रचना :-**


७.० उद्दिष्ट
७.१ प्रस्तावना
७.२ भारतीय न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये
७.३ सर्वोच्च न्यायालय
७.४ न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य (Independence of Judiciary)
७.५ न्यायालयीन पुनर्विलोकन
७.६ न्यायालयीन सक्रियता (Judicial Activism)
७.७ निवडणूक आयोग
७.८ प्रश्न


## ७.० उद्दिष्ट

भारतीय न्यायव्यवस्था आणि निवडणूक आयोगाचा अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना :

लोकशाही राज्यपद्धतीमध्ये कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात सत्तेचे विभाजन केलेले असते. कायदेमंडळ कायदे करण्याचे, कार्यकारीमंडळ कायदे अमलात आणण्याचे आणि न्यायमंडळ कायद्याचा अर्थ लावण्याचे कार्य करतात. भारतीय राज्यघटनेतील भाग ५, कलम १२४ ते १४७ मध्ये भारतीय न्यायव्यवस्थेची माहिती आहे.

## ७.२ भारतीय न्यायव्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये :

कायद्याचा अर्थ लावून न्याय देणारी शासनाची शाखा म्हणजे न्यायमंडळ होय. भारतीय न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) स्वतंत्र्य आणि मुक्त न्यायव्यवस्था
२) न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क
३) एकेरी न्यायव्यवस्था.

**एकेरी न्यायव्यवस्था** - अमेरिकेप्रमाणे भारतामध्ये संघराज्य पद्धती आहे परंतु अमेरिकेप्रमाणे दुहेरी न्यायव्यवस्था (dual judiciary) भारतात नाही. भारतात संघराज्याची आणि घटकराज्यांची वेगवेगळी न्यायालयीन व्यवस्था न स्वीकारता एकेरी न्यायव्यवस्था प्रस्थापित केली आहे. देशात एकात्मता वाढावी हा त्यामागे उद्देश होता. भारतात एकेरी न्यायव्यवस्था (Single Judiciary) असल्यामुळे सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय आहे. त्याखाली उच्च न्यायालये, जिल्हा न्यायालये, तालुका न्यायालये आहेत. सर्वोच्च व उच्च न्यायाधीशांच्या नेमणुका राष्ट्रपती करतात. सर्वोच्च व उच्च न्यायालये संघराज्याचे व घटकराज्यांचे कायदे राबवितात. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयापासून ते तालुका न्यायालयापर्यंत संपूर्ण न्यायालयीन व्यवस्था एकात्मतेच्या तत्त्वावर आधारलेली आहे.

भारतातील २८ राज्यांसाठी आणि ७ केंद्रशासित प्रदेशांसाठी एकूण २१ उच्च न्यायालये भारतात आहेत. अंतिम न्यायालयाची भूमिका सर्वोच्च न्यायालय करीत असते.

## ७.३ सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) :

२६ जानेवारी १९५० ला सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.

### ७.३.१ सर्वोच्च न्यायालयाची रचना :

भारतीय राज्यघटनेचा भाग पांच, कलम १२४ ते १४७ सर्वोच्च न्यायालयाची रचना, कार्ये, भूमिका आणि न्यायालयाचे स्वातंत्र्य यासंबंधी आहे.

**१) न्यायाधीशांची संख्या** - घटनेच्या १२४ व्या कलमाप्रमाणे सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश आणि सात इतर न्यायाधीश असतात. सध्या सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश आणि ३१ इतर न्यायाधीश असतात. संसदेला कायदा करून न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचा अधिकार आहे.

**२) न्यायाधीशांची नियुक्ती** - सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधीशांची नेमणूक राष्ट्रपती करतात. सरन्यायाधीशांची नेमणूक करताना राष्ट्रपती न्यायालयातील इतर न्यायाधीशांचा सल्ला घेतात. साधारणपणे ज्येष्ठ न्यायाधीशांची नेमणूक सरन्यायाधीश म्हणून करण्यात येते. इतर न्यायाधीशांची नेमणूक सरन्यायाधीांच्या सल्ल्यानुसार करण्यात येते. न्यायाधीशांच्या नियुक्ती पद्धतीवरून असे दिसते की न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये राजकीय हस्तक्षेप नसतो.

**३) न्यायधीशांच्या नेमणुकीसाठी पात्रता** -
१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असली पाहिजे.
२) उच्च न्यायालयाचा कमीत कमी ५ वर्षे सतत न्यायाधीश असावा किंवा उच्च न्यायालयात १० वर्षे सतत वकिली केली असली पाहिजे.
३) राष्ट्रपतींच्या मते, ती व्यक्ती सुप्रसिद्ध कायदेपंडित असावी. प्रत्यक्षात सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधीश उच्च न्यायालयातून ज्येष्ठतेच्या तत्त्वावर नेमले जातात.

**४) कार्यकालाची सुरक्षितता** - न्यायाधीशांचे निवृत्ती वय ६५ वर्षे आहे. त्यामुळे न्यायाधीशाला कार्यकालाची निश्चितता मिळाली आहे. निवृत्त होईपर्यंत न्यायाधीश आपल्या पदावर राहतात आणि निर्भयपणे न्याय देऊ शकतात.

**५) पदच्युती** (**Removal**) - न्यायाधीशांना त्यांच्या जागेवरून गैरवर्तुणुकीसाठी बडतर्फ करता येते परंतु त्यासाठी घटनेने विशिष्ट प्रकारची कठीण प्रक्रिया सांगितली आहे. न्यायाधीशांवर गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमतेचा आरोप असेल आणि तसा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकूण सभासद संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या २/३ बहुमताने मंजूर केल्यावरच न्यायाधीशाला पदभ्रष्ट करण्याचा आदेश राष्ट्रपति काढू शकतात. सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित राहावे यासाठी ही कठीण प्रक्रिया ठेवली आहे. या प्रक्रियेला impeachment) महाभियोगाची प्रक्रिया म्हणतात.

**६) वेतन** - घटनेनुसार न्यायाधीशांचे वेतन व भत्ते यासंबंधी तरतूद केलेली आहे. संसदेने ठरविलेले भत्ते, वेतन, निवासस्थान त्यांना मिळते. त्यांचे वेतन व भत्ते संचित निधीतून दिले जातात. न्यायाधीशांना निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन मिळते. वेळोवेळी न्यायाधीशांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे.

**७) सेवानिवृत्तीनंतर व्यवसाय करण्यास बंदी** (**Ban on practice after retirement**) - न्यायाधीशाला सेवानिवृत्तीनंतर भारतातील कोणत्याही न्यायालयात वकिली करता येत नाही कारण निवृत्ती झालेले ज्येष्ठ न्यायाधीश वकिली करू लागले तर संबंधित न्यायालयातील न्यायाधीशांवर दबाव येण्याची शक्यता असते.

**८) कर्मचारी** (**Freedom to appoint its staff**) - सर्वोच्च न्यायालयाचा स्वतंत्र कर्मचारी वर्ग असतो. त्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती, सेवाशर्ती आणि नियंत्रण न्यायालयातर्फेच होते. त्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, निवृत्तीवेतन व प्रशासकीय खर्च भारताच्या संचित निधीतून देण्यात येतो.

**९) सवलती** (**Immunities**) - न्यायाधीशांच्या सर्व कृतींवर व निर्णयांवर कोणाला कसलीही टीका करता येत नाही. जर कुणी न्यायाधीशांवर टीका करण्याचा प्रयत्न केला तर त्या व्यक्तीला किंवा संस्थेला शिक्षा देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. कलम १२१ प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधिशांच्या वागणूक व निर्णयाविषयी संसदेमध्ये चर्चा होऊ शकत नाही.

**१०) स्थान** - संसदेला सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्ये कमी करण्याचा अधिकार नाही. कार्यकारी मंडळाला संसदेच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. न्यायालयाच्या कामकाजाची भाषा इंग्रजी आहे. भारताच्या एकेरी न्यायालयीन रचनेमध्ये सर्वोच्च न्यायालय अंतिम आणि श्रेष्ठ आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय भारतातील सर्व नागरिक, सर्व संस्था आणि इतर न्यायालये या सर्वांवर बंधनकारक असतात.

**सारांश तक्ता - सर्वोच्च न्यायालयाची रचना**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न्यायाधीशांचा संख्यी | पात्रता | नियुक्ती | कार्यकाल | पदच्युती | वेतन | बंदी | कर्मचारी | सवलती | स्थान |

## ७.३.२. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार, कार्ये आणि भूमिका (Powers, Functions and Role of the Supreme Court) :

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये यासंबंधी विस्तृत तरतुदी घटनेने केलेल्या आहेत. या तरतुदी पुढील पाच गटांमध्ये विभागता येतात.

**तक्ता : सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक अधिकार क्षेत्र | पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र | आदेश देण्याचा अधिकार | सल्ला देण्याचे अधिकार क्षेत्र | न्यायालयीन पुनर्विलोकन | अभिलेख न्यायालय | इतर अधिकार |

**१) प्रारंभिक अधिकार क्षेत्र** (**Original Jurisdiction**) - ज्या खटल्यांची सुरुवात सर्वोच्च न्यायालयातच होऊ शकते, इतर कोणत्याही न्यायालयात जे खटले प्रथम दाखल करता येत नाहीत त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकार म्हणतात. सर्वोच्च न्यायालयाच्या या अधिकारक्षेत्रात पुढील खटल्यांचा समावेश होतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या या कार्यक्षेत्राचे स्वरूप संघीय न्यायालयाचे आहे.

१) भारत सरकार विरुद्ध घटकराज्य यांच्यातील वाद.
२) भारत सरकार आणि काही राजये् विरुद्ध इतर राज्य यांच्यातील वाद.
३) दोन घटक राज्यांमध्ये निर्माण झालेला वाद.
४) कोणत्याही केंद्रीय कायद्याच्या घटनात्मक वैधतेचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयातच प्रथम सुनावणीला येऊ शकतो.

प्रारंभिक अधिकार क्षेत्रामुळे सर्वोच्च न्यायालय ‘संघीय न्यायालय’ म्हणून कार्य करीत असते आणि संघराज्याचे संरक्षण करते.

**२) पुनर्विचाराचे अधिकार क्षेत्र** (**Appellate Jurisdiction**) - भारतामध्ये ऐकरी न्यायव्यवस्था आहे. सर्वोच्च न्यायालय अंतिम आणि सर्वोच्च न्यायालय आहे. भारतातील उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांवर पुनर्निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त झाला आहे. सैनिकी न्यायालयाने दिलेल्या निर्णयांवर मात्र ते अपील ऐकू शकत नाहीत. खालील दाव्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. (अ) घटनात्मक दावे (ब) दिवाणी दावे (क) फौजदारी दावे.

**अ) घटनेचा अन्वयार्थ** (**Cases involving Interpretation of the Constitution**) **:**

उच्च न्यायालयाच्या दाखल्यानंतरच घटनात्मक विश्लेषणासाठी अशाप्रकारचे दावे सर्वोच्च न्यायालयात दाखल केले जातात.

**ब) दिवाणी दावे (Civil Cases) :**

दिवाणी दाव्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी कमीतकमी २० हजार रुपये अंतर्भूत खटलेच असावेत अशी अट होती परंतु आता ती रद्द करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने असे प्रमाणपत्र दिले की दावा सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यायोग्य आहे किंवा त्यामध्ये कायद्याचा महत्त्वाचा भाग अंतर्भूत आहे म्हणजे सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते.

**क) फौजदारी दावे (Criminal Cases) :**

फौजदारी दाव्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात अपील करताना पुढील तरतूदी लक्षात घेण्यात येतात.

अ) उच्च न्यायालयाने आरोपीस निर्दोष सोडून दिल्यास.

ब) उच्च न्यायालयाने आरोपीस फाशीची शिक्षा दिल्यास.

क) उच्च न्यायालयाने दावा सर्वोच्च न्यायालयाने चालविण्यायोग्य असल्याचा दाखला दिल्यास.

**३) आदेश देण्याचा अधिकार (Writ Jurisdiction)** - कलम ३२ प्रमाणे मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयात जाण्याचा नागरिकांना हक्क आहे. या हक्कांप्रमाणे मूलभूत हक्कांचा भंग झाल्यास व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाकडे अर्ज करू शकतात. तेव्हा मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालय आदेश देतात. उदा. बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, सर्वोच्च न्यायालय या हक्कानुसार मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची भूमिका करते.

**४) सल्ला देण्याचे अधिकार क्षेत्र (Advisery)** - राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यायालय कायदेशीर सल्ला देऊ शकते. कायद्याचा प्रश्न उपस्थित झाल्यास असा सल्ला राष्ट्रपती मागतात. हा सल्ला गुप्त स्वरूपाचा असतो. तो सल्ला मानलाच पाहिजे असे बंधन राष्ट्रपतींवर नसते.

**५) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार (Judicial Review)** - कायदेमंडळाने केलेला कायदा आणि कार्यकारी मंडळाने केलेली कृती घटनेशी सुसंगत आहे किंवा नाही ते तपासून पाहणे आणि सुसंगत नसल्यास रद्द ठरविणे म्हणजे न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क होय. भारतात घटना सर्वोच्च आहे. घटनेच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायालयावर आहे. ती जबाबदारी पार पाडण्यास व नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करता यावे म्हणून सर्वोच्च न्यायालयाला हा हक्क देण्यात आला आहे.

**६) अभिलेख न्यायालय (Court of Record)** - सर्वोच्च न्यायालय अभिलेष न्यायालय म्हणून कार्य करते. सर्वोच्च न्यायालयाचे सर्व निर्णय व कार्यपद्धती यांची काळजीपूर्वक नोंद ठेवली जाते. पुढे उद्‌भवणाऱ्या तशाच प्रकारच्या खटल्यांच्या सुनावणीच्या वेळी या नोंदी मार्गदर्शक म्हणून उपयोगात येतात. या निर्णयांना कायद्याचे स्वरूप येते. हे निर्णय भारतातील सर्व न्यायालयांना बंधनकारक असतात.

**७) इतर अधिकार** - राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसंबंधीचे वाद सोडविणे.

### ७.३.३ सर्वोच्च नयायालयाचे स्थान आणि भूमिका (Position and Role of Supreme Court) :

जगातील इतर देशांच्या न्यायालयांपेक्षा भारतातील सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्याचे स्वरूप आणि विस्तार व्यापक आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालय खालील महत्त्वाच्या भूमिका पार पाडते.

**१) संघीय न्यायालय (Federal Court)** - भारतात संघराज्य पद्धती असूनसुद्धा भारतात केंद्र व राज्यांची अशी दुहेरी न्यायव्यवस्था नाही. त्यामुळे केंद्र व राज्य, राज्य व राज्य यांच्यातील वाद सोडविण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करते. त्यासाठीच सर्वोच्च न्यायालयाला प्रारंभिक अधिकारक्षेत्र दिले आहे. या अधिकारामुळे सर्वोच्च न्यायालय भारतात संघीय न्यायालयाची भूमिका करीत असते आणि केंद्र व राज्य यांच्यात समतोल राखण्याचे कार्य करते.

**२) घटनेचे संरक्षण (Guardian of the Constitution)** - घटनेचे संरक्षण करणे आणि घटनेची सर्वोच्चता राखणे ही जबाबदारी न्यायालय पार पाडीत असते. त्यासाठीच न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आला आहे.

**३)** भारतात अंतिम व सर्वोच्च न्यायालयाची भूमिका सर्वोच्च न्यायालय पार पाडते. (Final Court of appeal) एकेरी न्यायव्यवस्थेच्या रचनेमध्ये भारतात सर्वोच्च न्यायालय अंतिम (Final) न्यायालय आहे.

**४)** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांना कायद्याचे स्वरूप प्राप्त होते. त्याचा उपयोग इतर न्यायालयांना करता येतो. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश इतर न्यायालयांना बंधनकारक असतात.

**५)** मूलभूत हक्कांचे संरक्षण आणि हमी देण्याची भूमिका सर्वोच्च न्यायालय करते.

## ७.४ न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य (Independence of Judiciary) :

भारतात न्यायव्यवस्था मुक्त व स्वतंत्र आहे. त्यासाठी घटनेने खास तरतुदी केल्या आहेत.

### ७.४.१ न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य म्हणजे काय?

न्यायाधीशांना कोणाचीही भीती न बाळगता किंवा कोणात्याही दबावाला व प्रलोभनाला बळी न पडता (Without Fear and Favour) निःपक्षपातीपणे कार्य करता यावे यासाठी न्यायव्यवस्था, कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि शासनाच्या इतर घटकांच्या हस्तक्षेपापासून व प्रभावापासून मुक्त आहे. न्यायव्यवस्था स्वतंत्रपणे कार्य करीत असते.

### ७.४.२ न्यायालयीन स्वातंत्र्याचे महत्त्व :

१) सामान्य नागरिकांच्या दृष्टीने - सर्वोच्च न्यायालय मूलभूत हक्कांचे संरक्षण करीत असल्यामुळे आणि शासनाच्या सत्तेवर मर्यादा ठेवत असल्यामुळे स्वतंत्र न्यायव्यवस्था असणे सामान्यांच्या हिताचे आहे.

२) (Work as a guardian of the constitution) राज्यघटनेची सर्वोच्चता राखण्याचे आणि घटनेच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर असल्यामुळे न्यायव्यवस्था स्वतंत्र असणे गरजेचे आहे.

३) भारतीय संघराज्याच्या दृष्टीने - केंद्र आणि राज्य यांच्यातील वाद सोडविण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्थेचे महत्त्व निश्चितच आहे.

मूलभूत हक्कांचे, राज्यघटनेचे आणि लोकशाहीचे रक्षण करण्याचे कार्य न्यायालय करीत असल्यामुळे न्यायालय मुक्त आणि स्वतंत्र असेल तरच निपक्षपातीपणे आपले कार्य करु शकतात.

**न्यायालयीन स्वातंत्र्यासाठी घटनात्मक तरतुदी खालीलप्रमाणे आहेत :**

**१) न्यायधीशांची पात्रता व नेमणूक :** न्यायधीशांच्या नियुक्तीमध्ये राजकारण येऊ नये म्हणून न्यायाधीशपदासाठी उच्च दर्जाची पात्रता आवश्यक आहे. म्हणजेच न्यायाधीशांची नेमूणक राष्ट्रपती करीत असले तरी ते न्यायाधीशांची नेमणूक करतांना ती पात्रता लक्षात घेऊन सर्वोच्य न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि इतर न्यायाधीश यांच्याशी सल्लामसलत करुन न्यायाधीशांची नेमणूक करतात.

**२) न्यायाधीशांना कार्यकालाची सुरक्षा आहे (Security of Tenure) :** घटनेने न्यायाधीशांच्या कार्यकाल निश्चित केला आहे. न्यायाधीशांचे नियुक्त होण्याचे ६५ वर्षे आहे. त्यामुळे न्यायाधीशांना आपल्या कार्यकालाची सुरक्षा मिळाली आहे. गैरवर्तणुकीसाठी एखाद्या न्यायाधीशाला पदच्युत करावयाचे असेल तर न्यायाधीशांना पदच्युत करण्याची प्रक्रिया अतिशय कठीण आहे.

**३) भरपूर वेतन, सुखसोयीसुविधा आणि भत्ते :** न्यायाधीश कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये म्हणून त्यांना सर्व सुविधा, भरपूर वेतन आणि भत्ते देण्यात येतात.

**४) निर्भयपणे कार्य करण्याची शपथ** - प्रत्येक नायाधीशाला पदग्रहण करण्यापूर्वी निर्भयतापूर्वक कार्य करण्याची आणि घटनेचे रक्षण करण्याची शपथ घ्यावी लागते.

**५) निवृत्तीनंतर वकीली करण्यास प्रतिबंध -** निवृत्तीनंतर न्यायाधीशांना वकीली करण्यास घटनेनुसार मनाई आहे कारण निवृत्तीनंतर कोणत्याही न्यायाधीशाने न्यायालयात वकीली केल्यास त्या न्यायालयातील इतर न्यायाधीशांवर दडपण येण्याची शक्यता असते.

**६) न्यायालयीन कार्यप्रणाली विषयी नियम करण्याचा अधिकार** - न्यायालयीन कार्यप्रणाली संबंधी नियम करण्याचा तसेच आपल्या न्यायालयीन अधिकारक्षेत्रामध्ये आदेश देण्याचा अधिकार सर्वोच्य न्यायालयाला आहे.

**७) कर्मचारी वर्गावर नियंत्रण (Control over Establishment) -** सर्वोच्च न्यायालयाचा स्वतंत्र कर्मचारी वर्ग असतो. न्यायालयातील कर्मचारी वर्गाची नियुक्ती मुख्य न्यायाधीशातर्फे होते तसेच त्यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयालाच आहे.

**८) टीकेपासून मुक्तता (Free from Criticism) -** न्यायालयावर टीका करून, न्यायालयाचा अपमान करणाऱ्या व्यक्ती व संस्थांवर उचित कार्यवाही करण्याचा अधिकार

सर्वोच्च न्यायालयाला आहे. त्यामुळे न्यायाधीश सर्व तऱ्हेचे दबाव, दडपण, धमक्यांपासून मुक्त राहू शकतात. अशा प्रकारे न्यायालयीन स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी घटनाकारांनी अनेक तरतुदी केल्या आहेत.

**९) न्यायालयाचे सार्वभौमत्व (Sovereignty of Judiciary) -** न्यायालयाचे निर्णय केंद्रशासन, राज्यशासन, सर्व जनता आणि देशातील सर्वांवर बंधनकारक असतात. न्यायालयीन निर्णय न पाळण्यानांवर 'कोर्टाचा अपमान केला' या गुन्ह्याखाली शिक्षा केली जाते.

### ७.४.४ न्यायालयीन स्वातंत्र्याच्या मार्गात निर्माण झालेले धोके :

१) शासकीय दादागिरी व त्यांची अनावश्यक लुडबूड - न्यायालयीन व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करण्याचा शासनाने अनेकदा प्रयत्न केला आहे. १९७४ मध्ये ज्येष्ठताक्रमानुसार सरन्यायाधीशांची नेमणूक करण्याऐवजी न्या. ए. एन. रे यांची सरन्यायाधीश पदावर नियुक्ती करण्यात आली होती. १९७५ ते १९७७ च्या आणीबाणीच्या काळात उच्च न्यायालयाच्या सुमारे १६ न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. अशा प्रकारे कार्यकारीमंडळ अति शक्तीशाली असेल तर न्यायालयीन व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करतात आणि अशावेळी न्यायालयाचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते.

२) सर्वसामान्य मानवी प्रवृत्तीप्रमाणे काही न्यायाधीश भ्रष्टाचारी व जातीय प्रवृत्तीचे आढळतात. प्रलोभनाला ते बरेचदा बळी पडतात.

३) अनेक न्यायाधीश राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगतात. निवृत्ती झाल्यानंतर राजदूत, राज्यपाल पद मिळेल या आशेने कार्य करतात त्यामुळे ते निपक्षपातीपणे कार्य करू शकत नाहीत.

४) न्यायाधीशांच्याही स्वतःच्या आवडीनिवडी, मूल्ये असतात त्याचा प्रभाव त्यांच्या कार्यावर पडतो.

**निष्कर्ष :** स्वतंत्र न्यायव्यवस्था भारतीय राजकीय व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. आतापर्यंत भारतीय न्यायालयांनी स्वतंत्रपणे व मुक्तपणे राहून महत्त्वपूर्ण भूमिका केली आहे.

### ७.४.५ सारांश : न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य

**१** न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याचा अर्थ

**२** महत्त्व

**३** स्वातंत्र्यासाठी घटनात्मक तरतुदी
- १. पात्रता
- २. नेमणूक
- ३. सुरक्षा कार्यकालीन
- ४. वेतन भत्ते
- ५. निर्भयतेची शपथ
- ६. निवृत्तीनंतरचे प्रतिबंध
- ७. स्वतंत्र कर्मचारी वर्ग व कार्यप्रणाली
- ८. टीकेपासून मुक्तता
- ९. न्यायालयाची सर्वोच्चता

**४** धोके
- १. शासकीय लुडबुड
- २. मानवी प्रवृत्ती
- ३.न्यायाधीशांची महत्त्वाकांक्षा
- ४. न्यायाधीशाचा स्वभाव

## ७.५ न्यायालयीन पुनर्विलोकन (Judicial Review) :

**७.५.१ न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अर्थ** - कार्यकारी मंडळाच्या कृती आणि कायदेमंडळाचा एखादा कायदा घटनेशी सुसंगत आहे किंवा नाही ते तपासून पाहणे आणि सुसंगत नसल्यास तो कायदा किंवा कृती रद्द ठरविण्याचा न्यायालयाचा हक्क म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकन होय. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनरावलोकनाचा अधिकार आहे.

### ७.५.२ न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकाराचे महत्त्व :

या अधिकारामुळे न्यायालयाला खालील भूमिका पार पाडता येतात. १) घटनेचे पालकत्व व संरक्षण - भारतात राज्यघटनेच्या सर्वोच्चतेला मान्यता देण्यात आली आहे आणि राज्यघटनेचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयावर आहे. सर्वोच्च न्यायलय घटनेचा अर्थ लावून कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ यांना घटनात्मक मर्यादेचे पालन करण्यास लावते आणि अशाप्रकारे घटनेची सर्वोच्चता राखण्याची भूमिका पार पाडते. २) न्यायालयाच्या या अधिकारामुळे लोकशाही स्थिर आणि यशस्वी होण्यासाठी मदत झाली आहे. कायद्याचे राज्य प्रस्थापित होण्यास मदत झाली. ३) संघराज्य व्यवस्थेचे रक्षण ४) नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण होण्यास मदत झाली आहे.

### ७.५.३ न्यायालयीन पुनर्विलोकनाचा विकास :

भारतात घटनेप्रमाणे न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आहे. स्वातंत्र्यानंतर त्याचा विकास खालीलप्रमाणे झाला आहे.

### न्यायालयीन पुनर्विलोकन आणि त्यातून निर्माण झालेले संघर्ष :

भारतीय राज्यघटना अमलात आल्यापासून न्यायालयाने न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अनेकदा वापर केला आहे. १९६७ नंतर न्यायालयाच्या या अधिकारामुळे न्यायालयाचे संसदेशी शत्रुत्व निर्माण होते. १९६७ साली गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य या खटल्याच्या वेळी न्यायालयाने असा निर्णय दिला की मूलभूत हक्कांचा संकोच करणारी कोणतीही दुरुस्ती करण्याचा संसदेला अधिकार नाही. याप्रमाणे न्यायालयाने संसदेच्या अधिकारांवर मर्यादा टाकली.

न्यायालयाने संसदेवर अशाप्रकारचे नियंत्रण आणल्यामुळे संसदेने १९७१ साली २४ वी आणि २५ वी घटनादुरुस्ती केली. या घटनादुरुस्तीप्रमाणे नवीन कलम घटनेला जोडण्यात आले. घटनेतील १४, १९ व ३१ या कलमांतील मूलभूत हक्कांना बाधा येते या सबबीखाली मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी केलेला कोणताही कायदा न्यायालयाला अवैध ठरविता येणार नाही असे संसदेने स्पष्ट केले. संसदेने या घटनादुरुस्त्यांद्वारे न्यायालयाच्या न्यायालयीन पुनर्विलोकन या अधिकारावर मर्यादा आणली.

त्यानंतर केशवानंद-भारती खटल्यामध्ये वरील घटनादुरुस्त्यांना न्यायालयाने आव्हान दिले. संसदेला घटनादुरुस्ती करून मूलभूत हक्कांचा संकोच करण्याचा अधिकार असला तरी ''घटनेची मूळ चौकट'' बदलण्याचा संसदेला अधिकार नाही असा निर्णय न्यायालयाने दिला. मात्र घटनेची मूळ चौकट म्हणजे काय? हे न्यायालयाने स्पष्ट केले नाही. न्यायालयाने हे स्पष्ट न केल्यामुळे घटनादुरुस्ती करताना संसदेवर बंधन आले.

अशाप्रकारे राज्यघटना अमंलात आल्यानंतर काळाच्या ओघात न्यायालयीन पुनर्विलोकनाचा विकास झाला. भारतातील ४२ वी घटनादुरुस्ती म्हणजे भारतातील सर्वात मोठी लिखित घटनादुरुस्ती होय. घटनेच्या निरनिराळ्या ४० कलमांमध्ये या घटनादुरुस्तीने बदल करण्यात आले होते परंतु १९७८ च्या ४३ व्या घटनादुरुस्तीद्वारा त्यातील काही तरतुदी रद्द करण्यात आल्या. उदारहणार्थ, उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारावर लादण्यात आलेले निर्बंध रद्द करण्याची तरतूद. अशा प्रकारे पुन्हा एकदा संसद आणि सर्वोच्च न्यायालय यांच्यातील सत्तेचा समतोल प्रस्थापित करण्यात आला. त्यानंतर १९८० आणि १९९० साली न्यायालयाने संसद आणि कार्यकारी शाखा यांनी घटनेची मर्यादा ओलांडू नये म्हणून न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकाराची अंमलबजावणी केली होती. २००५ साली सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या ९ व्या शेड्यूलच्या वैधतेचा प्रश्न उपस्थित केला. घटनेच्या ९ व्या शेड्यूलमध्ये जर मूलभूत हक्कांचा भंग होत असेल तर तो विषय न्यायालयीन पुनर्विलोकनाचा विषय होऊ शकेल असा प्रश्न उपस्थित केला. अशाप्रकारे न्यायालयाच्या न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकाराच्या अंमलबजावणीतून न्यायालयाच्या या अधिकाराचा विकास झाला आहे.

### ७.५.४ भारतातील न्यायालयाच्या न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकाराची व्याप्ती (Scope) :

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला कायदेमंडळाने केलेला कायदा घटनेशी सुसंगत आहे किंवा नाही ते पाहण्याचा अधिकार आहे म्हणजेच कायद्याची वैधता तपासण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. परंतु कोणत्याही कायद्याची न्यायता ठरविण्याचा (Right or Wrong) (Just or unjust) हे ठरविण्याचा अधिकार भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला नाही. असा अधिकार अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाला आहे. भारतातील सर्वोच्च न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार अमेरिकेच्या न्यायालयाच्या तुलनेने मर्यादित आहे.

## ७.६ न्यायालयीन सक्रीयता (Judicial Activism) :

१९८० नंतर भारतीय राजकारणांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण परिवर्तन झाल्याचे दिसून येते. उदा. काँग्रेसपक्षाची सत्ता दुर्बळ झाली, प्रादेशिक पक्षांचा विकास झाला, भ्रष्टाचार वाढला, राजकारणाचे गुन्हेगारीकरण वाढले, संसदेच्या सत्तेचा ऱ्हास झाला इत्यादी. भारत लोककल्याणकारी राज्य आहे. लोककल्याणाच्या नावाखाली गरीब जनतेला आश्वासने देणारे आहेत असे दिसून येते होते. सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत शासन कार्यक्षम नाही असेही हळूहळू लक्षात येत होते. अशावेळी दुर्बल आणि गरीब जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालय सक्रीय झाले. दारिद्र्य, भ्रष्टाचार, दलितांचे हक्क, सार्वजनिक सेवा, आदिवासी योजना, कामगारांचे प्रश्न इत्यादी बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने लक्ष घातले.

सर्वांसाठी न्याय (Justice for all) उपलब्ध व्हावा म्हणून जनहित याचिका (Public - Interest Litigation) यंत्रणा राबविली. न्यायालयीन कार्यपद्धतीमध्ये साधारणपणे १९८२ पासून सुरू केलेला नवीन उपक्रम म्हणजे 'जनहित याचिका' (Public Interest Litigation) चालविणे व त्यासाठी 'लोक न्यायालये' स्थापन करणे होय.

**या उपक्रमाचा उद्देश :**

जनहितयाचिका या उपक्रमाचा उद्देश खालील आहे.

सर्वसामान्यांना कमी वेळात आणि कमी खर्चात न्याय मिळवून देणे. न्यायालयीन प्रक्रिया गुंतागुंतीची, सर्वसामान्य माणसाला न परवडणारी एवढी खर्चिक आणि अति विलंब लावणारी आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना एक प्रकारे न्याय नाकारणे असा त्याचा अर्थ होत होता. अति खर्चिक आणि औपचारिक न्यायालयाची कायदेशीर प्रक्रिया बाजूला सारून गरिबांना आणि कमकुवत घटकांना लवकरातलवकर न्याय मिळावा हा उद्देश या उपक्रमामागे आहे.

या उपक्रमामुळे घटनेला अभिप्रेत असलेली 'न्याय समाजव्यवस्था' आणण्यासाठी निश्चितच मदत झाली आहे.

**जनहितयाचिका म्हणजे काय? (Public Interest Litigation)**

सर्वसाधारण लोकांच्या कल्याणासाठी किंवा बहुसंख्यांकांच्या सामाजिक हितासाठी न्यायालयात सुरू केलेली कारवाई म्हणजे सार्वजनिक हिताचे दावे असा या उपक्रमाचा शब्दशः अर्थ आहे.

**जनहिताच्या दाव्यांसाठी असलेली कार्यपद्धती :**

न्यायालयाचे लक्ष वेधून घेण्यासाठी कोणतीही व्यक्ती न्यायालयाला एखादे साधे पत्र लिहून एखाद्या विषयाच्या बाबतीत न्यायालयाला अन्याय दूर करण्यासाठी उद्युक्त करू शकते. अशावेळी न्यायालय नेहमीचे तांत्रिक नियम व पद्धती इत्यादी औपचारिक सोपस्कार बाजूला सारून ते विनंतीपत्र आपल्याकडे दाखल करून त्यावर योग्य ती कारवाई करते.

**दाव्यांची व्याप्ती :**

१) एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला काही कायदेशीर नुकसान झाले असेल किंवा तशी भीती निर्माण केली गेली असेल तेव्हा ती व्यक्ती तसे विनंती पत्र न्यायालयाकडे देऊ शकते.

२) मूलभूत हक्कांचा भंग झाला असल्यास सर्वोच्च न्यायालयाकडे अर्ज करता येतो.

३) ज्या व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह आपली अन्यायासंबंधी गाऱ्हाणी त्यांच्या गरिबी, असहायता, निकृष्ट सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे न्यायालयाकडे घेऊन जाण्यास असमर्थ असतात त्यांच्यासाठी समाजातील कोणीही व्यक्ती त्यांच्यातर्फे न्यायालयाकडे अर्ज सादर करू शकतात. समाजातील कोणतीही व्यक्ती किंवा उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाला एखादे साधे पत्र लिहून किंवा तार करून अन्यायांच्या परिमार्जनासाठी न्यायालयीन कारवाईची मागणी करू शकते.

न्यायालय नेहमीच्या पद्धतीला बाजूला सारून अशा पत्रांचे किंवा तारेचे परिवर्तन एक कायदेशीर विनंती अर्ज या स्वरूपात करून स्वीकार करतात व त्यावरील आपली कारवाई करतात.

**जनहिताच्या दाव्यांच्या संदर्भातील खटले :**

जनहितदाव्यांच्या या खटल्यांमुळे न्यायालयाच्या कामात खूप वाढ झाली आहे. काही न्यायाधीश अशा अर्जांशी जनतेकडून मागणी करतात. त्यांच्याकडे आलेल्या गाऱ्हाण्यांची पत्रे ते रीतसर विनंती अर्जात परिवर्तन करतात. त्यानंतर आपल्या स्वतःच्या पत्रिकेवर नोंदवून घेतात व असे अर्ज निकालात काढतात. गुजरात उच्च न्यायालयाचे न्या. एम. पी. ठक्कर यांनी एका

विधवेने वर्तमानपत्राच्या संपादकांना लिहिलेल्या तक्रारपत्राचे परिवर्तन विनंती अर्जात केले. त्या पत्रात त्या स्त्रीने आपल्या पतीच्या निधनानंतर फंडाची रक्कम न मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या अवस्थेचे वर्णन केले होते. न्यायमूर्तींनी कसल्याही औपचारिकतेचा आश्रय न घेता ताबडतोब रीजनल प्रॉव्हिडंड फंड कमिशनरांना योग्य ती कारणे दाखवा अशी नोटीस दिली. न्यायालयीन सुनावणीनंतर त्या स्त्रीला ताबडतोब फंडाची रक्कम देण्याची व्यवस्था केली.

**बंधमुक्ती मोर्चा विरुद्ध भारत सरकार :**

या खटल्यात अर्जदार एक संघटना आहे. ही संघटना वेठविगारांना मुक्त करण्याच्या ध्येयाला वाहिलेली आहे. संघटनेचा अर्ज एका साध्या पत्राच्या स्वरूपात होता. हे पत्र सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांना लिहिले होते. त्यांनी त्या पत्राचे निवती अर्जात परिवर्तन केले.

**तक्रारीचे स्वरूप असे होते की :**

हरियाणा राज्यातील फरीदाबाद जिल्ह्यामध्ये एका दगडाच्या खाणीत काही कामगार अत्यंत अमानुष परिस्थितीत काम करीत आहेत. त्यांच्यापैकी कित्येक कामगार वेठबिगार म्हणून राबविले जात आहेत. ज्या खाणीत ते काम करीत होते त्या खाणीचे नाव, तेथील कामगारांची नावे व त्यांच्या अंगठ्याचे ठसे असलेले त्यांचे स्टेटमेंट त्या अर्जासोबत जोडलेले होते. याठिकाणी आरोग्य व पर्यावरणसंबंधीच्या नियमांची कार्यवाही केली नव्हती याबद्दल जबाबही त्याला जोडले होते.

सर्वोच्च न्यायालयाने त्या स्थळाला भेट देण्यासाठी दोन वकील आयुक्त व सामाजिक कायदा चौकशी अधिकारी यांची नियुक्ती केली. या समितीने कामगारांच्या स्थितीविषयी एक अहवाल सादर केला. या अहवालाच्या प्रती खाणीच्या भाडेकरूंना व मालकांना देण्याचा आदेश न्यायालयाने दिला व त्या सर्वांना त्या खटल्यात प्रतिवादी करून अहवालातील माहिती खरी असल्याबद्दलचे पत्र न्यायालयास सादर करण्याचा आदेश दिला.

सर्वोच्च न्यायालयाने विनंती अर्ज, आयुक्तांचा अहवाल, प्रतिवादींची प्रतिज्ञापत्रे यांचा अभ्यास करून केंद्र व राज्य सरकारांना आदेश जारी केला व विशिष्ट तारखेच्या आत त्यांची अंमलबजावणी करण्याचा आदेश दिला.

न्यायालयीन सक्रीयता न्यायाधीश भगवती आणि कृष्णा अय्यर या न्यायाधीशांच्या विशेष लक्ष दिल्यामुळे अस्तित्वात आली. न्यायालयीन सक्रीयतेमुळे खालील महत्त्वपूर्ण गोष्ट घडली आहे. भारतीय राज्यघटनेची मुख्य उद्दिष्टे म्हणजे स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या मूल्यांची स्थापना करणे आहे. या मूल्यांची स्थापना करण्यामध्ये न्यायालयीन सक्रीयतेमुळे मदत झाली आहे. सर्वोच्च न्यायालय न्यायालयीन सक्रियतेद्वारे सार्वजनिक धोरणे ठरवू शकत नाही कारण सार्वजनिक धोरणे ठरविणे संसदेचे कार्य आहे.

## ७.७ निवडणूक आयोग :

**महत्त्व :** भारतीय लोकशाहीमध्ये स्वतंत्र आणि मुक्त वातावणात निपक्षपातीपणे निवडणूका व्हाव्यात म्हणून राज्यघटनेच्या १५ व्या भागामध्ये कलम नं. ३२४ ते ३२९ मध्ये अनेक तरतूदी करण्यात आल्या आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ प्रमाणे निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. संपूर्ण निवडणूक यंत्रणा आणि निवडणूकविषयक प्रक्रियांवर नियंत्रण ठेवण्यासांठी भारतात स्वतंत्र निवडणूक आयोग आहे.

निवडणूक आयोगामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी आणि वेळोवेळी राष्ट्रपती ठरविल तेवढ्या इतर निवडणूक अधिकाऱ्यांचा समावेश होतो. निवडणूक अधिकारी यांचा कार्यकाल आणि सेवा विषयक अटी संसद कायदे करून ठरवित असते. कार्यकारीमंडळ आणि कायदेमंडळाच्या नियंत्रणापासून निवडणूक अधिकारी व निवडणूक आयोग पूर्णपणे मुक्त ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच स्वतंत्र व मुक्त वातावणात निपक्षपातीपणे निवडणूका घेणे शक्य होते.

**सत्ता आणि कार्ये :** राज्यांचे कायदेमंडळ, केंद्राचे कायदेमंडळ, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती या सर्व निवडणूकांचे आयोजन करणे, मार्गदर्शन करणे, नियंत्रण करणे ही जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. एकूण निवडणूक आयोगाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) प्रत्येक जनरल इलेक्शनपूर्वी उमेदवारांची यादी तयार करणे. पात्रतापूर्ण मतदारांचे रजिस्ट्रेशन करणे.
२) विविध राजकीय पक्षांना मान्यता देणे आणि त्यांना चिन्ह प्रदान करणे.
३) राजकीय पक्षाचे वागणूक विषयक नियम ठरविणे.
४) संसदसदस्यांच्या आपत्रतेविषयी राष्ट्रपतींना माहिती देणे.
५) संसद, राज्याचे कायदेमंडळ, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणूका घेणे.
६) निवडणूक अधिकारी आवश्यक असल्यास निवडणूक व्यवस्था व त्याबाबतीतील भांडणे सोडविण्यास नेमणे.
७) मतदारांची यादी तयार करणे आणि मतदारांना ओळखपत्र देणे.

## ७.८ प्रश्न

१) सर्वोच्च न्यायालयाची रचना आणि अधिकारकार्योचे विवेचन करा.
२) सर्वोच्च न्यायालयाची कार्ये सांगून; सर्वोच्च न्यायालयाचे स्थान व भूमिका सांगा.
३) न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य म्हणजे काय? त्यासाठी कोणत्या घटनात्मक तरतूदी आहेत समालोचन करा.
४) न्यायालयीन पूनर्विलोकनावर सविस्तर लिहा.
५) टिपा द्या.
    १) भारतीय न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये.
    २) जनहित याचिका
    ३) न्यायालयीन पुनर्विलोकन
    ४) निवडणूक आयोग.
    ५) न्यायालयीन सक्रियता

❖❖❖❖

# ८

# भारतीय संघराज्य
## (FUNCTIONING OF THE FEDERAL POLITY IN INDIA)

**प्रकरणाची रचना :-**

८.० उद्दीष्ट
८.१ प्रस्तावना
८.२ भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये
८.३ भारतीय संघराज्याची केंद्राकर्षी प्रवृत्ती दाखविणारी वैशिष्ट्ये
८.४ प्रश्न

## ८.० उद्दीष्ट :

भारतीय राज्याची संघराज्य व्यवस्था समजून घेणे हे मुख्य उद्दीष्ट आहे. अमेरिका संघराज्य पद्धती असलेला देश आहे. इंग्लड एककेंद्री (Unitary) व्यवस्था असलेला देश आहे. भारतीय राज्यव्यवस्था या दोन्ही देशांपेक्षा वेगळी आहे. भारतात केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य आहे.

साधारणपणे संघराज्य व्यवस्था मोठ्या देशांमध्ये (Larger state) आणि विविधता (भाषा, धर्म, प्रदेश) असलेल्या देशांमध्ये (Heterogeneous) स्वीकारण्यात येते. अमेरिका, भारत, ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये संघराज्य व्यवस्था आहे. राष्ट्रीय ऐक्य आणि प्रादेशिक स्वायत्तता यांचा समन्वय या व्यवस्थेमध्ये असतो.

## ८.१ प्रस्तावना :

जगातील कोणत्या देशांची राज्यव्यवस्था दोन प्रकारांमध्ये विभागली आहे असे दिसून येते.
(१) संघराज्य पद्धती, (२) एककेंद्रीय व्यवस्था पद्धती.

अमेरिका जगातील सर्वात पहिला संघराज्य पद्धतीचा देश आहे. अमेरिकेत ५० राज्ये मिळून अमेरिकेचे संघराज्य निर्माण झाले आहे. ब्रिटन हा देश एककेंद्री व्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे. भारतात अर्ध-संघराज्य किंवा केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य आहे.

भारतीय संघराज्य निर्मिती २६ जानेवारी १९५० ला घटना लागू झाल्यानंतर करण्यात आली. भारतीय संघराज्य सेन्ट्रीफ्युगल ?? प्रक्रियेने अस्तित्वात आले आहे. ब्रिटिश वर्चस्वाखाली भारतीय वसाहतीचे स्वरूप एककेंद्री होते. प्रशासकीय सोयीसाठी फक्त प्रदेशांची निर्मिती केली होती, परंतु या प्रदेशांना स्वतंत्र कोणतेच अधिकार नव्हते. सर्व सत्ता ब्रिटिश संसदेकडे होती. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेमध्ये भारत “Union of States” आहे असा शब्दप्रयोग केला आहे, ज्यामध्ये केंद्रशासन, राज्यशासन आणि केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो. केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्यात सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे.

**भारताचे केंद्राकर्षी स्वरूपाचे संघराज्य आहे.**

| **भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये** (**Framework Federal**) | **भारतीय राज्याची एककेंद्रीय वैशिष्ट्ये** (**Soul Unitary**) |
| --- | --- |
| १. दुहेरी शासन व्यवस्था (केंद्र / राज्य) | १. केंद्राकर्षी संघराज्य विशिष्ट हेतूने निर्मित आहे. |
| २. केंद्र व राज्यात अधिकाराची विभागणी | २. अधिकार विभागणी केंद्राकडे झुकणारी आहे. |
| ३. लिखित राज्यघटना व घटनेची सर्वोच्चता | ३. संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार |
| ४. न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क | ४. एकच घटना |
| ५. द्विगृही संसद | ५. राज्यपाल-केंद्राकडून निर्वाचित |
| | ६. आणीबाणीच्या काळात एककेंद्री स्वरूप प्राप्त होते. |
| | ७. घटकराज्यांना समान प्रतिनिधित्व नाही. |
| | ८. एकेरी नागरिकत्व |
| | ९. एकेरी न्यायव्यवस्था |
| | १०. अखिल भारतीय नोकऱ्यांवर केंद्राचे नियंत्रण |
| | ११. कलम ३५६ |
| | १२. एकात्मक आयोग |

## ८.२ भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये (Characteristies of Indian Federation) :

### ८.२.१ प्रस्तावना :

भारतीय संघराज्यामध्ये संघराज्य व एकात्मपद्धतीचे मिश्रण दिसून येते. व्हिअर यांच्या मते भारतीय संघराज्य ‘‘निम-संघराज्य’ (Quasi – federal) आहे. काहीच्या मते भारती संघराज्य ‘सौदेबाजीचे संघराज्य’ (Bargaining Federation) आहे. भारतीय राज्याची बाह्य

चौकट (Frame) संघराज्याची आहे पण आत्मा (Soul) केंद्राकर्षी आहे. भारतीय संघराज्य अमेरिकन संघराज्याप्रमाणे नाही. भारतीय संघराज्यात केंद्रसरकार मजबूत आहे.

**८.२.२ भारतात केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य निर्माण करण्याची कारणे :**

१) भारत भौगोलिक दृष्टीने आणि लोकसंख्येने मोठा विस्तार असलेला देश आहे. अशा देशात राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने संघराज्य व्यवस्था योग्य होती.

२) परंतु भारताचा मुख्य प्रश्न म्हणजे ऐक्य व एकात्मता राखणे हा होता. भारतात विविध भाषा, धर्म, प्रादेशिक विविधता आहे. या विविधतेमुळे विघटनात्मक प्रवृत्ती निर्माण झाल्यास त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशाचे ऐक्य राखण्यासाठी केंद्र सरकार मजबूत असणे आवश्यक होते. राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक स्वायत्तता याचा मेळ साधण्यासाठी भारतात केंद्राकर्षी स्वरूपाच्या संघराज्याची निर्मिती करण्यात आली. The intention of the founding fathers of the constitution of India was to create a two-tieped polity combining the interests of the nation as a whole and the regional aspirations of the states.

**८.२.३ भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये :** भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) दुहेरी शासनव्यवस्था
२) केंद्र - राज्यात अधिकार विभागणी
३) लिखित राज्यघटना आणि घटनेची सर्वोच्चता
४) न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार
५) द्विग्रही संसद

**१) (Dual Governenment) दुहेरी शासन व्यवस्था (Two Sets of Govt) -** केंद्रसरकार आणि राज्यसरकार अशी दुहेरी शासनव्यवस्था भारतात आहे. भारतीय घटनेमध्ये 'संघराज्य' हा शब्दप्रयोग कोठेही नाही. भारतीय राज्यघटनेमध्ये ('युनियन ऑफ स्टेटस') 'भारत हा राज्याचा संघ' आहे असा शब्दप्रयोग केला आहे. २८ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश भारतीय संघराज्यात आहेत. केंद्रसरकार व राज्यसरकार अशी दुहेरी शासनव्यवस्था भारतीय संघराज्याची आहे परंतु कोणत्याही घटकराज्याला भारतीय सघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार नाही.

**२) अधिकारांची विभागणी (Division of Powers) -** केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांच्या कायदेविषयक, कार्यकारी आणि आर्थिक अधिकारांची निश्चित विभागणी घटनेप्रमाणे करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य यांच्यात राज्यकारभाराचे विषय वाटून दिलेले आहेत. ही विषयांची वाटणी तीन सूचीमध्ये खालीप्रमाणे आंहे. केंद्रसूचीत ९७, राज्यसूचीत ६६ व समवर्ती सूचीत ४७ विषय आहेत. केंद्रसूची केंद्रसरकारकडे आहे. राज्यसूची राज्यसरकारकडे आहे आणि समवर्तीसूचीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार दोन्ही शासनाला आहे. सर्व शेषसत्ता (Residary powers) केंद्र सरकारकडे आहे. सध्या केंद्रसूचीत १०० विषय आहेत. हे सर्व विषय राष्ट्रीय आणि संपूर्ण देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय आहेत. राज्यसूचीत सध्या ६१ विषय आहेत. यामध्ये प्रादेशिक दृष्टीने महत्त्वाच्या विषयांचा समावेश

आहे. काही विशिष्ट परिस्थितीत आणि राज्यसभेने तसा ठराव पास केल्यानंतर राज्यसूचीतील विषयांवर संसद कायदे करू शकते. समवर्ती सूचीत सध्या ५२ विषय आहेत. यावर केंद्र व राज्य दोघांनाही कायदे करण्याचा अधिकार आहे. परंतु केंद्राचे कायदे सर्वोच्च समजले जातात. सर्व शेषसत्ता; ज्या कोणत्याही सूचीत समाविष्ट नाही त्यावर केंद्रसरकार कायदे करीत असते.

**३) लिखित राज्यघटना आणि घटनेची सर्वोच्चता (Written Constitution and Supremacy of the Constitution) -** भारतीय राज्यघटना लिखित आहे. राज्यघटनेत केंद्र आणि राज्यशासनाची रचना, कार्ये, अधिकार स्पष्ट केली आहेत. संघराज्यव्यवस्थेला निश्चितता आणि स्पष्टता देण्याच्या दृष्टीने लिखित राज्यघटना आणि घटनेची सर्वोच्चता हे तत्त्व भारतीय व्यवस्थेत आहे. राज्यघटना सर्वोच्च आहे. केंद्रशासन आणि राज्यशासनाला घटनेतील तरतुदीप्रमाणे कार्य करावे लागते. घटनेची मर्यादा सर्वांना आहे.

**४) सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा आणि संघीय न्यालयालय म्हणून भूमिका करण्याचा अधिकार आहे** - सर्वोच्च न्यायालय घटनेची सर्वोच्चता राखण्याचे आणि केंद्र व राज्य सरकार यांच्यातील वाद सोडविण्याचे काम करते. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार घटनेत देण्यात आला आहे. या अधिकारानुसार केंद्र व राज्याने घटनेची मर्यादा लक्षात घेऊन कायदे आणि कृती केल्यास ते कायदे किंवा कृती बेकायदेशीर ठरविण्याचा न्याय अधिकार न्यायालयाला आहे. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालय घटनेच्या सर्वोच्चतेचे संरक्षण करते. सर्वोच्च न्यायालयाला प्रारंभिक अधिकार क्षेत्र आहे. या प्रारंभिक अधिकार क्षेत्राखाली सर्वोच्च न्यायालय केंद्रशासन आणि राज्यशासन किंवा राज्याराज्यातील वाद सोडविण्याचे कार्ये करते आणि संघीय न्यायालयाची भूमिका बजावते.

**५) द्विगृही कायदेमंडळ (संसद)** - संसदेची दोन सभागृहे आहेत. पहिले आणि कनिष्ठ सभागृह लोकसभा होय. दुसरे आणि वरिष्ठ सभागृह राज्यसभा होय. लोकसभा लोकांचे प्रतिनिधित्व करणारे आणि राज्यसभा राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. भारतीय संघराज्यीय व्यवस्थेत राज्याचे हितसंबंधाचे रक्षण करून केंद्राचा राज्यामध्ये उगीचच हस्तक्षेप होत असेल तर त्याला पायबंद घालण्याचे काम राज्यसभा करते. जगातील अन्य देशांच्या संघराज्यांपेक्षा भारतीय संघराज्यव्यवस्था खालील बाबतीत भिन्न आहे. एककेंद्री व्यवस्थेकडे झुकणारे आहे.

## ८.३. भारतीय संघराज्याची केंद्राकर्षी प्रवृत्ती दाखविणारी वैशिष्ट्ये -

संघराज्याचा आत्मा एककेंद्री (Unitary) आहे. भारतीय संघराज्याची केंद्राकषी प्रवृत्ती दाखविणारी वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) संघराज्यनिर्मिती पद्धती
२) अधिकारांची विभागणी केंद्राकडे झुकणारी
३) घटनादुरुस्तीचा संसदेला अधिकार
४) एकच घटना

५) राज्यपालाची तरतूद
६) आणीबाणीच्या काळात
७) घटकराज्यांना समान प्रतिनिधित्व नाही
८) एकेरी नागरिकत्व
९) एकेरी न्यायव्यवस्था
१०) अखिल भारतीय सेवा
११) कलम ३५६ - राज्यात राष्ट्रपती राजवट
१२) एकात्मक निर्वाचन आयोग, महालेखापाल

**१) संघराज्यनिर्मिती पद्धती (The Mode of Formation)** - अनेक सार्वभौम राज्ये एकत्र येऊन स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परात करार करून केंद्र सरकारला अधिकार देतात आणि इतर अधिकारांच्या बाबतीत स्वायत्त असतात. अशा पद्धतीने अमेरिकेतील संघराज्य अस्तित्वात आले आहे. भारतीय संघराज्य अशा प्रकारच्या ऐच्छिक करारातून निर्माण झाले नाही. १९३५ पर्यंत भारतात एककेंद्री व्यवस्था होती. १९३५ च्या कायद्याद्वारे संघराज्य व्यवस्था भारतात निर्माण केली होती. स्वातंत्र्यानंतर घटनेनुसार 'भारतीय राज्यांचा संघ' निर्माण करण्यात आला. केंद्र सरकार प्रबळ करण्यात आले. भारतीय संघराज्य केंद्राकर्षी निर्माण करण्यामागे देशाची एकता व एकात्मता राखणे हा घटनाकर्त्यांचा मुख्य हेतू होता.

**२) अधिकारांची विभागणी केंद्राकडे झुकणारी (Strong centre)** - भारतीय संघराज्यामध्ये केंद्र आणि राज्यात अधिकारांची विभागणी केली आहे परंतु ही अधिकारविभागणी समान नाही. केंद्र सरकारकडे राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे केंद्रसूचीतील १०० विषय आहेत. राज्यसरकारकडे प्रादेशिक दृष्टीने महत्त्वाचे राज्यसूचीतील ६१ विषय आहेत. राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव संमत केला तर संसद राज्यसूचीतील विषयांवरही कायदा करू शकते. समवर्तीसूचीतील ५२ विषयांवर केंद्र सरकार व राज्य सरकार यांना कायदे करण्याचा अधिकार असला तरी केंद्रसरकारचे कायदे सर्वोच्च समजण्यात येतात. सर्व शेषसत्ता केंद्राकडे आहेत. यावरून केंद्रसरकार आणि राज्य सरकार यांच्यात असलेली अधिकार विभागणी केंद्राकडे झुकणारी आहे राज्यापेक्षा केंद्राला खुप अधिकार आहेत. त्यामुळे केंद्र सरकार प्रबळ आहे.

**३) घटनादुरुस्तीचा संसदेला अधिकार (Amendment of the Constitution)** - भारतात घटनादुरुस्तीचा अधिकार फक्त संसदेला आहे. राज्याच्या कायदेमंडळाला घटनादुरुस्तीचा अधिकार नाही. घटकराज्याचे नाव, सीमा बदलणे, नवीन घटकराज्य निर्माण करणे, घटकराज्यांची संमती न घेताच केंद्र सरकार करू शकते. अमेरिकेतील संघराज्य पद्धतीत घटकराज्यांच्या संमतीशिवाय घटनेत दुरुस्ती केली जात नाही. अमेरिकेतील संघराज्यात घटकराज्यांना अधिक स्वायत्तता देण्यात आली आहे.

**४) एकच राज्य घटना (One Constitution)** - भारत संघराज्यपद्धती असलेला देश असला तरी संपूर्ण भारताची एकच राज्यघटना आहे. अपवाद जम्मू काश्मीर राज्य. कोणत्याही घटकराज्याला स्वतःची स्वतंत्र राज्यघटना निर्माण करण्याचा अधिकार नाही. भारतात केंद्र व राज्यांची मिळून एकच राज्यघटना आहे. अमेरिकेत प्रत्येक घटकराज्यांची घटना आणि केंद्रशासनाची घटना वेगवेगळी आहे.

**५) राज्यपाल (The Office of the Governer)** - अमेरिकेत घटकराज्यांचे राज्यपाल (Governer) त्या राज्याच्या जनतेने निवडलेले असतात. भारतात मात्र राष्ट्रपती राज्यपालांची नेमणूक करतात व राष्ट्रपतींची इच्छा असेल तोपर्यंत ते आपल्या पदावर राहतात. राज्यपाल राज्याचा प्रमुख असतो परंतु भारतात राज्यपाल केंद्राचा हस्तक म्हणून काम केंद्रसरकार राज्यपालांद्वारे आपले नियंत्रण अप्रत्यक्षपणे राज्यांवर प्रस्थापित करतात.

**६) आणीबाणीच्या काळात (Emergency provisions)** - भारतात आणीबाणीच्या काळात संघराज्याचे रूपांतर एककेंद्री शासनात होत असते. राष्ट्रीय आणीबाणी घोषीत केल्यानंतर संपूर्ण भारतात केंद्रसरकारची सत्ता प्रस्थापित होते. राष्ट्रपती आणीबाणीची घोषणा करतात. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात सर्व सत्ता केंद्र सरकारकडे असते. सर्व राज्ये केंद्राच्या आदेशाप्रमाणे कार्य करतात.

**७) घटकराज्यांना समान प्रतिनिधित्व नाही** - अमेरिकेतील संघराज्यात राज्यांना सिनेटमध्ये प्रत्येकी दोन प्रतिनिधी पाठवितात येतात. राज्य लहान किंवा मोठे असले तरी राज्यांना केंद्रामध्ये समान प्रतिनिधित्व आहे. परंतु भारतीय संघराज्यात घटकराज्ये राज्यसभेत लोकसंख्येप्रमाणे प्रतिनिधी पाठवितात. त्यामुळे घटकराज्यांच्या हिताचे समान संरक्षण होत नाही.

**८) एकेरी नागरिकत्व (A single citizenship)** - अमेरिकेतील संघराज्याप्रमाणे भारतात दुहेरी नागरिकत्वाची पद्धत नाही. भारतामध्ये एकेरी नागरिकत्व आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती फक्त 'भारतीय नागरिक' असतो. नागरिकत्वासंबंधीचे कायदे करण्याचा अधिकार फक्त केंद्रसरकारलाच आहे.

**९) एकेरी न्यायव्यवस्था (A single integrated judiciary)** - अमेरिकन संघराज्याप्रमाणे भारतात केंद्रसाठी वेगळी व राज्यासाठी वेगळी अशी दुहेरी न्यायव्यवस्था नाही. भारताच्या एकेरी न्यायव्यवस्थेमध्ये सर्वोच्च न्यायालय अंतिम व सर्वोच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत दुय्यम न्यायालये कार्य करतात.

**१०) अखिल भारतीय सेवा (All India Services)** - केंद्र आणि राज्यांसाठी अखिल भारतीय सेवांची निर्मिती घटनेप्रमाणे होत असते. या सेवांमध्ये काम करणाऱ्यांची बदली संपूर्ण भारतात कुठेही होऊ शकते. केंद्र आणि राज्य दोघांसाठीही ते कार्य करतात. उदा. I.A.S., I.P.S.

**११) कलम ३५६ - राज्यात राष्ट्रपती राजवट** - कलम ३५६ - प्रमाणे राष्ट्रपती एखाद्या राज्यामध्ये राष्ट्रपती राजवटीची घोषणा करू शकतात. घटनात्मक शासन अयशस्वी झाले आणि त्या राज्याची कायदा व सुव्यवस्था धोक्यात आहे असे सांगून त्या राज्यात राष्ट्रपती राजवट घोषित करून त्या राज्याचा कारभार केंद्र शासन आपल्याकडे घेऊ शकते. एखाद्या राज्यात सशस्त्र दल पाठविण्याचा अधिकारही केंद्र सरकारला आहे.

**१२) एकात्मक निर्वाचन आयोग आणि महालेखापाल** - निर्वाचन आयोग, नियोजनमंडळ, महालेखापाल या यंत्रणा भारतात संपूर्ण देशासाठी म्हणजे केंद्र आणि राज्य दोन्हींसाठी कार्य करतात. त्यांच्या नेमणूका ही केंद्र सरकार करीत असते.

**निष्कर्ष :-** भारतीय संघराज्याची वरील वैशिष्ट्ये आणि केंद्राकर्षी प्रवृत्ती अभ्यासल्यानंतर भारतीय संघराज्याचे स्वरूप केंद्राकर्षी आहे असे दिसून येते.

भारतीय राज्याची बाह्य चौकट संघराज्याची आहे; परंतु भारतीय राज्याचा आत्मा एककेंद्री आहे. घटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. आंबेडकर यांनी म्हटल्या प्रमाणे भारताची संघराज्य रचना भारतीय परिस्थितीस अनुरूप अशीच आहे.

## ८.४ प्रश्न :

(१) भारतीय संघराज्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये सांगा.

(२) भारतात ''अर्धसंघराज्य'' आहे चर्चा करा.

(३) भारतीय संघराज्याची केंद्राकर्षी स्वरूप दाखविणारी वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(४) टिपा लिहा -

(१) भारतात केंद्राकर्षी स्वरूपाचे संघराज्य स्वीकारण्याची कारणे.

❖❖❖❖

# १

# भारतीय संघराज्यातील केंद्रसरकार आणि राज्यसरकाराची कार्यप्रणाली
# (FUNCTIONING OF FEDERAL POLICY IN INDIA)

**प्रकरणाची रचना :-**


१.१ उद्दीष्ट
१.२ प्रस्तावना
१.३ केंद्र आणि राज्याच्या संघराज्यात्मक कार्याची आणि संबंधांची विभागणी
१.४ केंद्र आणि राज्य यांचे कायदेविषयक संबंध
१.५ केंद्र आणि राज्याचे कार्यकारी व प्रशासकीय संबंध
१.६ केंद्र आणि राज्याचे आर्थिक संबंध
१.७ केंद्र आणि राज्यांच्या बदलत्या संबंधाचे स्वरूप
१.८ राज्यांच्या स्वायत्ततेचा प्रश्न
१.९ राज्याराज्यातील संबंध आणि संघर्ष आणि त्यावर उपाययोजना
१.१० प्रश्न


## १.१ उद्दीष्ट :

भारतीय संघराज्याच्या स्वरूपाचा अभ्यास केल्यानंतर भारतात 'केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य' आहे असे स्पष्ट होते. भारतीय राज्यघटनेप्रमाणे केंद्र आणि राज्य यांच्यात अधिकार आणि कार्याची विभागणी कशी आहे, केंद्र व राज्ये यांचे एकमेकांशी संबंध कसे आहेत अभ्यासणे आवश्यक ठरते. भारतीय संघराज्य व्यवस्थेची कार्यप्रणाली कशी आहे व त्याचा केंद्र-राज्य संबंधांवर कसा प्रभाव पडला याची मिमांसा या प्रकरणामध्ये करण्यात आली आहे. त्यामुळेच राज्यांच्या स्वायत्ततेचा प्रश्न कसा उद्‌भवला याचाही अभ्यास भारतीय संघराज्याच्या संदर्भात करणे आवश्यक आहे.

## १.२ प्रस्तावना :

भारतात “केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य आहे” म्हणजेच संघराज्य व्यवस्था ही केंद्रीकरणाकडे झुकलेली आहे. घटना अंमलात आल्यापासून ते आतापर्यंत भारतीय

संघराज्यव्यवस्थेचेच्या कामकाजाचे विश्लेषण केल्यानंतर भारतीय संघराज्याच्या केंद्राकर्षी प्रवृत्ती स्पष्ट दिसून येतात.

भारतात संघराज्य व्यवस्था असल्यामुळे घटनेप्रमाणे केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्यात सत्तेची विभागणी केलेली आहे. केंद्र आणि राज्य आपआपल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र आहेत. भारतीय राज्यघटनेच्या अकराव्या भागात क्रेंद्र व राज्य संबंधविषयक सविस्तर तरतुदी आहेत. हे संबंध निश्चित करताना राष्ट्रीय एकात्मता आणि घटकराज्यांची स्वायत्तता जपण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## १.३ तीन प्रकारात केंद्र आणि राज्यांच्या संघराज्यात्मक संबंधाची विभागणी केली आहे.

तीन प्रकारात केंद्र आणि राज्यांच्या संघराज्यात्मक संबंधाची आणि कार्याची विभागणी खालीलप्रमाणे केली आहे.

**१.३.१** कायदेविषयक संबंध (Centre State Legislative Relations)

**१.३.२** प्रशासकीय संबंध (Adminitrative Relations)

**१.३.३** आर्थिक संबंध (Financial Relations)

## १.४ केंद्र व राज्य यांचे कायदेविषयक संबंध (Legislative Relations) :

**केंद्र व राज्य यांचे कायदेविषयक संबंध (Legislative Relations) आणि कार्ये :**

राज्यघटनेच्या अकराव्या भागात; कलम २४५ ते २५५ मध्ये केंद्र व राज्य यांच्या कायदेविषयक संबंधांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

केंद्र - राज्य कायदेविषयक संबंधांच्या ४ बाजू आहेत.

१.४.१ केंद्रीय आणि राज्यीय कायद्यांच्या भूप्रदेशीय मर्यादा (Territorial Extent of Central and State Legislation)

१.४.२ कायदेविषयक विषयांचे तीन सूचीत अधिकार विभाजन

१.४.३ राज्यसूचीतील विषयांवर काही विशिष्ट परिस्थितीत संसदेचे कायदे

१.४.४ राज्याच्या कायद्यावर केंद्राचे नियंत्रण

**१.४.१ केंद्रीय आणि राज्यीय कायद्याचा भूप्रदेशीय मर्यादा (Territorial extent of Central and State Legislation) -** संसद संपूर्ण देशासाठी म्हणजेच भारताच्या कोणत्याही प्रदेशासाठी कायदे करते. याउलट राज्याचे कायदेमंडळ फक्त त्या राज्यासाठीच कायदे करतात, म्हणजेच राज्याच्या कायद्यांना भूप्रदेशीय मर्यादा आहेत.

**१.४.२ कायदेविषयक विषयांच्या तीन सूची** - केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यात विषयांची विभागणी केंद्रसूची राज्यसूची व समवर्तीसूची अशाप्रकारे तीन सूचीत अधिकार विभागणी करण्यात आली आहे.

**१) केंद्रसूची (Union List) -** संपूर्ण भारताशी ज्या विषयांचा संबंध येतो किंवा ज्या विषयांच्या बाबतीत देशभर एकच धोरण असावे अशी अपेक्षा होती ते राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे विषय केंद्रसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या विषयांची संख्या ९७ होती आता १०० आहे. संरक्षण, उद्योगधंदे, अणुशक्ती, पोस्ट तार, दळणवळण, रेल्वे इत्यादी राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे विषय या सूचीत आहेत. या विषयांवर कायदे करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच देण्यात आला आहे.

**२) राज्यसूची (State List) :** राज्यसूची मध्ये ६६ विषयांचा समावेश होता, आता ६१ विषय राज्यसूचीत आहेत. प्रादेशिक दृष्टीने महत्त्वाचे विषय उदा. पोलीस, तुरूंग, आरोग्य, शेती इत्यादी विषयांचा यात समावेश आहे. या विषयांवर कायदे करण्याचा अधिकार घटकराज्यांच्या कायदेमंडळांना आहे.

**३) समवर्तीसूची (Concurrent List)** - यामध्ये ४७ विषय होते, आता ५२ विषय आहेत. यात प्रादेशिक व राष्ट्रीय दोन्हीचे हितसंबंधविषयक विषय आहेत. त्यावर केंद्र व राज्य दोन्ही शासनांना कायदे करता येतात. केंद्र व राज्य यांच्या कायद्यात जर संघर्ष झाला तर राज्यसरकारचा कायदा रद्द समजला जातो. केंद्रशासनाने केलेला कायदा लागू करण्यात येतो.

**४) शेषसत्ता (Residuary Power)** - वरील तीन याद्यांमध्ये समाविष्ट नसलेल्या विषयांना शेषसत्ता म्हणतात. यावर कायदे करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये शेषसत्ता राज्यांकडे आहेत त्यामुळे या देशांमध्ये केंद्रापेक्षा राज्य अधिक प्रबळ आहेत.

**१.४.३ राज्यसूचीतील विषयांवर काही विशिष्ट परिस्थितीत केंद्राचे कायदे :** राज्यसूचीमधील विषयांवर राज्यशासन कायदे करते. परंतू खालील विशिष्ट परिस्थितीत राज्यसूचीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार घटनेनुसार केंद्र सरकारला प्राप्त होतो.

अ) आणीबाणीच्या परिस्थितीत (emergency) ब) राज्यसूचीतील एखादा विषय राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा (national interest) वाटला तर राज्यसभा २/३ बहुमताने ठराव संमत करून त्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार संसदेला देऊ शकते. क) दोन किंवा अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळांनी (by agreement between states) केंद्रसरकारला तशी विनंती केली तर. ड) परराष्ट्राबरोबर तह, करार यांचे पालन करण्यासाठी (for implementation of treaties) राज्यसूचीतील एखाद्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होऊ शकतो. इ) एखाद्या घटकराज्यात घटनात्मक शासन अयशस्वी झाले (failure of constitutional machinery) आणि राष्ट्रपतींनी त्या घटक राज्यात आणीबाणी पुकारली तर तेथील विधिमंडळाचे सर्व अधिकार संसद स्वतःकडे घेते. ई) एखाद्या राज्यात कायदा आणि सुव्यवस्था ह्यांना धोका उत्पन्न झाल्यामुळे निर्माण झालेली गंभीर

परिस्थिती नाहीशी करण्यासाठी केंद्रसरकारला सशस्त्र दल त्या घटकराज्यात पाठविण्याचा अधिकार आहे. फ) केंद्रशासित प्रदेशांसाठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे.

**१.४.४ राज्यांच्या कायद्यांवर केंद्राचे नियंत्रण :**

राज्यांच्या कायद्यावर केंद्रसरकार खालीलप्रकारे नियंत्रण प्रस्थापित करते. १) राज्याच्या कायदेमंडळाने पारित केलेली काही विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राज्यपाल राखून ठेवू शकतात. राष्ट्रपती त्या विधेयकांच्या बाबतीत नकाराधीकार वापरू शकतात. २) आर्थिक आणीबाणीच्या काळात राष्ट्रपती राज्यांना आदेश देऊ शकतात; की राज्याची अर्थविधेयके त्यांच्या संमतीसाठी ठेवावीत. ३) राज्यसूचीतील काही विषयांबाबत राज्य कायदेमंडळाला कायदे करण्याआधी राष्ट्रपतींची पूर्वसंमती घ्यावी लागते.

**निष्कर्ष :** केंद्र आणि राज्य यांच्या कायदेविषयक संबंधाच्या बाबतीत असलेल्या राज्यघटनात्मक तरतुदींवरून असे दिसून येते की, केंद्र व राज्य यांच्या कायदेविषयक संबंधांच्याबाबतीत घटकराज्यांवर केंद्राचेच वर्चस्व आहे. केंद्रसरकार प्रबळ आहे. केंद्रसरकारला राज्यसरकारपेक्षा सर्वोच्च स्थान आहे.

**१.४.५ सारांश -** केंद्र आणि राज्य कायदेविषयक संबंध

| भूप्रदेशीय मर्यादा | विभाजन ३ सूचीत | राज्यसूचीतील विषयांवर केंद्राचे कायदे | राज्याचे फायदे. त्यावर केंद्राचे नियंत्रण |
|---|---|---|---|
| | १. केंद्रसूची<br>२. राज्यसूची<br>३. समवर्तीसूची<br>४. शेषसत्ता | १. राज्यसभेने ठराव केल्यास<br>२. आणीबाणीच्या काळात<br>३. राज्यांनी केलेल्या विनंतीवरून<br>४. तह करारासाठी<br>५. राज्यामध्ये कायदा सुव्यवस्था आणण्यास | |

## १.५ केंद्र व राज्य कार्यकारी आणि प्रशासकीय संबंध आणि कार्ये (Executive and Administrative Relationship) :

घटनेच्या अकराव्या भागातील दुसऱ्या प्रकरणात कलम २५६ ते २६३ मध्ये केंद्र आणि घटकराज्ये यांच्यातील कार्यकारी व प्रशासकीय संबंध विशद केले आहेत. भारताच्या संघराज्याचे शासन कार्यक्षमतेने आणि समन्वयाने चालावे यासाठी घटनेत काही तत्त्वे नमूद करण्यात आली आहेत. संसद आणि घटकराज्यांची कायदेमंडळे घटनेने निश्चित केलेल्या आपापल्या कार्यक्षेत्रात कायदे करीत असतात. या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या कार्यकारी व प्रशासकीय यंत्रणांची कोणती खबरदारी घ्यावी याचे दिग्दर्शन घटनेने केले आहे.

**१.५.१. विधिविषयक अधिकारांशी समांतर (Co-extensive with their Legistive Powers) -** केंद्र व राज्यसरकारचे कार्यकारी अधिकार त्याच्या विधिविषयक अधिकारांशी समांतर आहेत म्हणजे संसदेला ज्या विषयांच्या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार आहेत त्या केंद्रसूचीतील विषयांवरील कायद्यांच्या अंमलबजावणीचे अधिकार केंद्रसरकारला आहेत. राज्याच्या कायदेमंडळांना राज्यसूचीतील विषयांवर कायदे करण्याचे अधिकार आहेत. त्याबाबतीत अंमलबजावणीचे अधिकार राज्यसरकारला आहेत. म्हणजेच केंद्र आणि राज्यांचे कार्यकारी कार्ये व अधिकार कायदेविषयक अधिकार व कार्याशी समातंर आहेत.

**१.५.२. राज्यसरकारांना मार्गदर्शन करणे (Obligation of States and the centre) -** संसदेने निर्माण केलेल्या कायद्याच्या मार्गात अडचणी निर्माण होऊ नये म्हणून राज्यसरकारांनी आपली कार्यकारी सत्ता कशी वापरावी, ह्यासंबंधी केंद्रसरकार घटक सरकारांना सूचना देऊ शकते आणि त्या सूचनांचे पालन करणे घटकसरकारांवर बंधनकारक आहे.

**१.५.३. केंद्रसरकार राज्यसरकारांना आदेश देऊ शकते (Centre’s directions to the State) -** राष्ट्रीय आणि लष्करी महत्त्वाच्या दळणवळणाच्या साधनांची उभारणी उदा. रेल्वे त्याची सुव्यवस्था ठेवण्यासाठी केंद्रसरकार घटकसरकारांना आदेश देऊ शकते. त्या आदेशाचे पालन करणे घटकसरकारांवर बंधनकारक आहे.

**१.५.४. केंद्रसरकारची कार्ये राज्यसरकारवर सोपविणे (President can give power and duties to state)**

केंद्रीय कार्यकारी मंडळ आपल्या अधिकारक्षेत्रातील कोणतेही कार्य राज्यसरकारच्या संमतीने राज्यसरकारवर सोपवू शकते. उदा. सार्वत्रिक निवडणूकांच्या वेळी.

**१.५.५. अखिल भारतीय नोकऱ्यांच्या बाबतीत (Establishment of All India Services) -** (IAS, IPS) या सेवेतील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा, त्यांना प्रशिक्षण देण्याचा व राज्यांना त्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्याचा अधिकार त्यांना प्रशिक्षण देण्याचा व राज्यांना त्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. घटकराज्यातील प्रशासनामध्ये सर्व उच्चपदांवर या अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. ते केंद्रसरकारचे कर्मचारी असल्याने त्यांच्याविरूद्द शिस्तभंगाच्या करवाईचा अधिकार राज्यशासनाला नाही.

**१.५.६. आंतरराज्यीय परिषद आणि व्यापार आयोग (Establishment of an interestate council) -** राज्याराज्यांतील वादग्रस्त प्रश्न, समान धोरणाचे प्रश्न, राज्य आणि केंद्र यांच्या हितसंबंधांची चौकशी करणे इत्यादींसाठी आंतरराज्यीय परिषद (Inter State Council) निर्माण करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे.

राज्याराज्यांतील व्यापार, व्यवसाय यासाठी आंतराज्यीय व्यापार समिती निर्माण करण्याचा अधिकार संसदेला आहे. आंतरराज्यीय मंडळांना घटकराज्यातील वादात निकाल देण्याचा अधिकार नाही. वादग्रस्त प्रश्नांबाबत चौकशी करून सल्ला देणे, शिफारसी करणे एवढाच अधिकार आहे.

**९.५.७.** केंद्रसरकारला कोणत्याही घटकराज्याच्या सुव्यवस्थेबाबतीत तेथील राज्यपालांकडून अहवाल मागविता येतो. प्रसंगी एखाद्या घटकराज्यात राष्ट्रपतीची राजवट निर्माण करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. (कलम ३५६ प्रमाणे) राष्ट्रपतींच्या राजवटीची मुदत किती काळपर्यंत असावी याचा निर्णय संसद घेते. एखाद्या घटकराज्यात कायदा आणि सुव्यवस्था यासंबंधी गंभीर परिस्थिती निर्माण झाली असता केंद्रसरकार आपले लष्करी अथवा इतर दल त्या राज्यात पाठवितात. हे दल, केंद्रसरकारच्या सूचनांनुसार कार्य करतात. घटकराज्य सरकारचे या दलावर नियंत्रण नसते. या दलातील सभासदांचे कारवाईच्या काळातील अधिकार आणि कामे स्पष्ट करणारा कायदा संसद करीत असते.

**९.५.८. आणीबाणीच्या काळातील अधिकार (Relations during Emergencies) -** ज्यावेळी देशात राष्ट्रीय आणीबाणी घोषीत केली जाते त्यावेळी घटकराज्यांच्या सरकारांनी आपला सत्ता कशी वापरावी यासंबंधी केंद्रसरकार आदेश देऊ शकते.

देशात आर्थिक आणीबाणी घोषित केली जाते तेव्हाही घटकराज्यांनी आपापल्या आर्थिक व्यवहारांच्या बाबतीत कोणत्या नियमांचे व कसे पालन करावे, यासंबंधी केंद्रसरकार आदेश देऊ शकते.

या आदेशांचे घटकराज्यांनी पालन करावे असे घटनात्मक बंधन आहे. जर एखादे घटकराज्य हे आदेश पाळण्यात असमर्थ ठरले तर संबंधित घटराज्यात घटनात्मक यंत्रणा कोलमडली आहे. असा अर्थ लावून राष्ट्रपती त्या राज्यात कलम ३५६ प्रमाणे राष्ट्रपती राजवट आणू शकतो.

**९.५.९. अनुसूचित जमाती आणि केंद्राचे अधिकार -** घटकराज्याच्या कक्षेतील प्रदेशात राहणाऱ्या अनुसूचित जामातींच्या कल्याणासाठी आवश्यक अशा योजना तयार करून त्यांची कार्यवाही करण्यासाठी योग्य ते आदेश घटकराज्य सरकारांना देण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे.

**९.५.१०. नद्यांच्या पाण्यासंबंधी वाद -** काही नद्या अनेक घटकराज्यांच्या प्रदेशांतून वाहतात. त्या नद्यांच्या पाण्यावर सर्व संबंधित घटकराज्यांचा हक्क पोहोचतो. कोणत्या घटकराज्याने किती पाणी वापरायचे ? त्याचे वाटप कसे करावयाचे ? हे वादाचे प्रश्न असतात. उदा. कृष्णा, गोदावरी या नद्या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक या राज्यांतून वाहतात. महाराष्ट्रात बांधलेल्या धरणांमुळे कर्नाटकाला मिळणाऱ्या पाण्यावर परिणाम होतो आणि वाद निर्माण होतो. असे वाद सोडविण्यासाठी लवादासारखी तटस्थ यंत्रणा निर्माण करण्याचा अधिकार संसदेस देण्यात आला आहे.

**निष्कर्ष** - कायदेविषयक संबंधाप्रमाणेच प्रशासकीय संबंधांच्या बाबतीत केंद्रशासन राज्यापेक्षा अधिक शक्तीशाली आहे असे दिसते.

**सारांश -** केंद्र-राज्य कार्यकारी आणि प्रशासकीय संबंध

१) विधिविषयक अधिकारांशी समांतर
२) राज्यसरकारांना केंद्राचे मार्गदर्शन
३) राज्यसरकारांना केंद्राचे आदेश
४) केंद्रसरकारची कार्ये राज्यसरकारवर सोपविणे
५) अखिल भारतीय नोकऱ्यांची प्रस्थापना
६) आंतरराज्यीय परिषदा व व्यापार व्यापारउद्योगांची स्थापना
७) राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेसंबंधी
८) आणीबाणीच्या काळातील संबंध
९) अनुसूचित जमाती व केंद्राचे अधिकार
१०) नद्यांच्या पाण्यासंबंधी

## ९.६. केंद्र-राज्य आर्थिक संबंध - (Financial Relationship) :

संघराज्यामध्ये केंद्र व घटक शासनांवर ज्या वैधानिक आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत त्या जबाबदाऱ्या त्यांना यशस्वीपणे पार पाडता याव्यात म्हणून आर्थिक तरतुदींची आवश्यकता असते. केंद्र व राज्य यांचे प्रशासन सुरळीत चालावे, त्यांच्यात समन्वय व सहकार्य निर्माण व्हावे यासाठी त्या त्या राज्यांना आपआपली जबाबदारी पार पाडण्यासाठी योग्य अशी आर्थिक परिस्थिती असणे आवश्यक असते. केंद्र व राज्य यांच्यात संघर्ष होऊ नये यासाठी केंद्र व घटक सरकारे यांच्यामध्ये उत्पन्नांच्या बाबी आणि कर (Tax) लावण्याचे अधिकार घटनेप्रमाणे निर्धारित केले आहेत.

**९.६.१. करांची विभागणी (Divides Taxing Powers)** -राज्यसूचीतील विषयांवरील कर राज्यांच्या वाट्याला व केंद्रसूचीतील विषयांवरील कर केंद्राच्या वाट्याला आहेत. समवर्ती सूचीत कोणत्याही कराचा विषय समाविष्ट नाही. राज्याकडे जमा झालेली कराची रक्कम राज्य स्वतःकडे ठेवीत असते. केंद्रसरकारकडे जमा झालेल्या कराच्या रक्कमेतील काही हिस्सा राज्यांना दिला जातो.

**९.६.२. राज्यांना आर्थिक साहाय्य (Union Financial Assistance to the State)** - राज्यांचे कराद्वारे मिळणारे उत्पन्न अपूरे असते म्हणून केंद्रसरकार आपल्या उत्पन्नातील काही भाग, आर्थिक साहाय्याच्या स्वरूपात राज्यांना देत असते. काही कर केंद्रातर्फे लावले जातात परंतु त्यांची वसुली राज्यसरकार करते व आपल्या खाती जमा करते. उदा स्टँपकर, अबकारीकर, काही कर केंद्रसरकार बसविते व वसूलही करते आणि आलेले उत्पन्न राज्यसरकारला देत असते. उदा. रेल्वेभाडे

**९.६.३. साहाय्यक अनुदान (Grants in Aid)** - विकासाची कामे व मागासलेल्या जातीजमातींच्या कल्याणासाठी केंद्रसरकार घटकराज्यांना काही साहाय्यक अनुदान देते अर्थात याबाबतची रक्कम संसद ठरविते. आसाम राज्याला अनुसूचित जमातीसाठी खास अनुदानाची व्यवस्था आहे. सार्वजनिक कामासाठी केंद्र घटकराज्यांना अनुदानसाहाय्य देते. आसाम, बिहार, ओरिसा यांना ताग व तागापासून तयार केलेल्या वस्तूंच्या निर्यातीच्या मोबदल्यात साहाय्यक अनुदान देण्यात येते.

**९.६.४. घटकराज्यांना कर्ज** - प्रत्येक घटकराज्याला केंद्रसरकारकडून कर्ज घेता येते. भारताबाहेरील देशांकडून राज्यसरकारला कर्ज घेता येत नाही.

**९.६.५. वित्तआयोग (The Finance Commission)** - राष्ट्रपती वित्त आयोगाची पाच वर्षासाठी निर्मिती करतात. या आयोगाचे अध्यक्ष व चार सभासद असतात. सभासदांची पात्रता संसद कायदा करून ठरविते. वित्त आयोगाची मुख्य कार्ये खालील आहेत.

१) केंद्र व राज्य यांच्यात किंवा राज्याराज्यात करांचे उत्पन्न कसे विभागले जावे यासंबंधी शिफारशी करणे. २) भारताच्या संचित निधीमधून राज्यांच्या उत्पन्नाला जी साहाय्यक मदत द्यावयाची, ती कोणत्या निकषांच्या आधारे द्यावी यासंबंधीच्या शिफारशी करणे.

**९.६.६. नियोजन मंडळ** - नियोजन मंडळामुळे राज्यांना केंद्रावर आर्थिक बाबतीत अवलंबून राहावे लागते. नियोजकविषयक धोरण निश्चित करताना राज्यांना विश्वासात घेतले जात नाही. पंतप्रधान, मंत्री, कॅबिनेट सचिव यांचा समावेश नियोजन मंडळात होतो. राज्यांचा एकही प्रतिनिधी नियोजन मंडळात नसतो.

**९.६.७. आणीबाणीच्या काळात** - राष्ट्रपती केंद्र व राज्यातील आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवतात. राज्याची आर्थिक विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठवावी असा आदेश देऊ शकतात.

**निष्कर्ष :**आर्थिक बाबतीत केंद्रसरकारचे घटकराज्यांवर नियंत्रण दिसून येते. बऱ्याच बाबतीत राज्यसरकार केंद्रावर अवलंबून असल्याचे दिसून येते.

**सारांश - केंद्र आणि राज्य आर्थिक संबंध :**

१) कराची विभागणी - केंद्र व राज्य
२) राज्यांना आर्थिक साहाय्य
३) सहाय्यक अनुदान
४) घटकराज्यांना कर्ज
५) वित्तआयोग
६) नियोजन मंडळ
७) आणीबाणीच्या काळात

## ९.७ केंद्र व राज्य संबंधाचे आणि कार्यांचे बदलते स्वरूप :

### ९.७.१ प्रस्तावना :

भारतीय संघराज्य पद्धती भारतीय राज्यघटनेच्या मुलभूत चौकटीचा एक भाग आहे. घटनेप्रमाणे केंद्रसरकारला जास्त अधिकार आहेत. परंतु घटकराज्ये सुद्धा आपल्या कार्यक्षेत्राच्या बाबतीत स्वायत्त आहेत .घटकराज्यांकडे सुपूर्द केलेल्या विषयांच्या बाबतीत घटकराज्ये सार्वभौम आहेत. संघराज्याच्या प्रत्यक्ष वाटचालीत असे दिसते की केंद्र आणि राज्य यांच्यात अनेकदा संघर्ष झाले आहेत. घटनेप्रमाणे भारतात केंद्राकर्षी संघराज्य आहेच याशिवाय घटना अंमलात आल्यापासून ते आतापर्यंत अनेक घटनात्मक आणि घटनाबाह्य साधनाद्वारे केंद्राला प्रबळ करण्याकडे केंद्रशासनाची कामकाज पद्धती आहे. कारण केंद्र व राज्याचे प्रत्यक्ष संबंध

अनेक राजकीय आणि बिगरराजकीय प्रभावांवर अवलंबून असतात. १९६७ साली ९ घटकराज्यांमध्ये काँग्रेस सोडून इतर राजकीय पक्षांची शासने आली. त्या पक्षांनी दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या केंद्रीय प्रवृत्तींना विरोध करायला सुरूवात केली. त्यातूनच केंद्र आणि राज्य यांच्यात संघर्ष व तणाव वाढायला लागले. विविध कारणांमुळे केंद्र शासनाचे महत्त्व वाढत चाललेले व घटक राज्यांचे महत्त्व बऱ्याच प्रमाणात ओसरत चाललेले दिसते.

भारतीय संघराज्याची आतापर्यंतची कार्ये आणि संबंधांची वाटचाल यावरून संघराज्यव्यवस्थेच्या कार्यप्रणालीचे वास्तविक स्वरूप दिसून येते. त्यावरून भारतीय राज्यात दोन प्रकारचे कल (Aspects) दिसून येतात.

१) केंद्र व राज्य यांच्यात संघर्षाचा कल

२) केंद्र व राज्य यांच्यात सहकार्याचा कल

### १.७.२ केंद्र आणि राज्य यांच्यातील तक्रारीची आणि संघर्षाची क्षेत्रे :

**१) राज्याची अधिक स्वयत्ततेची मागणी (Demand for Autonomy) :**

भारतीय संघराज्य व्यवस्थेच्या कामकाजामध्ये १९६७ नंतर फरक पडला कारण तोपर्यंत केंद्र आणि राज्यात काही अपवाद वगळता काँग्रेस पक्षाचे शासन सत्तेवर होते. त्यानंतर घटकराज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची सरकारे आलीत त्यांनी विशेषतः अकाली दल, तेलगु देसम, द्रमुक या पक्षांनी केंद्र व राज्य सरकारच्या परस्परसंबंधांचा पुनर्विचार व्हावा अशी मागणी केली. त्यासाठी १९७७ साली - ए. व्हि. राजमन्नार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य समिती नेमण्यात आली होती.

१९७८ साली अकालीदलाने आनंदपूर साहेब ठराव पास केला होता.

१९८३ साली भारत सरकारने सरकारीया आयोग स्थापन केला. या आयोगाने १९८८ मध्ये केंद्र व राज्य संबंधांविषयक अहवाल सादर केला; तो अजूनही विचाराधीन आहे. दिवसेंदिवस राज्यांची अधिकार आणि स्वायत्ततेची मागणी वाढत आहे. ४२ वी घटनादुरूस्ती आणि काही न्यायालयीन निर्णय यामुळे केंद्राचा प्रभाव वाढला. त्यातूनच राज्यांची अधिक स्वायत्ततेची मागणी सुरू झाली.

**२) राष्ट्रपती राजवट** - एखाद्या घटकराज्यामध्ये घटनात्मक शासनाची अयशस्विता निर्माण झाल्यास राष्ट्रपती त्या राज्यात राष्ट्रपती राजवट घोषित करतो. या तरतुदींचा राजकीय कारणांसाठी किंवा एखाद्या राज्याचे शासन रद्द करण्यासाठी उपयोग होऊ नये असे राज्यांचे मत आहे कारण बरेचदा केंद्रसरकारने या तरतुदींचा गैरवापर करून काही राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट घोषित केली होती.

**३) राज्यपाल** - राज्यपाल राज्याचा घटनात्मक प्रमुख असतो. राज्यपालाची भुमिका केंद्र आणि राज्य संबंधात तणाव निर्माण होण्याचे मुख्य कारण झाले आहे. राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपती करतात व राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपाल अधिकारावर राहतात. राज्यपाल केंद्राचा प्रतिनिधी म्हणून काम करतात. राज्यपालाने स्वतःच्या स्वधिकारांचाही उपयोग करावा; फक्त प्रेक्षकाची भूमिका करू नये अशी राज्यांची अपेक्षा आहे कारण राज्यपाल राज्याचा प्रमुख असतो. परंतु भारताच्या संघराज्यव्यवस्थेत राज्यपालावर राज्याचा नाममात्र प्रमुख आणि केंद्राचा राज्यात असणारा प्रतिनिधी अशी दुहेरी भूमिका सोपविली आहे.

**४) आर्थिक मिळकतीची साधने** - घटकराज्यांचे आर्थिक परावलंबित्व देखील राज्यांच्या स्वायत्ततेची मागणीमागील एक कारण आहे. केंद्र आणि राज्य यांच्यात आर्थिक संबंध घटनेद्वारे निश्चित करण्यात आले आहेत. आर्थिक अधिकारांची आणि मिळकतीची विभागणी योग्यप्रकारे अमलात आणली जात नाही. राज्यांना केंद्रावर त्यासाठी अवलंबून राहावे लागते असे राज्यांचे मत आहे. काही राज्यांच्या मते घटनेप्रमाणे केंद्र कराचे वाटप करीत नाही. श्रीमंत आणि मोठ्या घटकराज्यांना केंद्रशासन जास्त फंड देतात.

**५) नियोजन मंडळ** - के. संथानम यांच्या मते केंद्राकर्षी प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे त्याला दोन कारणे कारणीभूत आहेत. एक म्हणजे नियोजन मंडळ आणि दुसरे म्हणजे आर्थिक क्षेत्रात राज्यशासने केंद्राच्या फंडावर अवलंबून असतात.

नियोजनमंडळाची भूमिका देखील केंद्र राज्य संबंधांतील दुराव्याला व संघर्षाला कारणीभूत आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये आपले वाढते व संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित करून नियोजन मंडळाने केंद्रीकरणाचा पाठपुरावा केलेला आहे. नियोजन मंडळाद्वारे केंद्रसरकार राज्यावर आपला प्रभाव वाढवीत आहे असे राज्यांना वाटते. नियोजन मंडलाच्या रचनेत घटकराज्यांना कोणतेही स्थान नाही. नियोजनमंडळ प्रत्यक्षात केंद्रसरकारच्या नियंत्रणाखाली कार्य करते.

**६) केंद्रीय पोलीस दलाचा वापर** - एखाद्या राजयामध्ये केंद्रीय पोलीसदल पाठविण्याचा अधिकार राज्यांना आहे. बरेचदा केंद्र राजयांना न विचारताच हे दल पाठवितात. खरे तर घटनेप्रमाणे शांतता व सुव्यवस्था राखणे हा राजय्सरकारचा विषय आहे. राज्याने मागणी केल्यानंतर असे पोलीस दल केंद्राने पाठविले तर केंद्र राज्य संबंधांना बाधा येणार नाही. रेल्वे, पोस्ट, स्टीलमील्स, फॅक्टरीज संपूर्ण देशात पसरलेल्या असतात. अशश ठिकाणी हरताळ, हिंसाचार झाला आणि कायदा सुव्यवस्था धोक्यात आली असे केंद्रशासनाला वाटले की बरेचदा त्या राजयांमध्ये केंद्रीय पोलीस दल पाठविण्यात येते.

**७) समवर्ती सूची** - समवर्तीसूचीतील विषयांवर केंद्रशासनाने केलेले कायदे त्याच विषयांवरील राज्यातील विधिमंडळाने केलेल्या कायद्यांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात. बरेचदा केंद्रसरकार या सूचीतील विषयांचा उपयोग करून राज्यसरकारांवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असतात. या सूचीवर नव्याने विचार करण्याची आवश्यकता बहुसंख्य राज्यांनी व्यक्त केली आहे.

**८) उद्योगधंदे व खाणी यावर केंद्राचे वर्चस्व** - उद्योगधंदे व खाणी हे विषय राजयाच्या अधिकारात असावयास हवेत आणि जे उद्योगधंदे जनतेच्या हिताचे आहेत, तेवढेच केंद्रसरकारने नियंत्रित करावेत अशी मूळ घटनेमध्ये तरतूद आहे. काही खास उद्योगधंद्यांसंबंधीचे कायदे करण्यास केंद्रसूचीने संसदेला अधिकार दिलेला आहे. सध्या बहुतेक उद्योगधंदे व खाणी केंद्राच्या अधिकारात आहेत.

९) राज्यसूचीतील विषय घटकराज्यांकडे आहेत.परंतु राजय्सूचीतील विषयांबाबतीतही दिवसेंदिवस केंद्राचा हस्तक्षेप वाढत आहे. उदा. शिक्षण विषय राज्यसूचीतून काढून समवर्ती सूचीत घेतला.

**१०)** अखिल भारतीय सेवा उदा. आय. पी. एफ. आय. एफ. एस. यांचे व्यवस्थापन केंद्राकडे आहे. त्यानिमित्ताने केंद्राचे वर्चस्व राजयावर येते. वरील विषय केंद्र व राज्य यांच्यात तणाव आणि संघर्ष निर्माण करणारे आहेत. त्यामुळे राज्यांच्या राजकीय स्वायत्ततेला धक्का पोहोचतो असे घटकराज्यांना वाटते त्यामुळेच अनेक राज्ये राज्यांच्या स्वायत्ततेची मागणी करतात.

**११) प्रादेशिक पक्षांचा उदय** - निरनिराळ्या घटकराज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांचा उदय झाला आणि राज्यातील जनतेचा त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळू लागला. प्रादेशिक पक्ष प्रादेशिक अस्मितेला खतपाणी घालून आपल्या राजकीय स्वार्थासाठी जनतेच्या मनात फुटीरतेची भावना रूजवितात.

**१२) राज्याच्या स्वायत्ततेस विरोध** - केंद्रशासनाने घटकराज्यांच्या स्वायत्ततेच्या मागणीस विरोध केला. त्याची कारणे खालील आहेत.

१) केंद्रशासनास कमकुवत करणे राष्ट्रीय हिताच्या व राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीकोनातून चूक ठरेल. विघटनकारी प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवण्यास केंद्रसरकार शक्तिशाली असणेच योग्य आहे. घटकराज्यांकडे अधिक सत्ता सोपविल्यास कार्यक्षमता अधिक येईल असे नाही कारण अनेक घटकराज्यांमध्ये प्रशासनाचा दर्जा घसरला आहे. अशाप्रकारे केंद्र आणि राज्य यांच्यात सत्तेच्या विभागणीच्या संदर्भात वाद होतातच.

### १.७.३ केंद्र व राज्य संबंधांची आणि कार्याची सहकार्याची बाजू :

केंद्र आणि राज्य यांच्यात सहकार्य आहे असे सामान्यतः दिसते. केंद्र आणि राज्यांमध्ये घटनेप्रमाणे अधिकार विभागणी केलेली आहे. त्या विभागणीप्रमाणे घटकराज्ये आपआपल्या क्षेत्रात स्वायत्तता उपभोगतात.

१) भारताच्या विविधता असलेल्या देशात राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता राखण्यासाठी केंद्रसरकार शक्तिशाली करण्यात आले आहे. भारतीय संघराज्यांची रचना एककेंद्री व्यवस्थेकडे झुकणारी आहे.

२) कल्याणकारी योजना राबविण्यासाठी (The Executive of Welfare Project) भारतासारख्या नवीन व विकसनशील देशाला केंद्र व राज्य यांच्यातील सत्तेची ताठर विभागणी परवडणारी नाही. विकसनशील देशामध्ये केंद्र व राज्य यांच्यात सहकार्य असेल तरच प्रशासकीय कार्यक्षमता येते. शेवटी राज्यघटनेचा उद्देश लोकांना न्याय देणे हा आहे. केंद्र व राज्यशासनांच्या सहकार्यातूनच हे साध्य होणार आहे. म्हणून संघराज्यात्मक व्यवस्थेतील महत्त्वाचा आशय हा स्पर्धात्मक नसून वेगवेगळ्या शासनांनी आपल्या अधिकारांचा सहकार्याने वापर करण्यात दिसून येतो.

३) केंद्र आणि घटकराज्ये शासनामध्ये सहकार्य वाढावे यासाठी खालील संस्थांचा उपयोग होतो.

**अ) नियोजनमंडळाची भूमिका** - विकासाच्या योजना आणि त्यासाठी आर्थिक मदत मिळविण्यासाठी राज्यशासनांना नियोजन मंडळांवर अवलंबून राहावे लागते. त्याचप्रमाणे नियोजनमंडळ अनुदानाच्या विभागणीवर, वापरावर व योजनेच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवते.

**ब) राष्ट्रीय विकास परिषद** - ही संस्था नियोजनमंडळाची निगडित आहे. या परिषदेची निर्मिती १९५२ मध्ये झालेली असून तिच्यामध्ये राज्यांच्या, केंद्राच्या व केंद्रशासित प्रदेशांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. नियोजन क्षेत्रांतील केंद्र व राज्य यामध्ये परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. परिषद सर्व योजनांना व वार्षिक विभागणींना मंजुरी देते. आणि वेगवेगळ्या राष्ट्रीय योजनांच्या कामकाजाचा आढावा घेते.

**क) विभागीय परिषदा** - १९५६ च्या राज्यपुर्नरचनेच्या कायद्यातील शिफारशीप्रमाणे या परिषदा निर्माण केल्या आहेत. दोन किंवा अधिक राज्यांच्या विषयाच्या संबंधात सल्ला देण्याचे कार्य या परिषदा करतात. उदा. सीमातंटे, भाषिक अल्पसंख्यांकांच्या समस्या, आंतरराज्यीय आर्थिक व सामाजिक योजनांचा कार्यक्रम.

**ड) ईशान्य विभागीय परिषदा** - आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड, त्रिपूरा ही राज्ये व अरूणाचल प्रदेश आणि मिझोराम या केंद्रशासित प्रदेशांमधील समान हितसंबंधांचा विचार ही परिषद करते.

**९.७.४ मूल्यमापन :** भारतीय संघराज्य (A Union of States) आहे. हे संघराज्य केंद्राकर्षी स्वरूपाचे आहे. भारतीय संघराज्यामध्ये केंद्र अधिक शक्तीशाली असले तरी राज्ये आपआपल्या क्षेत्रात सर्वोच्च आहेत. भारतीय संघराज्यातील केंद्र व राज्य एकमेकांचे शत्रू नाहीत तर राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेतील दोन्ही सहकारी आहेत. दोन्ही सर्वस्वी एकमेकांवर अवलंबून नाहीत आणि दोन्ही एकमेकांपासून फार स्वतंत्रही असू शकत नाहीत.

**९.७.५ सारांश टेबल : केंद्र आणि राज्यांचे संबंध आणि कार्याचे बदलते स्वरूप**

- प्रस्तावना
  - संघराज्याची वाटचाल
- केंद्रराज्य यांच्यातील संघर्षाची क्षेत्रे
  - १. अधिक स्वायत्ततेची मागणी
  - २. राष्ट्रपतीची राजवट
  - ३. राज्यपालाची नेमणूक व भूमिका
  - ४. आर्थिक मिळकतीची साधने व त्यातील भेदभाव
  - ५. नियोजन मंडळाची भूमिका
  - ६. केंद्रीय पोलीस दलाचा वापर
  - ७. समवर्तीसूची
  - ८. उद्योगधंदे व खाणींवर केंद्राचे वर्चस्व
  - ९. राज्यसूची
  - १०. अखिल भारतीय सेवा
  - ११. प्रादेशिक पक्षांचा उदय
  - १२. केंद्राचा स्वायत्ततेस विरोध
- सहकार्याची बाजू
  - १. एकात्मतेसाठी
  - २. कल्याणकारी योजना राबविण्यासाठी
  - ३. सहकार्य वाढावे म्हणून संस्था
  - अ) नियोजनमंडळ
  - ब) राष्ट्रीय विकास परिषद
  - क) विभागीय परिषद
  - ड) ईशान्य विभागीय परिषद
- मूल्यमापन

## ९.८ राज्याच्या स्वायत्ततेचा प्रश्न (State autonomy) :

अनेक राज्यांनी राज्यशासनांना अधिक स्वायत्तता देण्यात यावी अशी मागणी केली होती. यासाठी राज्यशासनांच्या सुधारणा आयोगाने वेगवेगळ्या सूचना व प्रस्ताव दिले आहेत.

**ए-अप्पादोराई व शिवराम यांचा प्रस्ताव :**

आंतर-राज्यपरिषदेची स्थापना करावी अशी सूचना यांची होती. त्यांच्या मते या परिषदेचे सदस्यत्व भारताचे सरन्यायाधीश, माजी सरन्यायाधीश, भूतपूर्व पंतप्रधान व उपपंतप्रधान तसेच ॲटर्नी जनरल यांना देण्यात यावे. या परिषदेकडे पुढील महत्त्वाच्या बाबी द्याव्यात.

१) घटनेच्या ३६५ कलमाप्रमाणे राज्यात राष्ट्रपती राजवट सुरू करणे.
२) राज्यपालांच्या नेमणुका
३) आंतर-राज्य सीमा तंटे
४) राज्यविधानसभांनी मंजूर केलेले परंतु राष्ट्रपतींच्या विचारासाठी राज्यपालांनी राखून ठेवलेले प्रस्ताव.

या परिषदेने दिलेला सल्ला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्याच्या विरोधात असला तरी राष्ट्रपतींना तो बंधनकारक असावा असे अप्पादोराईचे मत होते.

१९९० साली राष्ट्रपतींनी अशाप्रकारच्या आंतरराज्य परिषदेची निर्मिती केली परंतु या परिषदेची रचना अप्पादोराई व शिवराम यांच्या सूचनाप्रमाणे केली नाही. या परिषदेचे अध्यक्ष पंतप्रधान आहेत व राज्यांचे मुख्यमंत्री या परिषदेचे सदस्य आहेत.

**राजमन्नार समिती :**

१९७० साली तामिळनाडू सरकारने पी. व्ही राजमन्नार यांच्या नेतृत्वाखाली एका त्रिसदस्यीय समितीची स्थापना केली. या समितीने केंद्र - राज्यांच्या परस्परसंबंधांच्या प्रश्नांची नव्याने चौकशी करून त्याबाबत शिफारशी कराव्यात असे ठरले. या समितीच्या शिफारसी पुढीलप्रमाणे होत्या -

१) आंतर-राज्यपरिषदेची तात्काळ निर्मिती करण्यात यावी.
२) राज्यांना त्यांचे स्वतःचे नियोजनमंडळ असावे
३) वित्तीय आयोगाची कायम स्वरूपाची नेमणूक करण्यात यावी.
४) राज्यशासनांना करांमध्ये अधिक वाटा देण्यात यावा.
५) त्या त्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने व्यक्तीची शासनामध्ये इतरत्र कोणत्याही पदावर नियुक्ती होता कामा नये.

भारत सरकारने राजमन्नार समितीच्या शिफारशींचा स्वीकार केला नाही.

**पश्चिम बंगाल शासनाचा प्रस्ताव :**

या प्रस्तावालाच 'ज्योती बसू निवेदन पत्रिका' असेही म्हणतात. या प्रस्तावानुसार राज्यशासनांना अधिक प्रमाणात स्वायत्तता देण्यावर भर आहे. त्यांच्या मते, १) शेषसत्ता (residuary powers) केंद्रशासनाऐवजी राज्यशासनाकडे देण्यात यावेत. २) राज्यसभेची निवडणूक प्रत्यक्ष पद्धतीने घेण्यात यावी इत्यादी सूचना त्यांनी केल्या होत्या.

**केंद्र-राज्य संबंधांबाबत सरकारिया आयोगाच्या शिफारशी :**

८ जून १९८३ रोजी तीन सदस्यांचा एक आयोग भारत शासनाने केंद्रराज्य यांच्या परस्परसंबंधांच्या प्रश्नाचे परीक्षण करण्यासाठी स्थापन केला होता.

न्यायमूर्ती श्री. आर. एस. सरकारिया हे या आयोगाचे अध्यक्ष व इतर दोन सदस्य या आयोगावर होते. या आयोगाने केंद्र सरकार, राज्य सरकार, विविध राजकीय पक्ष, घटनातज्ज्ञ यांच्याशी सल्लामसलत केली व १९८७ साली त्यांनी आपला अहवाल केंद्रशासनाला सादर केला. या अहवालातील काही महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.-

१) केंद्रशासन मजबूत असावे यावर या आयोगाचा भर होता.
२) राष्ट्रीय विकास परिषदेची पुनर्रचना करण्यात यावी.
३) कायमस्वरूपी आंतर-राज्य परिषद निर्माण करण्यात यावी.
४) राज्याचा राज्यपाल राजकारणापासून अलिप्त असावा. त्याच्या नियुक्तीच्या वेळी मुख्यमंत्र्यांचा सल्ला घेण्यात यावा. निवृत्तीनंतर राज्यपाल कोणत्याही शासकीय पदावरील नेमणुकीला अपात्र असावा.
५) राज्यघटनेच्या कलम ३५६ चा, (राष्ट्रपतींची राजवट राज्यांमध्ये आणण्यासंबंधीचे आहे) वापर कमीतकमी करण्यात यावा.

अशाप्रकारे केंद्र आणि राज्य शासनांच्या कार्यकारी, कायदेविषयक, प्रशासकीय व आर्थिक संबंधांबाबत सरकारिया आयोगाने २४७ शिफारशी केल्या होत्या. या आयोगाच्या बहुतेक शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत.

## ९.९ राज्याराज्यांतील संबंध आणि संघर्ष (Inter-state Relations and Conflicts) आणि त्यावर उपाययोजना :

**प्रस्तावना :**

भारतीय संघराज्याच्या यशस्वी वाटचालींसाठी केंद्र आणि राज्य यांचे संबंध सहकार्याचे असणे गरजेचे असते. तसेच राज्याराज्यांचे आपआपसातील संबंधही चांगले असणे आवश्यक असते.

राज्यराज्यांमधील संघर्ष ही समस्या भारतीय संघराज्यपद्धतीमुळे उदयास आली आहे. भारतीय संघराज्यामध्ये २८ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. १९५६ साली राज्यपुनर्रचना कायदा पास करण्यात आला आणि राज्यांची रचना भाषेच्या आधारावर करण्यात आली त्यातूनच सीमावाद उदयास आले. उदा. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील वाद सीमावाद आहेत. राज्याराज्यांतील दुसऱ्या प्रकारचा वाद म्हणजे नदीच्या पाण्याच्या वाटपाचा वाद होय. नदी एका राज्यातून उदयास येते आणि दुसऱ्या राज्यातून वाहत जाऊन तिसऱ्या राज्यात समुद्राला मिळते. याच्यातून तामिळनाडू आणि कर्नाटक यांच्यात कावेरी नदीच्या पाण्याच्या वाटपाचा प्रश्न निर्माण झाला आहे. आपल्याच राज्यातील लोकांना राज्यातील नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे हा सुद्धा राज्याराज्यांतील संघर्षाचा एक विषय आहे. त्या त्या राज्यातील भाषिक अल्पसंख्यांकांच्या तक्रारी असतातच की त्यांच्यावर अन्याय होतो वैगरे. यासाठी बरेचदा प्रादेशिक पक्ष कारणीभूत असतात. उदा. मुंबईमध्ये बाहेरच्या राज्यातून येणाऱ्या लोकांच्या

बाबतीत अनेक राजकीय पक्षांच्या तक्रारी आहेत. त्यावरून बरेचदा राज्यव्यवस्थेत तणावाचे वातावरण निर्माण होते.

**राज्याराज्यांतील संघर्षाची उदाहरणे :**

**१) महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावाद :** १९५६ साली राज्यपुर्नरचना कायद्यामध्ये राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यावेळी बेळगाव, निपाणी, खानपूर हे मराठी भाषीय प्रदेश कर्नाटक भागात गेले. राजकीय पक्षांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की ही चूक दुरूस्त करण्यात यावी. ज्या प्रदेशांविषयी संघर्ष आहेत. त्या प्रदेशांमधून महाराष्ट्र एकीकरण समिती पक्षांचे सभासद लोकसभेमध्ये आणि कर्नाटकाच्या विधानसभेमध्ये निवडून आले होते. सतत या प्रदेशावरून महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये संघर्ष होतो परंतु अजूनही हा वाद सुटला नाही.

**२) कावेरी नदीच्या पाण्याच्या वाटपाचा प्रश्न :** कर्नाटक आणि तामिळनाडू या दोन राज्यांमध्ये कावेरी नदीच्या वाटपासंबंधी वाद आहेत. तामिळनाडू राज्याने आतापर्यंत कावेरी नदीचे जास्तीतजास्त पाणी घेतले आहे त्यामुळे कर्नाटक राज्याला आपल्यावर अन्याय होत आहे असे वाटते. या वादाचे मूळ म्हणजे १९२४ साली ब्रिटिश राजवटीत मद्रास प्रेसिडन्सी आणि म्हैसूर राज्यामध्ये झालेला करार होय. कर्नाटक राज्याच्या मते हा करार मद्रास सरकारच्या बाजूने आहे त्यामुळे ह्यावर पुन्हा विचार करण्यात यावा. परंतु तामिळनाडू राज्याचा त्यासाठी विरोध आहे. शेवटी १९९० साली केंद्रसरकारने या विषयावर न्याय देण्याच्या दृष्टीने ट्रिब्युनल स्थापन केले. या न्यायालयाने दोन्ही राज्यांच्या बाजू ऐकून त्यावर २ फेब्रुवारी २००७ ला निवाडा दिला. त्याप्रमाणे तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, पांडेचेरी या चारही राज्यांमध्ये कावेरी नदीचे पाणी किती वापरावे हे नमूद करण्यात आले आहे.

**राज्याराज्यांतील संघर्ष सोडविणारी उपाययोजनात्मक यंत्रणा :**

घटनेप्रमाणे आणि कायद्याप्रमाणे राज्याराज्यांतील तणाव आणि संघर्ष सोडविण्यासाठी खालील यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. :

१) सर्वोच्च न्यायालयाला प्रारंभिक अधिकारक्षेत्र
२) १९५६ चा रिव्हरबोर्ड ॲक्ट
३) राज्याराज्यांतील समित्या
४) झोनल कौन्सिल
५) नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिल

**१) सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकारक्षेत्र :** राज्यघटनेच्या १३१ या कलमाप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाला प्रारंभिक अधिकार क्षेत्र देण्यात आले आहे. या अधिकाराप्रमाणे सर्वोच्च न्यायालय केंद्रसरकार विरूद्ध राज्यसरकार, राज्याराज्यांतील वाद, एखादे राज्य आणि केंद्र व इतर राज्ये यांच्यातील वाद सोडविण्याचे कार्य करते. संघीय न्यायालयाची भूमिका सर्वोच्च न्यायालय करते.

**२) रिव्हरबोर्ड ॲक्ट -** १९५६ साली केंद्रसरकारने हा कायदा केला आहे. या कायद्याप्रमाणे नदीच्या पाण्याच्या वाटपाच्या संदर्भात ज्या राज्यांमध्ये वाद होता त्यांच्यावर तोडगा म्हणून हा कायदा होता.

**३) पाणीवाटप कायदा -** १९५६ साली करण्यात आला होता.

**४) राज्याराज्यांतील समित्या -** राज्याराज्यांमध्ये सहकार्याचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून या समित्या स्थापन करण्यात आल्यात. १९९० साली अशा समित्यांची स्थापना करण्यात आली.

**५) झोनल कौन्सिल -** भारतीय राज्याचे पांच भाग पाडण्यात आले. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम, मध्य. या पाचही भागांमध्ये जी राज्ये आहेत त्यांचे आणि या सर्व भागांचे समान हितसंबंधाचे विषय आहेत त्यावर सूचनात्मक उपदेश करण्याचे कार्य हे झोनल कौन्सिल करीत असते. प्रत्येक झोनल कौन्सिलमध्ये त्या राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन इतर मंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक यांचा समावेश होतो. केंद्राचा गृहमंत्री सर्व झोनल कौन्सिलचा प्रमुख असतो.
आता तर संपूर्ण भारत सहा भागात विभागलेला आहे.

**१) पूर्व भाग :** यामध्ये बिहार, झारखंड, ओरिसा, सिक्किम, वेस्ट बंगाल यांचा समावेश होतो.
**२) पश्चिम भाग :** यामध्ये गुजरात, महाराष्ट्र, गोवा दीव दमन, नगरहवेली यांचा समावेश होतो.
**३) उत्तर भाग :** पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, राजस्थान, चंदीगड, दिल्ली यांचा समावेश होतो.
**४) दक्षिण भाग :** आंध्रप्रदेश, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, पांडेचरी यांचा समावेश होतो.
**५) मध्य भाग :** उत्तरप्रदेश, छत्तीसगढ, उत्तरांचल, मध्यप्रदेश यांचा समावेश होतो.
**६) उत्तरपूर्व भाग :** आसाम, मेघालय, नागालँड.

**नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिल :**

१९५२ साली या कौन्सिलची स्थापना करण्यात आली आहे. या कौनिसलमध्ये पंतप्रधान आणि राज्यांचे मुख्यमंत्री यांचा समावेश होतो. राष्ट्रीय योजना, त्यांचे नियोजन, ध्येय, कामकाज इत्यादींची पाहणी करणे हे या कौन्सिलचे कार्य आहे.

**निष्कर्ष :** केंद्र आणि राज्य यांच्या संबंधाचे बदलते स्वरूप बघता असे दिसून येते की हे संघर्ष म्हणजे एकप्रकारे केंद्रामध्ये सत्तेवर असणारा पक्ष आणि घटकराज्यांमध्ये सत्तेवर असणारा पक्ष यांच्यातील संघर्ष असतात.

**सारांश - राज्याराज्यातील संबंध आणि संघर्ष आणि त्यावर उपाययोजना :**

१) प्रस्तावना
२) राज्याराज्यातील संघर्षाची उदाहरणे :- सीमावाद, पाणीवाटप वाद
३) राज्याराज्यातील संघर्ष सोडविण्यारी यंत्रणा :-
    १) सर्वोच्च न्यायालय
    २) रिव्हरबोर्ड ॲक्ट
    ३) पाणीवाटप कायदा
    ४) समित्या
    ५) झोनल कौन्सिल्स
    ६) नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिल

## ९.१० प्रश्न :

१) केंद्र आणि राज्य यांचे कायदे विषयक संबंध स्पष्ट करा.
२) केंद्र आणि राज्यातील कार्यकारी व प्रशासकीय संबंधाचे परिक्षण करा.
३) केंद्र आणि राज्यांच्या आर्थिक संबंधाचे विश्लेषण करा.
४) भारतीय संघराज्यातील केंद्र व राज्याच्या बदलत्या संबंधांचे स्वरूप यावर लिहा.
५) भारतीय संघराज्यातील राज्याराज्यातील संघर्ष आणि संबंधांचे समालोचन करा.
६) टिपा द्या
    १) राज्याच्या स्वायत्ततेचा प्रश्न
    २) सरकारिया कमिशनच्या शिफारशी
    ३) केंद्र व राज्यांचे आर्थिक संबंध.
    ४) राज्याराज्यातील संबंध व संघर्षावर उपाय योजना

❖❖❖❖

# १०

# भारतातील पक्षपद्धती (पक्षांची विचारप्रणाली आणि सामाजिक आधार)

**घटक रचना :**

१०.१ उद्दिष्ट्ये
१०.२ प्रस्तावना
१०.३ राजकीय पक्षांचे प्रकार
१०.४ राजकीय पक्षांचे महत्त्व
१०.५ राजकीय पक्षाचा अर्थ
१०.६ भारतीय पक्षपद्धतीची वैशिष्ट्ये
१०.७ भारतात पक्षपद्धतीचा उदय व विकास
१०.८ भारतातील राजकीय पक्षांचे वर्गीकरण
१०.९ राष्ट्रीय राजकीय पक्षांची विचारप्रणाली
१०.१० सारांश
१०.११ प्रश्न

## १०.१ उद्दिष्ट्ये

१) भारतीय लोकशाही पद्धतीतील राजकीय पक्षांचे स्वरुप आणि कार्य समजणे.
२) राष्ट्रीय पक्षांच्या उदय व विकासाचा आढावा घेणे.
३) राष्ट्रीय पक्षांवर प्रभाव असणाऱ्या विचारसरणी अभ्यासणे.
४) पक्षांच्या कार्यप्रणालीवर जात, धर्म, भाषा या घटकांचा प्रभाव अभ्यासणे.

## १०.२ प्रस्तावना

लोकशाही व्यवस्थेच्या यशस्वी कार्यप्रणालीसाठी राजकीय पक्ष महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. शासन आणि जनता यांच्यात समन्वय साधन्याचे कार्य पक्ष करतात. आधुनिक काळात प्रत्यक्ष लोकशाही शक्य नसल्यामुळे राजकीय पक्षाचे अस्तित्व अनिवार्य झाले आहे. लोकमताला आकार देणे, लोकांची दु:खे जाणून घेणे, लोकांना राजकीय दृष्टीने जागृक करणे, शासकीय धोरणे लोकांपर्यंत पोहचविणे इत्यादि महत्त्वाची भूमिका लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष

करतात. म्हणजेच राजकीय पक्ष दुहेरी कार्य करतात. एका बाजूला लोकांच्या अपेक्षा, दुःख राजकीय यंत्रणेपर्यंत पोहचविणे आणि दुसऱ्या बाजूला राज्यातील धोरणांबाबत लोकांना शिक्षण देणे.

भारतातील पक्षपद्धती ब्रिटिश वसाहतिक कारकिर्दीमधील अनुभवातून विकसित झाली आहे. आधुनिक काळात सर्वच लोकशाही देशांमध्ये राजकीय पक्षांचे अस्तित्व पाहावयास मिळत असले तरी प्रत्येक देशातील पक्षपद्धतीचे स्वरुप वेगळे असते. कोणत्याही देशातील पक्षपद्धतीच्या विकासावर त्या देशाच्या ऐतिहासिक व राजकीय परंपराचा, लोकांचा जीवनाविषयक दृष्टिकोन, यांची जीवनमूल्ये, सामाजिक परिस्थिती इत्यादी अनेक घटकांचा प्रभाव असतो. त्यातूनच प्रत्येक देशाच्या पक्षपद्धतीला तिची काही खास वैशिष्ट्ये प्राप्त होतात.

## १०.३ राजकीय पक्षांचे प्रकार

१) प्रतिक्रीयावादी Reactionary Parties - जुन्या सामाजिक परंपरा, आर्थिक, राजकीय संस्था व मूल्यांना महत्त्व देणारे पक्ष म्हणजे reactionary parties होय.
२) परंपरावादी पक्ष Conservative Parties - 'जैसे थे' परिस्थितीला महत्त्व देणारे Conservative Parties होय.
३) उदारमतवादी पक्ष Liberal Parties - उदारमतवादी – अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेत सुधारणा सुचविणारे म्हणजे Liberal पक्ष होय.
४) जहाल पक्ष Radical parties - नवीन व्यवस्था प्रस्थापित करण्याला महत्त्व देणारे म्हणजे Radical पक्ष होय.

विचारसरणीच्या आधारावर पक्षांचे वर्गीकरण केल्यास भारतात १) डावे पक्ष म्हणजे CPI, CPM व २) उजवे पक्ष म्हणजे BJP होय.

## १०.४ राजकीय पक्षांची भूमिका आणि महत्त्व

१) लोकशाहीत राजकीय पक्षांची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण असते. बहुमतात असलेला पक्ष राज्यकारभार चालवितो व इतर राजकिय पक्ष सत्तारुढ पक्षाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करतात. लोकशाही शासनपद्धती राजकीय पक्षांशिवाय कार्य करु शकत नाही.
२) राजकीय पक्षांमुळे निवडणुकानंतर दैनंदिन जीवनामध्ये कोणताही अडथळा न येता शांततेच्या मार्गाने सत्तेचे सत्तांतर घडून येते.
३) राजकीय पक्षांमुळे लोकांना राजकीय शिक्षण मिळते आणि लोकांमध्ये राजकीय जागृकता येते.
४) राजकीय पक्षांमुळे आणि त्यांच्या विचारसरणीमुळे समाजाला दिशा मिळते.
५) प्रातिनिधिक लोकशाहीत शासन आणि जनता यांना जोडण्याचे काम राजकीय पक्ष करतात.
६) शासनावर नियंत्रण राजकीय पक्षामुळे राहते.

स्वातंत्र्योत्तर  कालखंडात भारताने लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे राजकीय पक्ष हे भारतीय राजकीय व्यवस्थेचा अविभाज्य घटक बनलेला आहे. भारताचा भौगोलिक विस्तार, प्रादेशिक विविधता, भाषा, धर्म, संस्कृतीची विविधता इत्यादींमुळे भारतात अनेक राजकीय पक्षांची निर्मिती झाल्याचे दिसून येते. भारताच्या पक्षपद्धतीचे स्वरुप बहुपक्षीय असले तरी १९८९ पर्यंत भारतात एक पक्ष प्रभुत्व पद्धती प्रचलित होती. त्यानंतर अनेक प्रादेशिक पक्ष उदयास आले. त्यामूळे भारतीय पक्षपद्धतीच्या स्वरुपात अनेक स्थित्यंतरे झाल्याचे दिसून येते. भारताच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घटकांचाही प्रभाव भारतीय राजकीय व्यवस्थेवर पडल्यामुळे स्वतःची खास वैशिष्ट्ये असलेली पक्षपद्धती भारतात विकसित झाली आहे.

## १०.५ राजकीय पक्ष म्हणजे काय?

"राजकीय पक्ष म्हणजे समान राजकीय मते व ध्यैय असणाऱ्या व्यक्तींची ऐच्छिक संघटना होय; जी घटनात्मक मार्गाने राजकीय सत्ता मिळवून शासनावर नियंत्रण आणि सत्ता प्रस्थापित करुन राष्ट्रीय हितसंबंधासाठी कार्य करतात."

भारतात राजकीय पक्ष म्हणजे 'निवडणुकीचे यंत्र' झाले आहे. राजकीय पक्षांना सत्ता मिळविणे व ती टिकवणे या दोन गोष्टीत रस असतो. त्याव्यतिरिक्त इतर गोष्टी त्यांना गौण असतात.

ग्लोबल इलेक्शन रेकॉर्ड या ग्रंथसंग्रहामध्ये असे मत व्यक्त केले आहे की, भारतात जवळजवळ सर्व राजकीय पक्षांचे निवडणूक जाहीरनामे बव्हंशी सारखेच असतात. पक्षाचे नाव व चिन्ह सोडल्यास इतर बाबतीत सर्व राजकीय पक्षांचे स्वरूप व ध्यैय सारखेच असतात.

## १०.६ भारताच्या पक्षपद्धतीची वैशिष्ट्ये (FEATURES OF Indian PARTY SYSTEM)

### १) बहुपक्षपद्धती (Multi Party System) :

स्वातंत्र्यानंतर सुरवातीच्या काळात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष सर्व प्रकारच्या गटांना आणि विचारसरणींना सामावून घेणारा पक्ष होता. नेहरूनंतर हे चित्र बदलले. आता प्रत्येक वंशिय व धार्मिक गट त्यांच्या स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन करण्यामागे दिसून येतात. भारत भाषा, धर्म, जात, परंपरा, चालीरीती, संस्कृती इत्यादींची विविधता असलेला देश आहे. या विविधतेमुळे आणि खंडप्राय देश असल्यामुळे भारतात अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात आले आहेत. उदा. कॉंग्रेस, जनता दल, भारतीय जनता पक्ष, भारतीय कम्यनिष्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष इत्यादी. सध्या एकूण सात राष्ट्रीय पक्ष आणि चाळीस प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आहेत.

### २) एकपक्ष प्रभुत्व पद्धती :

तांत्रिकदृष्ट्या आपल्याकडे बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. परंतु १९७७-७९, १९८९-९१, १९९६-९७, १९९८, १९९९, २००४ हा काळ वगळता केंद्रात कॉंग्रेस पक्षच सत्ताधारी पक्ष राहिला आहे, भारताच्या राजकीय पटावर कॉंग्रेसचे प्रभावी व प्रमुख स्थान राहिले आहे. कॉंग्रेसचे स्वातंत्र्य चळवळी बजावलेल्या असामान्य कामगिरीमुळे तिचा भारतीय

जनमानसावर जबरदस्त प्रभाव होता. बरेच राजकीय पक्ष व त्यांचे नेते हे कॉंग्रेस पक्षाचा कधीतरी एक भाग होते. राष्ट्रीय स्तरावर कॉंग्रेसला गंभीर धोका उद्भवलेला नव्हता तथापि गेल्या काही वर्षात कॉंग्रेसचा प्रभाव कमी होत आहे आणि भारतात खरीखरी बहुपक्ष पद्धती विकसित होऊ लागली आहे.

### ३) दुर्बल व असंघटित विरोधी पक्ष :

लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीसाठी प्रभावी व सामर्थ्यशाली विरोधी पक्ष आवश्यक असतो. भारतात विरोधी पक्ष दुर्बळ आहेत. विरोधी पक्षांची संख्या प्रचंड आहे त्यामुळे त्यांच्या सामर्थ्याचे विघटन होते. विरोधी पक्ष राजकीय प्रक्रियेमध्ये आणि राष्ट्र उभारणी करण्यामध्ये भूमिका करण्यात अयशस्वी झाले आहेत.

### ४) नेतृत्वावर आधारित (Leader based) :

नेतृत्वावर आधारित पक्ष भारतातील पक्ष पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पक्षाच्या नेत्याच्या नावाने त्या त्या राजकीय पक्षाला ओळखण्यात येते. भारतातील राजकीय पक्षांकडून व्यक्तिनिष्ठ राजकारणाचा अवलंब केला जातो. राजकीय पक्षांचे राजकारण कार्यक्रमाभोवती नाही तर पक्षनेत्याभोवती फिरत असते. नेत्यांमधील संघर्ष, त्यांचा अहंकार, त्यांच्यामधील बेबनाव हेच बहुतेक राजकीय पक्षांच्या स्थापनेचे कारण आहे. कोणत्याही दोन राजकीय पक्षांमध्ये तीव्र स्वरुपाचा वैचारिक संघर्ष दिसत नाही. पक्षनेतृत्वात मतभेद झाले की पक्षाचे विभाजन होते व नवीन पक्ष निर्माण होतो. बहतेक सर्व राजकीय पक्षांनी विभाजन-एकत्रीकरण-पुन्हा विभाजन-पुन्हा एकत्रीकरण या मार्गाने वाटचाल केली आहे. राजकीय पक्षाचे कार्यकर्तेही स्वतःला एखाद्या नेत्याचे अनुयायी म्हणवून घेण्यात धन्यता मानतात. A proper democratic method is absent in Indian party system.

### ५) पक्षांतर्गत संघर्ष, फाटाफूट व पक्षांतर :

विविध राजकीय पक्षांचे सदस्य अनेकदा पक्षांतर करताना आढळतात. अनेक वेळा या पक्षांतराचे कारण वैचारिक नसते. सत्ता मिळविण्याचा विचार सर्वात वरचढ ठरतो. कालचे शत्रू आजचे मित्र बनतात. निवडणूक जिंकल्यानंतर पक्षबद्दल करणे म्हणजे एकप्रकारे मतदारांचा विश्वासघात होय. पक्षांतरबंदीचे कायदे केले आहेत. पक्षांतर करणे ही भारतीय राजकारणाची एक गंभीर समस्या बनली आहे. भारतातील कोणताही पक्ष अंतर्गत संघर्ष व फाटाफूट यांपासून सुटलेला नाही.

### ६) दूरदृष्टीचा आणि शिस्तबद्ध संघटनेचा अभाव :

बहुतेक राजकीय पक्ष राज्यातील प्रश्नांचा गांभीर्याने विचार करताना आढळत नाहीत. भारतापुढील मोठ्या व गंभीर समस्यांवर या पक्षांकडे समाधानकारक उत्तरे नाहीत. दूरदृष्टीने परिस्थितीवर मात करण्याची गरज कोणालाच कोणत्याच राजकीय पक्षाला वाटत नाही. प्रत्येक प्रश्नांवर तात्पुरते उत्तर शोधण्यावर त्यांचा भर असतो. निवडणुकीकडे लक्ष ठेवून असे पर्याय शोधले जातात पण त्यांच्या दूरगामी परिणामांकडे दुर्लक्ष करतात. भारतातील बहुतेक पक्षांकडे शिस्तबद्ध संघटना नाही. पक्षांकडे शिस्तबद्ध संघटना अभावानेच दिसून येते.

**७) प्रबळ प्रादेशिक पक्ष :**

अनेक प्रांतात प्रादेशिक पक्ष स्थानीय प्रश्नांना वाचा फोडणे व प्रादेशिक अस्मिता भावनेने उदयाला आले आहेत. आपापल्या राज्यात कॉंग्रेसला पर्याय म्हणून हे पक्ष वावरतात. राष्ट्रीय पक्ष आपल्या प्रदेशाचे, राज्याचे हितसंबंध जोपासण्यास असमर्थ आहेत असा लोकभावनेतून राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष प्रबळ होतात. भारताच्या आजच्या राजकारणामध्ये प्रादेशिकता भारतीय राजकारणातील प्रभावी घटक आहे. उदा. तामिळनाडूमध्ये १९६७ साली द्रविड मुन्नेज कळघम (DMK) या प्रादेशिक पक्षाने सत्ता मिळविली होती. आंध्र प्रदेशामध्ये तेलगू देसम पक्ष (TDP), उत्तर प्रदेशामध्ये समाजवादी पक्ष, पंजाबमध्ये अकाली दल, आसाममध्ये आसाम गणतंत्र परिषद हे प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आहेत. जात, भाषा, प्रादेशिक अस्मिता यांसारख्या गोष्टींचा आधार घेऊन हे पक्ष कार्य करतात.

**८) पक्षांचा समाजविघटक गटांशी सहयोग आणि पैशाचा दुरुपयोग :**

निवडणूकीत उमेदवाराने करावयाच्या खर्चावर कायद्याने मर्यादा घातलेल्या आहेत. परंतु बहुतेक राजकीय पक्ष या मर्यादा ओलांडतात. निवडणूक प्रचारावर प्रचंड खर्च होतो. या खर्चासाठी ते विविध ठिकाणांहून आणि गुन्हेगाराकडून देणग्या स्वीकारतात. देणगीदारांच्या अर्थातच त्या पक्षांकडून काही अपेक्षा असतात. अशा देवाण-घेवाणीतून चुकीची राजकीय व्यवस्था निर्माण होते. ही भारतातील राजकीय पक्षांची आजची वास्तवता आहे.

**९) राजकीय पक्षांवर सर्वसामान्य अविश्वास (General distrust in political parties) :**

सर्वसामान्यपणे लोकांचा राजकीय पक्षांवर विश्वास नाही. राजकीय पक्ष लोकांमध्ये गट पाडतात, लोकांना विभागतात, लोकांच्या मनात चुकीच्या गोष्टी पेरतात, लोकसेवा यापेक्षा सत्ता मिळविणे याला अधिक महत्त्व देतात अशीच राजकीय पक्षाविषयी लोकांची समजूत आहे. बुद्धीवादी मध्यमवर्ग स्वतःला राजकारणा पासून आणि राजकीय पक्षामध्ये सहभागी होण्यापासून स्वतःला दूर ठेवतात, अर्थात यामुळे लोकशाहीला धोका उद्‌भवतो.

**१०) तत्त्वनिष्ठेला गौण स्थान :** भारतीय पक्षपद्धती म्हणजे नैतिक मूल्यांचा ऱ्हास आणि सत्तेचे राजकारण झाले आहे. तत्त्वनिष्ठेपेक्षा पक्षकारणाला महत्त्व देणारे राजकीय पक्ष आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष बरबटलेला, सत्तेसाठी हपापलेला दिसून येतो. देशांचे हित, योग्य विचारसरणी, नैतिक मूल्ये कोणत्याच राजकीय पक्षाच्या ठिकाणी उरली नाहीत. पक्षांचे सत्राकेंद्रित स्वरुप आहे. सर्व राजकीय पक्षांमध्ये वंशपरपरांगत राजकारण (hepeditary politics) चा समावेश झाला आहे. योग्य नेतृत्वाला चालना न देता आपआपल्या मुलांना सत्तेचीसूत्रे सोपविली जात आहे. पक्षसंघटना खाजगी संपत्ती आहे असे समजून सत्ता वापरली जात आहे.

**११) जात व धर्मावर आधारित पक्ष :**

भारतीय राजकारणात जात, धर्म, भाषा या घटकांचा प्रभाव असल्यामुळे जात व धर्मावर आधारित अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत. उदा. दलित पँथर, रिपब्लिकन पक्ष, मुस्लिम लिग, अकाली दल इत्यादी.

**१२) पक्ष पद्धतीचे लोकशाहीविरोधी स्वरूप (The Non-democratic nature of Party System) :** निवडणूका जिंकणे आणि सत्ता मिळविणे हे राजकीय पक्षांचे मुख्य कार्य आहे. या प्रक्रियेमध्ये योग्य पात्र उमेदवाराची निवड करणे, पक्षाचा जाहीरनामा तयार करणे, प्रचार इत्यादी गोष्टी समाविष्ट असतात. या सर्व गोष्टी उघडपणे आणि लोकांच्या सहभागाने व्हायला पाहिजे परंतु भारतात उमेदवाराची निवड करताना त्याच्या पात्रतेपेक्षा त्या उमेदवारामध्ये निवडणूकीत जिंकण्याची क्षमता किती आहे यावरून उमेदवार ठरविण्यात येते. पक्षातील लोकांमध्ये जबाबदारीच्या भावनेचा किती आहे यावरुन उमेदवार ठरविण्यात येते. पक्षातील लोकांमध्ये जबाबदारीच्या भावनेचा अभाव दिसून येतो. एखाद्या पक्षातील व्यक्तीला निवडणूकीसाठी उमेदवार म्हणून तिकीट मिळाले नाही की ती व्यक्ति बंडखोर बनते, बऱ्याचदा नविन पक्षाची स्थापना करते. म्हणजेच प्रत्येक राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचे निवडणूक जिंकणे आणि सत्तेवर येणे हेच मुख्य ध्येय्य असते. त्यासाठी प्रादेशिक पक्षांशी, एखाद्या जातीच्या गटाची, धर्माच्या गटाशी हातमिळवणी करण्यात येते, पदांची देवाण घेवाण होते. एकूणच लोकशाही मूल्ये पायदळी असतात.

## १०.७ भारतातील पक्षपद्धतीचा उदय व विकास

**स्वातंत्र्यापूर्वी** - भारतात १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. परंतु शासन संस्था राबविणे या उद्देशाने नाही तर पारतंत्र्यातून देशाला मुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट ठेवून निर्माण झाली होती. त्या काळातील मुस्लिम लिग व हिंदू महासभा यांना खऱ्या अर्थाने राजकीय पक्ष म्हणता येणार नाही कारण विशिष्ट जातींय हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी या संघटना स्वातंत्र्यापूर्वी अस्तित्वात आल्या होत्या.

**स्वातंत्र्यानंतर** - राजकीय पक्षांविषयी स्पष्टपणे कोणत्याही घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या नाहीत. परंतु कलम १९ प्रमाणे नागरिकांना संघटना स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्यांची परिणती म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात नवनवीन राजकीय पक्ष उदयास येत आहे. राज्यघटनेच्या ३२४ व्या कलमान्वये निवडणुकांचे संचालन, मार्गदर्शन व नियंत्रण करण्याचे कार्य निवडणूक आयोगाकडे सोपविले आहे. त्यामुळे निवडणुका लढविणाऱ्या राजकीय पक्षांना मान्यता देणे, त्यांच्यासाठी चिन्हे राखून ठेवणे इत्यादी कामे हे आयोग करते.

स्वातंत्र्यानंतर भारतात पक्षपद्धतीचा विकास विविध टप्प्यांत झाल्याचे दिसून येते.

**१) १९४७ ते १९७७ सुरुवातीचा कालखंड** - १९५० ला समाजवादी पक्ष, १९५१ ला भारतीय जनसंघ, १९५७ ला स्वतंत्र पक्ष, १९६६ ला शिवसेना इत्यादी पक्ष उदयास आले. या काळात एकपक्ष प्रभुत्व पद्धती अस्तित्वात होती. काँग्रेस अतिशय प्रभावी पक्ष होता.

**२) १९७७ ते १९८०** - जनता पक्षाची राजवट यासाठी हा कालखंड प्रसिद्ध आहे.

**३) १९८० ते १९८९** - या काळात पुन्हा काँग्रेस पक्षाचे शासन होते. ह्या काळात एकपक्ष प्रभुत्व पद्धती होती.

**४) १९८९ पुढे** - बहुपक्षपद्धती व संमिश्र आघाडी सरकार यासाठी प्रसिद्ध कालखंड आहे.

## १०.८ भारतीय राजकीय पक्षांचे वर्गीकरण

भारतातील राजकीय पक्षांचे वर्गीकरण विचार प्रणाली आणि भौगोलिक तत्त्वावर आधारित याप्रमाणे करता येईल. वैचारिकदृष्ट्या राजकीय पक्षांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

**विचारप्रणाली आधारित :**

१) **उजवे पक्ष** - उदा. भारतीय जनता पक्ष व त्यांचे मित्र पक्ष

२) **डावे पक्ष** - उदा. साम्यवादी पक्ष, समाजवादी

३) **मध्यममार्गी पक्ष** - उदा. कॉंग्रेस, जनता दल इ.

**भारतीय राजकीय पक्ष**

| क्र. | पक्ष (स्थापना) | संस्थापक | निवडणूक चिन्ह | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| १. | कॉंग्रेस* (१८८५) | ए. ओ. ह्यूम | हाताचा पंजा | सोनिया गांधी |
| २. | भारतीय जनता पक्ष* (१९५१) | श्यामप्रसाद मुखर्जी | कमळ | व्यंकय्या नायडू |
| ३. | जनता दल (यू) | शरद यादव | बाण | शरद यादव |
| ४. | साम्यवादी पक्ष (एम) * (१९२४) | एम्. एन. रॉय | विळा व गव्हाचे रोप | ए.बी. वर्धन |
| ५. | साम्यवादी पक्ष (१९६४) | डांगे | विळा, हतोडी व तारा | एच्. एस्. सुरजीत |
| ६. | बी. एस्. पी. | काशीराम | हत्ती | मायावती |
| ७. | समाजवादी पक्ष | मुलायमसिंग यादव | सायकल | मुलायमसिंग यादव |
| ८. | आर. जे. डी. (१९९७) | लालूप्रसाद यादव | कंदील | लालूप्रसाद यादव |
| ९. | शिवसेना (१९६६) | बाळासाहेब ठाकरे | धनुष्यबाण | उद्धव ठाकरे |
| १०. | अण्णाद्रमुक (१९७२) | एम्.जी. रामचंद्रन | दोन पाने | जे. जयललिता |
| ११. | द्रमुक (१९४९) | अण्णादुराई | उगवता सूर्य | एम्. करुणानिधी |
| १२. | अकाली दल (१९२५) | मास्टर तारासिंग | तराजू | प्रकाशसिंग बादल |
| १३. | तेलगू देसम (१९८२) | एन.टि. रामाराव | सायकल | चंद्राबाबू नायडू |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | नॅशनल कॉन्फरन्स (१९३४) | शेख अब्दुल्ला | नांगर | फारुक अब्दुल्ला |
| १५. | तृणमूल कॉंग्रेस (१९९७) | ममता बॅनर्जी | फूल व गवत | ममता बॅनर्जी |
| १६. | बिजू जनता दल (१९९७) | नवीन पटनाईक | शंख | नवीन पटनाईक |
| १७. | आसाम गण परिषद (१९८५) | प्रफुल मोहंता | हत्ती | ब्रिंदावन गोस्वामी |
| १८. | झारखंड मुक्ती मोर्चा | शिबू सोरेन | धनुष्यबाण | शिबू सोरेन |
| १९. | हरयाणा लोक दल (राष्ट्रीय) | देवीलाल | नगारा | ओमप्रकाश चौटाला |
| २०. | जनता दल (सेक्यूलर) | एच्.डी. देवेगौडा | ट्रॅक्टरवरील शेतकरी | एच्.डी. देवेगौडा |
| २१. | लोक जनशक्ती | रामविलास पासवान | | रामविलास पासवान |
| २२. | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (१९९९) | शरद पवार | घड्याळ | शरद पवार |

## १०.९ भारतीय राजकीय पक्ष आणि त्यांची विचारप्रणाली

### १०.९.१ विचारप्रणालीवर आधारीत पक्ष :

विचारप्रणालीमुळे राजकीय पक्षात एकता (Unity) निर्माण होते. स्वतःचे व्यक्तिगत हितसंबंध बाजूला ठेवून राजकीय पक्ष आपल्या पक्षाच्या विचारप्रणालीसाठी कार्य करतात. भारतीय राजकीय विचारसरणीमध्ये खालील प्रकार दिसून येतात.

१) पाश्चात्य उदारमतवादी विचारसरणी
२) गांधीवादी विचारसरणी
३) समाजवादी आणि साम्यवादी विचारसरणी
४) जमातवादी विचारसरणी

**१) पाश्चात्य उदारमतवादी विचार :** स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाली त्यावेळी कॉंग्रेसमध्ये उचशिक्षित श्रेष्ठीजणांचा समावेश होत होता. उदारमतवादी विचारसरणीचे मुख्य समर्थक रानडे होते. ब्रिटिश राजवटीला ते दैवी समजत असत. ब्रिटिशांनी इंग्रजी शिक्षण सुरु केल्यामुळे पाश्चात्य उदारमतवादी विचारांची ओळख भारतीयांना झाली. त्यातूनच भारतीय समाजातील सामाजिक चालीरिती ज्या भारतिय समाजाला दुर्बळ करीत होत्या त्या लोकांच्या लक्षात यायला लागल्या आणि सामाजिक सुधारणा करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. रानडेचे मत होते की जोपर्यंत समाजव्यवस्था न्याय आणि डोळसपणा यावर आधारित नाही; तोपर्यंत राजकीय हक्क आणि विशेषाधिकार उपभोगण्यास लोक पात्र होत नाही. रानडे, गोखले यांनी सामाजिक सुधारणांना प्राधान्य दिले होते. समाजात समता, न्याय, मानवता आणणे या उदारमतवादी विचारांवर भर त्यांनी दिला होता.

पुढे बाळ गंगाधर टिळक यांनी राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये निर्माण करण्यावर भर दिला होता. 'स्वराज्य' त्यांचे घोषवाक्य होते. ब्रिटिशांनी सामाजिक सुधारणांच्या नावाखाली भारतीय संस्कृती व प्रंथा मध्ये हस्तक्षेप करणे त्यांना मान्य नव्हते. स्वराज्यासाठी कोणत्याही साधनांवर भर देण्यास ते तयार होते.

**२) गांधीवादी विचारसरणी :** राष्ट्रीय काँग्रेसचे नेते गांधी झाल्यानंतर त्यांनी अहिंसात्मक साधनाने सत्याग्रहाद्वारे स्वातंत्र्य मिळविण्यावर भर दिला. त्यांनी ब्रिटिशाविरुद्ध असहकार, सविनय कायदेभंग, उपोषण इत्यादी साधनांचा उपयोग करुन स्वातंत्र्य मिळविण्यावर भर दिला. आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी ग्रामीण विकास, कुटीरोद्योग, विश्वस्तता या अहिंसात्मक साधनांवर त्यांनी भर दिला.

**३)** समाजवादी आणि साम्यवादी विचारसरणी चा प्रवेश १९३० च्या दरम्यान भारतीय राजकीय पक्षाच्या विचारसरणीत झाला. कार्ल मार्क्स यांच्या साम्यवादी विचारांच्या प्रभावातून आर्थिक न्यायाच्या स्थापनेसाठी साम्यवादी विचारसरणीवर भर दिला. काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना त्यासाठी करण्यात आली. आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी क्रांतीवर भर दिला होता.

**४)** जमातवादी विचारसरणी असलेले गट हिंदुमहासभा, मुस्लिम लिग, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ अस्तित्वात आले होते.

स्वातंत्र्यानंतर भारतात बहुपक्षपद्धती अस्तित्वात आली. याचे कारण भारतातील प्रादेशिक, सांस्कृतिक वंशिक, धार्मिक, वैचारिक विविधता होय. भारतातील बहुतेक पक्ष (लीडर ओरीयन्टेड) दिसून येतात.

### १०.९.२ भौगोलिकदृष्ट्या राजकीय पक्षांचे वर्गीकरण -

१) राष्ट्रीय पक्ष
२) प्रादेशिक पक्ष असे करतात.

**राष्ट्रीय पक्ष :** सध्या भारतात सात राष्ट्रीय पक्ष आहेत. काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, साम्यवादी पक्ष, साम्यवादी पक्ष (मार्क्सिस्ट), बहुजन समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, जनता दल. संपूर्ण देशातील वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये भाग घेणारे पक्ष म्हणजे राष्ट्रीय पक्ष होय.

एखाद्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देण्याचे काम निवडणूक आयोग करतात. पक्षांनी गेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये चार किंवा अधिक राज्यांमध्ये लोकसभा किंवा विधानसभेसाठी उमेदवार उभे करावे लागतात आणि एकूण वैध मतांपैकी कमीतकमी (६%) मते आपापल्या राज्यांत मिळवावी लागतात. कमीतकमी चार उमेदवार लोकसभेवर निवडून यावे लागतात किंवा त्यांच्या उमेदवारांनी संसदेच्या एकूण मतदार संघापैकी २% जागा मिळविलेल्या असाव्या लागतात वा अटी त्या राजकीय पक्षांनी पूर्ण केल्या तर निवडणूक आयोग त्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता देतात.

**प्रादेशिक पक्ष :** सध्या भारतात ४० प्रादेशिक पक्ष आहेत. या पक्षांची स्थापना भाषा, धर्म इत्यादींच्या विभिन्नतेमुळे होते. त्यांचे महत्त्व त्या राज्यापुरते मर्यादित असते. उदा. शिवसेना, अकाली दल, तेलगू देसम इ.

प्रादेशिक पक्षांच्या उमेदवारांना गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत लोकसभा किंवा विधानसभेत त्या राज्यात एकूण वैध मतांपैकी कमीतकमी ६% मते मिळालेली असावी आणि कमीतकमीकक दोन उमेदवार विधानसभेवर निवडून आलेले असावे किंवा त्या राज्याच्या विधानसभेतील एकूण जागापैकी ३% जागा जिंकलेल्या असाव्या.

या व्यतिरिक्त भारतात ९८० नोंदणीकृत पक्ष आहेत ज्यांना पक्ष म्हणून मान्यता हवी आहे.

**राष्ट्रीय पक्ष (National Parties) :**

सध्या भारतात ७ (सात) राष्ट्रीय पक्ष आहेत.

१) काँग्रेस पक्ष
२) भारतीय जनता पक्ष (B.J.P.)
३) जनता पक्ष
४) जनता दल (R.J.D.)
५) साम्यवादी पक्ष
६) बहुजन समाजवादी पक्ष (B.S.P.)
७) राष्ट्रवादी काँग्रेस (N.C.P.)

**१०.९.१ काँग्रेस पक्ष (भारतातील राष्ट्रीय काँग्रेस) :**

या पक्षाची स्थापना १८८५ साली ए. ओ. ह्यूम यांनी मुंबईत केली. हा पक्ष देशातील स्वातंत्र्यलढ्यात आघाडीवर होता. पुढे दर्शविलेले कालखंड वगळता केंद्रात हा पक्ष सत्ताधारी पक्ष म्हणून कार्यरत राहिला आहे. १९७७-७९, १९८९-९१, १९९६-९७, १९९८ आणि १९९९-२००४. या पक्षाचे १९६९ साली विभाजन जाले. काँग्रेस (आर) व काँग्रेस (ओ) या दोन काँग्रेस अस्तित्वात आल्या. पक्षाचे दुसरे विभाजन १९७८ मधये झाले व काँग्रेस (आय) आणि काँग्रेस ओ) असे दोन पक्ष निर्माण झाले. १९९५ साली पक्षात पुन्हा फूट पडून काँग्रेस (टी) हा आणखी एक पक्ष तयार झाला २००३ साली स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीच्या प्रश्नावरुन पक्षात फूट पडून विदर्भ काँग्रेस हा पक्ष निर्माण झाला.

**पक्ष संघटना :** काँग्रेसने आपली पक्षसंघटना राष्ट्रीय पातळीपासून गावपातळीपर्यंत बांधली आहे व विविध समित्यांतर्फे ही संघटना कार्य करते. तिची रचना खालीलप्रमाणे आहे.

अखिल भारतीय काँग्रेस समिती

↓

काँग्रेस कार्यकारिणी

↓

प्रदेश काँग्रेस समिती

↓

जिल्हा काँग्रेस समिती

↓

मंडळ काँग्रेस समिती

↓

गाव काँग्रेस समिती

या व्यतिरिक्त महिला व युवक काँग्रेस समिती आहेत.

**विचार प्रणाली :**

महात्मा गांधी व पंडित नेहरु या नेत्यांचा पक्षाच्या विचारप्रणालीवरील प्रभाव उघड आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान नेहरूच्या नेतृत्वाखाली कार्य करीत होती. त्यांच्यावर समाजवादी विचारांचा पगडा होता. केंद्रीभूत नियोजन, सार्वजनिक उद्योगाचा विस्तार, तंत्रज्ञानाचा विकास यावर भर त्यांनी दिला होता. महाराष्ट्रात पक्षाने महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांचे विचार आत्मसात केले. श्रीमती इंदिरा गांधीच्या विचारांचा प्रभाव पक्षावर जाणवतो. त्यांच्या दारिद्र्यनिर्मूलन, सामाजिक न्यायासह आर्थिक नियोजन इत्यादी कल्पनांचा समावेश पक्षाच्या कार्यक्रमात झालेला दिसतो. हा किंचित डावीकडे झुकलेला पक्ष आहे. समाजवादी विचारसरणी व समाजवादी समाजरचना हा या पक्षाच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

या पक्षाने मिश्र अर्थव्यवस्था, आर्थिक नियोजन यांची स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अंमलबजावणी केली. धर्मनिरपेक्षता हा या पक्षाच्या तत्त्वज्ञानाचा महत्त्वाचा गाभा आहे. या पक्षाने अलिप्ततावाद, आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि जागतिक शांततेचा पुरस्कार केला आहे.

पाकिस्तान विषयीचे धोरण यावरून डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांनी नेहरूंच्या कॅबिनेट मधून राजीनामा दिला होता. डॉ. बी आर. आंबेडकर यांनीही नेहरूंच्या कॅबिनेट मधून राजीनामा दिला आणि त्यांनी भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली होती. दलीतांची दीन दुबळ्यांची स्थिती सुधारणे हे या पक्षाचे ध्यैय्य होते.

काही विचारवंतांच्या म्हणण्याप्रमाणे गेल्या १५-२० वर्षात हा पक्ष किंचित उजवीकडे झुकू लागला आहे. पक्षाच्या आर्थिक विचारसरणीत मूलभूत बदल झाला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून पक्षाने १९९१ पासून आर्थिक उदारीकरण स्वीकारले व भारतीय अर्थव्यवस्थेची दारे जगासाठी खुली केली.

काँग्रेसचे वर्णन छत्रीसारखा पक्ष (Umbrella Party) असे करतात, कारण हा पक्ष समाजातील शक्य तितक्या गटांना, व्यक्तींना व हितसंबंधांना आपल्या छत्राखाली आणण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे या पक्षाचे स्वरुप अत्यंत व्यापक झाले आहे.

**पक्ष कार्यक्रम :**

पक्षाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे :

१) पंचायती राज्याची स्थापना म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण करणे.
२) भारताची एकता व अखंडता वाढीस लावणे.
३) विविध धर्मातील लोकांमध्ये सुसंवाद निर्माण करणे व धर्मनिरपेक्षतेचा प्रसार करणे.
४) रोजगार निर्माण करणे.
५) दारिद्र्य निर्मूलन करणे.
६) समाजातील दुर्बल घटकांचे व स्त्रियांचे रक्षण करणे.
७) आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजस्य वाढीस लावण्यासाठी प्रयत्न करणे.

### १०.९ २ भारतीय जनता पक्ष (B.J.P.) :

आजचा भारतीय जनता पक्ष हा हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आर.एस.एस.) यांचे पुढचे पाऊल आहे. या पक्षाचा 'हिंदुत्वा' वर विश्वास आहे. महात्मा गांधीजींच्या हत्येनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली होती. त्यावेळेस संघाच्या नेत्यांच्या मनात असे विचार आले की, संघाची राजकीय संघटना असावी. त्यावेळेपर्यंत संघ ही एक सांस्कृतिक, सामाजिक संघटना होती. म्हणून २१ ऑक्टोबर १९५१ रोजी हिंदुत्वाचा प्रभावी प्रचार करण्यासाठी जनसंघाची स्थापना झाली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी यासाठी पुढाकार घेतला.

सार्वत्रिक निवडणुकींमध्ये १९७१ पर्यंत पक्षाला मर्यादित यश मिळाले. शहरातील पांढरपेशा मध्यमवर्ग या पक्षाचा प्रमुख आधारस्तंभ आहे. पक्षाने आपली संघटना बांधण्यासाठी देशभर कार्य केले. याचा परिणाम म्हणून पक्षाला मिळणाऱ्या जागांमध्ये व मतांच्या टक्केवारीत वाढ झाली.

आणीबाणीनंतर १९७७ साली सत्तेवर आलेल्या जनता पक्षात हा पक्ष सहभागी झाला होता. १९७८ साली जनता पक्षात फूट पडली. जनसंघ श्री. मोरारजी देसाई यांच्यासोबत राहिला नंतर १९८० साली पक्षात पुन्हा एकदा फूट पडली व श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली. १९८६ साली पक्षाने उघडपणे हिदुंत्वाचा प्रसार करायला सुरुवात केली व त्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. त्याचा फायदा पक्षाला १९८९ व १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये झाला. उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश आणि राजस्थानात हा पक्ष सत्तेवर आला. बाबरी मशीद प्रकरणावरुन पक्षाला १९९३ च्या निवडणुकीत धक्का बसला.

भारतीय जनता पक्षाला इतर मित्रपक्षासह १९९६ व १९९८ मध्ये थोड्या काळाकरिता केंद्रात सत्ता मिळाली. १९९९ साली मित्रपक्षासह हा सत्ताधारी पक्ष बनला व २००४ पर्यंत केंद्रात सत्तेवर राहिला.

पक्षाच्या मध्यममार्गी नेतृत्त्वात व आक्रमक हिंदुत्ववादी नेतृत्वात मतभेद आहेत.

**विचारप्रणाली :**

पक्षाने लहान राज्यांच्या निर्मितीत पाठिंबा दिला आहे. पक्षाच्या सत्तेच्या केंद्रीकरणावर विश्वास आहे. कोणत्याही राजकीय किंवा आर्थिक प्रश्नावर आपले विशेष मत जाहीर केलेले नाही. हा उजवीकडे झुकणारा पक्ष आहे.

**पक्ष कार्यक्रम :**

१) जम्मू व काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेचे ३७० वे कलम रद्द करणे.
२) समान नागरी कायद्यासाठी जनमत तयार करणे.
३) केंद्र-राज्य संबंधांना नवीन परिमाण देणे.
४) गोहत्या बंदी
५) स्वदेशीचा प्रसार
६) रोजगाराचा हक्क हा मूलभूत हक्क ठरला पाहिजे.
७) शेतीचा विकास
८) स्त्रियांना समाज दर्जा
९) आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजस्याचा प्रसार

**१०.९ ३ जनता पक्ष :**

जनता पक्षाची स्थापना २५ मे १९७७ रोजी झाली. भारतीय लोक दल, जनसंघ, समाजवादी पक्ष व काँग्रेस (ओ) हे पक्ष एकत्र येऊन जनता पक्ष निर्माण झाला. पक्षाच्या स्थापनेत लोकनेते श्री जयप्रकाश नारायण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली केंद्रातील पहिले बिगर काँग्रेस सरकार पक्षाने १९७७ साली स्थापन केले.

**विचारप्रणाली :**

जनता पक्षाने लोकशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण, मूलभूत हक्कांचे रक्षण, न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य या गोष्टींचा पुरस्कार केला. संपत्तीचा हक्क हा मूलभूत हक्क असू नये असे पक्षाचे मत होते. ग्रामीण विकास, रोजगार निर्माण करणारे कारखाने आणि शेती या विषयांवर पक्षाचा भर होता. अंतर्गत मतभेदांमुळे पक्ष जास्त काळ सत्तेवर राहू शकला नाही. समाजवादी पक्ष जनता पक्ष म्हणून अस्तित्वात राहिला. जनसंघाचे रुपांतर भारतीय जनता पक्षात झाले.

**पक्ष कार्यक्रम :**

१) लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करुन हुकूमशाही प्रवृत्तीचा प्रत्येक ठिकाणी विरोध करणे.
२) स्थिर शासन देऊन शांततामय मार्गाने सामाजिक बदल घडवून आणणे.
३) धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार
४) अर्थव्यवस्था व प्रशासनाचे विकेंद्रीकरण
५) समाजवादी समाजरचना अस्तित्वात आणून सार्वजनिक क्षेत्राला महत्त्व देणे.
६) अलिप्ततावाद, आंतरराष्ट्रीय मैत्री व स्वयंपूर्णतेतून राष्ट्राचे सामर्थ्य वाढविणे.
७) घटक राज्यांना जास्त सत्ता देणे.

**१०.९ ४ जनता दल (R.J.D.) :**

जनता दलाची स्थापना १९८९ साली झाली व जनता पक्ष त्यात विलीन झाला. १९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जनता दलाच्या नेतृत्वाखाली केंद्रात आघाडीचे शासन झाले. या शासनाला भारतीय जनता पक्ष व डाव्या पक्षांनी बाहेरुन पाठिंबा दिला होता. बोफोर्स तोफांच्या खरेदीदरम्यान झालेल्या कथित भ्रष्टाचारामुळे या पक्षाला निवडणुकीत फायदा झाला व पक्ष सत्तेवर आला. १९९१ साली पक्षात फूट पडली आणि समाजवादी जनता दल अस्तित्वात आले. १९९४ साली पक्षात पुन्हा फूट पडली.

**विचारप्रणाली :**

हा मध्यममार्गी पक्ष आहे. त्याचा लोकशाही समाजवादावर व धर्मनिरपेक्षतेवर विश्वास आहे. ग्रामीण भागाचा व शेतीचा विकास, अधिक रोजगार निर्मिती, रोजगाराचा हक्क, गरिबी निर्मूलन, विकासातील असमतोल दूर करणे, स्त्रियांचा विकास, प्रसारमाध्यमांना स्वातंत्र्य आणि मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी यांची या पक्षाला आवश्यकता वाटते.

**पक्ष कार्यक्रम :**

१) इतर मागासवर्गीयांना शिक्षणात व नोकरीत २७% आरक्षण तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना ५-१०% आरक्षण देणे.
२) रामजन्मभूमीचा प्रश्न न्यायालयीन मार्गाने सोडविणे.
३) शेतीमालाला किमान भाव देणे व शेतमजुरांचे शोषण थांबविणे.
४) दहा वर्षात बेरोजगारीचे निर्मूलन
५) केंद्र व राज्यांच्या संबंधांचे पुनरावलोकन
६) अमेरिका, सोविएत युनियन व आखाती देशांशी मैत्री

**१०.९ ५ साम्यवादी पक्ष :**

काँग्रेसनंतर साम्यवादी पक्ष भारतातील सर्वात जुना पक्ष आहे. त्याची स्थापना १९२४ साली झाली. १९४२ च्या छोडो भारत आंदोलनास त्यांचा विरोध होता.

स्वातंत्र्यानंतर सुरुवातीला निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता हस्तगत करण्यावर त्यांचा विश्वास नव्हता. परंतु कालांतराने साम्यवादी पक्ष निवडणूकीत सहभागी झाला. चिनी आक्रमणानंतर १९६४ साली पक्षात फूट पडून साम्यवादी पक्ष व मार्क्सवादी साम्यवादी पक्ष असे दोन पक्ष अस्तित्वात आले. १९६७ साली मार्क्सवादी साम्यवादी पक्ष फुटून साम्यवादी पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी) निर्माण झाला. मार्क्सवादी-लेनिनवादी पक्षाला नक्षलवादी असेही म्हटले जाते. या पक्षाचा प. बंगालमधील नक्षलबारी जिल्ह्यात बालेकिल्ला आहे. या पक्षाने जमीनदारांविरुद्ध हिंसक आंदोलन सुरु केले. केरळ, प.बंगाल व त्रिपुरामध्ये साम्यवादी पक्षाचे स्थान महत्त्वाचे आहे. भारतातील कामगार संघटना बांधण्यामागे या पक्षाचे मोठे योगदान आहे.

**विचारप्रणाली :**

साम्यवादाच्या मूलतत्त्वांवर या पक्षाचा विश्वास आहे. भारतात त्यांनी निवडणूक सत्ता मिळविण्याचे साधन आहे या गोष्टीचा स्वीकार केला. वेठबिगारी संपुष्टात येणे, वेतनवाढ, स्त्रियांना समान दर्जा, अल्पसंख्यांकांना संरक्षण, स्वदेशी गुंतवणूकीचे राष्ट्रीयीकरण आवश्यक आहे यावर त्या पक्षाच्या विचारप्रणालीमध्ये भर आहे, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जमीनदारांच्या जमिनी घेऊन त्यांचे वाटप भूमीहिनांमध्ये करायला हवे. वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जावे.

**पक्ष कार्यक्रम :**

१) सत्तेचे विकेंद्रीकरण करुन राज्यांना सत्ता दिली जावी.
२) नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यात यावे.
३) अमेरिकेच्या आर्थिक दबावाला विरोध
४) उद्योगांचे राष्ट्रीयीकरण
५) कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग असावा
६) जमीन सुधारणा कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी
७) स्त्रिया व मागासवर्गीयांवरील अन्याय दूर करणे.

### १०.९ ६ बहुजन समाजवादी पक्ष (बसप) (B.S.P.):

बहुजन समाजाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी या पक्षाची स्थापना झाली. श्री. काशीराम यांनी या पक्षाची स्थापना केली. भारतीय जनता पक्षाच्या सहकार्याने या पक्षाने उत्तर प्रदेशात सत्ता मिळविली होती. आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत असे श्री. काशीराम यांचा दावा आहे. या पक्षाला कोणतीही विशिष्ट विचारप्रणाली नाही किंवा विशेष पक्ष कार्यक्रम नाही. हा पक्ष ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्यांच्या विरोधात आहे. त्यांच्या मताप्रमाणे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सत्ता हे महत्त्वाचे साधन आहे.

### १०.९ ७ राष्ट्रवादी कॉंग्रेस (N.C.P.) :

जेष्ठ कॉंग्रेस नेते श्री शरद पवार यांनी श्री. पी. ए. संगमा यांच्याबरोबर १९९९ साली या पक्षाची स्थापना केली. श्रीमती सोनिया गांधी यांच्या पंतप्रधान होण्याच्या मुद्यावरुन या पक्षाची स्थापना झाली. पश्चिम महाराष्ट्रात या पक्षाचा मोठा प्रभाव आहे.

काळाच्या ओघात हा पक्ष मराठा-कुणबी युतीचा पक्ष बनला. २००४ मध्ये पक्षात फूट पडली. श्री. संगमा यांनी पक्ष सोडला व ते तृणमूल कॉंग्रेस पक्षात सहभागी झाले.

२००४ च्या निवडणूकीत पक्षाने आपली महाराष्ट्रातील परिस्थिती बळकट केली व कॉंग्रेस बरोबर सत्ताधारी पक्ष बनला.

## १०.१० सारांश

वरील सातही राष्ट्रीय पक्षांची विचारप्रणाली अभ्यासल्यानंतर प्रत्येक पक्षाची विचारसरणी लक्षात येते. स्वातंत्र्यानंतर ते १९६० पर्यंत राजकीय पक्षांमध्ये जी विचारसरणीची स्पष्टता दिसून येत होती ती नंतर दिसून येत नाही. राजकीय पक्षपद्धती सुदृढ असेल तरच प्रातिनिधीक लोकशाही जीवंत राहू शकते.

## १०.११ प्रश्न

१) राजकीय पक्षाचा अर्थ, महत्त्व आणि प्रकार सांगा.
२) भारतीय राजकीय पक्षपद्धतीची वैशिष्ट्ये विश्लेषण करा.
३) भारतीय राष्ट्रीय पक्षाची विचारसरणी स्पष्ट करा.
४) विचारप्रणालीवर आधारीत भारतीय राजकीय पक्षाचे वर्गीकरण करा.

❖❖❖❖

# ११

# प्रादेशिक पक्षांचा उदय आणि आघाडीचे राजकारण

**घटक रचना :**

११.० उद्दीष्ट
११.१ प्रस्तावना
११.२ प्रादेशिक पक्षाच्या उदयाची कारणे
११.३ प्रादेशिक पक्षांची रचना आणि विचारप्रणाली
११.४ आघाडीचे राजकारण
११.५ सारांश
११.६ प्रश्न

## ११.० उद्दीष्ट :

१) प्रादेशिकता ही संकल्पना समजून घेणे आणि प्रादेशिक पक्षांच्या उदयास कारणीभुत घटकांचा अभ्यास करणे.
२) निवडणूका प्रादेशिक पक्षांची रचना आणि वैचारिक बैठक समजून घेणे.
३) बहुपक्ष असलेल्या भारतीय लोकशाहीतील आघाडीच्या राजकारणाचा अभ्यास करणे.

## ११.१ प्रस्तावना :

प्रादेशिकता आणि प्रादेशिक पक्षांचा उदय याकडे नकारात्मक आणि सकारात्मक दोन्ही दृष्टीने बघण्यात येते. प्रादेशिकता व प्रादेशिक पक्ष यामुळे विविध प्रदेशांत, राज्याराज्यांमध्ये वैमनस्य निर्माण होते, अलगतेची भावना विकसित होते, राष्ट्रीय एकतेला तडा जाऊ शकतो, वांशिक संघर्ष निर्माण होतात. उदा. आसाम, जम्मू काश्मीर, पूर्वेकडील राज्य इत्यादी.

काही विचारवंत सकारात्मक दृष्टीकोनातून प्रादेशिकता याकडे बघतात. त्यांच्यामते विकेंद्रीकरण आणि सुदृढ संघराज्य व्यवस्थेचे प्रतिक म्हणजे प्रादेशिकता होय.

भारतासारख्या लोकसंख्या, भूप्रदेश आणि वंशिक विविधता असलेल्या खंडप्राय देशामध्ये केंद्रीकरण पद्धतीने शासकीय व प्रशासकीय व्यवस्था आणल्या जाऊ शकत नव्हती.

ब्रिटिशांची सत्ता भारतात होती त्यावेळी त्यांनी प्रशासकीय पोलादी चौकटीच्या मदतीने देशामध्ये स्थिरता राखण्याचे आणि स्वातंत्र्य चळवळी दडपण्याचे काम केले होते. स्वतंत्र भारतापुढे अनेक प्राधान्य देणाऱ्या गोष्टी आणि आव्हाने होती. ज्या व्यवस्थेमध्ये लोक स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतील अशी लोकशाही व्यवस्था आणणे याला प्राधान्य होते. घटनेप्रमाणे सर्व जाती, धर्म, वंश, आणि भाषा असलेल्या लोकांना त्यांच्या त्यांच्या धर्म, जाती, भाषेप्रमाणे जीवनमार्ग ठरविण्याचा हक्क आहे. भारतात प्रादेशिकता विकसित झाली आहे त्याची अनेक कारणे आहेत.

## ११.२ प्रादेशिक राजकीय पक्षाच्या उदयाची कारणे :

भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचा वाढता प्रभाव हे भारतीय पक्षपद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रादेशिक पक्ष म्हणजे विशिष्ठ घटक-राज्यांपुरते आणि मर्यादित कार्यक्षेत्र असलेले पक्ष होय. राष्ट्रीय पक्ष संपूर्ण देशांमध्ये कार्य करतात. त्यांच्या कार्यक्षेत्राला प्रादेशिक मर्यादा नसतात. याउलट प्रादेशिक पक्षांचे कार्यक्षेत्र सीमित असते; त्या त्या घटकराज्यापुरते मर्यादीत असते.

प्रादेशिक पक्षांच्या उदयाची अनेक कारणे दिसून येतात.

### १) राष्ट्रीयतेची भावना आणि एकतेच्या भावनेचा हळुहळु ऱ्हास :

ब्रिटिश राजवटीमध्ये जात, धर्म, वंश, प्रादेशिकता या गोष्टींना लोकांनी महत्त्व न देता, संपूर्ण देशातील लोक स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्य लढ्यात एक झाले होते. देश, राष्ट्र प्रमुख स्थानी होते. स्वातंत्र्यानंतर हळुहळु राष्ट्रासाठी बलीदान देणाऱ्या नेतृत्वाचा ऱ्हास होत आहे. प्रत्येक प्रदेशाला, गटाला आपल्यावर अन्याय होत आहे असे वाटते त्यातूनच प्रादेशिक पक्षाच्या उदयास चालना मिळाली आहे.

### २) घटनात्मक आदर्शांकडे दूर्लक्ष :

भारतीय राज्याची रचना आणि चौकट संघराज्यात्मक आहे; पण भारतीय संघराज्याचा आत्मा एककेंद्री आहे हे भारतीय संघराज्याच्या वैशिष्ट्यांवरुन स्पष्ट होते. घटनेतील तरतुदी ज्या राज्याचा एककेंद्री आत्मा आहे हे दाखविणाऱ्या आहेत त्या तरतूदींचा केंद्रशासन अनेकदा दुरूपयोग करीत असल्याचे दिसून येते. उदा. कलम ३५६ चा दुरुपयोग. अनेक घटकराज्यांचे शासन उलथवून पाडण्यासाठी या कलमाचा उपयोग करण्यात आला होता. वास्तविक भारतीय संघराज्या मध्ये (cooperative federaloism) ‘सहकार्य असलेले संघराज्य’ अभिप्रेत आहे. परंतु दिवसेंदिवस प्रादेशिकतेला चालना देणारे राजकारण होत आहे असे दिसून येते.

### ३) दुहेरी संस्कृती :

राजकीय व्यवस्थेच्या विश्लेषकांच्या मते भारतीय राजकीय व्यवस्थेच्या राजकारणामध्ये दुहेरी संस्कृती दिसून येते. एक म्हणजे खालील स्तरांवर असलेले mass culture होय. खेडी, जिल्हा येथील स्थानीय नेते स्थानीय प्रश्नांवर भर देतात. जात व प्रादेशिक संस्कृतीचा त्याच्या सर्व राजकीय कृतींवर ठसा असतो. gross root level वर प्रादेशिक राजकीय गोष्टींना महत्त्व असते. हे स्थानीय राजकारण, ग्रामीण प्रशासन आणि शहरी राजकारणावर व राज्याच्या राज्यकारभारावर प्रभाव पाडते. दुसरे म्हणजे दिल्लीवरुन चालणारे elite culture

होय, त्यांचे राष्ट्रीय राज्यकारणाचे विषय असतात. वरच्या स्तरावरील नियोजनकर्त्ये, प्रशासक, राष्ट्रीय पुढारी ही श्रेष्ठींची संस्कृती ठरवितात. त्यांच्यादृष्टीने mass culture आणि स्थानिय विषयांना महत्त्व देणे संकुचितपणा असतो. देशातील अशा दोन संस्कृतीमुळे प्रादेशिकतेला आणि प्रादेशिक पक्षांच्या उदयास चालना मिळते.

**४) आर्थिक विकासाचा असमतोल :**

स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासाचे केंद्रीय नियोजन आणि धोरणे आखण्यात आली आहे. त्यामध्ये सर्व प्रदेशांचा समतोल आर्थिक विकास याकडे दुर्लक्ष झाले आहे असे काही अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. अनेक प्रदेश अजुनही मागासलेले आहे. उदा. आंध्रप्रदेशातील तेलगंणा भाग हैद्राबाद शहरासारखा तांत्रीक विकासाच्या बाबतीत विकसित नाही. महाराष्ट्रात मुंबई सारखी प्रगती इतर भागांची (विदर्भाची) झाली नाही. म्हणजेच आर्थिक विकासाच्या बाबतीत असमतोल दिसून येतो. अनेक राज्य जे आर्थिक दृष्टीने संपन्न आहे त्यांना इतरांपासून स्वतःच्या राज्याची संपन्नता जपायची आहे. अनेक राज्यांमध्ये योग्य इन्फ्रास्ट्रक्चर नसल्यामुळे ती राज्य केंद्रीय फंडाचा उपयोग करु शकत नाही. अनेक राज्यांमध्ये असे दिसून येते की शेजारील राज्य प्रगत असेल तर त्या राज्यातील लोक प्रगत राज्यामध्ये जातात. उदा. मुंबईत इतर राज्यांमधून येणारे लोक. त्यातून त्या त्या राज्यांमध्ये नविन प्रश्न उदयाला येतात. उदा. स्थानीय लोकांनाच नोकरी, “Sons of Soil” शहरातील गर्दी, झोपडपट्ट्याची वाढ इत्यादी.

**५) भाषेच्या आधारावर राज्यांचे विभाजन :**

भाषेच्या आधारावर राज्यांचे विभाजन झाले आणि त्या त्या प्रदेशातील भाषेला महत्त्व प्राप्त झाले. कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यांमध्ये बेळगाव वरुन वाद सुरु झाले.

**६) नविन आर्थिक व्यवस्था :**

नविन आर्थिक धोरणामुळे परकीय गुंतवणूकदार भारतात यायला लागले. अनेक राज्याचे मंत्री परदेशी जाऊन तेथील गुंतवणूकदारांना आपआपल्या प्रदेशाच्या विकासासाठी गुंतवणूक करण्यास त्यांना प्रवृत्त करीत आहेत. परदेशात ज्या राज्याचे लोक शिक्षणासाठी, नोकरीसाठी गेलेले त्यांनाही भावनिक आव्हान करण्यात येते, अर्थात यामुळे प्रादेशिकतेला चालना मिळते.

**७) विशिष्ट चळवळीतून उदय :**

बहुतेक प्रादेशिक पक्षांमागे प्रादेशिक चळवळ असल्याचे दिसून येते. उदा. हिंदी विरोधी चळवळीतून द्रमुक लोकप्रिय झाला. बेकायदेशीर घुसखोरांच्या विरोधी चळवळीमुळे आसाममध्ये आसाम गणतंत्र परिषद पक्ष लोकप्रिय झाला. महाराष्ट्रात मराठी लोकांच्या हितसंबंधांचे संरक्षण या मुद्यावर शिवसेना, मनसे पक्ष लोकप्रिय झालेत. सत्तेत आल्यानंतर हे पक्ष राजकीय व्यवस्थेचा भाग होतात. अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसला विरोध करीत सत्तेवर आले.

**८) प्रादेशिकता, वांशिकता, धर्म व जातीच्या आधारावर निर्मिती :**

भारतात भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर प्रत्येक राज्यामध्ये भाषिक आणि प्रादेशिक अस्मिता जोपासली गेली. केंद्रामध्ये प्रांतांच्या नेत्यांना वजन प्राप्त झाले. त्यातच प्रांतीय नेत्यांनी सत्तेचे राजकारण मध्यवर्ती करुन प्रादेशिक पक्षांच्या विकासाला चालना दिली. उदा. काही

राज्यांत आर्थिक विकासासाठी वेगळ्या राज्याची मागणी होत आहे. उदा. स्वतंत्र विदर्भाची मागणी. काही पक्ष वांशिकता या घटकाला महत्त्व देऊन उदयास आले आहेत. उदा. झारखंड मुक्ती मोर्चा पक्ष, गोरखा लॅन्डची मागणी करणारा पक्ष. भाषा प्रश्नावरुन द्रमुक पक्षाची स्थापना झाली, प्रादेशिकता हे त्याचे मुख्य कारण आहे. प्रादेशिकता, वंश, धर्म, जात, भाषा हे सर्व घटक जनतेच्या भावनेशी निगडित आहेत. जनता भावनात्मक आव्हानांना चटकन प्रतिसाद देते याचा फायदा घेऊन प्रादेशिक पक्षांच्या उदयाला खतपाणी देण्यात आले.

**९) आघाड्यांचे राजकारण आणि प्रादेशिक पक्ष :**

एक मोठा राष्ट्रीय पक्ष आणि त्याभोवती गोळा झालेले छोटे मोठे प्रादेशिक पक्ष अशी आघाडी करुन सत्तेवर येण्याचे प्रमाण भारतीय राजकारणात वाढले आहे अर्थात भारतातील बहुपक्षीय राजकारणाचा हा परिणाम आहे.

**१०) प्रादेशिक समस्या :**

प्रादेशिक पक्षांचे दिवसेंदिवस महत्त्व वाढत आहे. विशिष्ट प्रदेशाच्या व राज्याच्या गरजांची, मागण्यांची, समस्यांची पूर्ती राष्ट्रीय पक्ष करु शकत नाहीत त्याऐवजी प्रादेशिक पक्ष या मागण्यांना न्याय देऊ शकतील असे लोकांना वाटते. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे केंद्रात कोणत्याही एका राजकीय पक्षाला बहुमत मिळत नसल्याने प्रादेशिक पक्षांचे स्थान महत्त्वाचे ठरते.

अर्थात काही वेळा प्रादेशिक पक्ष धोकादायक ठरु शकतात कारण प्रादेशिक पक्षांना राष्ट्रीय दृष्टिकोन नसतो. ते अतिरेकी व टोकाची भूमिका घेतात. भारताच्या एकात्मतेला बाधा आणू शकतात. राज्यात अस्थैर्य निर्माण करु शकतात. प्रादेशिक पक्षांनी आपल्या प्रादेशिक हितसंबंधांचे रक्षण व राष्ट्रीय एकता यात समतोल साधला पाहिजे. जलद आर्थिक विकासाच्या नावाखाली केंद्रशासन स्थानीय प्रश्नांकडे बरेचदा दूर्लक्ष करतात. अशा या दोन स्तरावरील राजकीय संस्कृतीच्या संघर्षातून प्रादेशिकतेवादाचा आणि प्रादेशिक पक्षांचा उदय होतो.

## ११.३ प्रादेशिक राजकीय पक्ष रचना आणि विचारप्रणाली :

**प्रादेशिक पक्षाचा अर्थ :**

प्रादेशिक पक्ष म्हणजे विशिष्ट घटकराज्यापुरते कार्यक्षेत्र असलेले राजकीय पक्ष होय.

Regional party is one which opepates in a particular region. प्रादेशिक पक्षाचे हितसंबंध संकुचित, लोकांच्या भावनांना आव्हान करणारे, स्वभाषेला अति महत्त्व देणारे असतात. विशिष्ट आवश्यकता पूर्ण केल्यानंतर एखाद्या पक्षाला राजकीय पक्षाचा दर्जा निवडणूक आयोग देत असते. विधानसभा किंवा लोकसभेच्या निवडणूकीमध्ये त्या पक्षाला कमीतकमी ६ टक्के मते मिळालेली असावी. ज्या पक्षांना राजकीय पक्षाचा दर्जा मिळत नाही ते दबाव गटासारखे कार्य करतात.

प्रादेशिक पक्षाच्या निर्मितीमध्ये दोन प्रकार दिसून येतात.

१) जे पक्ष भाषा, वंश, सामाजिक आधार, जात या आधारावर निर्माण झालेले असतात. ज्यांना विशिष्ट विचारसरणी असते. उदा. अकाली दल, तेलगु देसम पार्टी, शिवसेना, आसाम गणतंत्र परिषद इत्यादी पक्ष पहिल्या प्रकारच्या प्रादेशिक पक्षांमध्ये येतात.

२) काँग्रेस या राष्ट्रीय पक्षापासून वेगळे झालेले प्रादेशिक पक्ष दुसऱ्या प्रकारामध्ये येतात. उदा. बंगाल काँग्रेस, तृणमुल काँग्रेस, केरळ काँग्रेस, भारतीय क्रांती दल, तेलंगना प्रजा समिती इत्यादी. हे पक्ष विशिष्ट वेळी विशिष्ट हेतुने उदयास आले आहेत.

बहुतेक राजकीय प्रादेशिक पक्ष नेतृत्वावर आधारीत आहेत.
राज्याराज्यामधील प्रादेशिक राजकीय पक्ष खालीलप्रमाणे आहेत.

| क्र. | राज्य | पक्ष |
|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | तेलगू देसम |
| २. | आसाम | आसाम गण परिषद |
| ३. | गोवा | महाराष्ट्रवादी गोमांतक पक्ष |
| ४. | गुजरात | महा गुजरात जनता पक्ष |
| ५. | हरयाणा | विशाल हरयाणा विकास मंच |
| ६. | जम्मू आणि काश्मिर | नॅशनल कॉन्फरन्स |
| ७. | झारखंड | झारखंड मुक्ती मोर्चा |
| ८. | महाराष्ट्र | शिवसेना, रिपब्लिकन पक्ष, शेतकरी कामकरी पक्ष, मनसे |
| ९. | मणिपूर | मणिपूर पिपल्स पार्टी |
| १०. | मिझोराम | मिझो नॅशनल फ्रंट |
| ११. | नागालँड | नागालँड पिपल्स पार्टी |
| १२. | पंजाब | अकाली दल |
| १३. | सिक्कीम | सिक्कीम संग्राम परिषद |
| १४. | तामिळनाडू | द्रविड मुन्नेत्र कळघम, अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम, तामिळ मनिल काँग्रेस |
| १५. | पश्चिम बंगाल | फॉर्वर्ड ब्लॉक, रिव्होल्यूशनरी सोशॅलिस्ट पार्टी |
| १६. | बिहार | राष्ट्रीय जनता दल, समता पार्टी |
| १७. | केरळ | केरळ काँग्रेस, मुस्लिम लिग |
| १८. | कर्नाटक | कर्नाटक रयत संघ |
| १९. | ओरीसा | बिजू जनता दल |

यापैकी काही महत्त्वाच्या प्रादेशिक पक्षांचा अभ्यास आपण करणार आहोत.

### १३.२.२ अकाली दल :

१९२५ च्या शीख गुरुद्वारा कायद्यामुळे शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती स्थापन झाली. शीखांच्या धार्मिक स्थळांचे-गुरुद्वारांचे व्यवस्थापन करणे हे या समितीचे काम आहे. या समितीच्या राजकीय शाखेला अकाली दल म्हणतात.

हा पक्ष केवळ शीख धर्मियांसाठी खुला आहे. केवळ शीख धर्मातील लोकांनाच हा पक्ष सामावून घेतो. सर्व प्रादेशिक पक्षांपैकी कदाचित सर्वात जास्त वाद निर्माण करणारा पक्ष असू शकेल.

ब्रिटीशांच्या काळात त्यांच्या राजकीय नीतीचा परिणाम म्हणून शीखांना धार्मिक प्रतिनिधित्व मिळाले. त्यामुळे शीख राजकारणात सक्रिय झाले. त्या काळात हिंदू व मुस्लिम जमीनदारांचा युनियनिस्ट पक्ष प्रभावशाली होता. त्यांना पंजाबचे विभाजन नको होते. भारत व पाकिस्तान दरम्यान पंजाबचे तटस्थ राज्य असावे अशी त्यांची मागणी होती. ही मागणी अस्विकृत झाली.

१९६६ साली पंजाबचे विभाजन शीख बहुसंख्य पंजाब, हिंदू बहुसंख्यांक हरयाणा व केंद्रशासित चंदीगड मध्ये झाले. अकाली दलाला १९६७ व १९७७ मध्ये पंजाबात सत्ता मिळाली. या दरम्यान पंजाबमधील अतिरेकी कारवायांमध्ये वाढ झाल्यामुळे राष्ट्रपती राजवट आणावी लागली. सुवर्ण मंदिरातील शीख अतिरेक्यांच्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी भारतीय लष्कर सुवर्ण मंदिरात १९८४ साली शिरले. या 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' मुळे शीख धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या. त्याच्या परिणामस्वरूप श्रीमती गांधींची हत्या त्यांच्या सुरक्षा रक्षकांनी केली.

त्यानंतर श्री.राजीव गांधी व संत लोंगोवाल यांनी पंजाब करार केला. या करारानुसार पंजाबमध्ये निवडणूक घेतली व अकाली दल सत्तेवर आले. पण परिस्थिती बिघडतच होती. या दरम्यान अकाली दलाचे विभाजन होऊन बर्नाला गट व बादल गट वेगळे झाले. १९९१ च्या निवडणूकीत काँग्रेसला सत्ता मिळाली. श्री.बिआंत सिंग मुख्यमंत्री झाले. त्यानंतर पंजाबमधील परिस्थिती हळूहळू सुधारू लागली.

पक्षाचा 'शीख राष्ट्रावर' विश्वास आहे. पक्षातील जहाल गटाला भारतापासून वेगळे होऊन स्वतंत्र राज्य स्थापन करायचे आहे. जहाल गटांनी मवाळांवर ताबा मिळविला आहे.

**विचार प्रणाली व पक्ष कार्यक्रम :**

पक्षातील अतिरेक्यांना 'खलिस्तानाचे' स्वतंत्र राज्य हवे आहे तर मध्यममार्गीना जास्त स्वायतत्ता हवी आहे. गुरुमुखीला पंजाबच्या अधिकृत भाषेचा दर्जा देण्यात यावा आणि चंदीगडसह हरयाणा व राजस्थानमधील शीख बहुसंख्य भाग पंजाबला जोडण्यात यावा अशी या पक्षाची मागणी आहे.

### १३.२.३ द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) :

तामिळींच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांमुळे व आकांक्षांमुळे द्रमुकचा जन्म झाला. 'द्रविडी अस्मिता" जपण्यासाठी पक्ष अस्तित्त्वात आला.

१९४९ साली श्री. अण्णादुराई त्यांनी द्रमुकची स्थापना केली. द्रमुकने तामिळी अस्मितेचा प्रसार करुन कनिष्ठ मध्यमवर्ग, तरुण व मागास जातींचा पाठिंबा मिळविला. १९६७ साली तत्कालीन मद्रास राज्यातील द्रमुक पक्ष सत्ताधारी पक्ष बनला व लोकसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष बनला. १९७१ साली त्यांनी राज्याचे मद्रास हे नाव बदलून तामिळनाडू हे नाव ठेवले.

श्री.अण्णादुराईंचा १९६९ साली मृत्यू झाला. त्यानंतर श्री.करुणानिधी व श्री.एम.जी.रामचंद्रन यांच्यातील सत्तास्पर्धा तीव्र झाली. १९७२ साली पक्षात फूट पडून श्री.एम.जी.रामचंद्रन यांनी ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघमची (अण्णाद्रमुक) स्थापना केली. १९८८ साली श्री.रामचंद्रन यांच्या मृत्यूनंतर द्रमुक सत्ताधारी पक्ष बनला. १९९१ साली अण्णाद्रमुक सत्तेवर आला तर १९९६ साली द्रमुक सत्तेवर आला.

**विचार प्रणाली :**

दोन्ही पक्षांना तामिळी अस्मिता जागृत ठेवायची आहे. दोन्ही पक्ष ब्राह्मणविरोधी आहेत. त्यांना स्वतंत्र, स्वायत्त तामिळनाडू हवा आहे.

तामिळींवरील हिंदीच्या सक्तीला त्यांचा विरोध आहे. त्यांना लोकांना चांगले जीवनमान आणि रोजगार द्यायचा आहे. हा पक्ष डाव्या विचारांकडे झुकणारा आहे.

**११.३.३ तेलगू देसम पक्ष :**

१९७० च्या दशकात काँग्रेसच्या नेत्यांच्या आंध्र प्रदेशातील धोरणांमुळे व सतत हस्तक्षेप करण्याच्या पद्धतीमुळे तेलगू देसमचा जन्म झाला. वज्याचे मुख्यमंत्री सतत बदलणे, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.टी.अंजय्या यांना अपमानास्पद वागणूक देणे अशा कारणांमुळे आंध्र प्रदेशातील लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. श्री.एन.टी.रामाराव – एक लोकप्रिय नट - यांनी लोकांना आपला आत्मसन्मान जपण्याचे भावनिक आवाहन केले. तेलगू भाषकांच्या आत्मसन्मान जपण्याच्या या चळवळीचे रुपांतर तेलगू देसम पक्षाच्या स्थापनेत झाले. न पक्ष १९८२ साली स्थापन झाला.

हा पक्ष १९८३ साली आंध्र प्रदेशातील सत्ताधारी पक्ष झाला. तेव्हापासनू १९८९ व २००४ मधील निवडणूका वगळता हा पक्ष सत्तेवर राहिला आहे.

१९८४ च्या लोकसभा निवडणूकीत तेलगू देसम हा लोकसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष होता.

**विचार प्रणाली व पक्ष कार्यक्रम :**

श्री.एन.टी.रामाराव यांनी तेलगूंच्या आत्म-सन्मानाच्या मुद्यावर भर दिला आणि प्रादेशिक प्रश्न सोडविण्याकडे विशेष लक्ष पुरविले जाईल असे सांगितले. काम्मांकडे (आंध्र प्रदेशातील एक जात) होत असलेल्या दुर्लक्षाकडे लक्ष वेधले. लोकांना २ रू. प्रति किलो तांदूळ देण्यासारख्या योजना त्यांनी आखल्या. थ्यामुळे त्यांना भरपूर लोकप्रियता लाभली. अर्थातच त्याचा मोठा बोजा राज्यशासनाच्या तिजोरीवर पडून राज्यशासन जवळजवळ कर्जबाजारी झाले.

थ्यांच्यानंतर मुख्यमंत्रीपदावर आलेल्या श्री.चंद्राबाबू नायडू यांनी राज्याचा विकास घडवून आणण्यावर भर दिला. आधुनिक काळाला अनुसरून माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला विशेष सवलती उपलब्ध करून दिल्या. उस्त्रोजकांना राज्यात उस्त्रोग सुरू करायला बोलावून त्यांना आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा पुरविल्या. थ्यामुळे हैद्राबादचा कायापालट झाला. परंतु या प्रक्रियेत शेतीकडे दुर्लक्ष झाले व त्यांना आपली सत्ता गमवावी लागली.

### ११.३.४ शिवसेना :

श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रयत्नातून १९६६ साली शिवसेनेची स्थापना झाली. हिंदुत्वाचा प्रचार करणारी ही एक आक्रमक चळवळ आहे. महाराष्ट्रातील 'भूमिपुत्रांचे" हक्क जपणारी ही संघटना आहे.

सुरूवातीच्या काळात शिवसेनेचे स्वरुप बिगर-राजकीय संघटना असे होते. त्यावेळी ही संघटना निवडणूकीच्या राजकारणापासून दूर होती. ही संघटना मराठी लोकांचे हितसंबंध जोपासणारी संघटना होती. भूमिपूत्रांना नोकरीत ८०% आरक्षण असावे, अशी त्यांची मागणी होती.

१९८५ सालापासून ही संघटना प्रादेशिक राजकीय पक्ष या स्वरूपात कार्यरत झाली. मुंबई व ठाणे महानगरपालिकांवर पक्षाला वर्चस्व स्थापन करता आले. पक्षाने आपली संघटना ग्रामीण भागात बांधली. १९९१ साली श्री.छगन भुजबळ यांच्या नेतृत्त्वाखालील एक गट काँग्रेस पक्षात सामील झाला. १९९५ मध्ये भारतीय जनता पक्षाबरोबर हा पक्ष सत्तेवर आला. श्री.राज ठाकरे २००५ साली पक्षातून बाहेर पडले व त्यांनी आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केला.

मुंबईतील मराठी माणसाचे हितसंबंध जपणाऱ्या पक्षापासून वाढत जाऊन शिवसेना राष्ट्रीय राजकारणातील खेळाडू बनली आहे. भाजप बरोबरच्या युतीतून शिवसेना राष्ट्रीय क्षितिजावर उगवली. शिवसेनेच्या दलितांबद्दलच्या भूमिकेत लक्षणीय बदल झाला आहे. २००४ पासून 'शिवशक्ती" व 'भिमशक्ती" एकत्र येण्यावर भर दिला जात आहे. १९८४ पासून शिवसेना निश्चितपणे हिंदुत्वाकडे झुकली. त्यामुळे पक्षाच्या लोकप्रियतेत वाढ झाली.

### विचारप्रणाली व पक्ष कार्यक्रम :

शिवसेना 'हिंदुत्वाचा" प्रचार करते. भूमिपुत्रांना नोकरीत आरक्षण हवे अशी त्यांची भूमिका आहे. मुंबईतील झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देण्याचे पक्षाने वचन दिले होते. गरिबांसाठी झुणका-भाकरी केंद्र सुरू करण्यात आली. परंतू मोफत घरांचे प्रकल्प पूर्ण करु शकले नाही. पक्ष आता लोकांमधील आपल्या पायाचा विस्तार करीत आहे. त्यानुसार पक्षाच्या भूमिकेत बदल घडत आहे. मराठी माणसाबरोबर आता महाराष्ट्रीयन माणसाच्या हितसंबंधाची जोपासना करण्याचे पक्षाचे धोरण आहे.

### १३.२.६ जम्मू ॲण्ड काश्मिर नॅशनल कॉन्फरन्स :

शेख अब्दुल्ला यांनी १९३८ साली द नॅशनल कॉन्फरन्स ऑफ जम्मू काश्मिरची स्थापना केली. 'नवीन काश्मिर' ही त्यांची घोषणा होती. त्यांच्या पक्षाला जमीनदारी पद्धती संपवायची होती. काश्मिरमधील लघू व गृह उद्योगांना चालना द्यायची होती. पदवीपर्यंतचे शिक्षण स्त्रियांना मोफत असावे, असे या पक्षाचे मत होते. पंडित नेहरूंच्या प्रभावामुळे पक्षाचे नाव बदलून 'ऑल जम्मू ॲण्ड काश्मिर नॅशनल कॉन्फरन्स' असे ठेवण्यात आले.

**विचार प्रणाली व पक्ष कार्यक्रम :**

पक्षाला सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हवा होता. हा पक्ष मुस्लिम लीगच्या जातीयवादी राजकारणापासून दूर राहिला. घटनेच्या ३७० व्या कलमात होणाऱ्या कोणत्याही बदलास या पक्षाचा विरोध आहे. लोकशाही व धर्मनिरपेक्षतेवर या पक्षाचा विश्वास आहे. राज्यातील अतिरेकी कृत्यांना पायबंद घालावा असे या पक्षाला वाटते.

**११.३.६ आसाम गण परिषद :**

आसाममधील विद्यार्थी चळवळीतून या पक्षाची स्थापना झाली. ऑल आसाम स्टुडन्टस् युनियन (आसू) ही संघटना परकीय नागरिकांच्या प्रश्नावरून सक्रिय झाली होती. बांगलादेशातून मोठ्या प्रमाणावर निर्वासित आसाममध्ये येत असत. त्यांच्यामुळे आसामी तरुणांना नोकऱ्या मिळणे कठीण होत होते. या प्रश्नावरून तरुणांची तीव्र प्रतिक्रिया उमटत होती. या पक्षाची स्थापना १९८५ साली झाली व त्याच वर्षी हा पक्ष सत्तेवर आला.

**विचार प्रणाली व पक्ष कार्यक्रम :-**

सर्व बांगलादेशींना देशाबाहेर घालविणे हा या पक्षाचा प्रमुख कार्यक्रम होता. त्यामुळे आसामी तरुणांना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होतील असे पक्षाचे मत होते. राज्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे पक्षाचे प्रमुख ध्येय होते.

**११.३.७ मुस्लिम लीग :**

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या मुस्लिम लीगपासून आजच्या मुस्लिम लीगची निर्मिती झाली आहे. भारतातील मुस्लिमांचे प्रतिनिधीत्व हा पक्ष करतो. निवडणूकीत या पक्षाला अत्यंत मर्यादित यश मिळाले आहे.

**११.३.८ शेतकरी कामकरी पक्ष (पीडब्ल्यूपी) :**

केशवराव जेध्यांनी १९४८ साली काँग्रेस पक्ष सोडून या पक्षाची स्थापना केली. न पक्ष मार्क्सवादी विचारांचा होता. तथापि ब्राह्मणविरोधी लोकांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नात हा पक्ष जातीय राजकारणात शिरला. निवडणूकीत पक्षाला फारसे यश मिळाले नाही.

**११.३.९ रिपब्लिकन पक्ष (आरपीआय) :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनपासून या पक्षाची निर्मिती झाली. या पक्षाला मर्यादित अनुयायी आहेत. पक्षातील नेत्यांमधील मतभेदामुळे हा पक्ष राजकीयदृष्ट्या परिणामकारक होऊ शकला नाही. दलितांची प्रगती व्हावी व त्यांना शिक्षणात व नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळावे असे या पक्षाचे मत आहे.

## ११.४ राष्ट्रीय आघाडीचे राजकारण आणि शासन (COALITION POLITICS)

**प्रस्तावना :**

१) आघाडीच्या राजकारणाचा अर्थ

२) भारतातील आघाडीच्या राजकारणाची कारणे

३) आघाडीच्या राजकारणाचा उदय व विकास
दोन प्रमुख आघाड्या - (i) U.P.A. संयुक्त पुरोगामी आघाडी (ii) N. D. A. राष्ट्रीय लोकशाही आघाडी
४) आघाडीच्या राजकारणाचे फायदे - तोटे
५) निष्कर्ष

हल्लीचे भारतातील आघाडीचे राजकारण आणि शासन भारतीय राजकारणातील स्थित्यंतर दाखविणारे आहे.

### ११.४.१ आघाडीचे राजकारण - अर्थ :

विशिष्ट उद्दिष्टांसाठी राजकीय पक्षांनी तात्पुरते एकत्रित येणे आणि सत्तेवर येण्यासाठी अनेक राजकीय पक्षांनी एकत्रित येऊन शासन स्थापन करणे म्हणजे संमिश्र आघाडी सरकार होय.

### ११.४.२ भारतातील आघाडीच्या राजकारणाची कारणे :

**१) बहुपक्षपद्धती** - राजकीय पक्ष लोकशाहीमध्ये अनिवार्य असतात. विशेषतः संसदीय शासनपद्धतीमध्ये संसदेमध्ये बहुमतामध्ये असलेला राजकीय पक्ष शासनावर येतो आणि इतर पक्ष विरोधी पक्षाचे काम करतात. एकाच पक्षाला संसदेमध्ये स्पष्ट बहुमत मिळत नाही तेव्हा संयुक्त आघाडी बनवून राजकीय पक्ष आघाडीचे शासन निर्माण करतात. ज्या देशांमध्ये द्विपक्ष पद्धती अस्तित्त्वात असते अशा देशांमध्ये आघाडीचे राजकारण अस्तित्त्वात येत नाही. बहुपक्ष पद्धती असलेल्या देशांमध्ये आघाडीचे राजकारण अस्तित्त्वात येते. उदा. भारत, पाकिस्तान इत्यादी.

२) प्रादेशिक पक्षांचा उदय आणि विकास - भारतात प्रादेशिक पक्षांना राज्यामध्ये आणि राष्ट्रीय स्तरावर दिवसेंदिवस महत्त्व प्राप्त होत आहे. यासर्व पक्षांचे स्वरुप स्पर्धात्मक झाले आहे. प्रादेशिक पक्षांच्या उदय आणि विकासामुळे आघाडीच्या राजकारणाला चालना मिळत आहे.

३) एकप्रभुत्व पक्षपद्धती संपुष्टात आली. काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष दोन्ही पक्षांचे महत्त्व, प्रभुत्व कमी होत आहे. एकप्रभुत्व पक्ष पद्धती संपुष्टात आल्यामुळे अनेक पक्ष एकत्रित येऊन आघाडी शासन स्थापन करण्याचा कल वाढत आहे.

### ११.४.३ भारतात आघाडीच्या राजकारणाचा उदय व विकास :

१९७७ नंतर भारतात आघाडीच्या राजकारणाचा उदय झाला आहे. १९७६ साली काँग्रेसच्या विरोधात जनता पक्षाच्या नावाखाली सात विरोधी पक्ष एकत्रित आले होते. आघाडी सरकार अस्तित्वात येण्याच्या दोन पद्धती आहेत. एक म्हणजे निवडणूकीपूर्वीच (Pre-election coalition) निवडणूक लढवण्याच्यादृष्टीने एकत्रित येतात. निवडून आल्यावर एकत्रित येऊन शासनाची स्थापना करतात. दुसरी पद्धत म्हणजे राजकीय पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवितात. निवडणूकीनंतर कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही तर; त्यातील मोठा पक्ष ज्याला इतरांपेक्षा जास्त मते मिळाली; तो पक्ष इतर पक्षांशी युती करुन शासन स्थापन करतो. या पद्धतीला “horse trading” असे गमतीने म्हणतात. या पद्धतीने जे युतीचे शासन अस्तित्वात येते त्या युती शासनाला कोणत्याही विचारसरणीचा आधार नसतो. देवाणघेवाण, पद

मिळविणे या हेतूने निवडणूकी नंतर एकत्रित येऊन केलेल्या युतीच्या शासनाचा उद्देश असतो. १९६७ नंतर अनेक राज्यांमध्ये या पद्धतीने युतीचे शासन आले होते. त्याला "संयुक्त विधायक दल" (SVD) असे म्हटले जाते आहे. (SVD) पद्धतीने अस्तित्वात आलेले युतीचे सरकार अस्थिर असते त्यामुळे बरेचदा राज्यामध्ये अस्थिरता येते.

१९८९ साली केंद्रामध्ये जनता दल आणि नॅशनल फ्रन्टचे शासन व्ही.पी. सिंगच्या नेतृत्वाखाली आले. अशा प्रकारे केंद्रामध्ये प्रथमच निवडणूकीनंतर युती होऊन युतीसरकार आले आणि तेव्हापासून लोकसभेमध्ये काँग्रेसची एकपक्ष प्रभुत्व संपुष्टात आले आणि बहुपक्षपद्धतीमध्ये त्याचे रुपांतर झाले. कोणत्याही एका पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे आघाडीचे सरकार अस्तित्वात आले. १९९१ साली नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात आघाडीचे सरकार स्थापन करण्यात आले होते. १९९८ साली भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेवर होती. २००४ सालापासून काँग्रेसप्रणीत संयुक्त आघाडी सत्तेवर आली आहे. महाराष्ट्रातही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व इतर मित्रपक्ष यांची लोकशाही आघाडी सत्तेवर होते. १२, १३, १४ आणि १५ व्या लोकसभा निवडणूकामध्ये (१९९८ ते २००९) एका पक्षाला बहुमत मिळणे ही पद्धतच संपुष्टात आली होती; आणि युती सरकार, आघाडी सरकार पद्धती अस्तित्वात आले. भारतातील या आघाडीच्या राजकारणांमध्ये आणि शासनामध्ये दोन प्रमुख आघाड्या आहेत.

१) काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी (UPA - United Progressive Alliance)

२) भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA - National Democratic Alliance)

आघाडी निवडणुकीपूर्वी किंवा निवडणुकानंतर याप्रमाणे दोन स्तरावर दिसून येते.

**११.४.४ आघाडीच्या राजकारणाचे फायदे** - भारतीय समाजाचे स्वरुप अनेकतावादी, विविधतावादी आहे. अनेक सामाजिक गटाचे राजकीयीकरण झाले आहे. प्रत्येक गटाला न्याय देणे एका पक्षाचा शासनाला शक्य होत नाही. अशा समाजामध्ये समाजातील सर्व स्तरांवरील लोकांचे हितसंबंध लक्षात घेण्याच्या दृष्टीने, सर्वांना सामावून घेण्याच्या दृष्टीने आघाडीचे राजकारण योग्यच आहे. Pluralistic feature अनेकतावादी भारतीय समाजव्यवस्थेचे आहे स्वरूप हे आघाडी राजकारणावरुन दिसून येते.

**आघाडी राजकारणाचे तोटे :**

**१) अस्थिरता** - अनेक पक्ष एकत्र येऊन आघाडीचे शासन अस्तित्वात येते. आघाडी शासनातील एखादा पक्ष आघाडीतून फुटून निघाला आणि आघाडीने लोकसभेत बहुमत गमावले तर केव्हाही सरकार कोसळून अस्थिरता निर्माण होते.

**२) संधीसाधु वृत्तीची वाढ** - सत्तेवर येण्यासाठी, मंत्रीपद मिळण्यासाठी आघाडी शासनामध्ये बरेच पक्ष एकत्र येतात. त्यासाठी पोलीटिकल ब्लॅकमेल तंत्राचा उपयोग करण्यात येतो.

**३) देशाच्या योग्य विकासाला घातक** - आघाडी शासनाचे सर्व लक्ष, वेळ, शक्ती, प्रयत्न युती सांभाळण्यातच खर्च होत असते त्यामुळे देशासाठी दूरवरचा विकास लक्षात घेतला जात नाही.

**४)** संघटित विचारसरणीचा अभाव असतो. शासनाला विशिष्ठ विचारसरणी राहत नाही.

**११.४.५ निष्कर्ष -**

संयुक्त आघाडीचे शासन आणि युतीचे राजकारण आणि शासन ही भारतीय राजकारणाची वास्तविकता आहे. हे लक्षात घेऊन संयुक्त आघाडी शासनाचे नियम व कायदे बनविण्याची गरज आहे. आघाडी शासनातील आमदार, खासदार, मंत्री शक्यतो गुन्हेगारी वृत्तीचे असणार नाही, देशाला प्रामाणिक असतील याची काळजी घेणे गरजेचे आहे. कारण आघाडीचे सरकार आणि युतीचे सरकार भारतीय राजकारणाची गरज झाली आहे. निवडणूकीपूर्वी युती करुन विशिष्ट विचारसरणीच्या आधारावर युती सरकार सत्तेवर आल्यास ते अधिक योग्य आहे. त्यामुळे निवडणूकीनंतर युती करुन आघाडी शासन स्थापन करताना जो व्यापार केला जातो तो थांबेल, मोठ्या पक्षांनी लहान पक्षांकडे युती करतांना समान दर्जा स्थान देऊन युती करावी. आघाडी शासन पद्धती यशस्वी करणे ही भारताची आजची गरज आहे.

## ११. ५ सारांश

भारतात प्रादेशिक पक्षांच्या विकासाची ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय, वंशिक अशी अनेक कारणे आहेत. भाषेच्या आधारावर राज्याची रचना हे सर्वात मुख्य कारण प्रादेशिकतेचे आहे. प्रादेशिक पक्षांचे स्वरूप संकुचित, भावनेला आव्हान देणारे, एका नेतृत्वावर आधारीत असे दिसून येते. प्रादेशिक पक्ष दोन प्रकारचे दिसून येतात. एक म्हणजे स्वतंत्रपणे विचारधारेच्या आधारावर निर्माण झालेले आणि दुसरा प्रकार म्हणजे काँग्रेस पक्षापासून फूटून वेगळा पक्ष स्थापन केलेले प्रादेशिक पक्षांचा उदय आणि विकास भारतीय समाजाचे अनेवतावादी स्वरूप स्पष्ट करणारे आहे. भारतातील काँग्रेस पक्षाची एकप्रभुत्व संपुष्टात येऊन युती सरकार पद्धती किंवा आघाडी सरकार पद्धती अस्तित्वात आली आहे.

## ११.६ प्रश्न

१) प्रादेशिक पक्ष म्हणजे काय ? प्रादेशिक पक्षाच्या उदयाची कारणे सांगा.
२) काही प्रमुख प्रादेशिक पक्षांची विचारसरणी सांगा.
३) "प्रादेशिक पक्ष भारतीय राष्ट्रीयत्वाला आव्हान आहे" चर्चा करा.
४) आघाडी शासनाची विश्लेषणात्मक समालोचन करा.

❖❖❖❖

# १२

# राष्ट्रउभारणीची समस्या - जात आणि धर्म
# (THE PROBLEM OF NATIO BUILDING - CASTE AND RELIGION)

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ राष्ट्रीय एकात्मकतेची गरज
१२.३ भारतीय राजकारणातील आणि राष्ट्रातील विभाजनवादी घटक
१२.४ विभाजवादीघटक जात आणि जातीची भूमिका
१२.५ धर्म विभाजनवादी घटक आणि धर्माची भूमिका
१२.६ सांराश
१२.७ प्रश्न

## १२.१ उद्दिष्ट्ये

१) भारतीय राष्ट्रवादाचे स्वरुप समजून घेणे. राष्ट्रीय एकात्मतेची कारणे व त्यादृष्टीने प्रयत्न लक्षात घेणे.
२) भारतीय राष्ट्रातील विभाजनवादी घटक जात व धर्माचा अभ्यास करणे.
३) जातीवाद आणि सांप्रदायिकतावादावर उपाय व त्यावरील मर्यादांचा अभ्यास करणे.

## १२.२ प्रस्तावना

भारताला राष्ट्र म्हणावे किंवा नाही याविषयी फार पूर्वीपासून वाद आहेत. ब्रिटिश राज्यव्यवस्थेमध्ये ब्रिटिश भारताला एक राष्ट्र म्हणायला आणि समजायला तयार नव्हते. त्यांच्या मते भारत विभागलेला आहे आणि एक राष्ट्र नाही. राष्ट्रीय चळवळीमध्ये सर्व विभाजनवादी घटक एकत्रित येणे ब्रिटिशांना नको होते, कारण त्यामुळे ब्रिटिश राज्यव्यवस्थेला धोका होता. भारत एखाद्या उपखंडाप्रमाणे आणि विविध भाषा, धर्म, वंश, संस्कृति असलेला देश असल्यामुळे भारतात राष्ट्रीयता व एकतेचा विकास होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण होणे कठीण आहे. कारण राष्ट्रीयतेची भावना निर्माण होण्यासाठी समान भाषा, समान इतिहास, समान संस्कृति असणे आवश्यक असते. एका भूप्रदेशामध्ये लोकांना एकत्र बांधून ठेवणारा भावनिक बंध

म्हणजे राष्ट्रीयता होय. भारतात समान भाषा, समान इतिहास, समान वंशाचे लोक नाही. भारतात अनेक सार्वभौम राज्ये होती. ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षेपोटी त्यांना एकत्रित आणले होते. त्यामुळे लोकांमध्ये राजकीय एकता निर्माण झाली होती. एकता निर्माण होण्याच्या दृष्टीने त्यावेळीच्या राष्ट्रीय नेत्यांनीही महत्त्वाची भूमिका केली होती. देशाचे स्वातंत्र्य मिळविणे या उद्दिष्टातून निर्माण झालेली भारतातील एकता लोकांमध्ये निर्माण झाली होती, पण खोलवर रुजली नव्हती. स्वातंत्र्यापूर्वी भारतात धर्म या घटकामुळे लोकांमध्ये विभाजन होण्यास सुरुवात झाली. त्यातून "two nation theory" आली आणि मुस्लिमांनी स्वतंत्र राज्याची मागणी केली. देशाचे धर्माच्या आधारावर विभाजन झाले आणि पाकिस्तानची निर्मिती झाली. यावरुन भारतीय राष्ट्रीयत्वाचे अपयश आणि राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये खोलवर रुजली नाही असे दिसून येते.

भारतीय नेत्यांनी मिश्र संस्कृतीचा स्वीकार भारतात केला. देशाच्या विभाजनानंतर झालेले दंगे आणि इतर कटू आठवणी विसरुन भारतात धर्म निरपेक्षता (Secularism) हे धोरण स्विकारले. तरीही सांप्रदायिक वाद अनेकदा उद्‌भवतो. यासारख्या घटनांमुळे भारतीय राष्ट्राला धोका निर्माण होतो. धर्माच्या आधारावर विभाजन हे एक आणि एकाच धर्मामध्ये विविध गट हे दुसरे असे चित्र दिसून येते. जातीय रचना ज्यातून भारतात उच्च, निच असे कॉम्पेक्स लोकांमध्ये दिसतात ते लोकशाही संकल्पनेच्या विरोधी आहे. समाजाचे त्यामुळे खालच्या दर्जाचा, उच्च दर्जाचा असे विभाजन होऊन भारतीय राष्ट्रीय एकतेला त्यामुळे धोका निर्माण होतो.

काही विचारवंतांच्या मते भारतीय राष्ट्रीयता नकारात्मक (Indian nationalism is negative) आहे. भारतीय राष्ट्रीयता ब्रिटिशविरोधी होती. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये एकता टिकविणारी सकारात्मक वैशिष्ठे भारतीय राष्ट्रीयत्वात नाही. विभाजनवादी घटक एकतावादी घटकांपेक्षा भारतीय राष्ट्रीयत्वामध्ये जास्त प्रबळ आहेत.

भारतीय राष्ट्राला वैचारिक आव्हानही दिसून येते. दक्षिण भारतीय द्रविडीय पक्षांना उत्तर भारतीयांपासून वेगळे पाहिजे. उत्तर भारतीयांना वाटते ते आर्य संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करतात, तर दक्षिण भारतीयांना वाटते ते द्रविडी संस्कृतीचे रक्षण करतात.

१९७० पर्यंत काही भारतीय साम्यवाद्यांनी भारत राष्ट्र नाही आणि राज्यांना भारतीय संघापासून वेगळे होण्याचा अधिकार आहे अशी भूमिका घेतली होती. मार्क्सवादी, लेनिनवादी पक्षांनी यावर भर दिला होता. धर्मावर आधारीत काही पक्षांनी उदा. पंजाबमध्ये स्वतंत्र खालिस्तानची मागणी केली होती. काश्मीरमध्ये JKLF पक्षाने स्वतंत्र काश्मीरची मागणी केली होती. वंशिक आव्हान भारतीय एकतेला दिसून येते.

हिंदूत्वाचे तत्त्वज्ञान हिंदू महासभेने, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (R.S.S.) मांडले. ते बरेचदा भारताच्या अनेकतावादी स्वरूपाला आणि धर्मनिरपेक्षेला आव्हान करतात.

## १२.२ राष्ट्रीय एकात्मता (NATIONAL INTEGRATION)

भारतीय राष्ट्राची एकता (Unity) राखणे, विभाजनवादी घटकांपासून भारतीय राष्ट्राचे रक्षण करणे हे देशापुढे एक मोठे आव्हान आहे. राष्ट्रीय एकात्मता साध्य करावी असे राष्ट्रीय

नेत्यांना वाटते. स्वातंत्र्यानंतर या प्रश्नांकडे अधिक लक्ष देण्याची गरज देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अधिक आहे. देशातील लोकांमध्ये देशाविषयी आपुलकीची भावना नसेल आणि संकुचित हितसंबंधासाठी लोक आपआपसात संघर्ष करीत असेल तर नियोजित आर्थिक विकास अशक्य होतो.

एकात्मता ही व्यापक संकल्पना आहे ज्यामध्येक विविध बाजूंचा समावेश होतो. Myron Weiner यांच्यामते एकात्मतेची चार बाजू (aspects) आहेत.

१) विविध व अलग संस्कृतीची (culture identities) एकात्मता आणणे आणि त्यांच्यात राष्ट्रीयतेची भावना विकसित करणे.
२) राष्ट्रीय चौकट शासनाची त्यामध्ये राजकीय घटकांची एकात्मता आणणे.
३) शासक (rulers) आणि शासित (ruled) यांच्यामध्ये एकात्मता म्हणजे लोकांना समान राजकीय प्रक्रियेमध्ये सामावून घेणे.
४) नागरिकांचे उद्दिष्टपूर्ण क्रियांसाठी संघटन करणे व एकात्मता आणणे.

आपल्या देशाला या सर्व वैशिष्ट्यांच्या पूर्ततेचा अनुभव आहे. उदा. अनेक राज्यांना एकत्रित आणून भारतीय संघराज्य निर्माण केले आहे. विविध संस्कृतींना एकत्रित आणण्यास व त्यांच्यात एकात्मता निर्माण करण्यासाठी अनेक संस्थात्मक तरतूदी व सरंक्षणाची तरतूद केली आहे. ''विविधतेतून एकता'' निर्माण करणे हे मुख्य स्वप्न धोरण निर्मात्याचे आहे. उदा. घटनेद्वारे राखीव जागांची तरतूद अनेक अल्पसंख्यांकाना एकत्रित करुन भारतीय राजकीय प्रवाहात आणण्यात येत आहे. माहितीचा अधिकार, जनहितयाचिका या घटनात्मक अधिकारांद्वारे लोकांना मुख्य राजकीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न होत आहे. लोकांमध्ये जागृकता आणून सकारात्मक राष्ट्रीयता त्यांच्यात निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी अभिजन (elite) आणि सामान्य जनता यांच्यातील दरी नष्ट होणे ही राष्ट्रीय एकात्मतेची पूर्णअट होय असे एडवर्ड शीलस यांचे मत आहे. अविकसित किंवा कमी विकसित देशांमध्ये ही दरी खूप मोठ्या प्रमाणात दिसून येते. आर्थिक संपन्नता वाढविण्याची गरज देशात असते. लोकांची अपेक्षा शासनाकडून असतात त्याची पूर्तता होण्याची गरज असते. लोकांच्या मूलभूत गरजा आणि अपेक्षाही शासनाकडून पूर्ण झाल्या नाही तर लोकांमध्ये देशाविषयी व शासनाविषयी उद्वेगाची भावना वाढते. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता आणण्याच्या दृष्टीने शासनाने लोकांच्या गरजा पूर्ण करणे, विकासाचा समन्वय साधणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्र उभारणी (nation building) करणे होय. त्यासाठी विभाजनवादी घटकांवर नेहमी नियंत्रण असावे. अलगतेची भावना निर्माण करणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवावे. भौगोलिक एकता (teppitorial integrity) संरक्षित करणे राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे. लोकांमध्ये भावनात्मक मानसिक आणि शैक्षणिक एकता निर्माण करावी. राष्ट्राप्रति प्रामाणिकपणा आणि एकतेची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न व्हावेत.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी दुहेरी प्रयत्न आवश्यक असतात.
१) देशातील लोकांमध्ये बंधुभावाच्या भावनेचा विकास करणे - धर्म, भाषा, वंश, संस्कृती यावरुन असणारे भेदभाव नष्ट करण्यास बंधुभावाची भावना विकसित करणे आवश्यक आहे.

२) नागरिकांनी देशाच्या हितसंबंधांना प्राधान्य देणे राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे. अर्थात धर्म, भाषा, जात इत्यादींना दुय्यम स्थान नागरिकांनी द्यायला पाहिजे. जिथेकुठे देशाचा हिताचा विचार असतो त्याच्या आड धर्म, जात, भाषा अली तरी त्याचा विचार न करता देशहिताचा विचार व्हावा. देशभक्तीची भावना लोकांमध्ये विकसित व्हावी, धर्म, जात, वंश, संस्कृती, भाषा इत्यादी विविध घटक असलेल्या देशांमध्ये या सर्व घटकांना एकत्रित बांधून राष्ट्रीय एकात्मता राखणे देशापुढे फार मोठे आव्हान असते.

## १२.३ भारतीय राजकारणातील आणि राष्ट्रीय एकात्मतेतील विभाजनवादी घटक :

भारतीय राजकारण आणि राष्ट्रीय एकात्मता यावर प्रभाव पाडणारे घटक खालील आहेत.

१) जात
२) धर्म
३) प्रादेशिकता
४) वंश
५) भाषा
६) लिंगभेद
७) आर्थिक घटक
८) प्रचंड लोकसंख्या
९) लोकांची मनोवृत्ती

**१) जात** - भारतीय राज्यघटनेप्रमाणे आणि कायद्याप्रमाणे जातीभेद पाळणे गुन्हा आहे परंतु जातीचा प्रभाव देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनावर सतत असतो. भारतातील अनेक राजकीय पक्ष आणि संघटना जातीय हितसंबंध जोपासणाऱ्या आहेत. त्यांचा प्रभाव स्थानीय राजकारणावर फार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. जातीचे राजकारण प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. निवडणुकीसाठी उमेदवार ठरविताना, मंत्रीपद देताना जातीच्या राजकारणाचे गणित असतेच.

**२) धर्म** - धर्म आणि जमातवाद या सामाजिक घटकांचाही राजकारणावर अतिशय प्रभाव दिसून येतो. त्यामुळे बरेचदा देशाच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वाला धोका निर्माण होतो. घटनात्मक स्तरावर आणि कायद्याने धर्मभेद नष्ट केला आहे. परंतु राजकारणाच्या गणितात धर्माचा प्रभाव दिसतो.

**३) प्रादेशिकता** - भारतात प्रादेशिक विविधता आणि प्रादेशिक व्यापकता आहे. या प्रादेशिक विविधतेमध्ये एकता असली तरी प्रादेशिकवाद त्यातूनच उदयास आला आहे. उदा. मुंबई, आसाम या प्रदेशांमध्ये बाहेरुन येणाऱ्या लोकांची प्रचंड संख्या त्यातून या शहरांमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. यातून संघर्ष तणाव उदयास येतात आणि निश्चितच त्याचा राजकारणावर प्रभाव पडतो. त्यादृष्टीने दिवसेंदिवस प्रादेशिक पक्षांची वाढणारी संख्या व त्यांचा प्रभाव लक्षात घेण्यासारखा आहे.

**४) वंशभेद** - बहुवंशीयता भारताचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक वंशीय गटाची स्वतःची वैशिष्ट्ये, प्रथा, परंपरा, इतिहास आहेत. प्रत्येक वांशिक गटाला स्वतःची वैशिष्ट्ये जतन करायची आहेत. प्रादेशिकता, प्रादेशिक इच्छाआकांक्षा त्यातूनच उदयास येतात.

**५) भाषा** - १९५६ साली भारतात भाषेनुसार राज्यांची पुर्नरचना करण्यात आली आहे. भाषावार राज्य स्थापित झाल्यानंतर प्रादेशिकता, प्रादेशिकवाद, भाषावाद उदयास आले. प्रादेशिक पक्ष, प्रादेशिक नेते या सर्व गोष्टींना अति महत्त्व देतात आणि आपल्या प्रदेशाच्या मागणीसाठी शासनावर दबाव आणतात. स्थानीय बाबींवरुन राजकारण करण्यात येते.

**६) लिंगभेद** - लिंगभेदामुळे स्त्री घटकांवर अन्याय झाला आहे. आधुनिक काळात स्त्रियांवर होणारा अन्याय, स्त्रियांचे शोषण हे मोठे सामाजिक प्रश्न आहेत. भारतीय राज्यघटनेप्रमाणे समता, न्याय या मूल्यांना महत्त्व देण्यात आले तरीही स्त्रियांना राजकीय क्षेत्रात फार कमी संधी मिळते.

**७) आर्थिक घटक** - भारतीय समाजातील शेतीप्रधान अर्थव्यवस्था आणि विकसित अर्थव्यवस्था या दोन्हींची सांगड नीट न घातल्यामुळे भारतीय व्यवस्थेमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. दारिद्र्य, बेकारी, विषमता, असमतोल आर्थिक विकास इत्यादी समस्या राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात येतात.

**८) प्रचंड लोकसंख्या** - शासनाला नियंत्रणात ठेवता येणार नाही एवढी लोकसंख्या भारताची आहे, प्रचंड लोकसंख्येमुळे अनेक समस्या उद्‌भवल्या आहेत.

**९) लोकांची मनोवृत्ती** - विशिष्ट प्रश्नांकडे बघण्याची वृत्ती आणि दृष्टीकोन जोपर्यंत लोकांचा बदलत नाही तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गामध्ये अडथळे आणि धोके राहणारच.

## १२.४ विभाजनवादी घटक - जात (DIVISIVE FORCES - CASTE)

भारतीय समाजव्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे जातीव्यवस्था होय. जातीव्यवस्था सुरुवातीला व्यवसायावर आधारीत होती आणि लोकांना व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य होते. अर्थात याला कोणताही ऐतिहासिक पुरावा नाही. व्यक्ति ज्या जातीमध्ये जन्माला येते त्या जातीची म्हणून शेवटपर्यंत ओळखल्या जाते हे आज आपण बघतो. धर्मांतर करुन धर्म बदलता येतो परंतु जात नाही. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, क्षूद्र असे चार वर्ण भारतीय समाजात होते आणि त्यांना समाजात विशिष्ठ भूमिका देण्यात आली होती. सामाजिक संबंध व व्यवहार, लग्न त्या त्या जातीप्रमाणे व जातीमध्येच होत असे. वर्णव्यवस्था व्यवसायावर आधारीत होती परंतु काळाच्या ओघात भारतात अनेक जातीप्रकार अस्तित्वात आले.

जातीवरुन व्यक्तीची ओळख निर्माण झाली. जातीच्या आधारावर त्या त्या जातीच्या लोकांमध्ये एकता निर्माण झाली. जातीचे पाठबळ लोकांना मिळायला लागले. आपआपल्या जातीला लोक पांठीबा द्यायला लागले. आधुनिकीकरण, औद्योगीकरण, आणि लोकशाही व्यवस्था सुद्धा जातीचे घट्ट बंधन फारसे सैल करु शकले नाही असे दिसते. व्यक्तिचे सामाजिक, आर्थिक

आणि राजकीय संबंध जाती निश्चित करायला लागल्या असे दिसते. कार्ल मार्क्सने असे भाकीत केले होते की आधुनिकरण, औद्योगिकरण राजकीय लाकेशाहीमुळे नविन सामाजिक, आर्थिक बंध आणि समान हितसंबंध तयार होतील. आधुनिक औद्योगिकरणामुळे वंशपरपरांगत श्रमविभागणी पद्धतीचा लोप होईल. परंतु मार्क्सने वक्तव्य केल्याप्रमाणे घडले नाही. भारतात औद्योगिकरण, शहरीकरण, आधुनिकीकरण झाले परंतु लोकांच्यावरील जातीची पकड संपली नाही. याउलट परिस्थिती दिसून येते, दिवसेंदिवस जातीची पकड आणखी घट्ट होत आहे.

जातीव्यवस्थेच्या दोन बाजू आहेत. १) परंपरागत रुढीप्रमाणे सामाजिक (ritual and social) (२) राजकीय बाजू (Political), आधुनिकरणामुळे जातीची रुढीपरंपरा आणि सामाजिक बाजू काही प्रमाणात कमी झाली आहे. परंतु जातीची राजकीय बाजू अतिशय प्रबळ झाली आहे. त्यामागे कारण आहे की स्थानीक शासन पद्धतीमुळे अनेक मागासलेल्या जातींना राजकीय सत्ता मिळाली. जातीय संघटना राजकारणात येण्यासाठी प्रौढ मताधिकार पद्धती आणि पंचायत राज्यव्यवस्थांमुळे जातींना प्रबळ होण्यास मदतच झाली. एका विशिष्ट भागात त्या त्या जाती प्रबळ बनायला लागल्या असे दिसुन येते. राष्ट्रीय स्तरापेक्षा प्रादेशिक आणि ग्रामीण स्थानीय स्तरावर जाती कार्यरत आहेत. राष्ट्रीय पक्ष निवडणूकासाठी स्थानिय व प्रादेशिक स्तरावरील जातीच्या नेत्यांना हाताशी धरुन त्यांच्यावर जबाबदारी टाकतात, त्यामुळे काहीप्रमाणात राष्ट्रीय स्तरावर जातीचा प्रभाव पडतो. राज्यीय स्तरावरील आणि ग्रामीण स्तरावरील राजकारणामध्ये जाती कार्यशाली आहेतच.

काही समाजवाद्यांच्या मते जातींमुळे काही फायदे झाले आहेत. उदा. जाती प्रभावी दबावगट म्हनून कार्य करतात. जातीच्या आधारावरील दबावगटांना राजकीय पक्ष ही दुर्लक्षित करु शकत नाही. म्हणजेच जातीचे राजकीयीकरण झाले आहे. ग्रामीण भागात लोकांना संघटीत करण्याचे काम जाती करतात.

जातीव्यवस्थेची नकारात्मक बाजू म्हणजे जातीव्यवस्था परंपरांगत आणि परिदृढ आहे आणि व्यक्तीचा जन्मानुसार जातीप्रमाणे दर्जा ठरविते ती जातीव्यवस्था लोकशाही विरोधी (anti democratic) आहे. लोकशाहीप्रमाणे स्वातंत्र्य, समता, न्याय ही तत्त्वे महत्त्वाची मानली जातात; परंतु अजुनही आंतरजातीय विवाह, जाती बाह्य विवाह इत्यादी प्रश्न लोकशाही तत्वांना झुगारुन त्या त्या जातीचे नेते, कायदा बाजूला ठेवून आपल्या जातीच्याप्रमाणे सोडवितात. जातीजातीतील वैमनस्य, जातीजातीतील संघर्ष यामुळे सामाजिक स्तरावर तर परिणाम होतातच परंतु राष्ट्रीय एकात्मतेलाही त्यामुळे धोका निर्माण होतो. प्रत्येक भागात विशिष्ट जातीचे प्रभुत्व दिसुन येते. त्या जाती राजकीय आणि आर्थिक सत्तेवरही एककेंद्री प्रभुत्व स्थापन करतात. त्या भागातील इतर जातींना ते पुढे यायला देत नाही. त्यामुळे इतर जातींमध्ये नैराश्य आणि कटूता निर्माण होते.

प्रत्येक व्यक्ति आणि प्रत्येक सामाजिक गट जातीनुसार ओळखल्या जातात. सामाजिक आणि राजकीय जीवनामध्ये जाती महत्त्वाची भूमिका करतात. प्रत्येक गट व व्यक्तिमध्ये जातीविषयी जागृकता आली आहे. एखाद्या जातीविषयी वक्तव्या वरुनही दंगे पेटतात. निवडणूकांच्यावेळी जातीच्या आधारावर लोक एकत्रित येतात आणि मतदान करतात. जातीचा एवढा प्रभाव काहीवेळी दिसतो की त्यापुढे पक्षाची विचारसरणी, राष्ट्रीय आणि सामाजिक प्रश्न याला दुय्यम स्थान लोक देतात. अशावेळी देशाच्या एकात्मतेचा आदर्श साध्य करणे कठीण होते.

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय प्रस्थापित करणे, दर्जा व संधीच्या बाबतीत समता आणणे आणि प्रत्येक व्यक्तीचा आदर व प्रतिष्ठा राखली जाईल अशी व्यवस्था निर्माण करणे हे राज्यघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे असे नमूद केले आहे.

समाजामध्ये समता, न्याय ही मुल्ये प्रस्थापित करण्यासाठी राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्क विशेषतः 'समतेचा हक्क', 'शोषणाविरुद्धचा हक्क' समाविष्ट करण्यात आले. दुर्बल घटकांसाठी, वंचित घटकांसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या. परंतु वास्तविकता अशी दिसून येते की, समाज आणि राजकारणातील प्रत्येक स्तरावर जातीभेद वेगवेगळ्या स्वरुपांमध्ये आढळून येतात. जातीचे राजकारण आजच्या काळात शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय सर्वच क्षेत्रातील संस्थांमध्ये प्रविष्ट झाले आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील जात आणि राजकारण यांच्यातील क्रियाप्रतिक्रिया आणि संबंधामुळे आज "जातीचे राजकीयीकरण आणि राजकारणाचे संस्थीकरण" झाले आहे. जातीचा प्रभाव तळातील ग्रामपंचायत राजकारणापासून ते थेट राष्ट्रीय स्तरावरील संसदेतील राजकारणापर्यंत दिसून येते.

स्वातंत्र्यानंतर भारतात जातीला राजकीय महत्त्व प्राप्त झाले. भारतीय समाजाची विभागणी अनेक गटात झाली. राजकारणाच्या प्रत्येक स्तरावर जात या घटकाचे अस्तित्व व प्रभाव आढळून येतो. भारतात व्यक्तीची जात तिच्या जन्मावरुन ठरत असल्याने ही विभागणी कायमस्वरुपी झाली आहे. अलिकडील काळात संपूर्ण राजकारणालाच जातीयवादी वळण लागले आहे. जातीपासून मिळणाऱ्या राजकीय लाभावर पाणी सोडण्याची कोणाचीच तयारी नसते. उदा. महाराष्ट्रात मराठा, कर्नाटकात लिंगायत, आंध्रात कम्मा व रेड्डी, उत्तरेत जाट इत्यादी जातीय पक्षांची वाढ होत आहे. दलित पँथर, बहुजन समाज पार्टी, बजरंग दल इत्यादी पक्ष जातीय आधारे निर्माण झाले ओहत. मतदारांना एकत्रित व संघटित करण्याचे राजकीय साधन म्हणजे जात होय.

**भारतीय राजकारणातील जातीची भूमिका :**

**१) हितसंबंधी व दबावगटाप्रमाणे कार्य** - भारतात आजच्या काळात असे दिसून येते की बहुतेक जाती संघटीत झाल्या आहेत. आपआपल्या जातीच्या हितसंबंधासाठी जातीय गट शासनावर दबाव आणतात. जातीयवादी संघटन आणि जातीय राजकारण राजकीय सत्तेपर्यंत पोहोचण्याचा सर्वात जवळचा मार्ग आहे याचा अनुभव र्स लोक घेत आहेत.

**२) निवडणुका** - सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्ष जातीच्या आधारे निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्ष जातीच्या आधारावर उमेदवाराची निवडणूकीसाठी निवड करतात. निवडणूकीतील प्रचारामध्ये जातीय निष्ठेस आव्हान करण्यात येते. मतदार आपआपल्या जातीच्या उमेदवाराला मतदान करतात. विविध जातीय पक्षांशी समझोते करून संयुक्त आघाडी स्थापन करण्याची प्रवृत्ती ही वाढत आहे असे दिसते.

**३) मतदान** - सार्वत्रिक निवडणुकीची पाहणी करण्यात आली तेव्हा असे आढळून आले की मतदार जातीला अतिशय महत्त्व देतात. त्या मतदारसंघात ज्या जातीची संख्या जास्त असेल त्या जातीचा उमेदवार निवडून येतो. जातीप्रमाणे 'व्होटबँक' तयार झाल्या आहेत. प्रौढ मताधिकार पद्धती आणि पंचायत राज्यव्यवस्थेमुळे जातीला नविन जीवदान मिळाले आहे.

**४) नवीन नेतृत्व** - सत्ता केंद्रात शिरकाव करण्यासाठी विविध जातीजमातीचे नेते आपआपल्या जातीबांधवांना संघटीत करण्याचा प्रयत्न करतात त्यातून जातीच्या आधारावर निरक्षर व्यक्ति सुद्धा खासदार आणि आमदार झाल्या आहेत.

**५) राजकीय पक्ष** - भारतातील विविध राजकीय पक्ष म्हणजे विविध जातीगटांचा संघ आहेत. उदा. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षावर ब्राह्मनेतवर व मराठी जातीचे वर्चस्व, बौद्ध जातीचे रिपब्लिकन पक्षावर, ब्राह्मण जातीचे भारतीय जनता पक्षावर वर्चस्व दिसून येते. पक्षीय स्वार्थासाठी जातीय गटांचा वापर करण्यात येतो. विविध राजकीय पक्ष सामान्य नागरिकांच्या मनातील जातीय भावनेला आव्हान करून त्यांचे राजकीय शोषण करतात असे दिसते. विविध राज्यातील राजकारणांमध्ये त्या त्या राज्यातील जातीसमूहाचे वर्चस्व दिसून येते. उदा. महाराष्ट्रात मराठा, आंध्रात कम्मा व रेड्डी, उत्तरेत जाट, मतदारांना एकत्रित व संघटित करण्याचे राजकीय साधन म्हणजे जात होय.

**६) राजकीय व सार्वजनिक धोरणांवर जातीचा प्रभाव** - राज्यकर्त्यांना सार्वजनिक धोरण ठरविताना जातीजमातीच्या हितसंबंधांची दखल घ्यावीच लागते. एखादे धोरण एखाद्या जातीच्या हितसंबंधास प्रतिकूल असेल तर ते आंदोलनाच्या मार्गाने शासनावर दबाव आणून राज्यकर्त्यांना धोरणात बदल करण्यास भाग पाडतात.

**७) लोकमताचे संघटन :** अनेक जातीसंघटनांनी आपली जनसंपर्क कार्यालये काढली आहेत. वृत्तपत्र, पत्रके, चर्चासत्रे, परिसंवाद इत्यादींद्वारे ते लोकमत आपल्या जातीला अनुकूल असे संघटित करण्याचा प्रयत्न करतात. अनेक जातीय गटांनी पतपेढ्या व सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. एकूणच आपआपल्या जातीच्या लोकांमध्ये जागृकता आणणे, त्यांना संघटित करणे या उद्देशाने जाती कार्यरत असल्याचे दिसते. संपूर्ण देशात जातिविशिष्ट बँका, सहकारी संस्था, निवासगृहे, मासिके, परिषदा, शिष्यवृत्या इत्यादी जातीयवादांचा आविष्कार करतात.

**भारतीय राजकीय व्यवस्थेवर जातीचा परिणाम :**

आपल्या देशातील निरनिराळ्या घटकराज्यांच्या राजकीय स्थितीचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, बहुतेक सर्वच घटकराज्यांच्या राजकारणावर तेथील प्रभावशाली जातीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. उदा. महाराष्ट्रात मराठा, कर्नाटकात लिंगायत, उत्तर प्रदेशात जाट व ठाकूर बिहारात यादव इत्यादी.

जात आणि राजकारणाच्या संबंधाचा परिणाम खालीलप्रमाणे दिसून येतो.

**१) जातीचे राजकीयीकरण** - जात आणि राजकारण यांच्यातील संबंधामुळे आज जातीला नवे स्वरुप प्राप्त झाले आहे. ते म्हणजे ‘जातीचे राजकीयीकरण’ होय. राजकारण व राजकीय व्यवस्था जातीपासून अलिप्त राहू शकत नाही. जातीमुळे राजकारणाला नवीन सामाजिक आधार मिळाला आहे.

**२) लोकांचे एकत्रीकरण आणि राजकीय सहभाग वाढण्यास मदत झाली** - जातीच्या नावाखाली का होईना लोक एकत्रित येऊन संघटना स्थापन करीत आहेत. आपल्या जातीच्या उमेदवाराला निवडून देण्यासाठी राजकारणातील मतदान प्रक्रियेत सहभागी होतात.

**३) घटनेद्वारे व कायद्याद्वारे समता परंतु वास्तवामध्ये असमता** - घटनेतील उद्देशपत्रिका, समतेचा हक्क आणि इतर मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे, कायदे सर्वच सैद्धांतिक व कायदेशीर स्तरांवर 'समता' ध्येय आहे. वास्तवात प्रत्येक ठिकाणी 'जात' घटक लक्षात घेतला जातो. सामान्य माणूस आपल्या जातीच्या कोशातून बाहेर पडावयास तयार नाही. वास्तवात प्रत्येक जातीचा दृष्टिकोन स्वतःच्या जातीप्रती आत्मीयतेचा दिसतो आणि दुसऱ्या जातीविषयी द्वेषाचा दिसतो.

**४) धर्मनिरपेक्ष लोकशाहीला धोका** - जातीय राजकारणामुळे प्रातिनिधिक धर्मनिरपेक्ष लोकशाही अडचणीत आणि धोक्यात येत आहे. सुदृढ लोकशाहीसाठी जे वातावरण आवश्यक असते ते वातावरण निर्माण होऊ शकत नाही.

**५) जातीजातींमध्ये शत्रुत्व तणाव व अविश्वास** - सामाजिक व राजकीय तणाव उच्च जाती आणि दुर्बल जाती यांच्यातील लहानसहान कारणांवरुन झालेल्या संघर्षातून वाढतो. राष्ट्रीय एकता धोक्यात येते. व्यक्तीव्यक्तींमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण होते. कायदा सुव्यवस्था, सामाजिक सुरक्षा धोक्यात येते. संकुचित भावना वाढीस लागतात. जातीय राजकारणांमुळे भारतीय राजकीय व्यवस्थेपुढे एक मोठे आव्हान निर्माण झाले ओह. भारतीय लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे.

**६) लोकशाही व्यवस्थेने दिलेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग** - लोकशाही व्यवस्थेमुळे मिळणाऱ्यासमतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्धचा हक्क व स्वातंत्र्ये, राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकार, निवडणुका, मतदान, लोकप्रतिनिधी होणे या सर्व गोष्टींचा जातीच्या राजकीयीकरणामुळे दुरुपयोग केला जातो.

**उपाय** - जात आणि राजकारण यांचा संबंध आधुनिक राजकारणातील न टाळता येणारी गोष्ट आहे. राजकारण जातींपासून वेगळे किंवा जात राजकारणातून पूर्णपणे वेगळी करणे शक्य नाही. कारण राजकीय नेते आणि अभिजन वर्ग यांना आपल्या स्वार्थासाठी जातीचा आधार फायदेशीर वाटत असल्याने जातीयवादी राजकारणाला प्रतिबंध घालणे कठीण झाले आहे. परंतु व्यापक राष्ट्रहिताचा विचार प्रत्येक क्षणी प्रत्येक भारतीय नागरिकाला असणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमे आणि इतर साधने यांनी जातीय राजकारणाला खतपाणी न घालता 'मानवतावादाची' राखण करणाऱ्या विचारांची प्रेरणी करावी. शाळा, महाविद्यालये, सांस्कृतीक साधने यांची यात मोलाची कामगिरी असावी.

### जात आणि राखीव जागांचा प्रश्न (Caste and Issue of Reservation) :

देशातील कायदेमंडळ, सरकारी नोकऱ्या आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये दुर्बल आणि वंचित जातीजमातीसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. वंचित जातींना राखीव जागा हा आजच्या काळातील जातींच्या संबंधातील ज्वलंत आहे. जातींना राखीव जागा देणे म्हणजे एकप्रकारे विशेष वागणूक देणे होय. पूर्वीच्या व्यवस्थेत उच्च जातींना विशेषाधिकार देण्यात असे त्यापेक्षा राखीव जागांची तरतूद वेगळी आहे.

राखीव जागाची तरतूद म्हणजे Leveling Process आहे. दुर्बल आणि वंचित जातींना त्यांचा विकास करण्याची व स्थान सुधारण्याची संधी देऊन (राखीव जागांच्या स्वरुपात) समानता आणणे होय.

**उद्दिष्ट :** राखीव जागांची तरतूद राज्यघटनेद्वारे करण्यात आली आहे त्याची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

**१) समता आणि न्याय स्थापन करणे :** राष्ट्राच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. समाजात समता आणि न्याय प्रस्थापित झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने 'न्याय समाजरचना' अस्तित्वात येऊ शकत नाही. भारतीय व्यवस्थेमध्ये समता आणून 'न्याय समाजरचना' प्रस्थापित करणे घटनाकारांचे मुख्य उद्दिष्ट होते म्हणूनच उद्देशपत्रिकेमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे समता, न्याय प्रस्थापित करणे. व्यक्तीची प्रतिष्ठा राखणारी व्यवस्था प्रस्थापित करणे हे मुख्य उद्दिष्ट या धोरणाचे आहे.

**२) बंधने व शोषणामुळे प्रगतीपासून वंचित घटकांसाठी** - भारतीय परंपरागत समाजातील स्पृश्य-अस्पृश्य भेदभावामुळे आणि अचुसूचित जातीजमातींवर बंधने असल्यामुळे अनेक जातीजमातींची प्रगती झाली नाही. इतर प्रगत नागरिकांच्या बरोबरीने विकसित होण्याची ज्यांना संधी मिळावी या उद्देशाने राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे.

**राखीव जागांविषयी घटनात्मक तरतुदी :**

**१) समतेचा हक्क** - स्वातंत्र्यापूर्वी अनेक समाजसुधारकांनी उदा. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी यांनी दुर्बल घटकांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले होते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या १४ व्या कलमात समतेची तरतूद केलेली आहे. कायद्यापुढे समानता, सार्वजनिक स्थळी भेदभाव न पाळणे, अस्पृश्यता पाळणे गुन्हा आहे, विशेषाधिकार देणाऱ्या पदव्यांचे संपृष्टीकरण, समान संधी व दर्जा इत्यादी तरतूदी करण्यात आल्या. या तरतुदींमुळे समता व न्याय प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे.

**२) राज्यघटनेचे उद्दिष्ट** - घटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये भारतातील प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय व प्रतिष्ठा आणि संधीच्या बाबतीत समता देण्याचे आश्वासन दिलेले आहे.

**३) मार्गदर्शक तत्त्वे** - मार्गदर्शक तत्त्वांमध्ये या आश्वासनांच्या पूर्तीच्या दृष्टीने तत्त्वे समाविष्ट केली आहेत.

**४) राखीव जागांसंबंधी तरतुदी (The Scheme of Reservation) :**

१) लोकसभेमध्ये राखीव जागा
२) प्रत्येक राज्याच्या विधानसभांमध्ये राखीव जागा
३) कलम ३३४ - राखीव जागांचा कार्यकाळ
४) राष्ट्राच्या अर्थरचनेमध्ये दुर्बल लोकांच्या हिताचे धोरण
५) मागासलेल्या जातीजमातीच्या हितांच्या संरक्षणासंबंध कायदे

६) काकासाहेब कालेलकर कमिशन
७) मंडल कमिशन
८) क्रिमिलेअरची ओळख

**१) लोकसभेमध्ये राखीव जागा** - राज्यघटनेच्या कलम ३३० मध्ये लोकसभेमध्ये अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे.

**२) प्रत्येक राज्याच्या विधानसभांमध्ये राखीव जागा** - राज्यघटनेच्या कलम ३३२ प्रमाणे राज्याच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जातीजमातीसाठी राखीव जागा असाव्यात अशी तरतूद करण्यात आली आहे.

**३) कलम ३३४ - राखीव जागांचा कार्यकाळ** - राज्यघटनेच्या कलम ३३४ मध्ये अशी तरतूद केलेली आहे की, लोकसभेमध्ये आणि विधानसभांमध्ये अुसूचित जातीजमातीच्या लोकांना ज्या राखीव जागा देण्यात आल्या आहेत त्या राज्यघटना लागू झाल्यानंतर दहा वर्षे राहतील. १९६० साली ८ व्या राज्यघटना दुरुस्तीद्वारे, १९६९ साली २३ वी घटनादुरुस्ती करुन आणि १९९० साली ६२ वी घटनादुरुस्ती करुन हा कालावधी वाढविण्यात आला. ७९ वी घटनादुरुस्ती १९९९ साली करुन २०१० पर्यंत राखीव जागांचा कालावधी वाढविण्यात आला आहे. अशा प्रकारे राखीव जागांचा कालावधी वेळोवेळी वाढविण्यात आला.

**४) राष्ट्राच्या अर्थरचनेमध्ये दुर्बल लोकांच्या हिताचे धोरण** - राज्यघटनेच्या कलम १६(१) प्रमाणे प्रत्येक भारतीय नागरिकाला समान संधी देण्यात आली आहे. परंतु कलम १६(४) प्रमाणे राज्यशासनाला अनुसूचित जातीजमातीसाठी राखीव जागा ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**५) मागासलेल्या जातीजमातीच्या हितांच्या संरक्षणासंबंध कायदे** - मागासलेल्या जातीजमातींच्या हितासाठी अनेक कायदे पास करण्यात आले आहेत. कलम १७ प्रमाणे अस्पृश्यता पाळणे कायद्याद्वारे गुन्हा आहे. त्याप्रमाणे अस्पृश्यता पाळू नये असा १९५५ साली कायदा पास केला. १९७६ सालापासून त्या कायद्याला 'नागरी हक्क संरक्षण' कायदा म्हणतात.

**६) काकासाहेब कालेलकर कमिशन** - भारतातील मागासवर्गीयांची सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीची चौकशी करण्यासाठी व ती परिस्थिती सुधारण्यासाठी कोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे या संबंधात १९५३ साली काकासाहेब कालेलकर आयोग नेमला होता.

**७) मंडल कमिशन :** १९७८ साली मंडल यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीयांसाठी आयोग नेमण्यात आला होता. या आयोगाने अनेक जिल्ह्यांची सामाजिक व शैक्षणिक पाहणी करुन सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचे निकष ठरविले. त्या आधारांवरुन तीन हजारांहून अधिक जमातींचा समावेश मागासवर्गीयांच्या यादीत करण्यात आला. मंडल आयोगाने १९८० साली आपला अहवाल सादर केला. या आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा विचार १९९० साली शाशनाने केला परंतु जनतेने मंडल आयोग विरोधी चळवळी केल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मंडल आयोगाच्या शिफारशींच्या कार्यवाहीला स्थगिती देण्यात आली

होती. १६ ऑक्टोबर १९९२ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे इतर मागासवर्गीयांसाठी राखीव जागा ठेवण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले.

८) क्रिमिलेअरची ओळख

**परिणाम** - राखीव जागांची तरतूद 'न्यायसमाज रचना' प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने आहे परंतु त्याचे परिणाम खालीलप्रमाणे दिसुन येतात.

१) जातीवाद पोसला जात आहे - राखीव जागांच्या नावाखाली जातीयवादाला खतपाणी घालून राजकारणी जातीजमातींमध्ये द्वेष व संघर्ष निर्माण करतात. भावनात्मक रंग देऊन राखीव जागांचे भांडवल करण्यात यते.

२) राखीव जागांचा फायदा मागास समाजातील जे पुढारलेले आहेत, ज्यांची थोडी स्थिती ठीक आहे अशा मागासवर्गीयांनाच मिळत आहे.

३) आपण मागास जमातीचे आहोत, आपणास राखीव जागा हव्या अशी मागणी करण्याची स्पर्धा अनेक जातींमध्ये निर्माण झाली आहे.

राखीव जागांबाबत बेरीज बजाबाकीचे राजकारण अस्तित्वात आल्यामुळे आंतरजातीय संघर्ष आणि एक नवा विघटनात्मक शक्तिप्रवाह भारतीय राजकारणात अस्तित्वात आला आहे.

## १२.५ धर्म - विभाजनवादी घटक (RELIGION - ADIVISIVE FORCE)

**प्रस्तावना :** भारत अनेक धर्मिय (a multi religious) देश आहे. भारतात हिंदू ८२%, मुस्लिम १२%, ख्रिश्चन ३%, शीख २%, बुद्धिस्ट ०.७१%, जैन ०.४८%, पारसी ०.३%, ज्यू ०.१% आहेत. भारतात याप्रमाणे अनेक धर्माचे लोक राहतात. या सर्व धर्मांनी भारतात मानवी संस्कृतीच्या विकासाला महत्त्वपूर्ण हातभार लावला आहे. शतकांपासून हे सर्व धर्म भारतात आहेत. भारतीय समाजाचे अनेकधर्मीय स्वरुप लक्षात घेऊन घटनाकर्त्यांनी 'धर्मनिरपेक्षता' हे तत्त्व भारतीय घटनेचे मुख्य तत्त्व म्हणून स्वीकारले आहे. धर्मनिरपेक्षता हे तत्त्व स्वीकारुन सर्वधर्मियांचे हितसंबंध सुरक्षित केले आहेत. भारतीय राष्ट्रउभारणीस त्यामुळे मदतच झाली आहे.

**भारत धर्मनिरपेक्ष देश आहे** - भारतातील सर्व धर्मिय लोकांमध्ये ऐक्य व बंधुभाव, सामंजस निर्माण व्हावे आणि सर्वधर्मियांना सुरक्षित वाटावे या उद्देशाने भारताने धर्मनिरपेक्ष राज्य (Secular State) निर्माण केले आहे. 'धर्मनिरपेक्षता' यामध्ये खालील मूलभूत तत्त्वांचा समावेश होतो. धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे १) कोणत्याही विशिष्ट धर्म राज्याने घोषित केला नाही. शासन कोणत्याही धर्मामध्ये हस्तक्षेप करीत नाही. २) सर्व लोकांना धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला आहे. आपआपल्या धर्माप्रमाणे पूजाअर्चा करण्याचे लोकांना स्वातंत्र्य आहे. ३) सर्व धर्मियांना शासनाकडून समान वागणूक देण्यात येते. ४) धर्म या घटकावरुन सामाजिक क्षेत्रात

भेदभाव करण्यात येत नाही. ५) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट आहे. राज्यघटनेत धार्मिक समता, स्वातंत्र्य, न्याय याविषयी तरतुदी आहेत. तरीही वास्तवात भारतीय राजकारणामध्ये धर्माचा प्रभाव दिसुन येतो.

धर्माच्या दोन बाजू आहेत. १) धर्म बौद्धिक विचारप्रक्रियेला चालना देणारा आहे. उदा. विश्वाची निर्मिती २) दुसरी बाजू धर्माची सामाजिक बाजू होय. जी व्यक्तिला वर्तनविषयक नियम सांगत असते.

धर्म एकतावादी (Unity) घटक आहे. धर्माच्या आधारावर लोक एकत्रित येतात. धर्म विभाजनवादी (divisive) घटक सुद्धा आहे. स्वधर्माविषयी अतिप्रेम आणि इतर धर्माविषयी द्वेष जेव्हा लोक करतात तेव्हा धार्मिक दंगे आणि सांप्रदायिकतावाद उदयास येतो. भारतीयांना जातीय दंगलीचा कटु अनुभव आहे. भारतात धर्म आणि राजकारण यांच्यात क्रिया-प्रतिक्रिया खालीलप्रमाणे आहेत.

अ) भावनिक एकता आणण्याचे धर्म अतिशय प्रभावशाली साधन आहे. या गोष्टीचा फायदा राजकारणी करुन घेतात. धर्म या घटकाला राजकारणात आणून लोकांना भावनिक दृष्टीने संघटीत करतात.

ब) धर्म या घटकामुळे भारताचे विभाजन झाले आणि धर्म विघटनवादी घटक आहे हे सिद्ध केले.

क) धर्माचे राजकीयीकरण आणि राजकारणाचे सांप्रदायीकरण - वेगवेगळ्या धर्माचे गट उदा. विश्व हिंदू परिषद, मुस्लिम लीग, अकाली दल इत्यादी धार्मिक गट व राजकीय पक्ष राजकारणात सक्रीय आहेत. शासकीय धोरणे, निर्णय यावर ते प्रभाव पाडतात. सत्ताधाऱ्यांशी सौदेबाजी करतात आणि आपआपल्या धार्मिक हितसंबंधांची जोपासना करतात. राजकीय श्रेष्ठी लोकांच्या धार्मिक भावनांचा आणि धार्मिक गटांचा आपल्या हितासाठी उपयोग करतात. धार्मिक गटांना सवलती जाहीर करतात, आश्वासने देतात.

ड) दोन धार्मिक गटांमध्ये संशयाचे, अविश्वासाचे वातावरण आढळते. क्षुल्लक कारणांवरुन जातीजमातींमध्ये तणाव निर्माण होतात, दंगली घडून येतात, कायदा-सुव्यवस्था धोक्यात येते, जीवित, वित्त हानी होते, राष्ट्रीय ऐक्य व अखंडता धोक्यात येते.

**इ) सांप्रदायिकतावाद किंवा जमातवाद (Communalism) :** ब्रिटिश काळात जमातवादी राजकारणाची सुरुवात भारतात झाली. ब्रिटिशांनी संपूर्ण भारत एक होवू नये म्हणून divide and Rule हे धोरण स्वीकारले होते. स्वातंत्र्यालढ्यामध्ये मवाळ गटाने सामाजिक सुधारणांना महत्त्व दिले. जहाल गटाने प्रखर राष्ट्रीयत्वाला महत्त्व दिले. जहाल गटाने प्रखर राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये निर्माण व्हावी म्हणून बरेचदा धर्माचा उपयोग केला. उदा. शिवजंयती, गणेशउत्सवाची सुरुवात, गायीचे संरक्षण मोहीम इत्यादि. याला प्रतिक्रिया म्हणून मुस्लिमांना मुस्लिम लीग ची स्थापना केली. हिंदू मुस्लिम दरी वाढत गेली. शेवटी धर्मावरुन देशाचे विभाजन झाले. आज भारतीय राजकारणावर जमातवादाचा प्रभाव दिसतो.

सांप्रदायिकतावाद म्हणजे काय?

Communalism means love for one's religious community in preference to the nation and a tendency to promote the communal interest at the cost of the interest of other religious communities. राष्ट्रहितापेक्षा धार्मिक हिताला अधिक प्राधान्य देणे होय.

**सांप्रदायिकतावादाचे स्वरुप** - भारतात दोन स्वरुपात सांप्रदायिकतावाद दिसून येतो.

१) जमातवादी राजकारण

२) जमातवादाचे हिंसक स्वरुप - दंगली, तणाव

**१) जमातवादी राजकारण :**

राजकीय क्रियाप्रक्रिया, राजकीय जीवनात धर्म या घटकाचा उपयोग करणे धर्मावर आधारित पक्ष, दबावगट, संघटना स्थापन करणे आणि आपल्या हितसंबंधांसाठी धर्म या घटकाचा साधन म्हणून उपयोग करणे आणि शासकीय धोरणे कृती यावर प्रभाव पाडणे. उदा. धार्मिक स्थळ, शब्दरचना यावरुन लोकांच्या भावनांना चेतावनी देऊन जमातवादी राजकारणातून लोकांना भडकविणे आणि त्यांचे सहकार्य मिळविणे. या जमातवादी राजकारणातूनच जमातवादाचे हिंसक स्वरुप उदयास येते. मुस्लिम लिग, हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अकाली दल इत्यादी धर्मावर आधारित पक्ष जमातवादी राजकारणाला खतपाणी घालतात.

**२) जमातवादाचे हिंसक स्वरुप :**

लहानसहान गोष्टीवरुन धार्मिक भावना दुखावल्या की हिंसात्मक स्वरुपात जमातवाद व्यक्त होतो. उदा. बाबरीमशीद प्रश्न, रामजन्मभूमीचा प्रश्न, जमातवाद हिंसात्मक स्वरुपात व्यक्त झाला की धार्मिक तणाव निर्माण होतो.

**जमातवादाची कारणे :**

**१) ब्रिटिश राजकर्त्यांचे विभाजनवादी धोरण** - हिंदू मुसलमान यांच्यात फूट पाडण्यासाठी आणि त्यांच्यात दुही निर्माण करण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्ते निश्चितच जबाबदार होते. या दोन्ही जमातींमध्ये फूट पाडणे या उद्देशाने त्यांची धोरणे होती. उदा. १९०९ साली मुसलमानांना वेगळा मतदारसंघ देणे, वेगळा पक्ष मुस्लीम लीग स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे इत्यादी. हिंदू - मुस्लिम यांच्यात पडलेली धार्मिक फूट छोट्याशा कारणावरुन आजही उफाळून येते आणि दंगली घडतात.

**२) सामाजिक रचना आणि राजकीय सत्ता स्पर्धा** - अल्पसंख्य धर्मियांमध्ये असुरक्षिततेची भावना असते. त्यांच्या भावनेचा फायदा धर्मावर आधारित पक्ष व संघटना घेतात. प्रातिनिधिक लोकशाही आणि निवडणुकांमुळे धर्माच्या आधारावर लोकांना एकत्रित आणून लोकांचा पाठिंबा मिळविण्याचा अनेक पक्ष प्रयत्न करतात. राजकीय पक्षांचा सत्तेसाठी आणि आपल्या गटाच्या हितसंबंधांसाठी सतत संघर्ष सुरु असतो. उदा. मुस्लिम लीग, हिंदू महासभा, विश्व हिंदू परिषद, अकाली दल इत्यादी. या जमातवादी पक्ष व संघटनामुळे व त्यांच्यातील सत्तास्पर्धेमुळे जमातवादी राजकारणाला खतपाणी मिळते.

**३) संशयाची भावना** - आपल्याच देशात आपण उपेक्षित आहोत ही भावना हिंदुमध्ये दिसून येते. त्यातूनच मुस्लिम जातीच्या नेत्यांकडे संशयाने व पूर्वग्रहदूषित नजरेने बघणे इत्यादींमुळे दोन्ही जमातींमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण होते. याउलट मुस्लिम जमातींना नेहमी हिंदूविषयी संशय वाटतो. या दोन्ही जमातींमध्ये असणाऱ्या अविश्वासाचा भावनेला जमातवादी नेते प्रोत्साहन देतात. मुसलमानांची संख्या जास्त असणाऱ्या शहरात भारतीय राष्ट्रीयत्वासंबंधी संशय निर्माण करणाऱ्या गोष्टी मुस्लिम नेते घडवून आणतात. उदा. जेथे मुसलमानांची संख्या जास्त आहे अशाच ठिकाणी हिंसक दंगली झालेल्या आहेत. उदा. उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र.

**४) जमातवादी संघटना आणि पक्ष** - धर्म या घटकावर आधारित अनेक राजकीय पक्ष व संघटना भारतात आहेत. राजकीय पक्ष व संघटना आपल्या गटाच्या हितसंबंधांसाठी जातीद्वेष वाढवितात. मशिदीवरुन वाद्ये वाजविणे, गोहत्या, सामुदायिक प्रार्थना, नमाज, रंगपंचमी, गणेशविसर्जन, दहीहंडी इत्यादींवरुन लोकांच्या भावना भडकविण्याचे व जातीवादला प्रोत्साहन देण्याचे काम करतात.

**५) बेकारी आणि दारिद्र्य** - तरुण धार्मिक भावनांच्या उत्तेजनाला लवकर बळी पडतात. त्याचा फायदा राजकीय श्रेष्ठी, मुल्ला-मौलवी, जातीवादी नेते घेतात. दारिद्र्य आणि बेकारीने ग्रासलेल्या तरुणांना अशा कामासाठी प्रोत्साहन देतात.

**६) आर्थिक स्पर्धा** - उदा. येवला गावात झालेल्या दंगलीचे प्रमुख कारण हिंदू-मुसलमान व्यापाऱ्यांतील स्पर्धा होती. भिवंडीला पावरलूमचे मालक हिंदू आणि कामगार मुसलमान होते. त्यांच्यातील वैमनस्यातून ती दंगल झाली होती. मालेगाव येथे हिंदू-मुस्लिम व्यापारी यांच्यातील आर्थिक स्पर्धा हेच जातीयवादाचे कारण होते.

**७) धार्मिक कट्टरतावादी** - राजकीय सत्ता हस्तगत करणे किंवा सत्तेमध्ये अधिकाधिक वाटा मिळविणे या उद्देशाने धर्माच्या आधारे लोकांचे राजकीय संघटन करुन प्रतिस्पर्धी पक्षांशी संघर्ष करण्यात येतो तेव्हा राजकीय प्रक्रिया जमातवादी होते. भारतीय समाज अशा जमातवादाला लवकर बळी पडतो. उदा. बाबरी मस्जिद, रामजन्मभूमीवाद, रथयात्रा, गोध्राकांड, गर्व से कहो हम हिंदू है हे घोषवाक्य, धार्मिक श्रेष्ठतेचा सिद्धांत, सांस्कृतीक राष्ट्रवाद इत्यादीला अति महत्त्व देण्यात येते.

**८) समाजविघातक घटक** - स्मगलर्स, समाजविघातक कार्य करणारे राजकीय पक्षांना हाताशी धरुन राजकारणामध्ये ढवळाढवळ करतात. हल्ली अनेक गुंड प्रवृत्तीचे लोक धर्माला हाताशी धरुन राजकारणात आल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**९) लोकांची मानसिकता** - सर्वसामान्य भारतीय माणूस अजूनही धर्माच्या प्रभावाखाली आहे. धार्मिक प्रश्नासारख्या भावनात्मक प्रश्नावर तो चटकन भडकविला जाऊ शकतो. सामान्य माणसाच्या या मनोवृत्तीचा गैरफायदा मतलबी राजकारणी घेतात.

**जमातवादाचा परिणाम :**

जमातवादी राजकारण कोणाच्याच फायद्याचे नसते. भारतात जमातवादी राजकारणामुळे (१) लोकशाहीला (anti democratic) धोका निर्माण झाला आहे. (२) संपूर्ण राजकीय प्रक्रिया त्यामूळे दूषित झाली. (३) संधीसाधू राजकारण अस्तित्वात आले. (४)

समाजात आणि देशात त्यातूनच तणाव निर्माण होतो. कायदा सुव्यवस्था नष्ट होते. राजकीय व्यवस्थेवर तणाव येतो. (५) (anti-humanism) जीवित हानी व वित्त हानी होते. (६) काश्मीर प्रश्न, पंजाब प्रश्न यांसारखे प्रश्न देशासमोर निर्माण होतात आणि देशाच्या एकतेला आणि अखंडतेला धोका निर्माण होतो. (७) धर्मनिरपेक्षतेला धोका निर्माण होतो.

**जमातवादावर उपाय :**

१) Secular administrative set up आवश्यक - जमातवादाला प्रोत्साहन देणारे राजकीय पक्ष व संघटना यांच्यावर बंदी किंवा कडक कारवाई करण्यात यावी.
२) भारतीय धर्मनिरपेक्षतेचा प्रत्येकाने आदर करावा - भारतासारख्या बहुधर्मीय देशामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठता किंवा संकुचित राष्ट्रवादाने शांतता आणता येणार नाही. जमातवादाला जमातवादाने उत्तर देणे हा पर्याय ठरु शकत नाही. एकमेकांविषयी सांमजस्य व सामोपचार हाच मुख्य उपाय आहे.
३) लोकांनी धार्मिक भावनांमुळे अति उत्तेजित होता कामा नये कारण त्यात राज्यकर्ते, मुल्ला-मौलवी बळी पडत नाहीत तर सर्वसामान्यांच्या जीविताची व वित्ताची हानी होते हे लक्षात घ्यावे.
४) जमातवादी संघटनांना प्रसार माध्यमांनी अति प्रसिद्धी देता कामा नये.
५) कडक शिक्षेची तरतूद करावी. जमातवादी राजकारणाला, दंगलीला प्रोत्साहन देणाऱ्यांवर कारवाई व्हावी.
६) सर्व राजकीय पक्ष आपण धर्मनिरपेक्ष आहोत असा दावा करतात आणि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जमातवादाला पाठिंबा देतात. त्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेला गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण झाला आहे. व्यापक राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने धर्माची राजकारणापासून फारकत करणे आवश्यक आहे. त्यासाठी घटनात्मक तरतुदी आणि कायदे आहेतच; त्याबरोबरच लोकांचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे.
७) शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणा लोकांचा नष्ट करणे गरजेचे आहे.

**धर्म, राजकारण आणि सांप्रदायिकतावाद :**

१) प्रस्तावना - भारत बहुधर्मिय देश परंतु धर्मनिरपेक्षता धोरण
२) धर्म आणि राजकारण क्रिया-प्रतिक्रिया
३) सांप्रदायिकतावाद -
    १) अर्थ
    २) स्वरुप
    ३) कारणे -
        १) ब्रिटिश राजकर्त्यांचे धोरण
        २) समाजरचना व राजकीय सत्तास्पर्धा
        ३) संशय
        ४) पक्ष व संघटना
        ५) बेकारी, दारिद्र्य
        ६) आर्थिक स्पर्धा
        ७) समाजविघातक घटक
        ८) लोकांची मानसिकता
    ४) जमातवादाचे परिणाम
    ५) जमातवादावर उपाय

## १२.६ सारांश

स्वातंत्र्यानंतर भारताचा सर्वात मोठा प्रश्न म्हणजे राष्ट्रीय एकता (National Unity) होय. भारताला राष्ट्रीय एकता राखण्याचा प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. भारतात राष्ट्रीयत्वाने अजुनही खोलवर मुळे धरली नाहीत असे दिसते. देशाच्या एकात्मतेला धक्का लावणारे अनेक सामाजिक व राजकिय घटक आहेत. त्यापैकी जात आणि धर्म हे मुख्य घटक होय. भारतीय समाज (हिंदू समाज) जातीव्यवस्थेवर आधारीत आहे. विशिष्ट जातींमध्ये जातीमुळे एकता आली आहे. परंतु जातीच्या राजकारणामुळे आणि जातीला अति महत्त्व दिल्यामुळे, जाती जाती मधील संघर्षामुळे राष्ट्रीय एकात्मतेला तडा जातो असे दिसते.

भारत अनेक धर्मीय देश आहे. भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता, घटनात्मक तरतुदी सर्व धर्मीयांना समान दजा व स्थान देण्याऱ्या आहेत. वास्ववात धर्माचे राजकारणात प्रवेश, सांप्रदायिकता, धार्मिक दंगे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण करतात. जोपर्यंत जात व धर्माचा प्रभाव कमी होत नाही तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता साध्य करणे कठीण जात आहे.

## १२.७ प्रश्न

१) राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय? राष्ट्रीय एकात्मतेत अंतर्भुत विविध घटकांची चर्चा करा.
२) सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेमध्ये जातीचे महत्त्व स्पष्ट करा.
३) "राष्ट्रीय एकात्मतेला जात धोक्यात आणते" चर्चा करा.
४) जातीचे राजकीयीकरण आज झाले आहे, भाष्य करा.
५) धर्म विभाजनवादी घटक आहे, समालोचन करा.
६) राज्याच्या धर्मनिरपेक्षतेला सांप्रदायिकतेमुळे कोणती आव्हाने उद्‌भवतात, विश्लेषण करा.
७) टीपा
    १) राखीव जागांचे राजकारण
    २) सांप्रदायिकता
    ३) राष्ट्रीय एकात्मतेची गरज

❖❖❖❖

# १३

# राष्ट्र बांधणीची समस्या - भाषा आणि वंशभेद

# (PROBLEMS OF NATION BUILDING - LANGUAGE AND ETHNICITY)

**घटक रचना :**

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ राष्ट्रीय भाषेचा प्रश्न
१३.३ भाषेच्या आधारावर राज्याचे विभाजन
१३.४ वंशभेद
१३.५ प्रश्न

## १३.१ उद्दिष्ट्ये

१) विविध भाषा असलेल्या भारतीय राज्याची राष्ट्रबांधणीची समस्या समजून घेणे.
२) राष्ट्रभाषे संबंधी निर्माण झालेल्या समस्या समजून घेणे.
३) भाषेच्या आधारावर राज्याच्या विभाजनाचे सामाजिक राजकीय परिणाम समजून घेणे.
४) अल्पसंख्याक आणि वांशिक समुहांच्या समस्या समजून
५) भाषाविषयक आणि वंशविषयक समस्यांवर राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने उपाय सुचविणे.

## १३.२ प्रस्तावना

लोकांमध्ये आणि समुहगटामध्ये एकी आणणारे सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा होय. एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण भाषेतून होते. भावना व्यक्त करण्याचे भाषा लोकांमधील एक प्रभावी माध्यम आहे. आनंद दुःख व्यक्त लोक भाषेतून करतात. आपलेपणाची भावना भाषेमुळे लोकांमध्ये निर्माण होते. संस्कृतीचे रक्षक म्हणून संपन्न भाषा आणि वाङमय काम करतात. एखाद्या गटाला ओळख देण्याचे काम भाषा करीत असते. लोकांमध्ये एकता निर्माण करणारा भाषा हा घटक बरेचदा राष्ट्रीय एकतेच्या मार्गामध्ये अडथळा निर्माण करतो. बहुभाषिक देशांमध्ये प्रत्येक भाषीक गट आपआपल्या भाषेची सर्वोच्चता त्या त्या प्रदेशात प्रस्थापित व्हावी अशी इच्छा करतात. अशा इच्छांमधून प्रादेशिक भावनांना खतपाणी मिळते आणि प्रादेशिकतेचा समस्या उद्‌भवते. प्रादेशिकता राष्ट्रीयतेला आव्हान देते.

बहुभाषिक देशांमध्ये संपूर्ण देशाची समान भाषा कोणती असावी यादृष्टीने प्रश्न निर्माण होतात. ज्या क्षणी एखादी भाषा 'राष्ट्रभाषा' म्हणून घोषीत करण्यात येते त्या क्षणापासून इतर भाषीक गटांमध्ये असंतुष्टता उद्भवते. राष्ट्रीय भाषा घोषीत करताना कोणत्या गोष्टींच्या आधारावर एखाद्या भाषेला राष्ट्रभाषा करावी अशीही समस्या निर्माण होते. बहुसंख्य लोक जी भाषा बोलतात त्या भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिल्यास इतर भाषिकांच्या बाबतीत कोणत्या तरतूदी असाव्यात अशीही समस्या येते. विज्ञान, तंत्रज्ञान या बाबतीतील संपन्नता ज्या भाषेतून प्राप्त होईल त्या भाषेला राष्ट्रभाषा करावी काय? अशा नानाविध गुंतागुंतीच्या समस्या लोकशाही, संघराज्य रचना असलेल्या, बहुपक्षीय, बहुभाषीय भारतासारख्या देशांमध्ये निर्माण होतात.

## १३.२ राष्ट्रीयभाषे संबधी प्रश्न (THE ISSUES INVOLVED NATIONAL LANGUAGES)

भारताच्या इतिहासात संपूर्ण भारताची समान भाषा प्रशासकीय कामकाजाच्या हेतूने होती असे दिसत नाही. राज्यकर्ते असतील त्याप्रमाणे त्यांची भाषा होती. उदा. मुस्लिम राज्यकर्ते असताना पर्शियन भाषा राज्यकर्त्याची होती. ब्रिटिश राज्यकर्ते असताना इंग्रजी प्रशासनाची भाषा होती. मुस्लिम येण्यापूर्वीच्या काळात राज्यकर्त्यांची भाषा पाली व संस्कृत होती. समान भाषेअभावी सामान्य लोक आणि राज्यकर्ते यांच्यामध्ये एकप्रकारची दरी होती. समान भाषेचा आणि राष्ट्रभाषेचा विचार करण्याची गरज स्वातंत्र्यानंतर भारतात निर्माण झाली.

स्वातंत्र्या लढ्याच्या वेळी दोन प्रकारचे मतप्रवाह भाषेसंबंधी होते, एक मतप्रवाह होता की देवनागरी स्क्रिप्ट मधील हिंदी भाषेला राष्ट्रभाषा करावी, दुसरा मतप्रवाहामध्ये हिंदीला विरोध करणारे उत्तर भारतीय उर्दू बोलणारे होते. त्यातून हिंदी बोलणारे हिंदू आणि उर्दू बोलणारे ते मुस्लिम असे गट पडून जमातवादाचे स्वरुप भाषीक मतप्रवाहाला यायला लागले. काही द्रविडीय पक्ष तामीळ सर्वात प्राचीन भाषा असल्याचे मत व्यक्त करीत. बंगालच्या लोकांनी हिंदीला विरोध केला आणि बंगाली हिंदीपेक्षा सर्वोच्च आहे असे मत मांडले होते. त्यांच्या मते सर्व नोबेल प्राईज मिळवणारे वाङमय बंगालीतून होते. तेलगु बोलणारे तेलगु भाषेला सर्वोच्च स्थान देऊ इच्छित होते. दक्षिण भारतातील लोक इंग्रजी चांगले बोलू शकत. इंग्रजीतून शिक्षण घेणारे त्यावेळी ते पहिले होते, त्यामुळे ब्रिटिश प्रशासनामध्ये सहभागाची संधी त्यांना मिळाली होती. स्वातंत्र्यापूर्वी दक्षिण भारतात हिंदी भाषेचे अस्तित्वच नव्हते. त्यामुळे हिंदीला त्यांचा विरोध होता. दक्षिण हिंदी प्रचार सभा यांनी दक्षिणेमध्ये हिंदीचा प्रसार केला. स्वातंत्र्यापूर्वी भाषेविषयक वरीलप्रमाणे चित्र भारताचे होते. घटनासमितेने अधिकृत भाषा प्रश्नावर चर्चा केली होती, भाषेविषयक त्यातून दोन मुद्दे महत्त्वाचे ठरले : १) राष्ट्रभाषावाद आणि २) भाषेच्या आधारावर राज्यांची पुर्नरचना.

**राष्ट्रभाषावाद :**

१) इंग्रजी भाषेला अधिकृत भाषा म्हणून किती काळ ठेवावी असा वाद उपस्थित झाला. कारण इंग्रजीनी परकीयांची भाषा तेंव्हा स्वातंत्र्यानंतर देशाच्या प्रशासकीय कामासाठी किती काठ ठेवावी याप्रमाणे राष्ट्रीय अभिमान त्यात अंर्तभुत व्हायला लागला.

२) इंग्रजी भाषेचा अधिकृत भाषा म्हणून उपयोग यासंबंधी भावनात्मक दृष्टीकोन आणि प्रॅक्टिकल व वास्तविक दृष्टीकोन दोन्ही लक्षात घेणे महत्त्वाचे होते. व्यवहारीक पातळीवर व वास्तविक दृष्टीकोनातून इंग्रजी भाषेचा विचार म्हणजे विज्ञान, तंत्रज्ञानाच्या युगात

शिक्षणाचा जागतिक दर्जा समजण्यास आणि जगातील इतर देशांशी वैचारिक देवाणघेवाण करणारे साधन म्हणजे इंग्रजी भाषा लक्षात घेऊन इंग्रजीचा विचार करणे गरजेचे होते. भावनिक दृष्टीकोन म्हणजे स्वतंत्र भारतात इंग्रजीला महत्त्व देऊ नये; स्वतःच्या देशातील भाषांचा स्विकार करावा. शेवटी भाषेविषयक घटनासमितील वाद व चर्चेनंतर घटनासमितीने हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा (National Language) दर्जा देण्याचे ठरविले आणि भारतीय समाजातील अनेकतावादी संस्कृतीचा विचार करुन हिंदीबरोबरच इंग्रजीच्या उपयोगाला मान्यता देण्यात आली होती.

१९५६ मध्ये बी.जी. खेर यांच्या अध्यक्षतेखाली भाषेविषयक आयोगाची नेमणूक केली होती. या आयोगाच्या शिफारसीप्रमाणे इंग्रजी भाषेऐवजी हिंदी भाषेचा जास्तीतजास्त वापर शासन व प्रशासनात करण्यात यावा. परंतु दक्षिणी राज्यांनी याला विरोध केला. द्रविडीय मुनेत्र कळघम पक्षाने राष्ट्रभाषेच्या प्रश्नावरुन भारतीय संघराज्यातून फूटून वेगळे द्रविडीस्थान राज्य स्थापन करण्याचे आव्हान दिले. हिंदी आणि अहिंदी भाषा बोलणारे प्रदेश आणि राज्या राज्यातील वादामुळे राष्ट्रीय एकता व एकात्मतेचा धोका निर्माण झाला. भाषा आयोगाच्या रिपोर्टचा अभ्यास करण्यासाठी संसदेने एक कमिटी स्थापन केली होती. १९६३ साली भाषाविषयक कायदा The Official Language Act पास करण्यात आला. या कायद्याप्रमाणे "हिंदी ला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यात आला आणि हिंदीबरोबर इंग्रजी भाषेचा उपयोग राज्यकारभारासाठी करावा." "Associate Language Status for English" करण्यात आले, या कायद्यामुळे हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषीक गट शांत झाले.

१९६४ साली तेव्हांचे गृहमंत्री गुलजारीलाल नंदा यांनी सूचनापत्र सर्व मंत्र्यांना (केंद्रीय) पाठविले. त्या सूचनापत्राचा उद्देश होता की, "ऑफीशिअल कामासाठी हिंदी चा उपयोग करण्याबाबतीत किती प्रगती झाली आणि हिंदीचा उपयोग व्हावा म्हणून कोणते प्रयत्न केले यासंबंधीचा रिपोर्ट कळवावा." नंदा स्वतः हिंदी समर्थक होते. ही सूचनापत्राची बातमी अहिंदी राज्यांमध्ये चुकीच्या पद्धतीने घेण्यात आली विशेषतः तामीळनाडू राज्यामध्ये, तामीळनाडू मध्ये त्यावरुन निर्दशने, दंगे, हिंसाचार, जाळूपोळ इत्यादी प्रकार घडले. अनेक महिने हे आंदोलन चालले. केंद्रातील अनेक मंत्र्यानीही त्यावरुन राजीनामा दिला. परिस्थिती आटोक्याच्या बाहेर जात आहे हे बघून जून १९६५ ला राष्ट्रभाषेचा प्रश्नावर चर्चा करण्यास सर्व केंद्रीय मंत्री, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, कॉंग्रेस पक्षाचे नेते यांची एक मीटिंग घेण्यात आली. त्या चर्चेमध्ये भाषेसंबंधी खालील मुद्यावर समझोता झाला.

१) अहिंदी बोलणाऱ्या राज्यांवर हिंदी चा उपयोग लादण्यात येणार नाही.
२) इंग्रजी भाषा हिंदीला सहाय्यक भाषा म्हणून राहील. English would be retained as an associate additional official language.
३) त्या त्या राज्यातील भाषा बोलणाऱ्या लोकांनाही शासनामध्ये पुरेशा संधी देण्यात येतील. भारतीय राज्यघटनेच्या ८ व्या शेड्यूल मध्ये ज्या बावीस भाषांची यादी दिली आहे त्या सर्व प्रादेशिक भाषा, हिंदी आणि इंग्रजी यापैकी कोणतीही भाषा UPSC (Union Public Service Examinations) च्या परिक्षा देण्यासाठी परवानगी राहील. या समझोत्यानंतर व वरील मुद्दे पास करण्यात आल्यानंतर संसदेमध्ये "ऑफिशियल भाषा दुरुस्ती कायदा"(१९६७) करण्यात आला. या कायद्यानंतर संसदेमध्ये हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांच्या उपयोग होऊ

लागला. UPSC च्या परिक्षाही प्रादेशिक भाषेतून देण्याची तरतूद झाली. भाषेवरुन देशाचा एकात्मतेला जो धोका निर्माण झाला होता तो वरीलप्रमाणे सोडविण्यात आला.

## १३.३ भाषेच्या आधारावर राज्याचे विभाजन (LINGUISTIC DIVISION OF STATE)

अनेक राज्यातील भाषिक गटांना आपली स्वतःची भाषा आपल्या प्रदेशात असावी असे वाटते. प्रत्येक राज्याचा इतिहास, भौगोलिक स्थान वेगवेगळे आहे. ब्रिटिश राजवट भारतात आल्यानंतर ब्रिटिशांनी आपल्या प्रशासकीय सोयीनुसार प्रदेशांची रचना केली होती. त्यामुळे एकाच राज्यामध्ये अनेक भाषीय गट राहत होते. उदा. मद्रास या प्रदेशामध्ये तेलगु, तामीळ, कन्नड, मलायाल्लम बोलणारे भाषिक गट होते. मुंबई या प्रदेशामध्ये मराठी आणि गुजराथी भाषीक गट होते. काही भाषीक गट अनेक प्रदेशांमध्ये विखुरले होते. उदा. तेलगु बोलणारे गट हैद्राबाद, नागपूर, ओरिसा भागात होते. स्वातंत्र्यलढा सुरु असतानाच राष्ट्रीयत्वाच्या प्रखर भावनेबरोबरच उपराष्ट्रीयत्वाची भावना (a sub-nation) अस्तित्वात येत होती. समान भाषा बोलणाऱ्या लोकांना त्यांना त्यांचे राज्य असावे असे वाटत होते. त्याची कारणे खालील होती –

१) अनेक मुख्य भाषिक गटांना त्यांचा स्वतंत्र राजकीय इतिहास आणि भौगोलिक स्थान होते.

२) इंग्रजी भाषेला भारतात प्रवेश मिळाल्यानंतर लोकांचा आपआपल्या भारतीय भाषांकडे ओढा वाढला.

३) ब्रिटिश राज्यकर्त्यांनी इतर भाषीक गटांविरुद्ध जे दडपशाहीचे धोरण सुरु केले होते त्यामुळे स्वतंत्र राज्याचा विचार प्रभावी होत गेला. उदा. निझाम भारतात होते तेव्हा त्यांनी उर्दु भाषेची लोकांवर सक्ती केली होती, जरी लोकांची मातृभाषा तेलगु होती तरी तेलगु लोकांची लायब्ररी जाळली होती.

४) शाळा कॉलेजमध्ये इंग्रजी भाषेला प्रारंभ केला त्यात प्रशासकीय दृष्टी कारकून तयार करणे हा ब्रिटिशांचा हेतू होता. लोकांच्या प्रादेशिक भाषांच्या विकासाची त्यांनी कुठेही तरतूद केली नव्हती.

या सर्व कारणांमुळे भाषिक राज्य असावे असे लोकांचे मत तयार होत गेले.

भाषेच्या आधारावर राज्यरचना याबाबतीत दोन विचारप्रवाह होते.

१) एका विचारप्रवाहाप्रमाणे केंद्रसरकार मजबूत असावे कारण दूर्बल केंद्र असेल तर परकीय त्याचा फायदा घेतात. देशांमध्ये “homogenous nationalism” असावे. त्यासाठी लोकांनी आपआपल्यातील सांस्कृतिक, भाषिक, वंशिय, भेदभाव विसरुन एक राष्ट्रीयत्वात विलीन व्हावे. देशाची शांतता, स्थिरता, आर्थिक प्रगती यासाठी सर्वांनी एकत्रित येणे अधिक गरजेचे आहे.

२) दुसऱ्या विचारप्रवाहाप्रमाणे विकेंद्रीकरण, अनेकता, बहुसंस्कृति या घटकांना मान्यता भारतीय समाजात असावी. भाषिक आधारावर राज्यांची रचना या मतप्रवाहाला त्याची सहानुभूती होती. त्यांच्या मते भारतात “Composite Nationalism” असावे.

स्वातंत्र्यापूर्वी बहुतेक राज्यांच्या सीमा राज्यकर्त्यांच्या सोयीप्रमाणे त्यांनी प्रदेश जिंकले त्याप्रमाणे होत्या. लोकांच्या इच्छा आशा यांना तेंव्हाच्या राज्याच्या नकाशात स्थान नव्हते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर धर समितीमध्ये भाषेच्या आधारावर राज्यांची सीमारचना करावी अशी मागणी झाली. १९४८ साठी धर कमिशनची नेमणूक झाली, त्यांच्यावर भाषेच्या आधारावर राज्यांची रचना करावी किंवा नाही याचा अभ्यास करण्याची जबाबदारी होती. धर कमिशनने रिपोर्ट दिला की भाषेच्या आधारावर राज्याची रचना यामुळे राष्ट्राच्या एकतेला धोका निर्माण होईल व त्यांनी भाषेच्या आधारावर राज्याची रचना करण्याला विरोध केला.

भाषीक आधारावर राज्याची निर्मिती संबधीची आंदोलने लक्षात घेऊन १९४९ साली. जे.व्ही.पी. समिती नेमण्यात आली. या समितीमध्ये (J) जवाहरलाल नेहरु, (V) वल्लभभाई पटेल, (P) पट्टमिसितारामय्या यांचा समावेश होता. या समितीने या प्रश्नाचा पुन्हा अभ्यास केला आणि या प्रश्नाची गहनीयता त्यांनी लक्षात घेतली. लोकांची भाषीक राज्याची मागणी दाबण्याचा प्रयत्न केल्यास त्यातून राष्ट्रीय एकात्मतेला धोका होऊ शकतो असे त्यांचे मत होते. आंध्रप्रदेशात तेलगु भाषीक लोकांची निर्दशने, हिंसाचार वाढतच होता. पोट्टी शिरमालू याने तेलगू भाषा बोलणाऱ्यांचे आंध्रप्रदेश या स्वतंत्र राज्याची मागणी केली. त्या आंदोलनात त्याचा मृत्यु झाला. शेवटी १९५६ साली शासनाने राज्यपुर्नरचना कायदा पास केला. ऑक्टोबर १९५६ ला तेलगू भाषा बोलणाऱ्या लोकांचे (मद्रास राज्यापासून फारकत करुन) आंध्रप्रदेश या नविन राज्याची निर्मिती केली. त्यानंतर भाषिक आधारावर राज्याची मागणी वाढली. शेवटी State Reorganisation Commission नेमण्यात आले. भारतीय संघराज्यामध्ये १४ राज्यांची भाषिक आधारावर पुर्नरचना केली.

सुरवातीला बॉम्बे द्विभाषिक राज्य होते. बॉम्बे महाराष्ट्र व गुजरात मध्ये विभाजीत करावे अशी लोकांची मागणी होती. राज्याची पुर्नरचना करण्यासाठी State Reorganisation Commission (S.R.C.) त्यांनी ही मागणी नाकारली. त्यामुळे आंदोलने महाराष्ट्रात झाली. अनेक लोक पोलीस फायरिंग मध्ये मारल्या गेले. सी.डी. देशमुख यांनी केंद्रीय कॅबिनेट मधून या प्रश्नासंबंधात राजीनामा दिला. शेवटी १९६० साली द्विभाषिक बॉम्बे गुजराथ आणि महाराष्ट्रात विभागल्या गेले.

पंजाब मध्ये हिंदू आणि शीख दोन्ही जमातीचे लोक होते. पंजाब ची मातृभाषा हिंदी असावी असे हिंदूचे मत होते तर मातृभाषा पंजाबी असावी असे शीख मत होते. त्यातून दोन्ही जमातीमध्ये कटूता निर्माण झाली. शिखांची पंजाबी भाषा बोलणाऱ्यांचे वेगळे राज्य असावे अशी मागणी व्हायला लागली. शेवटी १९६६ साली पंजाबचे विभाजन होउन पंजाब आणि हरियाना अशी दोन स्वतंत्र राज्ये निर्माण झाली.

आसाम ची पुनर्रचना नागालॅन्ड, मेघालय, मिझोराम, अरुणाचल प्रदेश अशा चार स्वतंत्र राज्यांमध्ये झाली. १९६३ साली नागालॅन्ड ला राज्याचा दर्जा मिळाला. १९७२ साली मेघालय, १९८७ साली मिझोराम, १९७२ साली अरुणाचल प्रदेश (North East Frontier Agency) झाली.

उत्तरप्रदेश मध्ये उत्तराखंड आणि बिहारमध्ये झारखंड निर्माण झाले. महाराष्ट्रात विदर्भ स्वतंत्र असावे अशी मागणी आहेच. म्हणजेच स्वतंत्र राज्य निर्मिती होतच आहे.

**परिणाम :** राज्यपुर्नरचना म्हणजेच राज्यांचे भाषेच्या आधारावर स्वतंत्र राज्यांची मागणी आणि अनेक राज्यांची निर्मिती याचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम दिसून येतात.

**सकारात्मक परिणाम :** विकेंद्रीकरण घडून आले. स्थानीय लोकांना शासन प्रशासनात भाग घेण्याच्या जास्तीतजास्त संधी प्राप्त होऊ लागल्या. राजकीय एकत्रीकरण अधिक घडून येऊ लागले. संघराज्याचे नविन स्पिरीट एकप्रकारे मूळ धरु लागले.

**नकारात्मक परिणाम :** म्हणजे प्रादेशिक अस्मिता अधिक जोपासल्या जाऊ लागल्या. प्रत्येक राज्यामध्ये त्या राज्यामध्ये बहुसंख्य लोक जी भाषा बोलतत त्यांना त्यांच्या राज्यात संधी मिळू लागली. परंतु इतर अल्पसंख्यांक भाषीक लोक संधीपासून वंचित राहू लागले. अनेक राज्यात इतर राज्यातून आलेल्या लोकांप्रति द्वेषाची भावना निर्माण होऊ लागली. “Sons of Soil” या संकल्पनेला महत्त्व आले. राष्ट्रीयतेची भावना बाजूला जाऊन, स्वभाषेविषयी, आपल्या राज्याविषयांची लोकभावना अधिक तीव्र झाली. प्रत्येकजण आपआपला अभिमान बाळगायला लागला आणि दुसऱ्याप्रती द्वेषाची भावना जोपासू लागला असे दिसते. उदा. मुंबई शिवसेना दक्षिण भारतीय आणि बिहारी लोकांना बाहेरचे समजतात. आसाममध्ये बंगाली बाहेरचे समजले जातात.

अशाप्रकारे भाषीक आधारावर राज्यांची पुर्नरचना धोक्याची ठरत आहे. भाषीक आधारावर राज्यांची पुर्नरचना केल्यामुळे प्रादेशिक अस्मिता जोपासल्या गेली. अशा अनेक अभ्यासकांना वाटते की भारतीय राज्याची भाषीक पुनर्रचना धोक्याची आहे. सेलिंग हॅरीसन यांच्या मते भाषा या घटकाला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे लोकशाहीचा विनाश होऊ शकतो. खालील गोष्टीमुळे असे घडणार नाही. त्या तरतुदी :

१) अलगतेची भावना जोपासून भारतापासून वेगळे होवून स्वतंत्र राज्याची मागणी करणाऱ्या घटक राज्यामध्ये केंद्रसरकार सैन्य पाठवून त्यांचे आंदोलन दडपू शकतात. उदा. जम्मू काश्मीर, पंजाब, नॉर्थइस्ट या भागातील अशी आंदोलन केंद्र सरकारने कारवाई करुन बंद केली आहेत. केंद्र सरकारने त्याप्रमाणे धोरणच आखले आहे की कोणत्याही घटकराज्याची स्वतंत्र राज्याची मागणी मान्य केली जाणार नाही.

२) राज्यघटनेमध्ये अनेक तरतूदी आहेत ज्यामध्ये भारतीय संघराज्यातून फूटून स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा अधिकार कोणत्याही घटकराज्याला नाही.

३) एकच नागरिकत्व, एकच न्यायालयीन व्यवस्था, एकच सनदी नोकरशाही, राष्ट्रपतीची राजवट लागू करण्याची तरतूद या घटनात्मक तरतूदी भारतीय संघराज्याचे स्वरुप संघराज्याचे असले तरी आत्मा एककेंद्री आहे. केंद्रसरकार मजबूत आहे.

४) राज्यघटनेमध्ये अल्पसंख्याकांच्या अधिकारांसाठी ही तरतूद आहे. भाषीक अल्पसंख्याकांचे अधिकार सरंक्षण करणारी चार कलमे राज्यघटनेत आहेत. (कलम नं. २०,३०, ३५० आणि ३५० अ) कलम २० प्रमाणे प्रत्येक व्यक्तिला आपली भाषा, संस्कृती जतन करण्याचा अधिकार आहे. कलम ३० प्रमाणे प्रत्येकाला आपआपल्या आवडीप्रमाणे शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. कलम ३५० प्रमाणे प्रत्येकाला आपले दु:ख शासनाकडे कोणत्याही भाषेतून मांडण्याचा किंवा प्रतिनिधित्वाचा अधिकार आहे.

कलम ३५० अ प्रमाणे प्रत्येक राज्य आणि स्थानिय सत्तेवर बंधन आहे की,भाषीक अल्पसंख्य गटाच्या मुलांना प्राथमिक स्तरावर त्यांच्या मातृभाषेतून त्यांना ज्या सवलती आहेत त्याविषयीच्या सूचना मिळाव्यात.

५) सरकारिया कमिशनने केंद्र आणि राज्य सरकार संबंधाबाबतीत खालील सूचना केल्या आहेत.

१) केंद्र आणि राज्य दोन्ही शासनाचे कार्य जे स्थानीय लोकांच्या संदर्भातील ते कार्य व कामकाज स्थानीय भाषेतून व्हावे.

२) “Three language formula” जो शाळांमध्ये लागू केला आहे; तो सर्वच राज्यामध्ये राबविण्यात यावा. हिंदी, इंग्रजी, आणि प्रादेशिक भाषा या तीन भाषाचे शिक्षण शाळांमध्ये करण्यात आले आहे. त्यांची अंमलबजावणी सर्वच राज्यात समान व्हावी.

सारांश - भारतीय संघराजीय लोकशाहीमध्ये भाषीक आधारावर राज्यांची पुर्नरचना केल्यामुळे एकीकडे विकेंद्रीकरण घडून आले परंतु दुसरीकडे त्यातून अनेक समस्या उद्‌भवल्या. राजकीय इच्छा आणि घटनात्मक तरतुदी (ज्या अल्पसंख्यांकासाठी आहेत) त्यांची प्रामाणिकपणे अमंलबजावणी झाल्यास या समस्या सोडविता येतील. विविधतेतून एकता भारतात निर्माण झाली आहे हे लक्षात घेऊन कोणत्याही प्रश्नाचे राजकीयीकरण होता कामा नये.

## १३.४ वंशभेद (ETHNICITY)

भारतात अनेक वंशाचे लोक राहतात. अनेक शतकापासून काळाच्या ओघात या अनेक वंशाचे एकत्रीकरण होत आहे, झाले आहे. परंतु वंशभेदाची समस्या बरेचदा भारतीय एकात्मतेच्या मार्गात धोका निर्माण करीत असते.

द्रविड आणि आर्य वंशावर भर देवून द्रविडीयन पक्षाची बांधणी झाली आहे. लोकशाही, विकेंद्रीकरण, संघराज्य, लोकांची राजकारणातील सहभाग यामुळे हा भेदभाव दिसत नाही.

इशान्येकडील राज्यांमध्ये मात्र असे घडले नाही. तेथील प्रदेशातील लोक त्यांचा रंग, शारीरीक ठेवण, संस्कृती याबाबतीत स्वतंत्र वंशिकतेचे प्रतिनिधीत्व करतात. या भागातील अनेक गट ते भारतीय असल्याचेही नाकारतात आणि स्वतःची वेगळी व स्वतंत्र वंशिक ओळख यावर भर देतात. त्याच्या मनात परकेपणाची भावना दिसून येते. धर्मांतर केलेल हिंदू जे ख्रिश्चन, मुस्लिम त्यांच्यात समानता दिसून येते. परंतु इशान्य भारतात इतर भारतीयांप्रमाणे समानता कमी आहे. नागालॅन्ड हे एकच भारतातील राज्य आहे ज्यांनी त्यांची राज्याची भाषा इंग्रजी असल्याचे धोरण केले आहे. नॉर्थइस्ट भारतीयन आणि इतर भारतीयांमध्ये फारशी देवाणघेवाण, दळणवळण ही दिसून येत नाही. बरेचदा नॉर्थइस्ट मधून इतर शहरांमध्ये शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली, हैद्राबाद, पुणे येथे अत्याचार झाल्याचे ऐकतो. त्या विद्यार्थ्यांच्या मते त्यांच्यात भेदभाव केला जातो. त्यांना सुरक्षित व स्वतंत्र वाटण्याच्या दृष्टीने उपाय आवश्यक आहेत. ईशान्य राज्यामध्ये सुरक्षिततेचा मोठा प्रश्न आहे. या भागातील बहुतेक राज्यांच्या सीमा चीन देशाच्या सीमाबरोबर लागून आहेत. या भागातील राज्यांच्या सीमा सरंक्षणाच्या दृष्टीने स्पेशल सैन्य ठेवण्यात आले आहे. स्पेशल फोर्स ॲक्ट प्रमाणे संशयास्पद कृती करणाऱ्यांना अटक करण्याचा

अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे या भागात लोकांमध्ये एकप्रकारे असंतुष्टता दिसुन येते. बरेचदा चीनच्या हस्तक्षेपापासून आक्रमणापासून लोकांचे संरक्षण व्हावे म्हणून जे सैन्य ठेवले आहे ते मणिपूर, नागालॅन्ड येथील लोकांच्या विरुद्ध कृती करतात. त्यामुळे या भागातील लोकांमध्ये एक प्रकारे परकेपणाची भावना दिसून येते. अरुणाचल प्रदेश भारताचा भाग नाही असे धोरण चीन बरेचदा घेत असल्यामुळे आणखी गुंतागुंतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागात स्पेशल पोलीस यंत्रणा आणि सैन्य आवश्यक झाले आहे. घुसखोरांविरुद्ध कारवाई करतांना बरेचदा स्थानिय लोकांच्याही मानवी हक्काचा भंग होतो, त्यामुळे शासनाचीही द्विधा मनस्थिती असते. इतर देशांच्या प्रोत्साहणावरुन या भागात घुसखोर, फूट पाडणारे गट सतत कार्यरत असल्याचे दिसते, ज्यामुळे कायदा सुव्यवस्थेची समस्या या भागात उद्भवते.

आसाम तेथील ट्रायबल बोडो यांच्यापासून उद्भवलेल्या समस्येला तोंड देत आहे. बोडो जमातीच्या मते त्यांची जमिन हिसकावून घेण्यात येते. त्यांच्या मुलांना त्यांच्या भाषेतून शिक्षण नाही. १९८९ मध्ये बोडोच्या चळवळीने हिंसक स्वरुप धारण केले होते.

अशाप्रकारे राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात वंशभेद हा सुद्धा अडथळा आहे. विशेषतः नॉर्थईस्टन राज्यांमध्ये जे विभाजनवादी घटक कार्यरत आहेत त्यामुळे विविधतेतून एकता साध्य करणे कठीण होत आहे.

## १३.५ प्रश्न

१) राष्ट्रीय एकात्मकता आणि भाषाभेद भाष्य करा.
२) राष्ट्रभाषेचा प्रश्न यावर टीप द्या.
३) नॉर्थइस्ट राज्यातील वंशभेदाची समस्या यावर लिहा.

❖❖❖❖

# १४

# भारताचा आर्थिक विकास आणि आर्थिक धोरणातील सुधारणा

## (Impact of Economic development and Reforms in the Indian Policy)

**घटक रचना :**

१४.० उद्दीष्ट
१४.१ प्रस्तावना
१४.२ आर्थिक विकासातील समस्या
१४.३ स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासाचे नियोजन
१४.४ नेहरूनंतरचे विकासाचे धोरण
१४.५ नविन आर्थिक धोरण व आर्थिक सुधारणा
१४.६ सारांश
१४.७ प्रश्न

## १४.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१) स्वातंत्र्यानंतर भारताला तोंड द्यावे लागणाऱ्या मुख्य आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
२) आर्थिक विकासासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांचे परिक्षण करणे.
३) उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकरणाचे धोरण समजून घेणे.

## १४.१ प्रस्तावना

देशाचा आर्थिक विकास तेव्हाच शक्य होतो जेव्हा उपलब्ध साधनांचा (available resources) आणि मानवी शक्तीचा योग्य उपयोग (proper utilization of manpower), त्यांचे पध्दतशीर नियोजन, तांत्रीक क्रांती तेंव्हा औद्योगिक उत्पादन वाढते आणि राष्ट्रीय संपत्तीमध्ये वाढ होते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेसाठी देशामध्ये शांतता, स्थिरता आणि विकासासाठी वाहून घेतलेले सत्ताधारी असणे आवश्यक असते. अशा पध्दतीनेच युरोपमध्ये औद्योगिकरण आणि आर्थिक सुबत्ता आली. भारतात मात्र ब्रिटिश राजवटीखाली भारत असतांना वेगळेच चित्र होते. भारताकडे नैसर्गिक साधनसंपत्ती भरपूर असून सुध्दा "श्रीमंत देश जिथे गरीब लोक राहतात" अशी स्थिती होती. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी भारताच्या

आर्थिक विकासाच्या दृष्टीने कोणतीही पाऊले उचलली नाही. भारताची परंपरागत आर्थिक व्यवस्था ही ब्रिटीशांनी खिळाखिळी केली होती. भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीची त्यांनी लूट केली होती. भारतातील कुटीरोद्योग नष्ट केले होते. युध्दाचा खर्च भारताच्या अर्थव्यवस्थेवर केला जात होता. भारताच्या आर्थिक विकासाच्या काळजीचा त्यांच्यात अभाव होता. त्यामुळे भारताची आर्थिक व्यवस्था ब्रिटिश काळात हलाखीची होती. स्वतंत्र्यांनंतर भारताचा आर्थिक विकास हे एक फार मोठे आव्हान भारतीय नेत्यांपुढे होते.

## १४.२ आर्थिक विकासातील समस्या
## (Problems of Economic Development)

स्वतंत्र भारतापुढे देशाच्या आर्थिक परिस्थिती आणि विकासाविषयी अनेक समस्या होत्या. देशाच्या आर्थिक विकासाला पोषक व पुरक परिस्थिती नव्हती. कारण ब्रिटिशांनी भारताला वसाहत बनवून भारतीय अर्थव्यवस्थेचे शोषण केले होते. स्वातंत्र्यानंतर भारताकडे भांडवल, वीज, पाणीविषयक सोयीसुविधांचा अभाव होता. खनिजसंपत्ती व नैसर्गिक संपत्तीने समृध्द देश असूनही देशाचा आर्थिक विकास शून्य होता. भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय शेती होता. शेतीप्रधान देश असूनही शेतीविषयक, कोणतीही प्रगती झाली नव्हती. नैसर्गिक पावसावर शेती अवलंबून होती. जमीनदारी आणि सरंजामशाही पध्दती अस्तित्वात होती. बहुतेक जमीन जमीनदारांकडे होती, बहुसंख्याक शेतकरी भूमीहीन होते. अशिक्षिताचे प्रमाण ८०% होते.

देशाच्या विभाजनाच्या वेळी सुपीक जमिन पंजाबमध्ये असलेली बरीचशी पाकीस्तानला गेली होती. त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनावर त्याचा परिणाम झाला होता. बंगाल मध्ये असलेल्या ज्यूटमिल्स बांगलादेशमध्ये गेल्या. आंतरराष्ट्रीय व्यापार करार विषयक समस्या होती. शेजारील राष्ट्रांची भारताप्रती भावना द्वेषाची होती. देशाचे विभाजनाच्या वेळी मालमत्तेचे विभाजन झाले होते. शिवाय देशाच्या विभाजनानंतर शरणार्थी लाखोने भारतात येते होते. त्यांच्या पुर्नवसनाचा प्रश्न होता. त्याशिवाय जातीय दंगे, कापाकापी इत्यादीला विभाजनानंतर सीमाभागात उत आला होता. कायदा सुव्यवस्था नष्ट झाली होती. भारतालाकाश्मीर सीमेवर युध्दाला तोंड द्यावे लागले. भारतातील स्वतंत्र्य राजांना एकत्रित आणण्याची प्रक्रिया सुरू होती, त्यासाठी त्यांना फार मोठा मोबदला द्यावा लागत होता.

प्रचंड लोकसंख्या (over population) चा प्रश्न होता, नैसर्गिक संपत्तीपेक्षा कितीतरी पटीने लोकसंख्या वाढली होती. शिक्षणाचा अभाव, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव कालबाह्य धार्मिक रूढीपरंपरा, लोकसंख्या नियत्रंणाच्या उपाययोजनांना अपयश इत्यादी अनेक समस्या होत्या.

भारताची शेती म्हणजे पावसावर अवलंबून असणारा जूगार होता. पाऊस पडला नाही तर दुष्काळ आणि अति पडला तर पूर नेहमीचेच झाले होते. जमीनीचे आधुनिकरण व यांत्रीकीकरण जमिन खाजगी मालकीचे असल्यामुळे अशक्य झाले होते. शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा वापर नव्हता. काहीभागात नद्या नाही म्हणून नद्या जोडून प्रकल्प उभारण्याचे धोरण नव्हते. कोणतेही राज्य पाणी वाटपाच्या दृष्टीने पुढे येत नव्हते. प्रादेशिकता आर्थिक विकासाच्या मार्गातील मोठा अडथळा होता. फॅक्टरी किंवा एखादी योजना राबवितांना राष्ट्रीय आर्थिक विकासाचा विचार न करता प्रदेशाला महत्त्व देणे असेही प्रकार होत होते.

दारिद्र्य आणि बेकारी याही समस्या आर्थिक विकासाच्या मार्गात होत्या. व्यापार, उद्योग यात गुंतवणूक न करता सोने व संपत्ती जमविणे याकडे लोकांचा ओढा होता. परकीय भांडवलावर विकासासाठी अवलंबून राहावे लागते होते. पुरेशी तांत्रिक प्रगती झाली नसल्यामुळे परकीय तांत्रीक ज्ञानावर अबलंबन होते. असे परावलंबन म्हणजे आर्थिक ओझेच होते. शासकीय सवलतीवर लोक अधिक लक्ष देत. स्वातंत्र्यानंतर वरील प्रकारे अनेक समस्यांना शासनाला तोंड द्यावे लागले. आर्थिक विकास आणि भरभराट जलद होण्याला त्यामुळे प्रतिबंध येत होते.

## १४.३ स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासाचे नियोजन (Planned Economic development)

देशाच्या आर्थिक विकासाच्या बाबतीत स्वातंत्र्यानंतर मुख्यतः तीन प्रकारचे विचारप्रवाह होते.

१) गांधीवादी विचार
२) भांडवलवादी आर्थिक धोरण
३) साम्यवादी विचारप्रवाह

गांधीवादी विचारप्रवाहाप्रमाणे देशाचा आर्थिक विकास कुटीरोद्योगांना ग्रामोद्योगांना चालना देणे, ग्रामीण विकासावर भर देणे, शेतीचा विकास करणे मोठ्या उद्योगाची निर्मिती करणे या गोष्टींना प्राधान्य देणारे होते. अर्थात हे धोरण पाश्चात्य विकासपध्दतीपेक्षा पूर्णपणे वेगळे होते. मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण व यांत्रीकीकरणामुळे भारतातील बेकारीची समस्या सुटणार नाही. भारत मूळ खेड्यांचा आणि शेतीप्रधान देश असल्यामुळे भांडवलवाद भारतात योग्य नाही असे गांधीवादी विचारप्रणालीचे मत होते.

दुसरा विचारप्रवाह, भांडवलवादाला प्रोत्साहन देणारा होता. मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण करावे, यांत्रीकीकरण करावे. (लक्झरी) सुखसोयीच्या उत्पादनाला महत्त्व द्यावे असे भांडवलवादी विचारप्रवाहाचे मत होते.

तिसरा विचारप्रवाह विकासाची साम्यवादी व समाजवादी पध्दती होय. साम्यवादी विचारप्रवाह मतांप्रमाणे साम्यवादामुळे देशाचा आर्थिक विकास आर्थिक प्रगती होते. सामाजिक न्याय सुध्दा त्यामुळे प्रस्थापित होतो.

साम्यवादाप्रमाणे सर्व उत्पादनाची साधने, जमिन राज्याच्या मालकीची करण्यात यावी. राज्याच्या संपूर्ण नियंत्रणाखाली आर्थिक व्यवहार असावेत. ग्रामीण विकासाचे मॉडेल त्यांना मान्य नव्हते.

स्वातंत्र्यानंतर भारतापुढे आर्थिक विकासाचे वरील विचारप्रवाह होते. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु होते. त्यांनी १९५२ पासून खालील आर्थिक धोरणाचा भारतात स्विकार केला आणि ते आर्थिक धोरण अमंलात आणले. त्यांनी भारतासाठी जे आर्थिक धोरण नियोजित केले तेव्हा भारतापुढे दोन पर्याय होते.

१) भांडवलशाही अर्थव्यवस्था
२) साम्यवादी अर्थव्यवस्था.

या दोन पर्यायापैकी एक पर्याय नेहरुंनी निवडावा म्हणून त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय दडपण ही होते. परंतु या दोन्ही अर्थव्यवस्थेचे गुण दोष, फायदे तोटे याबाबतीत नेहरु जागरुक होते. भांडवलशाही व्यवस्थेला आवश्यक भांडवल, इन्फ्रास्ट्रक्चर भारताकडे त्यावेळी नव्हते. साम्यवादी अर्थव्यवस्था जी क्रांतीतून येणारी होती तिचा विचार भारतासाठी करणे त्यांना योग्य वाटले नाही. देशाच्या गरजा, परिस्थिती लक्षात घेऊन "मिश्र अर्थव्यवस्था" त्यांनी स्वीकारली. नेहरुंवर काही प्रमाणात गांधी विचारांचा प्रभाव होता.

नेहरुप्रणित आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये :

१) लोकशाही समाजवाद (Democratic Socialism)
२) नियोजित अर्थव्यवस्था (Planned Economy)
३) शेतीचे आधुनिकीकरण (Moderanisation of Agriculature)
४) जमिनीविषयक सुधारणा (Radical Land Reforms)
५) मिश्र अर्थव्यवस्था, परंतु सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व (Mixed Economy Dominated by Public Secotr)
६) औद्योगीकरण (मोठ्या उद्योगांचे) (Industrialization)
७) विज्ञान आणि तंत्रज्ञान विकास (Development of Science and Technology)
८) अर्थव्यवस्थेवर राज्याचे नियंत्रण (The State Control on Economy)
९) ग्रामीण अर्थव्यवस्थेला महत्व (Significance to Rural Economy)
१०) परकीय गुतंवणूकीवर मर्यादा
११) शेती व औद्योगीकीकरणाचा समतोल (Balance Between Agriculture and Industry)

१) **लोकशाही समाजवाद** - भारतात लोककल्याणकारी राज्य निर्माण करणे, लोकांना किमान राहणीमान उपलब्ध करुन देणे, जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी लोकशाही समाजवाद योग्य मार्ग आहे असा नेहरुंचा विश्वास होता.
लोकशाही समाजवाद मार्क्सवादी समाजवादापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. लोकशाही समाजवादामध्ये समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शांततामय आणि लोकशाही मार्गाचा अवलंब यावर भर होता. घटनात्मक मार्गाने समाजात लोककल्याण साधून समाजवादी व्यवस्था आणणे हे उद्दिष्ट्य होते.

२) **नियोजित अर्थव्यवस्था** - नियोजनाशिवाय आर्थिक प्रगती शक्य नाही हे लक्षात घेऊन नियोजन मंडळ स्थापन करण्यात आले. या नियोजनमंडळाने देशाची भौतिक परिस्थिती, भांडवल, मानवी साधनसंपत्ती या सर्व गोष्टींचा विचार करुन भारतीय अर्थव्यवस्थेचे नियोजन केले. १९५१ सालापासून पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या.

३) **शेतीचे आधुनिकीकरण** - भारत शेतीप्रधान देश आहे. शेतीच्या विकासासाठी शेतीचे आधुनिकीकरण करण्यात आले. त्यासाठी डॅम, धरणे, पाटबंधारे बांधणे यावर भर दिला. आधुनिक बिबियाणे, आधुनिक खते शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले. ग्रामीण

भागात जागृकता आणण्यास आणि सुधारणा आणण्यास "कम्युनिटी डेव्हलपमेन्ट प्रोग्रॅम" सारखे कार्यक्रम राबविण्यात आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेती आणि औद्योगीकरणाचा समतोल विकास यावर भर देण्यात आला. शेतीविषयक हरितक्रांती घडविली.

४) **जमिनीविषयक सुधारणा** - भारतातील सारंजामशाही आणि जमीनदारी पध्दती शोषणास कशी कारणीभूत झाली आहे याच अंदाज असल्यामुळे नेहरुंनी आपल्या धोरणात जमिनीविषयक सुधारणांना प्राधान्य दिले. जमीनदारी निर्मूलन कायदा, कूळ कायदा, जमिनीवर सिलिंग इत्यादी कायदे करुन जमिनीविषयक सुधारणा केल्या. जमिनीचे पुर्नविभाजन करुन भूमिहीन शेतकरी आणि जमीनदार यांच्यातील असमता नष्ट करण्याला प्राधान्य दिले.

५) **मिश्र अर्थव्यवस्था** - मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्रांना प्राधान्य देणारी व्यवस्था. नेहरुप्रणित मिश्रअर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांचा मेळ होता.

६) **औद्योगीकरणाला प्राधान्य** - मोठ्या उद्योगांना चालना उदा. खाणी, वीज, हायड्रोइलेक्ट्रिसिटी तयार करणे, बहुउद्देशीय प्रोजेक्ट राबविणे इत्यादींना प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणात औद्योगीकरणाला चालना देण्यात आली. हे औद्योगीकरण करताना ग्रामीण वशहरी विकासाचा समतोल साधण्यात आला.

७) **विज्ञान तंत्रज्ञान प्रगतीवर भर** - वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी उच्च शिक्षण, संशोधन कार्य यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या. ऑल इंडिया इन्स्टिटट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, द इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट, ॲग्रीकल्चरल इन्स्टिटट्यूट इत्यादींची स्थापना करण्यात आली.

८) **नियंत्रित अर्थव्यवस्थेला प्राधान्य** - राज्याचे कायदे, लायसन, परमिट इत्यादींव्दारे शासनाची परवानगी उद्योगधंदे सुरु करण्यासाठी आवश्यक होती. कारण नेहरुप्रणित अर्थव्यवस्था नियंत्रित अर्थव्यवस्था होती म्हणूनच १९५० ते १९८० या काळाला "लायसनराज" म्हणतात.

९) **ग्रामीण अर्थव्यवस्थेला प्राधान्य** - ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी लघु व कुटीरोद्योगांना मदत्व देण्यात आले. लघुउद्योगांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारेलच त्याशिवाय अनेक बेकारांना त्यामुळे रोजगार उपलब्ध होईल असे उद्दिष्ट्य त्यामागे होते.

१०) **परकीय गुंतवणूक** - परकीय गुंतवणूक, आयातनिर्यात याबाबतचे नियम कडक होते. भारताला स्वबळावर स्वावलंबी, स्वयंपूर्ण करणे हे त्यामागे उद्दिष्ट्य होते. तरीही परकीय गुंतवणूक करण्याला बंदी नव्हती. परंतु त्याबाबतीत अतिशय कडक नियम होते. विशिष्ट अटीवरच परकीय गुंतवणूकदारांना परवानगी देण्यात येत असे.

११) **औद्योगीकरण आणि शेतीचा समतोल विकासावर भर** - १९५० ते १९७० च्या आर्थिक नियोजनामध्ये या समतोलावर भर होता असे दिसते. एकीकडे शेतीच्या विकासाला

चालना देण्यात आली होती आणि दुसरीकडे मोठ्या उद्योगधंद्यांना प्राधान्य देऊन औद्योगीकरणाला चालना देण्यात आली. उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना उदा. ऑटोमोबाईल इन्डस्ट्रीज इत्यादींवर निर्बंध घालण्यात आले होते.

**१९७० ते १९९० या काळातील आर्थिक धोरणांमध्ये काही बदल करण्यात आले होते -**

१९६४ साली पंडित नेहरुंच्या मृत्यूनंतर चौथी पंचवार्षिक योजना विकसित झाली. त्यानंतरच्या आर्थिक धोरणामध्ये काही बदल करण्यात आले होते कारण १९६० पर्यंतच्या आर्थिक धोरणाचे यशापयश लक्षात घेण्यात आले. दुसरे म्हणजे चीनबरोबर झालेले युध्द, पाकिस्तानबरोबर झालेली दोन युध्दे या परिस्थितीमुळे १९६० नंतरच्या आर्थिक धोरणात थोडासा बदल करण्यात आला.

राजीव गांधी शासनाने अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणाला प्राधान्य दिले त्यासाठी कॉम्प्यूटर, टेलीकम्युनिकेशनच्या प्रगतीवर भर दिला. परकीय गुंतवणूकदारांना भारतात येण्यास परवानगी देऊन अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाला प्रोत्साहन दिले. खाजगी उद्योगक्षेत्रांना प्रोत्साहन दिले. नेहरुप्रणित आर्थिक धोरणांच्या वैशिष्ट्यांवरुन नेहरुच्या आर्थिक धोरणांची उद्दिष्टे स्पष्ट होतात. नेहरूप्रणित आर्थिक धोरणाची उद्दिष्टे :

१) **वास्तववादी दृष्टिकोन** - भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या गरजा व परिस्थितीला योग्य ठरेल अशी आर्थिक व्यवस्था निर्माण करणे. त्यासाठी ग्रामीण आणि शहरी विकासाचा समतोल प्रस्थापित करणे. ग्रामीण कुटीरदोग व शहरी उद्योग यांच्यात समतोल साधणे. देशांतर्गत स्वालंबन आणि स्वयंपूर्णतः आणणे; त्यासाठीच देशी उद्योगांना संरक्षण होते आणि आयातीवर बंदी होती. प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे. हा वास्तववादी दृष्टिकोन या आर्थिक धोरणाचा होता.

२) **मानवतावादी दृष्टिकोन** - पैशासाठी मानवी बलिदान देणारी व्यवस्था त्यांना नको होती. राज्यघटनेत स्पष्च केलेल्या भारतीय राज्याला उद्दिष्टाची पूर्तता करणे यावर त्यांचा भर होता. ही उद्दिष्टे म्हणजे भारतात प्रत्येकाला न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता प्राप्त होईल अशी पसस्थिती निर्माण करणे त्यासाठीच "राज्यनियंत्रित" "मिश्र अर्थव्यवस्था" स्वीकारली होती.

३) **लोकशाही समाजवाद स्थापन करणे** - भारतीय जमिनदारी व्यवस्था, भांडवलशाही, सरंजामशाही व्यवस्था बदलून समाजाची पुनर्रचना करणे यावर भर होता. गरिबी हटाव, बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांची तनखेबंदी अशी धोरणे आखली होती.

**नेहरुप्रणित आर्थिक धोरणाचे मूल्यमापन :**

**टीका :**

१) नवउदारमतवाध्यांच्या मते नेहरुंच्या आर्थक धोरणामुळे देशाच्या आर्थिक विकासाला गती आली नाही. जगांमध्ये भारत आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगती करणारा देश म्हणून गणला गेला नाही.

२) टिकाकारांच्या मते नियोजन व नियंत्रण असलेल्या अर्थव्यवस्थेमुळे बहुराष्ट्री कंपन्या, खाजगी उद्योगकर्ते भारतात प्रवेश करु शकले नाही, नवीव नवीव उद्योग भारतात स्थापन झाले नाही. आधुनिक तंत्रज्ञान व प्रगतीचा शिरकाव भारतात होऊ शकला नाही.

३) नोकरशाहीला अति महत्व प्राप्त झाले – लायसन, परमिट मिळविणे, खाजगी व नवीन उद्योजकांसाठी शासनाची परवानगी घेण्यासाठी आवश्यक होते. त्यामुळे नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी कठीण व गुंतागुंतीच्या प्रक्रयेतून जाताना भ्रष्ट्राचार, लालफीतीचा कारभार, वेळकाढूपणा, वशिलेबाजी, बाबूराज इत्यादी व्यवस्थेत आले. नवीन उद्योजकांना प्रोत्साहन मिळत नव्हते.

**योगदान -** नेहरुप्रणित आर्थिक धोरणांवर टीका होत असली तरी या आर्थिक धोरणाचे योगदान नाकारले जाऊ शकत नाही.

१) आधुनिक भारताचा आर्थिक पाया घातला आणि मजबूत केला - आर्थिक विकासासाठी जो पाया आवश्यक असतो त्या पायाची घडण या आर्थिक धोरणाने केली होती. देशामध्ये मूलभूत व मोठ्या उद्योगधंद्याची बांधणी नेहरुप्रणित आर्थिक धोरणाने केली. लोकांना मूलभूत सोयी व गरजा उपलब्ध झाल्यात हा पाया पक्का व मजबूत झाल्यामुळे त्याच्यावर नव्या आर्थिक धोरणाची इमारत बांधता आली.

२) नेहरुप्रणित आर्थिक धोरण काळाची गरज होती. भारताला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबतीत स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविण्याचे कार्य या आर्थिक धोरणाने केले. आज जगातील तांदूळ निर्यात करणारा भारत दुसऱ्या क्रमाकांवर देश आहे. जगात औद्योगिक प्रगती करणारा भारत बारव्या क्रमाकांचा देश आहे.

३) नेहरु भारतीय आर्थिक नियोजनाचे संस्थापक आहेत. आशिया आणि आफ्रिका या देशातील विकासामध्ये त्यांची आर्थिक निय.ोजनाची कल्पना स्वीकारण्यात आली.

४) भारतीय राज्याचे राज्यघटनेमध्ये असलेले उद्दिष्ट साध्य – सर्व लोकांचे कल्याण होईल अशी व्यवस्था निर्माण करुन सर्व लोकांना न्याय - सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात उपलब्ध होईल यादृष्टीने या नियोजनामध्ये भर होता. भौतिक प्रगती (पैसा) यापेक्षा मानवी प्रगती साध्य करणे हेत नियोजनाचे उद्दिष्ट्य होते आणि ते उद्दिष्ट्य बऱ्याचशा प्रमाणात साध्य झाले आहे.

५) भारताने बहुतेक क्षेत्रात स्वावलंबन व स्वयंपूर्णता साध्य केली आहे.

**सारांश : नेहरुप्रणित आर्थिक धोरण**

१) प्रस्तावना : आर्थिक व्यवस्था व राजकीय व्यवस्था घनिष्ठ संबंधित

२) स्वातंत्र्यानंतर भारतापुढे असलेले पर्याय

३) नेहरुप्रणित आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये –

   १) लोकशाही समाजवाद

   २) नियोजित अर्थव्यवस्था

३) शेतीचे आधुनिकीकरण
४) जमिनीविषयक सुधारणा
५) मिश्र अरथव्यवस्था
६) औद्योगीकरण
७) विज्ञान तंत्रज्ञान विकास
८) अर्थव्यवस्थेवर राज्यांचे नियंत्रण
९) ग्रामीण अर्थव्यवस्थेला महत्व
१०) परकीय गुंतवणूकीवर मर्यादा
११) शेतीविकास व औध्योगीकरण समतोल

४) नेहरूप्रणित आर्थिक धोरणाची उद्दिष्ट्ये

५) मूल्यमापन –
१) टीका २) योगदान

## १४.४ (१९७० ते १९९०) नेहरुनंतर आर्थिक विकासाचे धोरण

१९७० च्या नंतर आर्थिक विकासाच्या बाबतीत काही सुधारणा आणि बदल झाले. सार्वजनिक क्षेत्राची (public sector)कार्यपध्दती यावर बरीच टीका झाली. आर्थिक फायद्यापेक्षा सार्वजनिक क्षेत्रामध्ये ते अमलात आणण्यावर अधिक खर्च होत होता. वेळकाढूपणा, बाबूराज वाढले होते. कोणताही निर्णय ताबडतोब होत नसे. सार्वजनिक क्षेत्रातील नोकरशाहीमध्ये आळशीपणा वाढला होता. कोणतीही स्पर्धा नसल्यामुळे परफॉर्मन्स चांगला करणे, खर्च कमी करणे, नवीन गोष्टी आणणे या गोष्टी होत नव्हत्या. कुणालाही नोकरीतून काढून टाकण्याचे भय नसल्यामुळे सरकारी नोकऱ्या म्हणजे वेळकाढूपणा झाला होता. काही न करता सरकारी नोकरांना शासकीय नियमाप्रमाणे पगारवाढ प्रमोशन होत होते. उदा. रेल्वे, फॅक्टरीज तोट्यामध्ये चालविल्या जात होत्या. कामगारांना काम असावे यादृष्टीने कामगार युनियन वाढल्या होत्या. नोकरशाहीला अति महत्व प्राप्त झाले होते. यामुळे आर्थिक धोरणाच्या बाबतीत नवीन विचार उदयास आले.

नवीन आर्थिक विचारांमध्ये खालील सूचना विचारकांनी सुचविल्या होत्या :

१) खाजगी क्षेत्राचा विकास व्हायला पाहिजे. जे सार्वजनिक क्षेत्र तोट्यात होते खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात यावे असे मत होते.
२) राष्ट्रीयीकरण (Nationalization) बंद करावे
३) तुटीचे अंदाजपत्रक असू नये.
४) शासकीय खर्चामध्ये कपात करण्यात यावी.
५) लायसन, परमीट पध्दती बंद करावी.
६) परकीय मदत आणि परकीय कंपन्या, बहुराष्ट्रीय कंपन्या यांनी भारतात गुंतवणूक करावी त्यादृष्टीने भारताने आपले आंतरराष्ट्रीय धोरण करावे.
७) शासनाने अमेरिकेच्या बाजूने दृष्टीकोन ठेवावा, अमेरिकेच्या मदतीने भारताचा आर्थिक विकास होऊ शकेल.

अशाप्रकारे आर्थिक धोरणामध्ये सुधारणा सुचविण्यात आल्या होत्या. पंतप्रधान नेहरुनंतर लालबहादूर शास्त्री फार कमी काळ पंतप्रधान होते. त्यांच्याकाळात आर्थिक विकासाच्या धोरणात कोणताच बदल करण्यात आला नाही. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी नेहरुंचेच आर्थिक विकासाचे धोरण चालविले. भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी व्हावे असे त्यांचे मत होते. त्यादृष्टीने हरितक्रांतीचे धोरण बरेच यशस्वी झोले. परंतु काही टीकाकारांच्या मते हरितक्रांतीचा फायदा फक्त श्रीमंत शेतकऱ्यांना झाला. गरिब शेतकऱ्यांच्याबाबतीत त्यामुळे कोणताही बदल झाला नाही. उलट ग्रामीण भागात त्यामुळे श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी असे वर्ग व त्यांच्यात संघर्ष उद्भवले. वेस्ट बंगाल आंध्र मध्ये नक्षलवादी चळवळी उदयास आल्या. लॅन्ड सीलिंग, जमिनीचे गरीब शेतकऱ्यांना वाटप इत्यादी शासकीय प्रयत्न अयशस्वी झाले.

१९७० च्या दरम्यान खुल्या व्यापाराचे धोरण (free trade policy) स्वीकारावे असे मत व्यक्त करणारा एक विचारप्रवाह होता. समाजवादाला महत्व द्यावे असा दुसरा विचारप्रवाह; होता. काहींच्या मते आहे ती परिस्थिती तशीच ठेवावी असा एक विचारप्रवाह होता. सत्तारुढ कॉंग्रेसमध्येच हे विविध विचारप्रवाह उदयास आले होते. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विकासाचा समाजवादी मार्ग स्विकारला. बॅकांचे राष्ट्रीयीकरण केले, लोकांना फायदा देणारी धोरणे स्वीकारलीत, आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय या दोन्हीला त्यांनी प्राधान्य दिले. "गरीबी हटाओ" च्या घोषणा झाल्या, पंचवार्षिक योजनांमध्ये त्याला प्राधान्य देण्यात आले. परंतु आर्थिक विकासाची संस्थात्मक रचना तीच ठेवण्यात आली. नोकरशाहीची दृष्टी, निर्णय पुढे ढकलण्याची वृत्ती, जबाबबदारी टाळणे, आळशीपणा, बेशिस्त, वेळकाढूपणा इत्यादी संस्थात्मक रचनेतील नोकरशाहीच्या वृत्ती त्याच राहिल्यामुळे आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय आणणे या धोरणालाही फरसे यश आले नाही.

(Capitalist model ) भांडवलशाही पध्दतीप्रमाणे भारताचा आर्थिक विकास करावा या विचाराला हळू हळू महत्त्व प्राप्त झाले. भारताची अर्थव्यवस्था जागतिक भांडवलशाही पध्दतीला जोडायला सुरुवात झाली.

अर्थात आंतरराष्ट्रीय घडामोडीही यासाठी कारणीभूत झाल्या. सोव्हिएट युनियनचे कोसळणे, समाजवादी देशांची आर्थिक विकासामध्ये अयशस्विता, भांडवलशाही देशांची झालेली प्रगती या जागतिक घटनांमुळे भारतात नवीन आर्थिक धोरण स्विकारण्याची वाटचाल सुरु झाली.

राजीव गांधी पंतप्रधान असतांना त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी नवीन आर्थिक धोरण आणण्यासाठी वाटचाल सुरु केली.

भारताच्या आधीच्या आर्थिक धोरणातील नोकरशाही, शासनाचा अति हस्तक्षेप, लायसन परमीटच्या स्वरुपातील मर्यादा यामुळे भारतीय बाजारपेठेत परकीय फर्म येण्यास तयार नसत. भारतीय अर्थव्यवस्था खुली व मुक्त करावी यादृष्टीने राजीव गांधी यांनी प्रयत्न केले.

१) आर्थिक क्षेत्रातील शासकीय हस्तक्षेप कमी केला. आर्थिक विकासाच्या क्रियांमध्ये शासनाचा हस्तक्षेप कमी केला, आणि त्याचवेळी खाजगी क्षेत्राला चालना दिली.

२) आर्थिक क्षेत्रामध्ये नियोजन कार्यांना जास्त वाव दिला.

३) उद्योगधंद्यामध्ये उच्च दर्जाची तांत्रिकता आणून उद्योगांचे आधुनिकरण केले.

४) बाजारपेठीय तंत्राचा विकास केला.

राजीव गांधी पंतप्रधान असतांना आर्थिक धोरणात वरील प्रकारे बदल करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, आणि a market mechanism आणले. राजीव गांधीनंतर व्ही.पी. सिंग पंतप्रधान झाले, परंतु त्यांनी आर्थिक क्षेत्रात कोणत्याही सुधारणा केल्या नाही. साधारणपणे १९८० पासूनच आर्थिक क्षेत्रात आणि धोरणात बदल करण्याचा विचार अनेक अर्थशास्त्रज्ञांनी मांडला.

## १४.५ नवीन आर्थिक धोरण व आर्थिक सुधारणा :

### १४.५.१ प्रस्तावना :

२४ जुलै १९९१ साली नरसिंहराव शासनाने नवीन आर्थिक धोरण ठरविले आणि राबविले. जुन्या आर्थिक धोरणापेक्षा नवीन आर्थिक धोरण पूर्णपणे वेगळे होते. पूर्णपणे रचनात्मक बदल त्यात आहे. नवीन आर्थिक धोरणाला "खुले आर्थिक धोरण" "मुक्त अर्थव्यवस्था" आणि "प्रो मार्केट रिफॉर्म पॉलिसी" म्हणतात. जागतिक आर्थिक धोरणाशी आणि भांडवलवादाशी हे धोरण संबंधित आहे.

### १४.५.२ भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:

१) To restore and sustain the high growth - १९९१ सालापर्यंत भारताची आर्थिक आणि राजकीय व्यवस्था परिपक्व झाली होती. असे लक्षात आले की जलद आर्थिक प्रगतीसाठी सार्वजनिक क्षेत्रांची महत्वाची भूमिका आहे. बहुतेक सार्वजनिक क्षेत्र जलद आर्थिक प्रगती करण्याच्या दृष्टीने भारतात अयशस्वी झाले होते. त्यामुळे "मिश्र अर्थव्यवस्थे" कडून खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाला महत्व देणारी अर्थव्यवस्था स्वीकारणे भाग पडले.

२) परकीय कर्जाचा वाढता बोजा - त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताची पत धोक्यात आली होती.

३) संरक्षण व्यवस्थेवर वाढता खर्च - शस्त्रास्त्र खरेदीसाठी मोठी आर्थिक तरतूद करणे गरजेचे होते.

४) तोट्यात चालणारे सार्वजनिक उद्योग व त्यामुळे झालेले आर्थिक नुकसान.

५) कर्जासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडे भारताला गहाण टाकावे लागलेले ६७ टन सोने. इत्यादी समस्यांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण झाली होती. अर्थकारणात स्थैर्य आणण्यासाठी रचनात्मक सुधारणा आवश्यक होत्या. वरील आर्थिक संकटांवर मात करण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या १) व्यापार २) उद्योग ३) सार्वजनिक उद्योग ४) परकीय भंडवल गुंतवणूक ५) परदेशी तंत्रज्ञान आयात ६) आर्थिक व्यवहार या सहा क्षेत्रांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

६) विकसनशील राष्ट्रांनी उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार करावा यासाठी अमेरिकेसारख्या महासत्ता, विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा दबाव होताच. त्यामुळे जगातील नवीन आर्थिक कल आणि देशापुढे असलेली परिस्थिती लक्षात घेऊन तेव्हाचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी नवीन आर्थिक धोरण स्वीकारले.

**१४.५.३ वैशिष्ट्ये –** नवीन आर्थिक धोरणाला L.P.G मॉडेल, मुक्त बाजाराला महत्व देणारे आर्थिक धोरण म्हणतात. या नवीन धोरणाची मुख्य वैशिष्टये खालील होती :

१) उदारीकरण (Liberalisation)
२) खाजगीकरण (Privatization)
३) जागतिकीकरण (Gobalisation)
४) मुक्त बाजार (Market-friendly State)
५) आधुनिकीकरण (Modernization)
६) खाजगी क्षेत्राला भर (Emphasis to the private sector)

**१) उदारीकरण (Liberalisation) -** जागतिकीकरण आणि उदारीकरण या परस्परपूरक प्रक्रिया आहेत. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही आंतरराष्ट्रीय एकीकरणाच्या तत्त्वावर आधारित आहे. आंतरराष्ट्रीय एकीकरण साधण्याचा आर्थिक उदारीकरण हा मार्ग एक साधन आहे.

आर्थिक उदारीकरण ही राष्ट्रीय अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेला जोडण्याची प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया 'मुक्त व्यापाराच्या उद्दिष्टावर आधारित आहे. यात देशाची अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी मुक्त केली जाते. आयात निर्यातीवरील निर्बंध काढून टाकले जातात. आर्थिक व्यवहारातील सरकारची भूमिका मर्यादित होते. बाजारपेठ शक्तींना महत्त्व प्राप्त होते. भांडवलाची गुंतवणूक, उत्पादनाची मर्यादा, त्याची निर्यात यामध्ये सरकारी हस्तक्षेप कमी होतो. उद्योजकांना पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होते. बहुराष्ट्रीय कंपन्या, विभागीय व्यापार संघ, व्यापार राजवटी यांची राष्ट्राच्या राजकीय आणि आर्थिक सार्वभौमत्वावर बंधने येतात. एकूण ही राष्ट्रीय अर्थव्यवस्थांना जोडणारी प्रक्रिया आहे.

उदारीकरण म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य (Economic Freedom) होय. नियंत्रित अर्थव्यवस्था यापासून उदारीकरण पूर्णपणे वेगळे आहे. नेहरूप्रणित आर्थिक व्यवस्था राज्यनियंत्रित' होती. नवीन आर्थिक धोरणात उदारीकरण स्वीकारले आणि त्यादृष्टीने खालील बदल केलेत.

अ) परकीय गुंतवणूकीला प्रेरणा - भारतात कोणताही व्यापार उद्योग सुरू करण्यास परकीय गुंतवणूकदारांना प्रेरणा व मोकळीक देण्यात आली. परकीय भांडवल गुंतवणूकीवरील निर्बंध उठविण्यात आले.
ब) उद्योगक्षेत्र परवानामुक्त - लायसन, परमिट, परवाना रद्द. व्यापारावर नियंत्रण आणणाऱ्या गोष्टी काढून टाकल्या.
क) खाजगी व परकीय बँकांना देशामध्ये प्रवेश देण्यात आला.
ड) आयातीवर निर्यातीवर कोणतेही बंधन नाही – त्याविषयी स्वातंत्र्य दिले.

**२) खाजगीकरण (Privatization) -** बहुतेक सर्व क्षेत्र खाजगी कंपन्यांकडे सुपुर्द करण्यात आली. लोखंड, स्टील, वीज, विमानसेवा इत्यादी सेवा आणि क्षेत्र सुद्धा खाजगी कंपन्यांकडे देण्यात आले. मक्तेदारी व व्यापार कायदा केला.

**३) जागतिकीकरण (Gobalisation) -**

**जागतिकीकरणाची मुख्य तत्त्वे :**

अ) आयात निर्यातीवरील निर्बंध शिथिल करणे.
ब) भांडवलाच्या मुक्त वाहनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे.
क) तंत्रज्ञानाच्या मुक्त वाहनासाठी आवश्यक उपाययोजना करणे.
ड) श्रमिकांच्या मुक्त वहनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे.

मुक्त व्यापार आणि मुक्त बाजारपेठांच्या माध्यमातून जागतिकीकरण करणे होय.

भारताची आर्थिक व्यवस्था व धोरण जागतिक व्यवस्था व धोरणाशी जोडण्यात आली. जगातील कोणत्याही वस्तू भारतात येण्यास आणि भारतातून इतर देशात पाठविण्यास म्हणजेच आयात निर्यातीवर बंदी नाही. व्यापारावर बंदी नाही. म्हणूनच 'फ्री मार्केट इकॉनॉमी' असे नवीन आर्थिक धोरणाला म्हणतात.

**४) मुक्त बाजार -** अर्थव्यवस्थेवर राज्याचे नियंत्रण त्यामुळे पूर्वीच्या आर्थिक धोरणानुसार राज्य 'कंट्रोलर' आणि 'रेग्युलेटर' म्हणून होते परंतु नवीन आर्थिक धोरणानुसार राज्य आर्थिक व्यवस्थेची देखरेख करणारे, सहकार्य प्रस्थापित करणारे म्हणून कार्य करते. राज्याची आर्थिक कार्ये त्यामुळे कमी झाली आहेत. आर्थिक क्षेत्रामध्ये राज्याला प्रत्यक्ष भूमिका करावी लागत नाही - व्यापार, उद्योगांचे खाजगीकरण केल्यामुळे राज्य 'मुक्त बाजारव्यवस्थेला प्रेरणा देणारे' ही भूमिका करते. सर्व उद्योगक्षेत्र परवानामुक्त करण्यात आले. किती गुंतवणूक करावी यावरची मर्यादाही उठविण्यात आली. कंपन्यांचे एकत्र येणे, विलिनीकरण यावरील बंधने ही उठविण्यात आली.

**५) आधुनिकीकरण -** अ) आधुनिक परकीय तंत्रज्ञानाला प्राधान्य देण्यात आले आहे. ब) संशोधन व तंज्ञज्ञानाचा विकास होण्याच्या दृष्टीने विविध सवलती देऊन खाजगी कंपन्यांना भारतात प्रवेश आहे.

**६) खाजगी क्षेत्राला भर (Emphasis to the private sector) -** नेहरूप्रणित आर्थिक धोरण 'राज्यनियंत्रित' (State Controlled), समाजवादी (Socialist), सार्वजनिक क्षेत्राला प्राधान्य (Public-sector dominated) या तीन गोष्टींवर आधारित होते.

नवीन आर्थिक धोरणामध्ये भांडवलवाद (Capitalist), उदार धोरण (Liberal Policy), खाजगी क्षेत्राला प्राधान्य (Emphasis to private sector) आहे. पूर्वीच्या आर्थिक धोरणापेक्षा नवीन आर्थिक धोरण पूर्णपणे वेगळे आहे.

'मुक्त अर्थव्यवस्था' स्वीकारण्यामागे हेतू होता की परदेशी कंपन्या भारतात येतील, भांडवल गुंतवतील, उत्पादन करतील म्हणजे सरकारला कर्ज न काढता देशाची प्रगती घडवून आणता येईल. परकीय भांडवल, गुंतवणूक व तंत्रज्ञानाला चालना दिली.

नव्या आर्थिक धोरणात सरकारने आयातनिर्यातीवरील बंधने हटविली. आयातीवरील कर कमी करण्यात आला. निर्यातीवर दिली जाणारी सबसिडी रद्द केली याचे कारण त्यामुळे निर्यातीला चालना मिळेल हा हेतू होता.

या धोरणानुसार विकासाची जबाबदारी आता एकट्या सरकारची राहिली नाही.

**जागतिकीकरण आणि आर्थिक सार्वभौमत्व** - जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परस्परावलंबित्व (Dependence) वाढले. प्रत्येक राष्ट्राची अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली जात आहे. अशा परिस्थितीत अलिप्त राहून राष्ट्रीय अर्थव्यस्थेची स्वायत्तता टिकविणे याविषयीचा प्राधिकार पूर्वी पूर्णपणे राष्ट्राचा होता; पण आता याविषयी व्यापार राजवटीचे नियम पाळावे लागतात.

आर्थिक धोरण निर्मितीची प्रक्रिया ही देखील आता केवळ राष्ट्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. आर्थिक धोरण निर्मितीच्या प्रक्रियेवर व्यापार राजवटी, विभागीय व्यापार संघ, बिगर शासकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या यांचा प्रभाव वाढला आहे.

### १४.५.४ नवीन आर्थिक धोरणाचे मूल्यमापन :

१) परकीय गुंतवणूक वाढली - उदा. पेप्सी, जनरल मोटर्स, कोकाकोला, मॅकडोनाल्ड, मशीन्स इत्यादी परकीय कंपन्यांनी भारतात भरमसाठ गुंतवणूक केली.
२) अंदाजपत्रकातील त्रुटी आणि चलनफुगवटा कमी झाला.
३) परकीय भांडवल आणि तंत्रज्ञान भारतात आले.
४) विकास दर वाढला.
५) स्पर्धा वाढली त्यामुळे कार्यक्षमता आली. उत्पादनात वाढ झाली. नवीन आर्थिक धोरणाचा आर्थिक विकासाच्या दृष्टीने फायदा झाला.

### सुधारणांचे सामाजिक आणि राजकीय परिणाम :

**प्रस्तावना** - जागतिकीकरणाचा केंद्रबिंदू आर्थिक असला तरी त्याची व्याप्ती राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अशी सर्वच बाबींशी संबंधित आहे.

### १) शेतीक्षेत्र दुर्लक्षित आणि शेतीविषयक समस्या -

**शेती** - आज बहुराष्ट्रीय कंपन्यांना खाणी, वीजनिर्मित केंद्र, कारखाने, बंदरे, विमानतळ याकरिता जंगले, जमीन, सरकार बहाल करीत आहे. त्यासाठी छोट्या शेतकऱ्यांची जमीन भरपूर पैसा देऊन विकत घेत आहेत.

कारखान्यासाठी शेतकऱ्यांच्या सिंचनाचे व गावकऱ्यांचे पिण्याचे पाणी देण्यात येते. दूषित हवा व सांडपाणी यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतजमीन बिगरशेती उपयोगाकडे वळविण्यात येऊन शेतकऱ्यांच्या जमिनीवर आक्रमण होत आहे.

नवीन आर्थिक धोरणामुळे ग्रामीण आणि शहरी विभाजन झाले. ग्रामीण अर्थव्यवस्था, शेती दुर्लक्षित झाल्यामुळे ग्रामीण भागात प्रचंड प्रमाणात दारिद्र्य, बेकारी, कर्जबाजारीपणा वाढला, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. शेतीतील फळे, भाज्या रासायनिक प्रक्रियेतून आल्यामुळे लोकांच्या आरोग्यावर त्याचे परिणाम व्हायला लागले.

**२) मानवतेपेक्षा नफा महत्त्वाचा झाला** - देशातंर्गत उद्योगांना बहुराष्ट्रीय कंपन्यांशी मोठी स्पर्धा करावी लागत आहे. त्यात राष्ट्रामधील उद्योगधंदे रसातळाला जाऊन बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी प्रस्थापित होत आहे. छोटे कारखाने बंद पडून कामगारांवर उपासमारीची पाळी आली आहे. आज ठाणे-बेलापूरचा जो औद्योगिक पट्टा आहे तेथील नव्वद टक्के कारखाने बंद झाले आहेत. बेकारीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला.

देशाची बाजारपेठ आता परकीयांच्या हाती गेल्यामुळे आर्थिक तूट वाढली. महागाई वाढली. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती भरमसाट वाढल्या. शासकीय नियंत्रणाअभावी खाजगी क्षेत्रातील उद्योग फक्त फायदा, नफा याला महत्त्व देतात. देशाचे आर्थिक परावलंबित्व वाढले.

**३) सामाजिक व्यवस्था धोक्यात** - समाजाचा नैतिक दर्जा खालावला आहे. समाजात तणाव वाढला. आर्थिक घोटाळे प्रकार वाढले. नैतिक मूल्य, मानवता यापेक्षा पैसा अधिक महत्त्वाचा झाला. राजकारणी, उद्योगपती, शासकीय, नोकर प्रशासक मिळून अनेक घोटाळे करतात. सगळीकडे लुबाडणूक होत आहे. सार्वजनिक हित, लोककल्याणाला पायदळी तुडवून, भ्रष्टाचाराचा आधार घेऊन खाजगी क्षेत्र नफा याभोवती केंद्रित झाले आहे. बळकावणे, लुबाडणे, पैसा, भोतिक प्रगती इत्यादीला फार मोठया प्रमाणात चालणा मिळाली आहे.

**४) भ्रष्टाचार वाढला** - खाजगी क्षेत्रामुळे व उद्योगामुळे राजकारणी भ्रष्टाचाराला अधिक वाव देतात. नव्या नव्या संधी भ्रष्टाचार करण्यास उपलब्ध झाल्यात आपल्या प्रवेशासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या अनेक अनैतिक मार्गाचा अवलंब करीत आहेत. यातून भ्रष्टाचार वाढला. शिक्षणक्षेत्रातही शासनाच्या विनाअनुदान तत्त्वाच्या धोरणामुळेच उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रचंड प्रमाणात देणग्या देण्याची पद्धत सुरु झाली.

**५) जागतिक भांडवलवाद हा नववसाहतवाद ठरत आहे** - जागतिकीकरण भांडवलशाही राष्ट्रांचे हितसंबंध जोपासणारी अर्थव्यवस्था आहे. भांडवलशाही राष्ट्रांनी आपल्या आर्थिक आणि व्यापारी हितसंबधांच्या पूर्ततेसाठी जाणीवपूर्वक या प्रक्रियेची निर्मिती केली आहे. जागितिकीकरणामुळे भांडवलशाही राष्ट्रांकडून अविकसित राष्ट्रांच्या पूर्वीपासून होत असलेल्या शोषणाला संघटित आणि संस्थापक रुप प्राप्त करुन दिले आहे.

नववसाहतवादाचे एक साधन म्हणून जागितिकीकरण आहे. नववसाहतवाद म्हणजे राजकीयदृष्ट्या एखादे राष्ट्र स्वतंत्र्य असते; मात्र अर्थव्यवस्थेची सुत्रे दुसऱ्या राष्ट्राच्या हातात असतात. यात अप्रत्यक्ष शोषण करण्यात येते. भांडवलशाही व्यवस्थेचा आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना जागतिक प्रसारासाठी अनुकूल परिस्थिती जागतिकीकरणामुळे निर्माण झाली आहे.

भारतात जागतिकीकरणामुळे उत्पादनक्षमता घटली आहे. गरिबी, बेकारी, उपासमारीचे प्रमाण वाढले आहे. राष्ट्रांमधील छोटे आणि मध्यम उद्योगधंदे देशाधडीला लागले आहेत. यातून बेकारी वाढली.

या भांडवलवादामुळे श्रीमंत गरीब दरी वाढली. गरिबांची स्थिती दिवसेंदिवस आणखीच खालावत आहे. मानवी व समान सामाजिक आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यास हा भांडवलवाद अडथळा आणतो. अनेक टीकाकार नवीन आर्थिक सुधारणांना श्रीमंतांसाठी असलेल्या आणि गरिबांच्याविरोधी सुधारणा असा या सुधारणांचा उल्लेख करतात. व्यापारीकरणाला चालना देण्याऱ्या या सुधारणा आहेत.

**६) भारताच्या सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित कल्याणकारी राज्य कल्पनेला सुरुंग** - नवीन अर्थव्यवस्थेमुळे राज्याच्या कल्याणकारी भूमिकेवर मर्यादा आल्यात कारण या नवीन अर्थव्यवस्थेमुळे सरकारचे आर्थिक विषमता दिवसेंदिवस वाढत आहे. बेकारीची समस्या वाढली.

**७) चैनीच्या वस्तूंच्या निर्मितीला प्रोत्साहन** - जीवनावश्यक वस्तूंपेक्षा चैनीच्या वस्तूंचे उत्पादन अधिक वाढले कारण उत्पादनावर आता सरकारी नियंत्रण नाही.

**८) राजकीय परिणाम** - उदारीकरण आर्थिक केंद्रीकरण करणार व त्याचा परिणाम राजकीय व्यवस्थेवर झाला. आर्थिक स्थिती खालावलेला सामाजिक वर्ग राजकीय स्पर्धेतेतून वाद होतो. सत्तास्पर्धेत श्रीमंतच राहतात. आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्रीकरण त्यातून अस्तित्वात येते. बहुराष्ट्रीय कंपन्या वाटेल तेवढा पैसा खर्च करुन सरकारी धोरणावर प्रभाव टाकतात. स्वतःचे हितसंबंध सांभाळण्यासाठी हे खासदार या कंपन्याविरुद्ध बोलत नाहीत.

**९) उपभोगवादी चंगळवादी संस्कृती जोपासली जात आहे** - एकीकडे देशातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या वाढत आहे. ८० टक्के लोकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, या किमान गरजा पूर्ण करता येत नाहीत. शहरातील झोपडयांची संख्या वाढत आहे.

तर दुसरीकडे कॅडबरी, पेप्सी, कोकाकोला, टी. व्ही इत्यादी वस्तूंची बाजारात रेलचेल आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. या उपभोग्य वस्तूंच्या उत्पादन व विक्रीत गरीब लोक प्रवाहापासून बाजूला राहिले. श्रीमंतांच्या संपत्तीत प्रचंड वाढ झाली आहे.

एकूणच देशात श्रीमंत विकास व प्रगती - अविकसित यांच्यातील दरी वाढली आहे. संतुलित विकास होत नाही.

**नवीन सुधारणांचे योगदानः**

१) आर्थिक क्षेत्रात विकास व प्रगती - खाजगी क्षेत्र, उद्योगांचा विकास जलद झाला आहे. खाजगी क्षेत्र नोकरशहाच्या नियंत्रणापासून मुक्त झाले आहे.

२) टेलीकम्युनिकेशन्स, सॉफ़्टवेअर, बायोटेक्नॉजी, रिसर्च इत्यादी क्षेत्रांतील विकास, कौशल्य वाढले.

३) उत्पादनाची गुणवत्ता वाढली - मुक्त आणि अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारांमुळे स्पर्धा वाढली. त्यामुळे उद्योजकांना स्पर्धेत टिकण्यासाठी उत्पादनाच्या गुणवत्तेत सुधारणा करावी लागते. परिणामी उच्च दर्जाच्या वस्तू तसेच सुविधा ग्राहकांना उपलब्ध झाल्यात.

४) एखादया वस्तूचे उत्पादन आपल्या देशात शक्य नसल्यास ती वस्तू दुसऱ्या देशातून त्वरित मागविता येते.

**उपाय:**

१) भारताने कठोर परिश्रम करुन फक्त खऱ्या विकासाठी अत्यावश्यक असेल तरच बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून तंत्रज्ञान विकत घ्यावे. मर्यादित क्षेत्रात जागतिकीकरणाला मान्यता द्यावी.

२) टी. व्ही. वरील बहुराष्ट्रीय कंपन्या, चैनीच्या वस्तूंच्या निर्मात्या कंपन्यांच्या जाहिराती बंद कराव्यात.

३) चैनीच्या वस्तूंची आयात पूर्णतः बंद करावी

४) रासायनिक खते, कीटनाशके, हायब्रीड यांना पर्याय असणाऱ्या उत्पादनांना उत्तेजन देणारे धोरण आखावे.

५) कसेल त्याची जमीन या नात्याने जमिनीच्या मालकीचे फेरवाटप केले पाहिजे. जीवनावश्यक गरजा पुऱ्या करणाऱ्या उत्पादनाला प्रेरणा द्यावी.

६) विकासात्मक प्रकल्पांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

७) राजकीय पक्षांनी स्वच्छ राजकारण करणे आवश्यक. विरोधी पक्षांनी केवळ विरोधासाठी विरोध करणे बंद करावे. राष्ट्रहिताला प्राधान्य असावे. देशबांधणीसाठी एकत्रित प्रयत्न व्हावेत.

## १४.६ सारांशः नवीन आर्थिक धोरण आणि आर्थिक सुधारणाः

१) प्रस्तावनाः
२) नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्याची कारणे
३) नवीन आर्थिक धोरणाची वैशिष्टये -
   १) उदारीकरण
   २) खाजगीकरण
   ३) जागतिकीकरण
   ४) मुक्त बाजारव्यवस्था
   ५) आधुनिकीकरण
   ६) खाजगी क्षेत्रावर भर
४) मुल्यामापन
५) सामाजिक व राजकीय परिणाम

**सारांश : सुधारणांचे सामाजिक व राजकीय परिणाम:**

१) प्रस्तावना - सर्वव्यापी

२) परिणाम -

   १) शेतीक्षेत्रावर
   २) मानवतापेक्षा नफा महत्वाचा
   ३) सामाजिक व्यवस्था धोक्यात
   ४) भ्रष्टाचार वाढला
   ५) जागतिक भांडवलवाद व नववसाहतवादाचा उदय
   ६) कल्याणकारी राज्य व्यवस्थेला सुरुंग
   ७) चैनीच्या वस्तूंचा सुकाळ
   ८) राजकीय परिणाम
   ९) चंगळवाद वाढला

३) उपाय

## १४.६ प्रश्न

१) स्वातंत्र्यानंतर भारतातील आर्थिक समस्यांचा मागोवा घेऊन आर्थिक मागासलेपणाची कारणे द्या.

२) नेहरूप्रमाणे आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये सांगून त्या आर्थिक व्यवस्थेच्या गुणदोषांचे विश्लेषणात्मक समालोचन करा.

३) नविन आर्थिक धोरणाच्या उत्क्रांती विषयी लिहा.

४) नविन आर्थिक धोरणाच्या वैशिष्ट्ये सांगा.

५) नविनआर्थिक धोरणाचे विश्लेषण करा.

❖❖❖❖

# १५

# राष्ट्रीय सुक्षा
## (Issues of National Scurity)

**घटक रचना :**

१५.० उद्दीष्ट
१५.१ प्रस्तावना
१५.२ राष्ट्रीय सुरक्षा व्याख्या आणि अर्थ
१५.३ राष्ट्रीय सुरक्षेचे घटक
१५.४ भारतातील राष्ट्रीय सुरक्षा
१५.५ राष्ट्रीय सुरक्षा संबंधी उपाय
१५.६ सांराश
१५.७ प्रश्न

## १५.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१) राष्ट्रीय सुरक्षेच्या बाजू, आणि अर्थ समजून घेणे.
२) राष्ट्रीय सुरक्षा संकल्पनेचे विविध घटक समजून घेणे
३) भारताच्या संदर्भात राष्ट्रीय सुरक्षा संकल्पना समजून घेणे.
४) राष्ट्रीय सुरक्षा विषयक उपाय जाणून घेणे.
५) भारतात राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

## १५.१ प्रस्तावना

सर्वसाधारणपणे राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना लष्कराशी जोडण्यात येते. राष्ट्रीय सुरक्षा वास्तवामध्ये व्यापक संकल्पना आहे. राज्याचा भूप्रदेश, राष्ट्राची संपत्ती आणि राष्ट्रातील जनता यांचे सरंक्षण करण्याची शासनाची क्षमता यावर राष्ट्रांचे सरंक्षण आधारीत असते. आधुनिक काळात जी राज्य फक्त लष्करी दृष्टीने बलशाली होण्यावर लक्ष केंद्रीत करतात ते विविध हितसंबंधाच्या दृष्टीने सुरक्षित राहू शकत नाही. म्हणूनच राष्ट्रीय सुरक्षा यामध्ये राष्ट्राची लष्करी सत्ता (military power) राष्ट्राचा आर्थिक विकास (economic growth), राजनितीक संबंध (diplomatic fineness) आणि राजकीय स्थिरता (political stability) इत्यादी

गोष्टी अंतर्भूत होतात. त्यादृष्टीने राष्ट्रीय सुरक्षा विविध बाजू असलेली (a multi - dimensional) संकल्पना आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर राष्ट्रीय सुरक्षा ही मुख्य राजकीय संकल्पना झाली आहे.

राष्ट्रीय सुरक्षेचे मुख्य घटक (element) या विषयी विविध विचार आहेत. राष्ट्रीय सुरक्षा खालील घटकांवर आधारित आहे.

१) economic security आर्थिक सुरक्षा.
२) energy security ऊर्जा सुरक्षा.
३) environmental security nationally and internationally वातावरण सुरक्षा.
४) military security लष्करी सुरक्षा.
५) diplomatic fineness राजनैतिक संबंध
६) political stability राजकीय स्थिरता.
७) control on violent religious and ideological groups, drug cartels, transnational corporations हिंसात्मक घटकांवर नियंत्रण.

## १५.२ राष्ट्रीय सुरक्षा, व्याख्या आणि अर्थ

राष्ट्रीय सुरक्षेविषयी सर्वसंमत अशी एकच व्याख्या नाही. यामध्ये "राष्ट्रीय" (national) या शब्दप्रयोगाविषयी वाद आहेत. 'National' हा शब्द 'Nation' या शब्दापासून आला आहे. राज्यशास्त्रात राष्ट्र आणि राज्य दोन्ही संकल्पना सारख्या नाही. येथे राष्ट्रीय सुरक्षा म्हणजेच राज्याची सुरक्षा (the security of a state) होय. 'राज्य' (state) राजकीय संकल्पना आहे, तर (nation) 'राष्ट्र' भावनिक व मानसशास्त्रीय संकल्पना आहे. अनेक अभ्यासकांच्या मते विविधता असलेल्या राज्यामध्ये अनेक राष्ट्राचे लोक राहतात. राष्ट्रीय हितसंबंध म्हणजेच राज्यीय हितसंबंध होतील काय ? असा प्रश्न उपस्थित केला जातो.

राष्ट्रीय सुरक्षेचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या खालील व्याख्या आहेत. मॅकलिन डिक्शनरीप्रमाणे "राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे देशातील गुपितांचे व तेथील नागरिकांचे सरंक्षण होय".

वॉल्टर लिपमन या राज्यशास्त्रज्ञांच्या मते "युध्द टाळण्यासाठी किंवा युध्दाला तोंड देण्यासाठी आपल्या कायदेशीर (legitimate interest) हितसंबंधाचे बलिदान राज्याला करावे न लागणे म्हणजे त्या राज्याची राष्ट्रीय सुरक्षा होय." दुसरे महायुध्द सुरु असतांना ही व्याख्या लिपमनने केली होती. त्यामुळे या व्याख्येत राष्ट्रांच्या कायदेशीर हितसंबंधाच्या सुरक्षेसाठी राष्ट्रांची लष्करी सत्ता लिपमनला आवश्यक वाटली होती.

लॉसवेल या राज्यशास्त्रज्ञाने राष्ट्रीय सुरक्षा राष्ट्रांच्या सार्वभौमसत्तेशी जोडली होती. लॉसवेलच्या मते "राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे परकीय हुकुमशाहीपासून मुक्तता होय." (National security means freedom from foreign dictation)

आॅरनॉल्ड वोल्फर म्हणतात “राष्ट्रांची आपल्या राष्ट्रांची मूल्ये संरक्षित करण्याविषयीची भीतीमुक्तता म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा होय.”

१९९६ साली भारताच्या नॅशनल डिफेन्स कॉलेज ने भारताच्या संदर्भात राष्ट्रीय सुरक्षेची व्याख्या केली होती. “National security is an appropriate and aggressive blend of political resilience and maturity, human resources, economic structure and capacity, technological competence, industrial base and availability of natural resources and finally the military might”“राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे राज्याची राजकीय परिपक्वता, मानवी साधनसंपत्ती, आर्थिक रचना आणि क्षमता, तांत्रिक क्षमता, औद्योगिक आधार, नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता आणि लष्करी बळ होय”. या व्याख्येत राष्ट्रीय सुरक्षेच्या सर्व घटकांचा समावेश करण्यात आला आहे. भारताच्या संदर्भात राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे भारत या राष्ट्राची वरील सर्व घटकांच्या बाबतीत सुरक्षेची योग्यता होय.

## १५.३ राष्ट्रीय सुरक्षेचे घटक (elements)

सर्वच देशांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नाला प्राधान्य देण्यात येते. तज्ञाच्यामते १७ व्या शतकात वेस्टफालिया येथील झालेल्या तहाच्या निष्कर्षाप्रमाणे आधुनिक राष्ट्रराज्यांची आणि राष्ट्रीयत्वाची कल्पना उदयास आल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा कल्पना उदयास आली. वेस्टफालियाच्या तहाप्रमाणे चर्चच्या सत्तेचा अंत आणि होली रोमन एम्पायर चा अंत झाल्यानंतर राष्ट्रीयत्व (nationalism) कल्पना उदयास आली आणि आधुनिक राष्ट्रराज्ये (nation states) उदयास आली. राष्ट्रराज्याचा महत्वाचा घटक सार्वभौमसत्ता झाला. सार्वभौमराज्यामध्ये त्या राज्यातील सार्वभौम सत्तेचे शासन आले. सार्वभौम शासनावर राज्याचे बाह्य आक्रमनापासून संरक्षण करणे, इतर राष्ट्रांशी शांततापूर्ण संबंध राखणे, राज्याचा विकास करणे, भरभराट करणे, इत्यादी जबाबदाऱ्या आल्या. राजनय (diplomay) कल्पना त्यातूनच उदयास आली. राष्ट्रीय सुरक्षेमध्ये लष्करी सत्ता, राजनय, राज्यांची भरभराट व विकास इत्यादीचा समावेश झाला.

दुसऱ्या महायुध्दानंतर राष्ट्रीय सुरक्षा या कल्पनेकडे अमेरिकन तज्ञांनी काळजीपूर्वक लक्ष दिले. १७९० साली ‘SecurityNational’ हा शब्दप्रयोग अमेरिकेमध्ये येल विद्यापीठाच्या कागदपत्रांमध्ये संघराच्यासंबधीत वापरला गेला. राष्ट्राची लष्करी सरंक्षणाची क्षमता याशिवाय राष्ट्रीय सुरक्षेमध्ये अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो हे लक्षात घेण्यात आले. जनरल मॅक्सवेल टेलर यांनी नॅशनल सिक्युरिटी मध्ये राष्ट्रीय संपत्ती, राष्ट्रातील मौल्यवान गोष्टी, राष्ट्रीय हितसंबंध यांचा समावेश होतो. या घटकांमुळे राष्ट्राची भविष्यकालीन राष्ट्रीय सुरक्षा होते असे मत त्यांनी आपल्या निबंधामध्ये मांडले होते. राष्ट्रीय संपत्ती आणि राष्ट्रातील मौल्यवान गोष्टी यामध्ये भौतिक, बौध्दिक आणि आध्यात्मिक गोष्टांचा समावेश होतो असे टेलर चे मत होते. उच्च दर्जाची राजकीय यंत्रणा, प्रभावी प्रशासकीय रचना, आर्थिक रचना या सर्वाचा समावेश राष्ट्रीय संपत्तीमध्ये होतो. आधुनिक काळात नैसर्गिक संपत्तीमध्ये पर्यावरण, उर्जा महत्त्वाचे झाले आहे. उदा. मिडल इस्ट मधील अनेक देश तेलाच्या बाबतीत श्रीमंत आहेत परंतु पिण्याच्या पाण्यासाठी त्या राष्ट्रांना बराच खर्च करावा लागतो.

राष्ट्रीय सुरक्षेचे घटक खालील आहेत.
१) लष्करी सत्ता (military power)
२) राजकीय स्थिरता (political stability)
३) आर्थिक विकास व भरभराट (economic prospepity)
४) पर्यावरण सुरक्षा (environmental protection)
५) उर्जा आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण (security of energy and natural resources)

**१) लष्करी सत्ता (military power)**

लष्कराच्या दृष्टीने राष्ट्र प्रबळ असणे. आपल्या देशाचे बाह्य आक्रमणापासून, हल्ला पासून सरंक्षण करुन आपल्या देशाची सर्वोच्चता कायम राखणे. दुसऱ्या महायुद्धानतंर राष्ट्र लष्करी दृष्टीने पात्र (capability) असणे याचबरोबर लष्करी दृष्टीने सर्वोच्च (supremacy) असणे यालाही महत्त्व प्राप्त झाले आहे.

**२) राजकीय स्थितरता (political stability)**

राज्यातील समाजव्यवस्थेमध्ये शांतता असेल तरच राजकीय स्थिरता येऊ शकते. देशांगर्तत एकता आणि शांतता राजकीय स्थिरतेसाठी अतिशय आवश्यक आहे. हुकुमशाही राज्यव्यवस्थेपेक्षा लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये जिथे अल्पसंख्याकांना हक्काची हमी असते, न्याय आणि मानवी हक्कांना सरंक्षण असते अशा राज्यव्यवस्थेमध्ये सामाजिक शांतता आणि स्थिरता असते, आणि राजकीय स्थिरता असते.

**३)Economic Prosperity आर्थिक भरभराट व विकास -**

दुर्बल राष्ट्रावर बलाढ्य राष्ट्र आक्रमण करतात त्याचे कारण बलाढ्य राष्ट्र स्वतःच्या आर्थिक विकासाला महत्त्व देतात. जिंकणाऱ्या राष्ट्राची आर्थिक भरभराट होते. परंतु दुर्बल राष्ट्र आणखी दरिद्री बनते आणि मागास राहते. युरोपिअन राष्ट्रांनी आशिया आणि आफ्रिका खंडातील देशामध्ये स्वतःचे वसाहतीत राज्य स्थापन केले  त्यामागे कारण आशिया आणि आफ्रिका खंडातील देशांची नैसर्गिक साधनसंपत्ती लुटणे आणि स्वतःच्या देशाचा आर्थिक विकास करणे होता. उदा. इंग्लडने भारतावर राज्य करून भारताला वसाहत बनविले होते. वसाहतिक राज्ये आज दिसत नसली तरी मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार या रुपात तेच घडत आहे. जागतिकरणाच्या आजच्या युगात आंतरराष्ट्रीय राजकारणातील ‘आंतरराष्ट्रीय व्यापार’ ही एक महत्त्वाची थीम व कल्पना झाली आहे. जी राष्ट्रे इतर राष्ट्रांशी स्वतःच्या अटीवर मुक्त व्यापार करीत आहेत त्यांची आर्थिक भरभराट झाली आहे अस दिसून येते. उद्योगधंदे, वाढवून आणि व्यापार या द्वारे जी राष्ट्रे आर्थिक विकास व भरभराट करीत आहेत, त्या राष्ट्रांची आर्थिक भरभराट लष्करी सर्वोच्चते सारखीच ठरत आहे. त्यामुळे आर्थिक भरभराट व विकास  राष्ट्रीय सुरक्षेचा एक महत्त्वपूर्ण घटक झाला आहे.

**४)पर्यावरण सुरक्षा (environmental protection)**

राष्ट्रीय हितसंबधांच्या सुरेक्षेसाठी पर्यावरण आवश्यक आहे, पर्यावरण म्हणजे राष्ट्राची संपत्ती होय. पर्यावरण संपत्तीमध्ये खनिजसंपत्ती, जंगले, नद्या, पर्वत, प्राणी पशुपक्षी इत्यादीचा समावेश होतो. राष्ट्राच्या  सर्वबाजूने प्रगती व विकासाठी या गोष्टी कारणीभुत असतात. नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये पाणी हा महत्त्वाचा घटक आहे. असे म्हणतात पुढचे जागतिक युद्ध

पाण्यावरुन होणार आहे. आजच्या ग्लोबल वार्मिंग वरुन जंगल सुरक्षा किती आवश्यक आहे हे आपल्या लक्षात येते.

**५) Security of energy** – उदा. तेल, वीज सोलरएनर्जी, पेट्रोल, न्यूक्लिअर एनर्जी इत्यादी उर्जात्मक गोष्टींची सुरक्षा आधुनिक औद्योगिक राष्ट्रांसाठी आवश्यक आहे. या उर्जात्मक साधनांची निर्मिती करणे, ती वाचविणे आणि या ऊर्जात्मक साधनांच्या बाबतीत स्वावलंबी होणे राष्ट्रीय सुरक्षेसाठी आज आवश्यक झाले आहे.

## १५.४ भारतातील राष्ट्रीय सुरक्षा(National security in India)

स्वतंत्र भारताच्या उदयानंतर भारतातील राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत खालील गोष्टी महत्वाच्या आहेत.

१) भारताची फाळणी झाली. पाकीस्तान आणि बांगलादेशाची निर्मिती झाली. पाकीस्तान आणि बांगला देश भारताची शेजारी राष्ट्र आहेत. या राष्ट्रांकडून राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत भारताला सतत काळजी घ्यावी लागत आहे. पाकीस्तान आणि बांगला देश यांच्या सतत भारतविरोधी कारवाया चालू असतात.

२) भारत जगातील प्रचंड लोकसंख्या असलेल्या दुसऱ्या नंबरचा देश आहे. काही तज्ञांच्या मते भारताची लोकसंख्या प्रचंड आहे परंतु तिचा उपयोग भारताची मालमत्ता यादृष्टीने भारताला करता आला नाही. quality of the people महत्वाची असते असते. आपल्या देशामध्ये लोकसंख्या (quantity) वाढली आहे परंतु दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने शासन कमी पडले आहे. चीन त्याबाबतीत यशस्वी झाला आहे. त्यामुळे चीनच्या राष्ट्रीय सुरक्षेमध्ये भरच पडली आहे.

३) **दारिद्र्य** - भारतातील प्रचंड लोकसंख्येबरोबरच लोकांमध्ये दारिद्र्य फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. दारिद्र्यामुळे लोकांची पात्रता वाढण्यास अडचणी येतात. लोक चांगले शिक्षण घेऊ शकत नाही. राहणीमानाचा दर्जा सुधारत नाही. दरिद्र्याबरोबरच बेकारीची समस्या आहे. दारिद्र्य आणि बेकारीमुळे लोकांना सुधारण्याची संधी मिळत नाही.

४) **भौगोलिक घटक** - भारताच्या सुरक्षेमध्ये भारतातील भौगोलिक घटकही महत्त्वाचा आहे. भारतीय प्रदेशातील दहशतवाद (terrorism) भारतातील नागरी व मानवी मूल्ये धोक्यात आणीत आहे व त्यामुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षा भारताच्या चिंतेचा विषय झाला आहे. उदा. जिहादी दहशतवाद, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील काश्मीर वाद, जिहादी दहशतवाद्यांचे घातपाताचे प्रकार, पाकीस्तानी तालिबान, लष्कर-ए-तोएबा या सर्वांमुळे भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण होता.

५) **शेजारील राष्ट्र चीन** - चीन हा देश अण्वस्त्रधारी आहे आणि चीन आकारमानाने बराच बलाढ्य देश आहे. सुरवातीला चीन आणि भारत यांचे मैत्रीचे संबंध होते. १९६२ ला चीन ने भारतावर आक्रमण केले आणि तेव्हापासून भारताचे संबंध काहीप्रमाणात शत्रूत्वाचे झाले. चीनने भारताचा बराचसा भाग आपल्या ताब्यात घेतला. भारतीय राज्यातील अरुणाचल

प्रदेश या राज्यावर चीन आपली मालकी प्रस्थापित करु इच्छितो. चिनने तिबेटवर आपला हक्क प्रस्थापित केला. सध्या चीन आणि भारत यांच्यात सीमावाद (border dispute) आहे आणि भारतीय राष्ट्रीय सुरक्षेचा हा काळजीचा विषय आहे.

६) **इशान्य भारतातील घुसखोरी** - इशान्य भारतामध्ये भारताच्या सात राज्यांचा समावेश होतो. आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम, अरुणाचलप्रदेश, मणिपूर, नागालँन्ड. भारताचे केंद्रशासन आणि नॉर्थइस्ट भारतातील राज्यांमध्ये वेळोवेळी अनेक बाबतीत समस्या निर्माण होतात. वरील काही राज्यांमध्ये दहशतवादी संघटना आहेत त्या सार्वजनिक मालमत्तेवर, निरागस लोकांवर हल्ला करून राष्ट्रीय सुरुक्षेला धोका निर्माण करतात. अरुणाचल प्रदेशावरून भारताचा चीनशी वाद आहेच. वरील राज्यांमध्ये राज्यांतर्गत समस्यांमुळे अनेकदा हिंसाचार घडतो. उदा. मणिपूर आणि नगालँन्ड यांच्यात भौगोलिक संघर्ष आहे. या भागांमध्ये घुसखोरीचीही समस्या आहेच. काही राज्यांमध्ये प्रादेशिक चळवळी घडतात आणि त्यांचे रुपातंर फुटीरवादाची भावना निर्माण करणाऱ्या चलवळीमध्ये होते. नागालँन्ड, मिझोराम, त्रिपुरा, आसाम येथील राज्यावर त्यांचा प्रभाव दिसून येतो. एकूण भारतातील नॉर्थईस्ट प्रदेशातील राज्यांमुळे तेथे घडणाऱ्या चळवळीमुळे भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण होतो.

७) **भारतीय समाजातील विविधता** -

भारतात जात, प्रदेश, भाषा, धर्म, वर्ग इत्यादी बाबतीत वैविध्यपूर्ण आहे. या विविधतेमुळे भारताच्या सुरक्षेला बरेचदा धोका निर्माण होतो. घटनेप्रमाणे विविधतेतून एकता निर्माण करणाऱ्या तरतूदी आहेत. परंतु असे दिसून येते की दिवसेंदिवस राजकारणी स्वतःची राजकीय ध्येय्य पूर्ण करण्यासाठी लोकांमध्ये संघर्ष होईल अशा समस्या आणि प्रश्नांना मुद्दाम खतपाणी घालतात, त्यातून सुरक्षेचा प्रश्न उद्भवतो.

८) **भारतातील भ्रष्टाचार** – भारतामध्ये आज असे कोणतेच क्षेत्र नाही कि जिथे भ्रष्टाचार नाही. विशेषतः भारतात जे लोक उच्च पदांवर काम करतात उदा. मंत्री, प्रशासक, लष्करी ऑफिसर, सरकारी ऑफिसमध्ये काम करणारे कर्मचारी इत्यादी. पावलोपावली भ्रष्टाचार आहे. लष्करी क्षेत्रात, देश चालविणाऱ्या लोकांमध्ये भ्रष्टाचार यामुळे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेला केव्हाही धोका निर्माण होऊ शकतो.

९) **नक्षलवाद** - जमीनदारी, भांडवलशाही विरुध्द भारतातील अनेक भागांमध्ये नक्षलवादी चळवळी आहेत. विशेषतः आदीवासी भागात पीपल्स वॉर ग्रुप PWG अनेक राज्यांमध्ये कार्यरत आहेत. २००४ पासून PWG ने माओवादी साम्यवाद्यांशी हातमिळवणी केली आहे. या नक्षलवादी संघटना हिंसात्मक पध्दतीचा उपयोग करून गरिब शेतकरी, आदीवासी यांना न्याय मिळवून देण्याचे काम करतात. बरेचसे नक्षलवादी ज्यांच्यावर अन्याय झाला ते या चळवळीमध्ये आहेत. भारतातील तेरा राज्यांमध्ये “रेड कॉरीडॉर” पसरले आहेत. नक्षलवादी चळवळी भारताच्या सुरक्षेला निर्माण झालेला सर्वात मोठा धोका होय.

एकूण भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला वरील धोके आहेत असे दिसून येते.

## १५.५ राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीत उपाय (Measures to ensure National security)

### अ) विशेष अधिकार कायदा Special Powers Act -

भारतातील राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न हाताळण्यासाठी पहिला महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे १८ ऑगस्ट १९५८ साली संसदेने Armed Forces Special Powers Act (AFSPA) बहुमताने पास केला. या कायद्यामुळे केंद्रशासनला विशेष सत्ता प्राप्त झाल्या. या कायद्याप्रमाणे केंद्रसरकार कोणत्याही राज्याच्या राज्यापालाला त्या राज्याच्या एखाद्या भागाला किंवा राज्याला disturbed area म्हणून घोषित करण्याची सूचना देतात. AFSPA हा कायदा एखाद्या राज्यात लागू केल्यास ऑर्मफोर्सेसला खूप अधिकार प्राप्त होतात. उदा. वॉरन्ट शिवाय एखाद्या व्यक्तिला किंवा गटाला, अधिकाऱ्याला अटक केली जाऊ शकते. व्हेरिफिकेशन न करता एखादी रचना नष्ट करू शकतात आणि वॉरन्ट शिवाय त्या रचनेतील वस्तु हस्तगत करु शकतात. एखाद्या व्यक्तिला impunity सकट ठार करु शकतात. अर्थात हा कायदा एकदा नागालँन्ड मध्ये घुसखोरीला आळा घालण्यासाठी आणि एकदा जम्मू काश्मीर मध्ये जिहादी दहशतवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी लागू करण्यात आला होता. १९४२ साली ब्रिटीशांनी "भारत छोडो" हे आंदोलन दडपण्यासाठी या कायद्याचा उपयोग केला होता. असे म्हणतात नॉर्थईस्ट मध्ये अनेक लष्करी अधिकारी AFSPA कायद्याचा दुरुपयोग करतात. या कायद्याविरूध्द तेथील लोक निदर्शने करतात व घोषणा देतात.

### ब) राष्ट्रीय सुरक्षा कायदा National Security Act (N.S.A.) -

ह्या कायद्याअन्वये प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची तरतूद केली आहे. १९८० साली संसदेने 'नॅशनल सिक्युरीटी ॲक्ट' पास केला होता. या कायद्याप्रमाणे केंद्रशासनाला विशेष सत्ता प्राप्त होतात. त्या म्हणजे सिक्युरिटी एजन्सीच्या मते एखाद्या व्यक्तिकडून देशसुरक्षेला धोका आहे असा संदेश मिळाल्यास त्या व्यक्तीला अटक केली जाऊ शकते, तसा आदेश केंद्रशासन देऊ शकते. सुरक्षेच्या प्रश्नावरून भारतीय सीमेवरून एखाद्या परकीय राष्ट्रीयत्व असलेल्या व्यक्तीला अटक करु शकतात. अशी अटक केलेल्या व्यक्तीला एक वर्षपर्यंत कोणत्याही ट्रायल शिवाय अटक करुन ठेवता येते.

अनेकांच्या मते हा कायदा म्हणजे भारताच्या लोकशाही आत्माच्या विरोध जाणार आहे. सिक्युरिटी एजन्सी ला या कायद्याप्रमाणे मिळणाऱ्या अधिकारांचा दुरुपयोग करण्याची संधी मिळते. सत्तेवर असणाऱ्या राजकारण्यांना आपल्या राजकीय शत्रूंच्या विरुध्द या कायद्याचा उपयोग करत येतो त्यामुळे तेही या कायद्याचा दुरुपयोग करु शकतात. वरील दोन्ही कायदे राष्ट्रीय सुरक्षेसाठी केलेले असले तरी मानवी हक्क आणि लोकशाही विरोधी आहेत असे काही तज्ञांचे मत आहे.

नॉर्थइस्ट आणि काश्मीर येथील घुसखोरी नष्ट करण्यासाठी हे विशेष पॉवर देणारे कायदे अयशस्वी झाले आहेत. त्यामुळे या कायद्याविषयी पुर्नविचार व्हावा असेही मत आहे.

**क) राष्ट्रीय सुरक्षा परिषद National Security Council (N.S.C.) -**

केंद्रसरकारने राष्ट्रीय सुरक्षा परिषदेची स्थापना केली आहे. राजकीय, आर्थिक, एनर्जीविषयी सुरक्षेसंबधीच्या गोष्टी ठरविण्यासाठी NSC या समितीची स्थापना केली. १९ नोव्हेंबर १९९८ साली या समितीची स्थापना झाल्यानंतर ब्रिजेश मिश्रा समितीचे (ॲडव्हायझर) सल्लागार होते. या समितीमध्ये संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थनियोजन कमिशनचे अध्यक्ष उपाध्यक्ष इत्यादी मेंबरसभासद असतात. महिन्यातून होणाऱ्या मिटींग साठी गरज असल्यास इतर सभासदांना आमंत्रित केल्या जाऊ शकते.

या समितीची त्रिस्तरीय रचना आहे.

१) डावपेचात्मक धोरण गट The Strategic Policy Group
२) राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ The National Security Advisory Board
३) संयुक्त गुप्तहेर समिती The joint Intelligence Committee.

१) The Strategic Policy Group या समितीचा पहिला आणि मुख्य स्तर होय. यात कॅबिनेट सेक्रेटरी, आर्मी स्टाफचे मुख्य, नेव्ही आणि एअरफोर्सचे मुख्य, बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सचे चेअरमन, इंटलीजन्स ब्युरोचे डायरेक्टर, फॉरीन सेक्रेटरी, होम सेक्रेटरी, डिफेन्स सेक्रेटरी, फायनान्स सेक्रेटरी, रेव्ह्युन्यु सेक्रेटरी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, कॅबिनेट सेक्रेटरीयटच्या रिसर्स आणि ॲनॅलीटिकल विभागाचे सेक्रेटरी, ॲटोमिक एनर्जि विभागाचे सेक्रेटरी, डिफेन्स मंत्रालयातील सायन्टिफिक उपदेशक, इंटलीजन्स कमीटीचे चेअरमन इत्यादींचा समावेश होतो. या समितीचे मुख्य कार्य म्हणजे संरक्षणविषयक ज्या युक्त्या, कार्य आहेत त्यांचा आढावा घेणे. भविष्यात देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ नये यादृष्टीने योग्य शिफारशी करुन त्याप्रमाणे योजना आखणे.

२) The National Security Advisory Board हा NSC समितीचा दुसरा स्तर होय. यामध्ये तज्ञांचा समावेश होतो जे शासनाचे भाग नसतात. देशांची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षितता, परराष्ट्र संबंध, संरक्षण, अर्थ, सायन्स आणि टेक्नॉलॉजी इत्यादी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षाविषयक शाखेतील तज्ञ असतात. या बोर्डाच्या मिटिंग महिन्यातून एकदा होतात. आवश्यकता असल्यास जास्त मिटिंग ही घेण्यात येतात. या समितीचे मुख्य कार्य म्हणजे संरक्षणविषयक ज्या योजना आहेत त्यावर परिक्षण करून योग्य शिफारशी करणे, सरंक्षण धोरणविषयक बघणे.

३) The joint intelligence committee - N.S.C. समितीचा तिसरा स्तर होय. कॅबिनेट सेक्रेटरीच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली ही समिती कार्य करते. इंजलीजन्स ब्युरोने जी माहिती दिली असेल त्याचे परिक्षण करणे हे त्यांचे मुख्य कार्य आहे. यामध्ये रिसर्च आणि ॲनॅलिसिस ब्युरो, आर्मी नेव्ही एअर फोर्स च्या डायरेक्टर यांनी दिलेल्या माहितीचे परिक्षण करणे हे त्यांचे कार्य आहे.

## १५.६ सारांश

राष्ट्रीय सुरक्षा ही लष्करसंबंधीत कल्पना समजण्यात येते. परंतु वास्तवामध्ये राष्ट्रीय सुरक्षेमध्ये लष्करसंबंधीत सत्ता (military power), त्याशिवाय आर्थिक विकास (economic growth), राजनायिक संबंध (diplomacy) आणि राजकीय स्थिरता (political stability) या विषयांचाही समावेश होतो.

राष्ट्रीय सुरक्षा हा विषय जुनाच आहे परंतु राष्ट्रसंघांच्या उदयानंतर राष्ट्रीय सुरक्षेला नविन रूप आले आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर राष्ट्रीय सुरक्षा संकल्पनेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

राष्ट्रीय सुरक्षेचे मुख्य घटक १) लष्करी सत्ता २) राजकीय स्थिरता ३) आर्थिक संपन्नता व भरभराट ४) एनव्हिरॉमेन्टल सुरक्षा ५) नैसर्गिक साधनसंपत्तीचे आणि उर्जाविषयक साधनांचे सरंक्षण हे आहेत.

भारतीय राष्ट्रीय सुरक्षेला असलेले धोके -

१) पाकीस्तानचे काश्मीरबाबतीत आक्रमक धोरण
२) प्रचंड लोकसंख्या
३) दारिद्र्य बेकारी
४) दहशतवाद
५) चीन
६) नॉर्थइस्ट राज्ये
७) भारताच्या अनेकविध स्वरुपातून उद्भवणारी सामाजिक असंतोष
८) भ्रष्टाचार
९) नक्षलवाद

भारताने राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने केलेले उपाय -

१) राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने पास केलेले विशेष कायदे
२) नॅशनल सिक्युरिटी कौन्सिल या संस्थेची स्थापना

## १५.७ प्रश्न

१) राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे काय ? राष्ट्रीय सुरक्षाविषयक घटक कोणते ? सविस्तर लिहा.
२) भारताच्या संदर्भात राष्ट्रीय सुरक्षाविषयक घटकांचा मागोवा घ्या.
३) राष्ट्रीय सुरक्षा विषयक ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घ्या.
४) भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला असलेले धोके सांगून भारत सरकारने त्यावर कोणते उपाय केले आहेत. ते उपाय परिणामकारक आहेत असे तुम्हास वाटते काय ?

❖❖❖❖

# १६

# राजकारणाचे गुन्हेगारीकरण
## (Criminalization of Politics)

**घटक रचना :**

१६.० उद्दिष्ट्ये
१६.१ प्रस्तावना
१६.२ राजकारणाचे गुन्हेगारीकरण अर्थ आणि घटक
१६.३ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची कारणे
१६.४ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे परिणाम
१६.५ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर उपाय
१६.६ सारांश
१६.७ प्रश्न

## १६.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१) राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा अर्थ, व्याख्या आणि घटक समजून घेणे.
२) भारताच्या संदर्भात राजकारणाचे गुन्हेगारीकरणाच्या उदयाची कारणे समजून घेणे
३) राजकारण आणि गुन्हेगारीकरण यांच्यातील संबंध लक्षात घेणे.
४) भारतीय व्यवस्था स्वच्छ आणि पारदर्शक होण्याच्या दृष्टीने परिणामकारी उपाययोजनांचा अभ्यास करणे.

## १६.१ प्रस्तावना

भारतीय राजकारणातील सध्याची मुख्य समस्या म्हणजे राजकारणाचे गुन्हेगारीकरण होय. राजकारणी, वृत्तपत्रकार, नागरी समाजाचे कार्यकर्ते आणि सर्वसाधारण लोक सर्वांचाच राजकारणाशी संबंध येतो. तेव्हा असे लक्षात येते की राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची समस्या भारतीय राजकारणामध्ये कॅन्सरप्रमाणे पसरली आहे. शासनाची कोणतीही शाखा त्यापासून मुक्त नाही. बहुतेक सर्व राजकीय पक्ष आपआपली राजकीय ध्येय पूर्ण करण्यासाठी गुन्हेगारांशी संबंध ठेवत आहे असे दिसते.

त्याचा परिणाम लोकशाहीच्या घटनात्मक तरतूदी अंमलात आणण्यामध्ये अडथळा निर्माण होतो. देशाची राजकीय व्यवस्था अंमलात आणणारे स्वच्छ असतील आणि प्रामाणिक असतील तरच देशाच्या व्यवस्थेला चांगला आकार येतो. परंतु भारतातील राजकारणात याउलट चित्र दिसून येते.

## १६.२ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा अर्थ आणि घटक

गुन्हेगारीकरण यामध्ये "गुन्हा" हा शब्द अंतर्भूत आहे. गुन्हा म्हणजे सोप्या शब्दमध्ये "बेकायदेशीर कृती" होय. ऑक्सफर्ड डिक्शनरी प्रमाणे एखाद्या व्यक्ति किंवा राज्या विरुध्द केलेला गंभीर स्वरुपाचा गुन्हा; जो कायद्याप्रमाणे शिक्षेयुक्त असतो. भारतात खून, बलात्कार, अफरातफर करणे, भ्रष्टाचार करणे, सायबर गुन्हे इत्यादी सिरीअस समजण्यात येतात. जी व्यक्ति किंवा गट हे गुन्हे करतात त्यांना गुन्हेगार म्हणतात. गुन्हेगार व्यक्ति प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जेव्हा राजकारणात हस्तक्षेप करतात तेव्हा राजकारणाचे गुन्हेगारीकरण घडून येते.

"राजकारण" हा शब्द "राजकारणाचे गुन्हेगारीकरण" या शब्दात अंतर्भूत आहे. येथे राजकारण शब्द राजकीय क्रियांशी (Political process) आणि राजकीय क्रिया करण्यास जबाबदार व्याक्तिंशी संबधीत आहे. भारतीय लोकशाहीमध्ये निवडणुका राजकीय सत्ता प्राप्त करण्याचे साधन आहे. व्यक्तिशः राजकारणी किंवा राजकीय पक्ष जेव्हा गुन्हेगारांची मदत घेतात किंवा स्वतः गुन्हेगार निवडणुका लढवितात तेव्हा राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याचे दिसून येते. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ, सनदी नोकरशाही, म्युनिसिपल कार्पोरेशन्स, म्युनिसिपाल्टीज, पंचायत राज्यसंस्था, राजकीयपक्ष, दबावगट, व्यापारी संघटना इत्यादी राजकीय संस्थामध्ये अनेक लोक असतात. त्यांच्यापैकी जे स्वतः गुन्हेगार असतात किंवा गुन्हेगारांशी संबंध ठेवून असतात अशा परिस्थितीला राजकारणाचे गुन्हेगारीकरण म्हणतात.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण दोन मार्गाने घडते :** १) प्रत्यक्ष २) अप्रत्यक्षपणे. प्रत्यक्ष राजकारणाचे गुन्हेगारीकरण म्हणजे जेव्हा गुन्हेगार स्वतःच निवडणूक प्रक्रियांमध्ये भाग घेऊन निवडून येतात आणि संसदेमध्ये किंवा राज्याच्या विधीमंडळामध्ये त्यांना सत्ता मिळते तेव्हा राजकारणाचे गुन्हेगारीकरण प्रत्यक्षपणे होते. अप्रत्यक्ष राजकारणाचे गुन्हेगारीकरण म्हणजे गुन्हेगारांचा राजकीय पक्षांच्या कार्यामध्ये सहभाग होय. उदा. उमेदवारांना पैशाची मदत करणे, गुन्हेगारांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भागामध्ये व्होट बँकमधून ब्लॉक व्होटींग करणे, बुथ कॅपचर करणे, विरुध्द पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारात अडथळा आणणे, उमेदवारांना किडनॅप करणे इत्यादीव्दारे गुन्हेगार राजकीय प्रक्रियांशी संबंधीत असतात. त्याला राजकारणाचे अप्रत्यक्ष गुन्हेगारीकरण म्हणतात. राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे दोन मुख्य घटक आहेत. १) दंड शक्ती Muscle power २) आर्थिक शक्ती Money power

**दंड शक्ती Muscle power :-** गँगस्टरस, माफीया डॉन, संघटीत गुन्हेगारी गट यांचा सहभाग, भारतीय राजकीय संस्कृतीचा एक भाग झाला आहे. आज कोणताही राजकीय पक्ष किंवा राजकीय संघटना मसल पॉवरच्या उपयोगापासून मुक्त नाही. आज अनेक राजकीय नेत्यांचे अस्तित्वच गँगस्टरसच्या मदतीवर अवलंबून आहे. विविध राजकीय पक्षांच्या कार्यपध्दतीवरुन विशेषतः निवडणूकांच्यावेळी निवडणूकीला उभे असणारे उमेदवार आपल्या

मतदारसंघातील दादा आणि मसलमॅनची मदत घेतात. उदा. पंचायतराज्याच्या निवडणूका जोपर्यंत Muscle power आणि (caste) जाती यावर आधारीत आहे तोपर्यंत राजकारण स्वच्छ होणार नाही हे स्पष्ट दिसते.

**आर्थिक शक्ती Money power :-** राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा दुसरा मुख्य घटक म्हणजे मनीपॉवर होय. लोकशाहीपध्दती निवडणूकांवर आधारीत आहे आणि निवडणूक अतिशय खर्चिक आहे. खर्चिक निवडणूकांमुळे भ्रष्टाचार भारतीय राजकारणात आला आहे. MLA, MP किंवा साध्या पंचायतीच्या, म्युनिसिपलच्या निवडणूकांवर लाखो, करोडो रुपये खर्च करण्यात येतात; त्यातील काही खर्च कायदेशीर असतो पण बराचसा बेकायदेशीर असतो. निवडून येण्यासाठी उमेदवार करोडे रुपये खर्च करतो आणि बेकायदेशीर पैशाच्या बळावर निवडून येतो ही एक बाजू होय. निवडून आल्यानंतर आणि संसदेमध्ये किंवा विधीमंडळात सीट मिळाल्यानंतर जो खर्च त्याने निवडून येण्यासाठी केलेला असतो त्यापैशाच्या हजारोपटीने तो राजकारणी बेहिशोबी पैसा कमवितो. अशाप्रकारे राजकारणाचे गुन्हेगारीकरण दिवसेंदिवस भारतीय राजकारणामध्ये वाढतच आहे. अशावेळी प्रामाणिक, आदर्श व्यक्ति स्वतःला राजकारणापासून दूर ठेवतात. वरीलप्रकारे व्यवहार करणाऱ्या व्यक्तीच राजकारणात येतात.

## १६.३ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची कारणे

भारतीय राजकीय प्रक्रियांमध्ये आज जेवढे गुन्हेगारीकरण दिसून येते तसे भारताच्या इतिहासामध्ये आढळत नाही. स्वातंत्र्यापूर्वी भारतात देशाला परकीय राजवटीपासून मुक्त करणे, देशाचे स्वातंत्र्य आणि लोकशाही या एकाच धैर्याने सर्व राजकारणात येत असे. राजकीय लढ्यात भाग घेणाऱ्यांमध्ये कोणत्या पध्दतीने राजकीय लढा असावा याविषयी मतभेद होते परंतु सर्वांचे ध्येय एकच 'देशाचे स्वातंत्र्य' होते. त्यावेळी राजकारणामध्ये असलेले सर्व राष्ट्रभक्त (nationalist), उच्च शिक्षीत (highly educated), ब्रिटिशांनी दाखविलेल्या लालसेपासून मुक्त, स्वतः अनेकतऱ्हेचा त्रास सोसून (suffered a lot) आलेले, व्यक्तिगत स्वार्थाला महत्व न देणारे असे प्रामाणिक, निस्वार्थी, देशभक्त होते. राजकीय प्रक्रियांमध्ये त्यांचा सहभाग भारतदेशाची आणि लोकांची सेवा करणे ह्या एकमेव उद्देशाने होता.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात घटनाकारांनी सांसदीय लोकशाही, प्रौढ मताधिकार पध्दतीचा स्विकार केला. ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता त्यांचा सहभाग स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारणात झाल्यानंतर भारतीय राजकारण स्वच्छ होते. हळूहळू भारतीय राजकारणाचे शुध्दीकरण जाऊन राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे. आजच्या काळात तर राजकारणाचे गुन्हेगारीकरण हा एक मोठा धोका भारतीय राष्ट्रीय सुरक्षतेच्या मार्गात निर्माण झाला आहे.

भारतातील राजकारणाचे गुन्हेगारीकरण प्रक्रियेची पहिली फेज म्हणजे संस्था भ्रष्ट्राचारी झाल्यात (Institutions got corrupted).

दुसरी फेज म्हणजे भ्रष्ट्राचाराचे संस्थीकरण झाले. Corruption has been institutionalized. संस्था भ्रष्ट्राचारी झाल्यात म्हणजे संस्थेमध्ये काम करणारी माणसे नियम

गुंडाळायला लागले, फायद्यासाठी किंवा पैशासाठी चुकीच्या गुन्हेगारी स्वरुपाच्या लोकांची कामे करायला लागले. संस्थामध्ये भ्रष्ट्राचार समाविष्ट झाला. दुसरी फेज Institutionalization of corruption भ्रष्ट्राचाराचे संस्थीकरण झाले. कोणत्याही संस्थेमध्ये भ्रष्ट्राचाराशिवाय, लाच दिल्याशिवाय कोणतेच काम होत नाही. पावलोपावली भ्रष्ट्राचार, लाचतुचपत, वशिलेबाजी, स्वार्थी राजकारणी या गोष्टी समाविष्ट होऊन भ्रष्ट्राचाराचेच संस्थीकरण झाले आहे. आज भारत जगातील भ्रष्ट देशांच्या यादीमध्ये प्रमुख स्थानी आहे. याला प्रमुख कारण राजकारणाचे गुन्हेगारीकरण होय. राजकीय गुन्हेगारीकरणाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) आजच्या काळात राजकारणाचे ध्यैय सत्ता, प्रतिष्ठा, पैसा मिळविणे हे झाले आहे - स्वातंत्र्यानंतर २०-२५ वर्षानंतरच्या काळात ज्या पिढीने राजकारणात प्रवेश केला आहे, त्यांचे उद्दिष्ट कुठेही काही करणे जमले नाही तर कमीत कमी राजकारण करुन किंवा राजकारणी लोकांच्या अवतीभोवती करुन सत्ता, प्रतिष्ठा आणि पैसा मिळविणे हे झाले आहे. हुशार, प्रामाणिक, निस्वार्थी, अभ्यासू, तज्ञ, बुध्दिवान लोक आज राजकारणापासून स्वतःला दूर ठेवतात. हुल्लडबाजी करणारे, फुकटचा वेळ घालविणारे काहीही अभ्यास नसलेले लोक आज राजकीय प्रक्रियेमध्ये सक्रिय आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष व नेता याच गोष्टींना चालना व प्रेरणा देत आहे असे भारतीय राजकारणाचे चित्र दिसून येते.

२) भारतातील बहुपक्षपध्दती - घटनेप्रमाणे प्रत्येक प्रौढ नागरिकाला मत देण्याचा, निवडणूक लढविण्याचा, राजकीय प्रक्रियांमध्ये भाग घेण्याचा, नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याचा अधिकार आहे. ज्या गुन्हेगारांना राजकीय पक्षांमध्ये प्रवेश मिळत नाही ते स्वतःचा राजकीय पक्षांमध्ये प्रवेश मिळत नाही ते स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन करतात. उदा. २००९ च्या संसदेच्या निवडणूकीच्या वेळी ३६९ राजकीय पक्षांनी उमेदवारांची नांवे नोंदविली होती. त्यामुळे राजकारण एक खेळ झाला.

३) गुन्हेगार आणि राजकारणी यांचे संबंध आणि युती - गुन्हेगारीला आळा घालणारे अनेक कायदे आहेत. उदा. दारुबंदी. परंतु दारुचे धंदे तरीही जोरात चालू आहे. काळ्या बाजारात दारुची विक्री होते. कारण दारुचे धंदे व काळाबाजार करणारे राजकारण्यांना पैसा पुरवितात. पोलीस, राजकारणी आणि गुन्हेगारी यांच्या युतीमुळे ,सर्वत्र काळा बाजार करणारे, चुकीचा व्यवसाय करणारे कार्यरत आहेत. पैशाप्रमाणेच निवडणूकीच्या वेळी मसलपॉवरचा उपयोग राजकीय उमेदवार करतात. गुंड, गुन्हेगार, अरेरावी करणारे यांना हाताशी धरुन लोकांमध्ये धाक निर्माण करुन मते मिळवितात. अशा प्रकारच्या युतीमुळे गुन्हेगारांना पाठींबा मिळतो आणि राजकारणाचे अप्रत्यक्षरित्या गुन्हेगारीकरण होते. Money and muscle support राजकारणी घेतात ; सत्तेत येतात असे दिसते.

४) गुन्हेगार स्वतःच राजकारणात येत आहेत - १९७० नंतरच्या भारताच्या राजकारणात सत्ता व प्रतिष्ठा मिळविण्यासाठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले लोक राजकारणात प्रवेश करीत आहेत असे दिसते. अनेक गुन्हेगार असा विचार करतात की आपल्या दंडशक्ति आणि पैशावर इतर लोक सत्तेवर येऊन राजे बनतात. तर मग आपण स्वतःच निवडणूक लढवून "राजा" का बनू नये. या विचारातून हळू हळू अनेक गुन्हेगार निवडणूक लढवितात, स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन करतातव प्रस्थापित राजकीय पक्षाचे सभासद बनतात. भारतीय कायदेमंडळ अनेक गुन्हेगारांसाठी सत्ता, प्रतिष्ठा, पैसा मिळवून देणारा स्वर्ग झाला

आहे. एकदा गुन्हेगार MP किंवा MLA झाले की त्याच गुन्हेगारांना पोलीसयंत्रणा आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यावर सत्ता गाजवण्याची संधी मिळते. या यंत्रणा त्यांना आपल्या मनाप्रमाणे राबवून घेता येतात. २००१ च्या निवडणूकांपेक्षा २००९ च्या निवडणूकांमध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या (MP) सदस्यांची संख्या वाढली आहे. राज्याच्या कायदेमंडळांमध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आमदारांची संख्या आणखीच वाढली आहे. गुन्हेगारच राजकारणी झाल्यामुळे ते पोलीसांनाही कायद्याप्रमाणे काम करु देत नाही. पोलीसही गुन्हेगारांना पाठीशी घालतात कारण पोलीसांची बदली, पदावरुन काढून टाकणे या गोष्टी त्या त्या राजकारणांच्या हातात असतात.

५) दारिद्र्य, अशिक्षितपणा, जातीय राजकारण, धर्मवाद, सामाजिक व राजकीय जागृकतेचा अभाव भारतीय सामाजव्यवस्थेमध्ये आहे. भारतीय राजकीय संस्कृतीचा उदय या सर्व गोष्टीतून होतो. वरील गोष्टींमुळे सुदृढ लोकशाही मुल्ये भारतात विकसित होऊ शकत नाही. जातीय राजकारणाला भुलणारे, धर्मवादाला महत्व देणारे आणि मूळातच जागृकतेचा अभाव असणारे भारतातील अनेक लोक राजकारण्यांच्या भूल थापांना बळी पडतात; निवडणूकीच्या वेळी चुकीच्या लोकांना निवडून देतात.

बेकारी, दारिद्र्य आणि अशिक्षितपणा यामुळे आज अनेक तरुण गुन्हेगारीकडे ओढले जात आहेत. लाचलुचपत देऊन पोलीस संरक्षण गुन्हेगारांना मिळत आहे.जात आणि धर्माचा उपयोग करुन अनेक तरुणांना भडकावून राजकारणात प्रवेश देण्यात येतो आणि त्यांच्याकडून नको त्या गुन्ह्याच्या कृती करवून घेण्यात येतात. या सर्व गोष्टी भारतीय राजकीय संस्कृतीचा एक भाग झाल्या आहेत असे दिसून येते.

६) भारताच्या समकालीन राजकारणामध्ये नैतिकतेचा अभाव – भ्रष्ट्राचारी मार्गांचा स्विकार आजच्या समाजाने केल्याचे दिसून येते. एखाद्या व्यक्तिने बेकायदेशीर व खोट्या मार्गाने पैसा मिळविला असेल परंतु तो जर बंगल्यात राहतो, गाडीतून हिंडतो अशा व्यक्तिकडे आणि त्याच्या नातलगांकडे लोक असहिष्णुता, तिरस्कार दाखवित नाही. त्यामुळे त्या व्यक्तिलाही आपण चुक करुन खोट्या मार्गाने पैसा मिळविला याची खंत वाटत नाही. याउलट समाजात अनेक तरुण अनैतिक मार्गांचीच स्तुती करतात आणि चांगल्या मार्गाने काही मिळत नाही असा दृष्टीकोन घेतात. अनैतिक मार्गाने हवी असलेली गोष्ट मिळविता येते अशी धारणा अनेक लोक बाळगतात.जे कोणी कायदे, नियम पाळून सरळ मार्गाने जातात त्यांना अपात्र, मूर्ख म्हटले जाते. शासनकर्त्यांकडून राजकीय प्रक्रिया घडून कार्यक्षमता निर्माण होईल यावर लोकांचा विश्वास राहिला नाही. त्यामुळेच राजकारणाचे गुन्हेगारीकरण जीवनाचा एक भाग म्हणून लोकांनी स्विकारले आहे. जे कुणी मूठभर नेते चांगल्या मार्गाने जाऊ इच्छितात अशा नेत्याला त्यांच्या राजकीय पक्षात स्थान मिळत नाही. भारतात आणि संपूर्ण जगात निवडणूक अतिशय खर्चिक झाल्या आहेत. त्यामुळे जो राजकारणी नेता राष्ट्रहिताला लोकहिताला महत्व देऊन राजकारणामध्ये राहू इच्छितो तो निवडणूक प्रक्रयेत खर्च करु शकत नाही म्हणजेच काळा पैसा आणि राजकारण असे समीकरण तयार झाले आहे.

७) न्यायालयीन पध्दती आणि इनव्हेस्टिगेटीव्ह पध्दती मधील लुपहोल्स - न्यायालयीन पध्दती आणि इनव्हेस्टिगेटीव्ह यंत्रणे मधील लुपहोल्यचा फायदा गुन्हेगारांचे वकील घेतात आणि कायद्याला फिरवून किंवा पाहिजे तसा अर्थ देऊन गुन्हेगारांचे संरक्षण करतात.

पोलीसयंत्रणा राजकीय यंत्रणेखाली कार्य करतात. गुन्हेगारांची मदत राजकारणी घेतात, त्यानंतर गुन्हेगारांना पाठीशी घालण्यासाठी पोलीस यंत्रणेचा उपयोग करतात. राजकारणाच्या गुन्हेगारीसाठी सर्व राजकीय पक्ष एकमेकांना दोष देतात. परंतु राजकारणातील गुन्हेगारी नष्ट करण्यास कोणताच राजकीय पक्ष प्रयत्न करीत नाही. क्रिमीनल लॉ प्रमाणे जोपर्यंत एखाद्या गुन्ह्याचे प्रुफ मिळत नाही तोपर्यंत तो गुन्हा ठरत नाही. अर्थात गुन्हा करायचा पण प्रुफ ठेवायचे नाही ही प्रवृत्ती विकसित झाली. त्याचा उपयोग गुन्हेगार सरसकट करतात. त्यामुळे एखाद्या उमेदवारांविरुध्द कोर्टात गुन्हे चालत असूनही त्यांना निवडणूकीमध्ये निवडणूक लढविण्यास निवडणूक आयोग मनाई करु शकत नाही. सिव्हील सोसायटीने मागणी केली की ज्यांच्याविरुध्द खून, बलात्कार, किडनॅपिंग अशाप्रकारचे सिरीअस गुन्हे आहेत त्यांना निवडणूक लढविण्यासाठी मनाई करण्यात यावी. परंतु कोणताच राजकीय पक्ष याबाबतीत सिरीअस नाही असे दिसते. एखाद्या गुन्हेगार राजकारणाविरुध्दचा खटला अनेक वर्षे चालतो. कारण भारतात न्यायालयीन प्रक्रिया दिर्घ काळ चालणारी आहे. न्यायालयीन व्यवस्थेच्या या दूर्बलतेचा फायदा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले राजकारणी घेतात.

८) युतीचे राजकारण – राजकारणाच्या गुन्हेगारीसाठी युती राजकारण जे भारतात मागच्या २५ वर्षापासून अस्तित्वात आले आहे ते सुध्दा कारणीभूत आहे. युतीचे सरकार बनवितांना युतीमध्ये समाविष्ट होणारा प्रत्येक राजकीय पक्ष युतीमध्ये मंत्रिपद मिळावे म्हणून धडपडतो. त्यावेळी व्यक्ति चांगली कि वाईट याचा विचार कोणताच पक्ष करीत नाही.त्यामुळे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या राजकारण्यांना ते एक वरदानच झाले आहे.

९) भारतात नागरी समाजाचा (civil society) चा प्रभाव अतिशय मर्यादित आहे. बहुसंख्य भारतीयांमध्ये सामाजिक व राजकीय जाग्रकतेचा अभाव आहे, भारतीय समाज जात, धर्म, वर्ग भाषा, वंश आणि प्रदेश इत्यादीबाबतीत विविधता असलेला आहे. त्या विविधतेमुळे भारतीय समाज विभागलेला आहे. समाजामध्ये असेच विभागलेले वातावरण राहावे यादृष्टीने अनेक राजकारणी तेच तेच जात व धर्मावरील प्रश्न समोर आणतात. लोकांचे लक्ष जात, धर्म प्रदेश इत्यादी प्रश्नावर वेधून घेतात. त्यामुळे सर्वांचे सामान्य धोरणे व कारणे (common cause) च्या मागणीसाठी उदा. स्वच्छ, नितळ, प्रामाणिक, निस्वार्थी शासनाची मागणी लोक करीत नाही. राजकारणाचे गुन्हेगारीकरण याविरुध्द लोक उठावकरीत नाही.

## १६.४ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे परिणाम

१) लोकशाही धोक्यात - स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवता स्थापन करणे ही लोकशाहीची उद्दिष्ट्यच नष्ट होत आहे. बरेचदा कायदा सुव्यवस्था फक्त वरवर आहे असे वाटते.
२) लोकांचा राजकीय व्यवस्थेवर विश्वास राहिला नाही. सामान्य व्यक्तिला बरेचदा असुरक्षित आणि हतबल वाटायला लागते.
३) तरुण पिढी भरकटत आहे. मूल्यांवरच्या विश्वासाला तडा गेल्यामुळे तरुण पिढी विशेषतः बेकारी, दारिद्र्याला तोंड देणारे चुकाच्या मार्गाकडे वळत आहे.
४) देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेला राजकीय गुन्हेगारीकरणामुळे खूप मोठा धोका निर्माण झाला आहे.

## १६.५ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर उपाय -

मागच्या दोन शतकांमध्ये शासनाने वाढत्या राजकीय गुन्हेगारीकरणा बाबतीत केलेल्या उपायांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की मार्च १९९३ साली मुंबईमध्ये जे अनेक बॉम्बब्लास्ट झालेत आणि त्यामुळे अनेक लोकांचे प्राण गेले तेव्हा केंद्रशासनाच्या लक्षात आले की राजकारण आणि गुन्हेगार यांच्यातील युतीमुळे हे बॉम्बब्लास्ट करणे दहशतवाद्यांना शक्य झाले. त्यावेळी लोकांचा राग लक्षात घेऊन शासनाने गुन्हेगार, प्रशासक आणि राजकारणी यांच्यातील युतीचा शोध घेण्यासाठी एका समितीची स्थापना केली. ती समिती व्होरा समिती होय. या समितीमध्ये केंद्राचे होम सेक्रेटरी एन. एन. व्होरा आणि इतर CBI चे डायरेक्टर वगैरे होते. कमिटीने अभ्यासपूर्ण शोध घेऊन गुन्हेगार, राजकारणी आणि सनदीनोकर यांच्यात लिंक आहे असा रिपोर्ट  दिला, त्यावर शिफारशी सुचविल्या. परंतु शासनाने त्याबाबतीत फारसे काही केले नाही. १९९७ साली दिनेश त्रिवेदी आणि केंद्रशासन यांच्यातील खटल्याच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने असे मत मांडले होते की राष्ट्रपतींनी उच्च दर्जाची समिती स्थापन करावी, आणि गुन्हेगारीकरण आणि राजकारण यांचा संबंधाचा शेवट करण्यासाठी मार्ग शोधावे. शासनाने nodal agency ची स्थापना केली. सार्वजनिक पैसा खर्च करुन ते मिटींग घेतात परंतु ठोस काहीही झाले नाही.

व्होरा समितीने निवडणूक पध्दतीवर भाष्य करतांना निवडणूक खर्चिक आहेत. सर्व राजकीय पक्ष निवडणूका जिंकण्यासाठी (ब्लॅक मनि) काळा पैसा वापरतात. यासाठी काळा पैसा मिळविण्यासाठी राजकारणी गुन्हेगारांच्या कृतीमध्ये सहभागी होतात. अशाप्रकारच्या अनेक गोष्टी व्होरा समितीने दाखवून दिल्या होत्या. ३१ ऑगस्ट १९९७ साली भारतीय स्वातंत्र्याची गोल्डन ज्युबिली म्हणून शासनाने लोकसभेमध्ये एक रिझोल्यूशन पास केले होते, की सर्व राजकीय पक्षांनी राजकीय गुन्हेगारीकरणाला आळा घालावा. परंतु प्रत्यक्षात त्याबाबतीत काही झाले नाही. व्होरा समितीच्या शिफारशीवर काहीही करण्यात आले नाही.

२ मे, २००२ साली सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला होता की निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी त्यांचा criminal record, financial status आणि educational level सांगणे सक्तीचे राहील. भ्रष्ट्राचाराचा नायनाट करण्याच्या दृष्टीने हे योग्य पाऊल होते.

प्रीन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीयाने ज्यांना लोकशाहीचा चौथा खांब असे संबोधले जाते त्यांनी प्रामाणिक, धर्मनिरपेक्ष पध्दतीने, स्वतःला न विकता, लोकांच्या हिताच्या दृष्टीने आपली भूमिका पार पाडवी. राजकारणी आणि गुन्हेगार यांच्यातील युती मिडीया उघड करु शकतात.

चारित्र्यघडण आणि नैतिक मूल्यांचा विकास व्हावा म्हणून कुटूंब, शाळा, सांस्कृतिक संघटनांनी प्रयत्न करावे. कमीतकमी नैतिक मूल्यांचे संस्कार काही प्रमाणात राजकारणाच्या गुन्हेगारीला आळा घालू शकतील.

मतदारांची जागृकता आवश्यक आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना मतदारांनी मते देवू नये.

## १६.६ सारांश

राजकारणाचे गुन्हेगारीकरण अतिशय धोकादायक आणि सर्वव्यापी झाले आहे. वेळीच यावर उपाय केले नाही तर लोकशाही संस्था धोक्यात येतील.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण १) प्रत्यक्षपणे २) अप्रत्यक्षपणे अशा दोन पध्दतीने होत आहे. राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची कारणे अनेक आहेत. १) राजकारण सत्ता, प्रसिध्दी मिळविण्याचे साधन बनले आहे. २) बहुपक्षपध्दती ३) पैशाची हाव ४) गुन्हेगारांचे राजकारणी लोकांमध्ये परिवर्तन ५) दारिद्रय, अशिक्षितपणा, जात धर्मावर आधारीत राजकारण ६) नैतिक मूल्यांचा अभाव ७) न्यायालयीन व्यवस्था आणि इनव्हेस्टिव्ह एजन्सीचे कार्यातील लुपहोल्स ८) युतीचे राजकारण ९) दुर्बल सीव्हील सोसायटी इत्यादी आहेत.

राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर शासनाने खालील उपाय केले आहेत. १) व्होरा समितीची स्थापना २) सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक लढविणाऱ्या सभासदांसाठी ठरविलेला निकष ३) माहितीचा अधिकार ४) मीडीया आणि वृत्तपत्रे ५) नैतिक मूल्यांचा विकास ६) मतदारांची जागृकता.

## १६.७ प्रश्न -

१) भारताच्या संदर्भात राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा अर्थ,व्याख्या सांगून त्याचे परिणाम सांगा.

२) राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची कारणे लिहा.

३) शासनाने राजकारणाच्या गुन्हेगारीकरणांवर कोणते उपाय केले विश्लेषण करा.

❖❖❖❖

# १७

# दहशतवाद

## (Terrorism)

**घटक रचना :**

१७.० उद्दीष्ट
१७.१ प्रस्तावना
१७.२ दहशतवादाची व्याख्या
१७.३ दहशतवादाची वैशिष्ट्ये आणि कारणे
१७.४ भारतातील दहशतवाद
१७.५ नक्षलवाद
१७.६ दहशतवादाचे प्रकार आणि परिणाम
१७.७ दहशतवादावर उपाय
१७.८ सारांश
१७.९ प्रश्न

## १७.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१) दहशतवादाच्या सैध्दान्तिक बाजू समजून घेणे, त्यासंबधीत दहशतवादाची व्याख्या, अर्थ, वैशिष्ट्ये, कारणे यांचा अभ्यास करणे.
२) भारतात दहशतवादाचा उदय आणि कारणांचा मागोवा घेणे.
३) भारतात ज्या राज्यांमध्ये सतत दहशतवादी कृत्ये घडतात त्यांच्या अभ्यास करणे. त्या प्रदेशांचे ते वैशिष्ट का बनले याचा अभ्यास करणे.
४) भारतातील दहशतवादाला आळा घालण्यासाठी काही उपाय सुचविणे.

## १७.१ प्रस्तावना

समकालीन जगामध्ये आंतरराष्ट्रीय शातंता आणि जगाला धोक्यात आणणारी मुख्य समस्या म्हणजे दहशतवाद होय. जगातील विविध भागामध्ये वेगाने दहशतवाद पसरत आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर युनायटेड नेशन्स आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना झाली आहे. आंतरराष्ट्रीय प्रश्न शातंतेच्या मार्गाने सुटून तिसऱ्या महायुध्दाला टाळणे हा त्यामागे उद्देश होता. आंतरराष्ट्रीय न्यायालय आंतरराष्ट्रीय कायद्याच्या क्षेत्रात येणारे तंटे सोडवितात.

## १७.२ दहशतवादाची व्याख्या

दहशतवादाची आंतरराष्ट्रीय दृष्टीने सर्वश्रुत अशी व्याख्या नाही. दहशतवादाच्या दोन पध्दती दिसतात.

१) **राजकीय दहशदवाद Political terrorism** - राजकीय उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने दहशतीचे वातावरण निर्माण करणे. यातही हिसेंचा उपयोग करण्यात येतो.

२) Criminal terrorism - यातही अति हिंसाचार करून दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात येते. या दहशदवादाचे स्वरुप गुन्हेगारी (criminal) असते. पैसै मिळविणे (monetary gain) त्यामागे उद्देश असतो. राजकीय उद्दीष्टपूर्तीसाठी जो हिंसाचार व दहशतवाद करण्यात येतो तो जागतिक चिंतेचा विषय आहे.

ऑक्सफर्ड युर्निव्हर्सिटी डिक्शनरी प्रमाणे – "Terrorism is the unofficial or unauthorized use of violence and intimidation in the pursuits of political aims."

दहशतवादी कृती म्हणजेच हिंसाचाराची कृती. एकतर यातील हिंसाचार अनऑफिशिअल आणि अनअॅथॉराईज्ड असतो आणि दुसरे म्हणजे हिंसाचाराचा उपयोग युक्ती (strategy) म्हणून करण्यात येतो ज्यामध्ये राजकीय उद्दीष्ट प्राप्त करणे हे ध्येय्य असते. दहशतवादातील हिंसाचार अनऑफिशिअल आणि अनअॅथॉराईज्ड असतो हे खरे परंतु हिंसाचाराची मान्यता कशी ठरवायची ? एखादा हुकुमशहा, राज्यकर्ता सत्तेवर राहण्याच्या उद्देशाने जेव्हा आपल्याच लोकांवर हिंसाचार करतो त्याला official हिंसाचार म्हणता येईल का ? उदा. सिरीया मध्ये सिरियातील लोक तेथील हुकुमशहाच्या सत्तेला विरोध करीत आहेत. म्हणून तेथील हुकुमशहा अशा आक्रमक लोकांना दडपण्यासाठी त्यांच्या विरुध्द हिंसाचार करीत आहे. उदा. फायरिंग, बॉम्बींग इत्यादी.

दहशतवादाच्या अनेक व्याख्या आहेत. काळाच्या ओघात दहशतवादाचे स्वरुप बदलत आहे. दहशतीचे राज्य, युध्दातील गुन्हेगारी, मानवतेविरुध्दचे गुन्हे, राज्यातील दहशतवाद, या सर्व दहशतवादी संकल्पनामध्ये फरक आहे.

युनायटेड नेशन्स यांनी केलेली दहशतवादाची व्याख्या खालील प्रमाणे आहे.

"Terrorism as any action intended to cause death or serious bodily harm to civilians and non-combatants with the purpose of intimidating a population or compelling a government or international organization to do or abstain from doing any act".

## १७.३ दहशतवादाची वैशिष्ट्ये आणि कारणे

दहशतवाद आणि इतर हिंसाचारी कृती यातील फरक लक्षात घेण्यासाठी दहशतवादाची वैशिष्ट्ये अभ्यासणे आवश्यक आहे.

१) दहशतवाद राज्यकीय कृती असते (a political act). राजकीय उद्दीष्टप्राप्तीसाठी केलेला संघटीत प्रयत्न असतो.

२) दहशतवादाचा परिणाम दीर्घकाळ टिकणारा असतो (a long lasting impact) राजकीय आणि मानसिक दृष्टीने दहशतवादाचा परिणाम दीर्घकाळ असतो. दहशतवादी कृतीमध्ये मानवी साधनसंपत्ती, सार्वजनिक मालमत्तेचे जास्तीतजास्त नुकसान करण्यात येते त्यामुळे लोकांमध्ये भीती आणि दहशकत निर्माण होते. लोक त्यागोष्टी विसरु शकत नाही. शासनालाही त्या कृतीची दखल घ्यावी लागते.

३) दहशतवादी गटांची रचना वरपासून खालपर्यंत श्रेणीबद्ध पद्धतीची असते. (a hierarchal structure)

४) दहशतवादी नेहमी निरागस लोकांवर हल्ला करतात. त्यांचे जे विरोधी असतात त्यांच्यावर प्रत्यक्ष हल्ला न करता, निरागस लोकांवर हल्ला करून दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात येते आणि दबाव आणण्यात येतो.

५) दहशदवादात non-state actors समाविष्ट असतात.

६) त्यांच्या कृती बेकायदेशीर (unlawful) असतात.

७) दहशतवादात मानवतावादी मूल्यांना (Humanitarian norms) स्थान नसते.

८) दहशतवाद्यांच्या कृती असतात. दहशतवाद्यांची कृती नियोजनबद्ध असते.

**दहशतवादाची कारणे**

१) Religious fanaticism eg. Islamic fanaticism धर्मान्धंता.

२) Impositon of a particular form of political order विशिष्ट स्वरुपांची राजकीय व्यवस्था स्थापन करणे उदा. अफगणिस्तान आणि पाकिस्तान

३) Separatist tendencies - स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या उद्देशाने, वेगळेपणाची भावना ठेवून दहशतवाद केला जातो. उदा. भारतात जम्मू काश्मीर आणि नॉर्थइस्ट राज्यांमध्ये आसाम, मेघालय, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, मणिपूर. या राज्यांमध्ये या स्वतंत्रपणाच्या भावनेतून दहशतवाद होत आहे.

४) Resistance to the existing governments - अस्तित्वात असलेल्या शासनाला विरोध करण्यासाठी दहशतवाद केला जातो. उदा. पॅलेस्टाईन, इराक

५) आर्थिक निराशा, वैफल्यता - उदा. भारतातील नक्षलवाद, आर्थिक वैफल्य आणि निराशा यातून उद्भवला आहे. उदा. बिहार, झारखंड, छत्तीसगढ, ओरीसा, महाराष्ट्र, आंधप्रदेश या राज्यामध्ये नक्षलवाद दिसून येतो.

६) बेकारी, दारिद्र्य, विषमता, शोषण, इत्यादीमुळे ही दहशतवादाला चालना मिळते.

७) स्पर्धात्मक राजकारण - अनेक राष्ट्र स्पर्धात्मक राजकारणामुळे दहशतवादाला प्रोत्साहन देतात. दहशतवादी संघटनांना आर्थिक साहाय्य करतात. शस्त्र पुरवितात. आणि शेजारील राष्ट्रांमध्ये अव्यवस्था, तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. उदा. भारतात शेजारील राष्ट्राच्या प्रोत्साहनातून बरेचदा दहशतवाद होतो.

८) भ्रष्टाचाराची यंत्रणा – स्थानीय पोलीस, प्रशासकीय यंत्रणा इत्यादी लाचलुचपत आणि दडपणाला बळी पडतात त्यातूनही दहशतवादी कृतींना चालना मिळते.

९) लोकांची स्वकेंद्रित वृत्ती – दिवसेंदिवस लोक स्वकेंद्रीत होत आहेत. आपल्याला इतरांचे काय ही वृत्ती विकसित होत आहे. पैसा अति महत्त्वाचा झाला आहे.

१०) धर्म आणि जात यावर आधारित संघटना.

## १७.४ भारतातील दहशतवाद (Terrorism in India)

भारतामध्ये दहशतवादाचे अतिशय उग्र स्वरुप दिसून येते. त्याची मुख्यतः तीन कारणे दिसून येतात.

१) International Politics आंतरराष्ट्रीय राजकारण
२) Religious antagonism धार्मिक वैमनस्य
३) Economic deprivation आर्थिक वैफल्य

१) आंतरराष्ट्रीय राजकारण – काश्मीर वरून पाकिस्तान भारताशी तंटे निर्माण करतो. आंतरराष्ट्रीय भांडण आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरुप काश्मीर प्रश्नाला आज आले आहे.
२) धार्मिक वैमनस्य – उदा. पंजाबमध्ये नॉर्थइस्ट राज्यांमध्ये
३) आर्थिक वैफल्य - नक्षलवादी आणि माओवादी यांचा दहशतवाद.

**काश्मीरसंबंधीत दहशतवाद –**

भारत आणि पाकिस्तान यांच्याध्ये काश्मीर वरून संघर्ष अतिशय जुना आहे. स्वतंत्र्य भाराताची आणि पाकीस्तान या इस्लाम राज्याची निर्मिती झाली तेव्हापासूनच हा संघर्ष उद्भवला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत British India आणि Indian states याप्रमाणे विभागलेला होता. British India यात येणाऱ्या प्रदेशांमध्ये ब्रिटिशांचे प्रत्यक्ष राज्य होते आणि Indian states ची संख्या पाचशेच्या वर होती. ब्रिटिश वर्चस्वाखालीच तेथे भारतीय राजांचे राज्य होते. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्याचा कायद्याप्रमाणे ब्रिटिशांच्या प्रत्यक्ष वर्चस्वाखाली असलेल्या भारताचे भारत आणि पाकिस्तान यात विभाजन झाले. Indian States मध्ये येणाऱ्या राज्यातील राज्यकर्त्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली की त्यांनी भारतात विलीन व्हायचे कि स्वतंत्र राज्य म्हणून राहायचे. Indian states मध्ये येणारी बहुतेक राज्य भारतात विलीन होण्यास तयार झाली. अपवाद हैद्राबाद, जुनागढ शेवटी भारतीय राज्यात विलीन झाली. काश्मीर मध्ये बहुसंख्या मुस्लिम लोकसंख्या असली तरी काश्मीरवर हिंदू राजाचे राज्य होते. त्याला स्वतंत्र्य राज्य म्हणून काश्मीरवर राज्य करण्याची महत्वाकांक्षा होती. त्यामुळे पाकीस्तानच्या राजाने भारत किंवा पाकीस्तान कुठेच विलीन व्हायचे नाही ठरविले. १९४८ साली पाकीस्तानने काश्मीरवर आक्रमण करून काश्मीरचा ५७ % भाग हस्तगत केला. तेव्हा काश्मीरच्या राजाने भाराताची मदत मागीतली. भारताने “The instrument of Accession” या करारावर काश्मीरच्या राजाची सही घेतली आणि काश्मीरला मदत करुन पाकिस्तानला आक्रमणापासून थांबविले. १९६० मध्ये पाकीस्तानने त्यांच्या त्याब्यात असलेला जम्मूकाश्मीरचा काही भाग चीन ला देऊन टाकला. त्यामुळे सध्या जम्मूकाश्मीरच्या ४३% भागावर भारताचे नियंत्रण आहे आणि पाकिस्तानकडे ३७% भाग आणि चीनकडे २०% भाग आहे.

(युनाटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल) संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीकडे भारताने कश्मीर विषयक प्रश्न नेला. (UNCIP) United Nations Military observer Group अशी एक समिती युनोने स्थापन केली. पाकीस्तानला काश्मीरमधून त्यांचे सैन्य काढून घेण्याचे आदेश देण्यात आले. जम्मूकाश्मीरच्या लोकांचे मत घेऊन हा प्रश्न सोडविण्याचे ठरविण्यात आले. भारत आणि पाकिस्तान दोघांवरही संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीचा निर्णय बंधनकारक होता. परंतु पाकीस्तानने अजूनही आपले सैन्य या ठरावाप्रमाणे जम्मूकाश्मीर मधून काढून घेतले नाही. अजूनही काश्मीरी लोकांचे मत या बाबबीत घेण्यात आले नाही.

पाकीस्तानने काश्मीर हस्तगत करण्यासाठी भारताबरोबर चार युध्द केलीत. परंतु भारतीय सैन्याने या चारही युध्दांना चांगल्या तऱ्हेने तोंड दिले. त्यानंतर पाकीस्तानने काश्मीरवरुन भारताला त्रास देण्यासाठी दहशतवादी कारवाया करण्यास सुरवात केली आहे. भारत मुस्लिमविरोधी आहे असा प्रचार केला जात आहे. मुस्लिम हितसंबंध आणि मुस्लीमांचे नुकसान भारताने केल्यास भारतावर हल्ला करु अशीही धमकी पाकिस्तानकडून दिली जाते.

भारतातील काही गुन्हेगार ज्यांनी अतितीव्र स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. उदा. बॉम्बब्लास्ट गुन्हेगारांना पाकीस्तान आश्रय देत आहे. बाबरी मशिद प्रश्न आणि इतर प्रश्नांवरून भारतविरोधी प्रचार सतत करण्याचा प्रयत्न पाकीस्तान करत आहे.

पाकीस्तानमधील काही दहशतवादी संघटना जगातील अनेक भागांवर दहशतवादी हल्ले करतातच पण भारत त्यांचे मुख्य लक्ष्य आहे. उदा. लष्कर-ए-तोयबा, हरकत-उल-मुजाहिद्दीन (movement of the God's soliders) आणि जस-इ-मोहम्मद (Army of Muhammad)

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाचे मुख्य कारण काश्मीर आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी पाकीस्तानने दहशतवादाचा आश्रय घेतला आहे. काश्मीर मध्ये दहशतवादी हल्ले होतात आणि आता तर संपूर्ण भारतातच हे हल्ले व्हायला लागले आहेत. याचा परिणाम अराजक, अशांतता निर्माण होते, मनुष्यहानी, संपत्तीहानी होते. शासनाला लष्करावर प्रचंड खर्च करावा लागत आहे. सतत दहशतवादाच्या सावटाखाली वावारावे लागत आहे.

**<u>वंशवाद आणि धर्म यांच्याशी संबंधित पंजाब मधील दहशतवाद</u>**

पंजाबमध्ये शिख धर्मीय बहुसंख्य आहेत. १९७० च्या दरम्यान काही शीख नेत्यांनी केंद्रशासन आणि पंजाबमधील हिंदू विरुध्द प्रचार करण्यास सुरवात केली की शिख आणि हिंदू असा भेदभाव करुन शिखांवर पंजाबमध्ये अन्याय होत आहे. जहाल गटाच्या शिख नेत्यांनी शिखांसाठी वेगळ्या राज्यांची खलिस्तान ची मागणी करण्यास सुरवात केली होती. १९८० च्या दरम्यान पंजाबमध्ये जातीय सांप्रदायिक हिंसाचार घडू लागले आणि हळूहळू त्याचे रुपांतर दहशतवादात झाले. शिखांचे पवित्रस्थान गोल्डन टेम्पल येथेही भिद्रंणवाले या जहाल शिख गटाच्या नेत्याने शस्त्रसाठा केला. आणि सतत खालिस्तानची मागणी केली. भिंद्रणवाले आणि त्यांच्या मदतनीसांच्या धमक्यांना नष्ट करण्यास शासनाने "ब्लूस्टार" ऑपरेशन केले. सुवर्णमंदिरमध्ये लष्कर पाठविण्यात आले आणि ज्या अतिरेक्यांनी आश्रय घेतला होता. त्यांचा नायनाट करण्यात आला. या ऑपरेशन ब्लू स्टार मध्ये त्यांचा मुख्य दहशतवादी भिंद्रनवाले मारले गेले. त्याचाच परिणाम १९८४ साली इंदिरा गांधी यांची त्यांचाच सुरक्षा रक्षकांनी हत्या

केली. त्यानंतर दिल्ली आणि इतर अनेक भागांमध्ये शिखांविरूध्द लोकांनी चिडून हल्ले केले होते. परकीय शीख दहशतवाद्यांनी कॅनडावरून भारतात येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात बॉम्ब हल्ला केला ज्यामध्ये ३२९ लोक मारले गेले होते.

जोपर्यंत पाकीस्तानशी पंजाबची सीमा जोडली गेली आली तोपर्यंत शीख दहशतवाद्यांना पाकीस्तानमध्ये प्रशिक्षण देऊन भारतात दहशतवादी कृत्ये होतच राहणार असे दिसते. बेनझीर भुत्तो पाकीस्तानच्या पंतप्रधान असतांना त्यांनी घेतलेल्या धोरणामुळे भारतीय सैन्याला शीख दहशतवादाला आळा घालणे सोपे गेले. राजीव गांधी भारताचे पंतप्रधान असतांना त्यांनीही पंजाबची परिस्थीती सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.सेंट लोगोंवाल आणि राजीव गांधी यांच्यातील करार शिख दहशतवाद थांबविण्यास बराचसा कारणीभूत झाला. सध्या पंजाबमध्ये दहशतवादी कारवाया थांबल्या आहेत. जे कुणी खलिस्तानची मागणी करीत ते अकाली दलामध्ये अल्पसंख्य आहेत.

**इशान्य भारतातील दहशतवाद :**

उत्तरांचल भागातील दहशतवाद आणि भारताच्या उत्तर-पूर्व भागातील राज्यांची सामाजिक आणि राजकीय वास्तवता याविषयी क्वचित माध्यमांवर चर्चा करण्यात येते. फार कमी लोकांना या प्रदेशाविषयी आणि तेथील लोकांविषयी माहिती आहे. उत्तराचंल मध्ये भारतीय संघराज्यातील सात राज्यांचा समावेश होतो. ती राज्ये म्हणजे आसाम, मेघालय, त्रिपुरा, अरुणाचलप्रदेश, मणिपूर, मिझोराम आणि नागालॅन्ड होय. यापैकी काही राज्ये आणि केंद्रशासन यांच्यामध्ये वेळोवेळी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या भागांमध्ये काही दहशतवादी संघटना आहेत ज्या लोकांवर हल्ला करुन मानवहानी आणि वित्तहानी करतात. अरुणाचलप्रदेश या राज्यांवरून चीन आणि भारत देशामध्ये न सुटणारा संघर्ष आहे. अरुणाचल प्रदेश वास्तविक भारताचा भाग आहे परंतु चीन हे मान्य करायला तयार नाही. या भागावर आपले वर्चस्व प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न चीन करीत आहे.

उत्तराचंल भागातील बहुतेक लोक (tribel) भटक्या आदीवासी जमातीचे आहेत. भारताच्या या भागात अतिशय कमी प्रगती झाली आहे. उत्तराचंल भागातील सातही राज्ये केंद्रशासनावर असा आरोप करतात की केंद्रशासन या भागांकडे आणि या भागातील लोकांकडे दुर्लक्ष करतात. या भागातील राज्यांमध्ये राज्यांतर्गत काही समस्या आहेत की ज्यामुळे तेथे नेहमी हिंसाचार होतो. उदा. मणिपूर आणि नागालॅन्ड यांच्यात भूप्रदेशावरुन भंडण आहे, त्याशिवाय घुसखोरी या भागाची मुख्य समस्या आहे. या राज्यांमधील काही प्रादेशिक चळवळींनी स्वतंत्र होण्याची भाषा करुन त्यांचे रुपांतर (secessionist movements) मध्ये झाले आहे. नागालॅन्ड, मिझोराम, त्रिपुरा, आसाम या राज्यांमध्ये घुसखोरी आहे तोपर्यंत दहशतवादी कारवायाही होतच राहणार असे दिसते.

नागालॅन्ड मध्ये घुसखोरीच्या केसेस तर होतातच परंतु नागालॅन्ड मधील प्रभावी संघटना "नॅशनॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅन्ड" ही संघटना भारतापासून वेगळे होऊन नागा लोकांसाठी स्वतंत्र राज्याची मागणी करीत आहेत. या संघटनेच्या चळवळी हिंसाचारी होत्याच. भारतीय आर्मी आणि केंद्र शासनाचे इनस्टॉलेशन ज्या भागात आहेत त्यांच्यावरही या संघटना हिंसाचारी हल्ले करीत आहेत. परंतु २० व्या शतकाच्या शेवटी शेवटी नागा या वेगळ्या राज्याची मागणी करणाऱ्या संघटनांना भारत शासनाच्या विरोधी वागून काहीही साध्य होणार नाही हे

लक्षात आले. शेवटी १४ जून २००१ साली भारतशासन आणि नागालँन्ड यांच्यात करार झाला आणि दहशतवादी संघटनांनी दहशतवादी कारवाया थांबविल्या.

भारतीय संघराज्यातील उत्तरपूर्व भागातील आसाम या राज्यात दहशतवादी कृती घडल्याचे रिपोर्टस आहेत. आसाम मध्ये हिंदू आणि मुस्लिम दोन जमातीचे लोक राहतात. जम्मूकाश्मीर या राज्यानंतर आसाममध्ये मुस्लीम धर्माचे लोक जास्त आहेत. बांगलादेशाची निर्मिती झाल्यानंतर आसाम मध्ये सीमेवरून येणाऱ्या घुसखोरांची संख्या खूप वाढली आहे. तिथे मुस्लिम विरोधी चळवळ 'ऑल आसाम स्टूडन्स युनियन' आहे. ही चळवळ सुरवातीला अहिंसक होती. परंतु आता हिंसाचारी संघटनेमध्ये त्यांचे रुपांतर झाले आहे. ऑगस्ट १९८५ साली "Assam Accord" नावाचा करार भार शासनाने या संदर्भात केला. त्या कराराप्रमाणे ऑल आसाम स्टूडन्स यूनियने हिंसाचारी चळवळीपासून आम्ही दूर राहू असे लिहून दिले आहे. या कराराप्रमाणे जानेवारी १९६१ आणि मार्च १९७१ या दरम्यान जे शरणार्थी सीमेवरून आसाम मध्ये आले त्यांना तेथे राहण्यास परवानगी देण्यात आली. १९७१ नंतर ज्यांनी प्रवेश केला त्यांना आसाममध्ये राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही असे सांगण्यात आले. त्याप्रमाणे १९८५ साली संसदेने नागरिकत्वाच्या कायद्यामध्ये दुरुस्ती केली. त्या दुरुस्तीप्रमाणे १९६१ ते १९७१ या दरम्यान आसाम मध्ये आलेल्या शरणार्थी लोकांना नागरिकत्वाचा अधिकार देण्यात आला. त्यांना त्यांच्या भागामध्ये आसाममधील बोडो जमात त्यांना त्यांच्या भागामध्ये प्रशासकीय स्वातंत्र्य देण्यात आले. परंतु बोडो जमात फक्त प्रशासकीय स्वातंत्र्यावर समाधानी नाही. बोडोलॅन्ड या स्वतंत्र्य राज्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यातून जे बोडो नाही त्यांच्याशी बोडो जमातीचा नेहेमी संघर्ष होतो. त्यामुळे आसामध्ये बोडो जमातीच्या संघटना आणि जे बोडो नाहीत त्यांच्याविरूध्द आणि भारतीय सैन्याविरूध्द हिंसात्मक संघर्ष होतो आणि हजारो लोकांचा त्यामध्ये मृत्यू होतो.

याशिवाय आसाममध्ये (ULFA) United Liberation Front of Asom चळवळ १९७९ पासून सुरू आहे. उल्फा चळवळीकर्त्यांच्या दोन मागण्या आहेत. एक म्हणजे स्वतंत्र्य आसाम राज्याची स्थापना करणे आणि स्थापन केलेल्या स्वतंत्र्य आसाम राज्यामध्ये समाजवादी स्वरुपाचे शासन स्थापन करणे. उल्फा संघटना दहशतवादी आणि बेकायदेशीर स्वरुपाची संघटना आहे. पोलिस आणि भारतीय सैन्यावर ते हिंसाचारी आत्मघातकी हल्ले करतात. उल्फा दहशतवाद्यांनी भूतान मध्ये आश्रय घेतला आहे. भारतीय लष्कराशी भूतानच्या सुरक्षा सैन्यानी हातमिळवणी करून हजारो उल्फा कार्यकर्त्यांना ठार केले आहे. तरीही आसाम मध्ये उल्फाच्या स्वतंत्रेच्या चळवळी सुरू आहेतच.

त्रिपुरा या राज्यामध्येही दहशतवादी कृत्ये १९९० च्या दरम्यान घडली आहेत. त्यासाठी भारत सरकार बांगला देशाला जबाबदार ठरविते. बांगलादेशी घुसखोरांना सरकार अजूनही थांबवू शकले नाही. मिझोराम मध्ये मिझो नॅशनल फ्रन्ट यांचा संघर्ष भारतीय सुरक्षाविषयक लोकांशी सतत होतो. भारतीय संघराज्यापासून वेगेळे होऊन त्यांनीही स्वतंत्र मिझोराम राज्याची मागणी केली आहे. त्यांच्या हिंसात्मक चळवळी दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मणिपूर या राज्यात स्वतंत्र्य राज्याची मागणी करणारी दहशतवादी संघटना आहे. त्या संघटनेचे नाव The People's Liberation Army आहे. या संघटनेने मणिपूर या स्वतंत्र

राज्याच्या मागणीसाठी म्यानमार येथील काही जमातीशी संबंध प्रस्थापित केला आहे. आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी ते भारतीय सैन्यावर आणि शासकीय इनस्ट्रालेशनवर सतत हिंसाचारी हल्ले करीत असतात. यावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे परंतु तरीही दहशतवादी हल्ले होतच राहतात.

**नक्षलवाद :**

भारतीय राजकीय व्यवस्थेला असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे देशातील सर्वत्र पसरलेली नक्षलवाद होय.

**नक्षलवादी कोण आहेत? -** 'रिव्होल्युशन इज नॉट अ डिनर पार्टी इट सीक्स सॅक्रिफाईस' हा माओझेडूग यांचा युक्तिवाद होता. भारतामध्ये १९६० साली कम्युनिस्ट पक्षापासून वेगळा झालेला ग्रुप त्याला 'माओइस्ट' म्हणतात. (डाव्या पक्षातील जहालगट) असेही म्हणतात. (Left oriented activists)

पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या खेड्यातून नक्षलवाद्याची सुरुवात झाली तेव्हापासून या चळवळीला नक्षलवाद असे नाव पडले. खेड्यातील जमीनदार आणि शेतकरी यांच्यातील संघर्षातून नक्षलवाद उदयास आला. नक्षलवाद्यांवर माओ झेडूंग (ज्यांनी चीनमध्ये कल्चरल क्रांती घडवून साम्यवाद आणला) यांच्या विचारसरणीचा प्रभाव आहे.

**नक्षलवादाचा विकास :** मे १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या खेड्यात तेथील स्थानिक साम्यवादी नेते चारु मुजुमदार माओच्या विचारांनी प्रभावित होते. त्यांनी शेतकरी आणि आदिवासी गरीब यांना जमीनदारीचा शेवट करणयास माओचा मार्ग स्वीकारा असे सांगून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. या प्रोत्साहनातून जमीनदार विरोधी नक्षलवादी आंदोलन सुरु झाले. तेव्हापासून या आंदोलनाला 'नक्षलवाद' असे संबोधले जाऊ लागले. बिहार, झारखंड, छत्तीसगड, ओरीसा, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये नक्षलवाद्यांचा विकास खूप मोठ्या प्रमाणात झाला आहे.

भारतीय समाजरचनेत जमीनदार, भांडवलदार एकूणच श्रीमंत लोकांचे वर्चस्व आहे. गरीब समाजाचे ते शोषण करतात यावर नक्षलवादी विश्वास करतात. १९६७ साली यातूनच 'शेतकरी चळवळीच्या' नावाखाली नक्षलवाद उदयास आला. पुढे नक्षलवादाचा विकास खालील टप्प्यांमध्ये झाला.

१) माओवादी साम्यवादी पक्ष
२) पिपल्स वॉर ग्रूप People's War Group (PWG)
३) माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर M.C.C.

१) माओवादी साम्यवादी पक्ष - कम्युनिस्ट पक्षामध्ये माओवाद्यांचे आकर्षण आहे. चीनमधील माओवादी रिजीम आणि भारतातील नक्षलवादी यांच्यात सहकार्य असल्याचे दिसून येते.

२) पिपल्स वॉर ग्रूप P.W.G. ची स्थापना आंध्रप्रदेशामध्ये ७० च्या दशकात झाली. आंध्रप्रदेशात नक्षलवाद्यांनी वणवा निर्माण केला. त्यांच्यावर बंदी १९९२ पासून टाकण्यात

आली. २००१ मध्ये पीपल्स गुरिला आर्मी (PLGA) स्थापना - शासकीय अधिकाऱ्यांवर हल्ले करणे हे त्यांचे लक्ष. त्यानंतर (C.P.I.) ची २००४ साली स्थापना झाली.

३) माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर M.C.C. - नक्षलवादाची चळवळ एका लहानशा खेड्यातून सुरु झाली आणि ती मध्य आणि पूर्व भारतातील खेड्यांमध्ये पसरली आहे.

भारतातील १३ राज्यांमध्ये नक्षलवाद आहे असे शासन कबूल करतात.

आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, उत्तरप्रदेश, वेस्टबंगाल, केरळ, कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू यांसारख्या अठरा राज्यांमध्ये नक्षलवाद सध्या फोफावला आहे. नक्षलवादीचे मुख्य लक्ष्य म्हणजे भ्रष्टाचारी प्रशासकीय, शोषण करणारे भांडवलदार आणि जमीनदार आहेत. मध्यप्रदेश सरकारला प्रचंड महसूल देणारा बस्तर जिल्हा आता छत्तीसगडमधील नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला बनला आहे.

**नक्षलवादाची कारणे :**

कोणतीही सामाजिक व राजकीय चळवळ पोकळीत उदयास येत नाही तर अस्तित्वात असलेल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय संस्था व व्यवस्थेला प्रतिक्रिया करण्यातून आणि लोकांच्या वैफल्यातून उदयास येतात. आज नक्षलवादी चळवळीने उग्र रुप धारण केले आहे. गोदावरीच्या तटावरील जंगल परिसराला दंडकारण्य संबोधले जाते. बस्तर, आदिलाबाद, बारंगळ या जिल्ह्यात सीमारेषेला लागून असलेल्या या दंडकारण्यातून आज नक्षलवाद्यांच्या कारवायांचे संचालन केले जाते. बस्तर हा जिल्हा त्यांचा केंद्रबिंदू आहे. सध्या छत्तीसगडमध्ये असलेल्या या जिल्ह्याच्या चतुःसीमा महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा या राज्यांना मिळाल्या आहेत. चार हजार चौ. कि.मी. परिसरात पसरलेल्या बस्तरच्या जंगलांतून एकेकाळी मध्यप्रदेश सरकारला दरवर्षी तब्बल २५० कोटींचा महसूल प्राप्त व्हायचा. २३४ गाव-पाडे या परिसरात असून ७६ विविध प्रकारच्या वनसंपत्ती या ठिकाणी आढळतात.

वनखात्यातील अधिकारी, जमीनदार, राज्यकर्ते, कार्पोरेटर्स यांनी केलेली वनसंपत्तीची लुटालूट आणि त्यानंतर माओवाद्यांनी येथे टाकलेला डेरा. आता हे जंगल माओवाद्यांचे केंद्रस्थान म्हणूनच ओळखले जाते. पश्चिम बंगालमध्ये पायाभूत सुविधा, खनिजसंपत्ती, विजपुरवठा आणि मनुष्यबळ असूनही या राज्यांत कारखानदारी अस्तित्वात येऊ शकली नाही.

मोठ्या शहरांमध्ये वाढलेले बकालीकरण, झोपडपट्ट्या, असंघटित क्षेत्रातील कामगारांमध्ये वाढत असलेला असंतोष, एकीकडे प्रचंड श्रीमंती आणि दुसरीकडे प्रचंड गरिबी सरकारची बेफिकीरी, या सर्वांवर उपाय म्हणून माओवाद कसा उपयुक्त आहे याची माहिती पटवून देण्यासाठी नक्षलवाद्यांनी आखलेला अर्बन अजेंडा आहे.

एकूणच देशांतर्गत परिस्थिती नक्षलवाद फोफावण्यासाठी पोषक आहे असे दिसते. अस्तित्वात असलेल्या संस्था व व्यवस्थांमध्ये बदल करणे हे नक्षलवाद्यांचे उद्दिष्ट असते. ग्रामीण भागातील गरीब, दलित, आदिवासी नक्षलवादी चळवळीत आहेत. त्यांचा असंतोष आणि बंड खालील कारणांतून उदयास आले आहे.

१) **जमिनीचा प्रश्न** - जमीनदारी पद्धती आणि जमिनीविषयक सुधारणांची संथ अंमलबजावणी आर्थिक विषमता नक्षलवाद्याचे मुख्य कारण आहे.

२) **सामाजिक, आर्थिक विकासाचा अभाव** - गरिबांना भूमिहीनांना, आदिवासींना, जमीन कसायला दिली नाही तर रक्तरंजित क्रांतीचा धोका असतो. भारतात अजुनही ग्रामीण भागात सामाजिक आणि आर्थिक विकासाचा अभाव आहे त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना नक्षलवादी चळवळीचे आकर्षण वाटायला लागते.

३) **समतोल विकासाची कमतरता** - शहरातील सुविधा, संधी ग्रामीण भागात पोहोचल्या नाही. प्राथमिक सुविधांचा ग्रामीण भागात अभाव आहे.

४) **शासकीय सेवेचा अभाव** - आदिवासी व दूरवरच्या ग्रामीण भागत शासकीय आणि प्रशासनाची अव्यवस्था व अभाव आहे. जमीनदार, शासनकर्ते आणि प्रशासक यांची युती विरुद्ध लोक चिडले आहेत.

५) **भ्रष्ट्राचार** आणि या भागाकडे सर्वांचेच दुर्लक्ष आहे.

६) **जंगली भागातील खनिज संपत्तीचा गैरवापर** - व्यावसायिक भांडवलदारांकडून शोषण या भागात असल्याचे आढळून येते. तेथील स्थानिक लोक शेती आणि जंगलातील मिळणाऱ्या वस्तूंवर उदरनिर्वाह करतात. एकतर शासनाने या भागात उद्योगधंदे सुरु केले नाही. ओरिसा, मध्यप्रदेशात काही उद्योग, इरिगेशन प्रोजेक्ट शासनाने आणले पण त्यात तेथील स्थानिक लोकांना सहभागी करुन घेतले नाही.

७) **टिम्बर माफिया, जमीनदार यांच्याकडून शेतकऱ्यांचे शोषण** - कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात खनिजसंपत्तीचे उत्खनन करण्यात येत असून, या माध्यमातून आपली लूट होत असल्याची भावना आदिवासींमध्ये आहे. उदा. मध्यभारत हा आदिवासी बहुल भाग आहे. या भागात देशातल विपुल खनिजसंपत्ती आहे. या भागात नक्षलवादाचा प्रश्न मोठा आहे. ओरिसात सात-आठ वर्षापूर्वी नक्षलवाद नव्हता. जेव्हा तेथे खनिजसंपत्तीचे उत्खनन सुरु झाले तेव्हापासून तेथे नक्षलवादाचा प्रश्न निर्माण झाला. वनखात्यातील अधिकारी, जमीनदार, कॉर्पोरेटस यांनी केलेली वनसंपत्तीची आणि आदिवासींची लुटालूट यामुळे जंगली भाग माओवाद्यांचे केंद्रस्थान झाले.

८) **स्वतंत्र कॉरीडोर निर्माण करणे हे उद्दिष्ट** - शोषणातून नक्षलवाद उदयास आला आहे हे खरे असले तरी नेपाळ आणि चीनला जोडणारा कॉरीडोर निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, ओरिसा, बिहार येथील घनदाट जंगलातून जाऊन नेपाळ आणि चीनला जोडल्या जाईल. चीन व नेपाळी माओवाद्यांशी नक्षलवादी जोडले गेले आहेत असेही अभ्यासकांचे मत आहे.

९) अनेक विचारवतांच्या मते 'डिलीव्हरी सिस्टीम' यासाठी जबाबदार आहे. शासन गरीबांच्या विकासासाठी पैसा फंड देतात परंतु डिलीव्हरी सिस्टीम एवढी भ्रष्टाचारी आहे की लोकांपर्यंत तो फंड पोहचत नाही.

**नक्षलवाद्यांची वैशिष्ट्ये :**

**१) रेड कॉरिडर (सेफ झोन)** - आंध्रप्रदेश ते नेपाळपर्यंत भारताच्या तेरा राज्यांमध्ये 'रेड कॉरिडर' म्हणजे नक्षलवाद्यांची वसाहत आहे. जंगलाचा आश्रय व अतिशय घनदाट जंगली भागात, ग्रामीण भागात त्यांचे राहणे आहे. उदा. छत्तीसगड येथील बस्तर.

**२) साधने** - गुरिला वॉर, खून करणे इत्यादी हिंसात्मक साधनांवर नक्षलवाद्यांचा भर आहे. हल्ली सुधारित शस्त्रांचा वापरही करतात. २००६ ते २०१० या काळात एकूण नक्षलवादी हल्ल्याच्या ९००० घटना घडल्या. ३००० लोक मारले गेलेत.

**३) उद्दिष्ट** - जमीनदारी, भांडवलशाही, साम्राज्यवादी धोरणांना विरोध करणे, चीनमधल्याप्रमाणे शेतकरी चळवळ निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे.

**४)** मार्क्सवाद, माओवाद आणि नक्षलवाद यांच्यातील भेद खालीलप्रमाणे आहेत.

1. मार्क्सवाद - भांडवलवाद आणि औद्योगिक क्रांतीला विरोध व प्रतिक्रियातून अस्तित्वात आला आहे.
2. शहरी कामगारवर्ग मार्क्सवादी चळवळीत सहभागी असतो.
3. उद्दिष्ट - कामगार हुकूमशाही व वर्गविहीन व्यवस्था आणणे हे मार्क्सवादाचे प्रमुख उद्दिष्ट असते.

१) माओवाद म्हणजे - ग्रामीण आदीवासींची चळवळ, भूमिहीन शेतकऱ्यांची चळवळ होय.
२) चीन व आशियातील मार्क्सवाद म्हणजे माओवाद. आशियामध्ये व चीनमध्ये जास्तीतजास्त जनता ग्रामीण व शेतीवर आधारित आहे.
३) ध्येय - ग्रामीण शेतकऱ्यांची हुकूमशाही आणणे. शस्त्राने समाजाची रचना बदलणे हे माओवाद्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**नक्षलवाद** - भारतीय माओवाद म्हणजे नक्षलवाद होय.

**नक्षलवादाचे साधन** - शस्त्राने, हिंसेने बदल करणे, गुरिला झोन्स निर्माण करुन राजकीय सत्ता मिळविणे.

भांडवलवाद, जमीनदारी, साम्राज्यवादाचे समर्थन करणाऱ्या शासनाच्या जागी शेतकरी आणि लोकांची लोकशाही आणणे हे नक्षलवाद्यांचे उद्दिष्ट आहे.

**नक्षलवादाचे परिणाम :**

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग विधान करतात की "आपल्या देशाच्या अंतर्गत सुरक्षेला आव्हान करणाऱ्या समस्यांत मोठी समस्या म्हणजे नक्षलवाद होय."

**नक्षलवादाचे खालील परिणाम दिसून येतात.**

१) भारताच्या अंतर्गत सुरक्षेला, सर्वात मोठा धोका आहे.
२) भारताची दुर्बलता - नक्षलवादासारखा अंतर्गत प्रश्न भारत सोडवू शकत नाही असे इतर देशांना वाटते आणि त्यातून भारताची दुर्बलता दिसून येते.
३) भारताच्या आर्थिक विकासावर परिणाम होतो.
४) भारतीय लोकशाही, कायद्याचे राज्य, लोकांच्या सुरक्षेचा धोका.

**नक्षलवादावर उपाय :**

१) सुरक्षेवर अधिक खर्च असावा.
२) मागासलेल्या प्रदेशांच्या विकासासाठी फंड देण्यात यावा व त्याची अंमलबजावणी होते किंवा नाही ते लक्षात घ्यावे. फंड गरीबापर्यंत पोहचत नाही त्याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे.
३) जंगली हक्क कायदा २००६ करण्यात आला त्याची अमंलबजावणी व्हावी.
४) राष्ट्रीय ग्रामीण नोकरी हमी कायदा - हा कायदा कागदावरच आहे. धोरणे आखली जातात पण त्यांची अमंलबजावणी नाही.
५) सलवा जुडूम - नक्षलवाद्यांना त्यांच्याच मार्गाने उत्तर देण्याचा 'सलवा जुडूम' चा प्रयत्न झाला. नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी आदिवासींच्या हातात शस्त्र देणे हा मार्ग घटनाबाह्य असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.
आर्थिक विकासाचा फायदा सर्व लोकांना, सर्व प्रदेशांना सारखा नाही.
६) सामाजिक आर्थिक विकास - या भागातील आरोग्य, शिक्षण, बेसिक सुविधांवर भर द्यावा. तेथील स्थानिक लोकांची मते जिंकणे.
७) शासकीय सुविधा उपलब्ध करुन घ्यावा. (आदिवासी, ग्रामीण भागामध्ये)
८) केंद्र व राज्य शासनाने मिळून एकजुटीने धोरणे ठरवावी.
९) चर्चा - नक्षलवादी नेते व राज्यातील पुढारी यांच्यात व्हावी.
१०) पंचायती राज संस्था मजबूत कराव्या.
११) विकास सर्वांसाठी सारखा - नॅचरल रिसोर्स मॅनेजमेन्ट आणि ट्रायबल दोघांनाही विकास योजनात सहभागी करावे. आदिवासींना भागीदार, मालक करुन तेथील विकास करावा.
१२) राजकीय प्रश्न आहे - एकजुटीने सोडवावा. या प्रश्नांचे राजकारण होऊ नये.
१३) पोलीस आणि सुरक्षा पथकांनी निरागस लोकांवर अत्याचार न करता कायद्याने आपली जबाबदारी पार पाडावी.

नक्षलवादाचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत होऊ शकत नाही परंतु बेरोजगारी, भ्रष्टाचार, शिक्षण धोरणाबद्दल अनास्था, नेत्यांची दादागिरी आणि टगेगिरी, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, वशिलेबाजी, सत्तेसाठी एखाद्या धर्माचे व जातीचे लांगूलचालन इत्यादी गोष्टींना जर सरकारने आणि प्रत्येक नागरिकाने वेळीच आवर घातला नाही तर नक्षलवाद फोफावणार हे निश्चित.

राज्य पोलीस दल आधुनिकीकरणासाठी अत्याधुनिक शस्त्रे व हत्यारे, पोलीस प्रशिक्षणाच्या सुविधा, दुर्गम भागाता पायाभूत सुविधांचे जाळे उभारणे यासाठी हा निधी देण्यात येतो. हा निधी केंद्राकडून "एम पी एफ" योजनेअंतर्गत दरवर्षी राज्यांना देण्यात येतो तो वापराविना पडून आहे. महाराष्ट्राने तर गेल्यावर्षी केंद्राकडून मिळालेल्या सुमारे ६५ कोटीपैकी अक्षरक्षः एक पैसाही खर्च केला नाही. (सकाळ ८ जून २०१३)

**१४)** शासनाने आदिवासींच्या जमिनीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर नक्षलवादी चळवळीला चांगले उत्तर मिळेल. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार अमलात आलेल्या कायद्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी झाली नाही. २००६ मध्ये आदिवासींसाठी वन हक्क कायदा संमत करण्यात आला. हा आपल्या देशातील एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याची अंमलबजावणी गडचिरोलीतील मेंढालेखा गावात झाली. तेथे आता नक्षलवादाचा प्रश्न नाही. आदिवासींचे तीन मुलभूत प्रश्न आहेत. (१) जमीन (२) खनिज संपत्तीसाठी जमिनीचे उत्खनन (३) जंगलावरची मालकी. हे तीन शासनाने सोडविल्यास नक्षलवादाचा प्रश्न निश्चितच सुटेल.

१४) स्थानिक पोलिसांकडे ही जबाबदारी असावी.

१५) नक्षलवादाचा प्रश्न सोडविण्यासाठी समिती स्थापन केली पाहिजे. यात आदिवासींच्या हक्कांची पायमल्ली, शोषण तसेच नक्षलवादी व तेथील सरकारी यंत्रणांची निःपक्षपातीपणे चौकशी झाली पाहिजे. आदिवासींच्या हक्कांची पायमल्ली नक्षलवादी किंवा सुरक्षा यंत्रणांनी केली असल्यास त्यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. तसे झाल्यास आदिवासींमध्ये सकारात्मक संदेश जाण्यास मदत होईल.

**नक्षलवाद (मुद्दे) :**

१) नक्षलवादी कोण आहेत?
२) नक्षलवादाचा विकास
३) नक्षलवादाच्या उदयाची कारणे
४) नक्षलवादाची वैशिष्ट्ये -
   अ) सेफ झोन
   ब) साधने
   क) उद्दिष्ट
   ड) मार्क्सवाद आणि माओवादातील फरक
५) नक्षलवादाचे परिणाम
६) नक्षलवादावर उपाय

## १७.५ दहशतवादाचे प्रकार :

दहशतवादाची उद्दिष्टे व कार्यक्षेत्र या आधारावर दहशतवादाचे तीन प्रकार दिसून येतात.

१) आंतरराष्ट्रीय दहशतवाद
२) सीमापार दहशतवाद (Cross - border terrorism)
३) राज्यपुरस्कृत दहशतवाद

**१) आंतरराष्ट्रीय दहशतवाद** - यांचे जाळे जगभर पसरले आहे आणि अनेक राष्ट्रांना या संघटनामुळे धोका निर्माण झाला आहे. अल-कायदासारखा दहशतवादी संघटना आणि त्यांची दहशतवादी कृत्ये आंतरराष्ट्रीय दहशतवादाची उत्तम उदाहरणे आहेत. अल-कायदा या संघटनेचे जाळे पन्नासहून अधिक राज्यांमध्ये आहे.

**२) सीमापार दहशतवाद** - सीमापार दहशतवाद भारतात जम्मू काश्मीर राज्यामध्ये दिसतो. सीमापार दहशतवादामध्ये दहशतवादी संघटनेचे केंद्र एका देशामध्ये तर दुसऱ्या देशामध्ये दहशदवादी घटना असतात. यात एक राष्ट्र दहशतवादी संघटनांचा वापर दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध करते. उदा. पाकिस्तानातील प्रशिक्षित दहशतवादी भारतामध्ये घुसखोरी करुन निष्पाप लोकांची हत्या करतात. सीमापार दहशतवाद हा जम्मू-काश्मीरचा प्रश्न सोडविण्यामधला सर्वात मोठा अडथळा आहे.

**३) राज्यपुरस्कृत दहशतवाद (State-sponsored Terrorism)** - ज्यावेळी राज्यांकडून दहशतवादी मार्गाचा वापर होतो, दहशतवादी कारवायांमध्ये राज्याचा प्रत्यक्ष हात

असतो तो राज्यपूरस्कृत दहशतवाद म्हणून ओळखला जातो. उदा. हिजबुल मुजाहिदीन, लष्कर-ए-तोयबा यांसारख्या संघटनांना आर्थिक व लष्करी मदत पाकिस्तानकडून मिळते ते भारतामध्ये राजकीय अस्थिरता निर्माण करतात.

भारतीय राजकीय व्यवस्थेपुढे दहशतवादाची समस्या आव्हान म्हणून उभी आहे. आज दहशतवाद ही एक आंतरराष्ट्रीय समस्या झालेली आहे.

दहशतवाद म्हणजे उघडपणे कायद्याला आव्हान देऊन त्याचा भंग करणे होय, दहशतवादी मार्गाचा अवलंब करुन शासनाच्या आणि लोकांच्या मनात दहशत निर्माण करणे व आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करणे होय. उदा. भारताच्या ईशान्य भागातील नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा या प्रदेशात बंडाळी करुन शासनाला जेरीस आणण्याचा प्रयत्न केला जातो. आंध्र प्रदेशातील तेलगंणा, पंजाब, काश्मीर, गडचिरोली इत्यादी भागातील नक्षलवाद्यांच्या दहशतवादी बंडाळ्या आपल्याला नवीन नाहीत. कोणतेही दहशतवादी कृत्य म्हणजे फक्त एक घटना नसते. ती प्रक्रिया असते. त्या कृत्याचे अल्पकालीन जसेच दीर्घकालीन परिणाम असतात.

**दहशतवादाचे परिणाम :**

**१) सामाजिक परिणाम** - दहशतवादी कृत्ये म्हणजे समाजात हिंसाचार वाढीस लावणे. दहशतवाद म्हणजे समाजातील वाईट प्रकारचा हिंसाचार ज्यामुळे भयमुक्त समाज निर्माण होऊ शकत नाही. दहशतवादामध्ये तरुणांचा वापर घातक कारवायांसाठी केला जातो. वित्तहानी, प्राणहानी होते. भय ज्या समाजात असते तेथे लोकांना सुरक्षित वाटत नाही. त्याचा त्या समाजाच्या विकासावर परिणाम होतो.

**२) आर्थिक परिणाम** - दहशतवादासंबंधी तज्ज्ञांचे मत आहे की, भारतासारख्या गरीब देशामध्ये पैसा हे दहशतवादी संघटनांकडे आकर्षित होण्याचे प्रमुख कारण आहे. मागास भागातील तरुण अशा गोष्टींकडे चटकन आकर्षित होतात. उदा. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात उद्योगधंद्यांच्या पूर्ण अभावामुळे तरुणांचा ओढा पैसा देणाऱ्या अशा संघटनांकडे जातो. अतिरेकी संघटना आपले अर्थसहाय्य स्वतःच करतात. एलटीटीईबद्दल असे वृत्तांत सापडतात की, जगात कुठेही काम करणाऱ्या जाफनातल्या तामिळींना आपल्या उत्तपन्नाच्या १०% भाग एलटीटीईला द्यावा लागतो. उत्पन्नाच्या अशा साधनांमुळे दहशतवादी संघटनांना आपल्या कारवाया सातत्याने चालविता येतात.

दहशतवाद्यांच्या आर्थिक परिणामांची आणखी एक बाजू म्हणजे दहशतवादी कारवायांमुळे त्या भागात गुंतवणूक करायला उद्योजक तयार होत नाहीत. त्यामुळे दहशतवादाने ग्रस्त झालेला भाग आर्थिकदृष्ट्या मागासलेला राहतो.

**३) राजकीय परिणाम** - दहशतवादामुळे लोकशाहीला धोका निर्माण होतो. दहशतवादाचा उपयोग काही विशिष्ट उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी केला जातो. उदा. विमानांचे अपहरण करुन शासनासमोर काही मागण्या करण्यात येतात. विमानातील प्रवाशांचे हित लक्षात घेऊन शासनाला त्या मागण्या कराव्या लागतात. दहशतवादामुळे लोकांचा शासनावरील विश्वास नष्ट होतो.

**४) अंदाधुंदी** - दहशतवादामुळे प्राणहानी, वित्तहानी होते, रक्तपात होतो आणि एकप्रकारची अंदाधुंदीची परिस्थिती निर्माण होते.

## १७.६ दहशतवादावर नियंत्रणाचे उपाय (MEASURES TO RESTRAIN TERRORISM)

१) लोकांची जागरुकता
२) सामाजिक जबाबदारी
३) मागासलेल्या, ग्रामीण भागांचा विकास

भारतीय शासन दहशतवादाची समस्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न याचदृष्टीने घेत आहे. दहशतवादाला तोंड देण्यासाठी केंद्रशासनाने आणि राज्य शासनाने स्पेशल पॉवर लॉज पास केले आहेत, अर्थात स्पेशल पॉवर लॉज लोकांच्या हक्क विरोधी असतात. भारतीय शासनाने, सुरक्षाविषयक खात्यांनी दहशतवादाला आळा घालण्यासाठी गुन्ह्याला शिक्षा करणारे कायदे पास केले परंतु त्यांच्याकडून दहशतवाद मूळातच उपटून टाकण्यासाठी प्रयत्न होत नाही. शासनाने काश्मीर, शिख पंजाब, उत्तराचंल प्रदेश, नक्षलवादी जिथे दहशतवाद खूप मोठ्या प्रमाणात आहे त्या प्रदेशातील मूळ समस्या लोकांच्या कोणत्या आहेत हे जाणण्याचा प्रयत्न करावा व त्यावर मुख्यतः उपाय करावेत.

दहशतवाद जागतिक समस्या झाली आहे. ही समस्या फक्त कायदे करुन सुटणार नाही. पाश्चात्य देशांपेक्षा आशिया खंडातील देश इराक,भारत, पाकिस्तान, अफगाणीस्तान आणि इतर देशांना दहशतवादी हल्ले जास्त सोसावे लागत आहेत. दहशतवाद संपूर्ण मानवजातीला सोसावा लागणार आहे संपूर्ण मानवजाती विरुद्ध आहे. दहशतवादाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच हाहाकार माजविला आहे. भारतात जम्मूकाश्मीर, उत्तराचंल या भागामध्ये आहे. भारतीय सुरक्षा व्यवस्थांच्या मते भारताच्या वेगवेगळ्या भागामध्ये झालेले बहुतेक दहशतवादी हल्ले जिहादी गटांनी व्यवस्थित नियोजीत करुन पाकिस्तान आणि बांगलादेश या देशांच्या मदतीने केले आहेत. अर्थात पाकिस्तान आणि बांगलादेश ही गोष्ट नाकारतात.

दहशतवादाचा प्रश्न सोडविण्यासाठी अमेरिका या देशाकडे बघण्याऐवजी (SAARC) South Asian Association for Regional Cooperation यांनी त्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

## १७.७ सारांश

दहशतवाद जागतिक धोका झाला आहे. संपूर्ण मानवतेला त्यामुळे धोका निर्माण झाला आहे. दहशतवादाची सर्वमान्य अशी व्याख्या नाही. दहशतवाद आणि इतर हिंसात्मक कृती यामध्ये फरक आहे. त्यामुळे दहशतवादाची वैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक आहे. दहशतवादाच्या या वैशिष्ट्यांकडून दहशतवाद व इतर हिंसात्मक कृती यामध्ये भेद करता येतो.

**दहशतवादाची वैशिष्ट्ये** -

१) दहशतवाद राजकीय कृती आहे
२) परिणाम दिर्घकालीन असतो

३) वरपासून खालपर्यंत रचना असते
४) निरागस लोकांवर हल्ला असतो.
५) अराजकीय घटक कार्यरत असतात
६) बेकायदेशीर कृती
७) मानवी मूल्ये पायदळी असतात
८) व्यवस्थीत नियोजीत कृती असते.

**दहशतवादाची कारणे -**

१) धर्मान्धंता
२) विशिष्ट व्यवस्था लादणे
३) स्वतंत्राची वेगळी होण्याची मागणी
४) अस्तित्वात शासनाला विरोध करणे
५) आर्थिक निराशा, विफलता
६) बेकारी, दारिद्र्य, विषमता
७) स्पर्धात्मक राजकारण
८) भ्रष्ट्राचारी यंत्रणा
९) लोकांची स्वकेंद्रीत वृत्ती
१०) धर्म व जातीवर आधारीत संघटना

भारतात जम्मू काश्मीर, उत्तराचंल भागामध्ये, पंजाबमध्ये दहशतवाद आढळतो. आंधप्रदेश, बिहार, छत्तीसगड, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, वेस्टबंगाल इत्यादी राज्यांमध्ये नक्षलवादाच्या स्वरुपात दहशतवाद आढळतो.

नक्षलवादाची कारणे, परिणाम दहशतवादापेक्षा काही प्रमाणात वेगळी आहे. दहशतवादाचे प्रकार अनेक आहेत. दहशतवादाचे परिणाम आणि उपाय आहेत त्याचा अभ्यास आवश्यक.

## १७.८ प्रश्न

१) दहशतवादाची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये सांगा.
२) दहशतवादाच्या उदयाची कारणे यावर लिहा.
३) भारतातील दहशतवाद समालोचन करा.
४) दहशतवादाचे प्रकार, परिणाम सांगून त्यावर उपाय सांगा.

❖❖❖❖

# १८

# भारतीय राज्याचे पुर्नजीवन समस्या आणि भविष्य

# (REVITALISING THE INDIAN STATE – PROBLEMS AND PROSPECTS)

**घटक रचना :**


१८.० उद्दीष्ट

१८.१ प्रस्तावना

१८.२ स्वातंत्र्यानंतर राज्याची ध्यैय्य आणि उद्दिष्ट

१८.३ राज्यव्यवस्थेला आव्हाने

१८.४ राज्याचा लोकशाही अनुभव

१८.५ सारांश

१८.६ प्रश्न


## १८.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१) ऐतिहासिक दृष्टीकोनातून भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरुप समजून घेणे

२) ब्रिटिश अंमलाखालील वसाहतिक राज्य आणि स्वतंत्र्यानंतरच्या भारताचे ध्यैय्य, उद्दिष्ट यांच्यातील तुलना करुन फरक समजून घेणे.

३) राज्याच्या कार्यावर प्रभाव पाडणाऱ्या सामजिक आणि राजकीय घटकांचे परिक्षण करणे.

४) राज्यातील कार्य करणाऱ्या लोकशाही संस्थाच्या गुणदोषांचे परिक्षण करणे.

५) मानवी हक्क भंग, सामाजिक न्याय, आर्थिक विकास इत्यादी संबंधीचे प्रश्न समजून घेणे.

६) भारतीय राज्यव्यवस्था भविष्यकाळात कशी असावी याचे परिक्षण करणे

## १८.१ प्रस्तावना

इतिहासाचा आढावा घेता असे दिसून येते की पूर्वी भारतात एकाधीकारशाही (authotarian) असलेली श्रेष्ठीची सत्ता होती. त्यावेळी लोकशाही संस्था नव्हत्या. श्रेष्ठींच्या वंशपरंपरांगत सत्तेला, अधिकारशाहीला त्यांच्या विशेषाधिकारांना एकूणच जन्माच्या आधारावर असलेल्या असमतेला सामाजिक मान्यता होती.भारतात राजेशाही अस्तित्वात असतांना राजाच्या आज्ञा लोक कोणताही प्रश्न उपस्थित न करता पाळीत असत. लोक राजाला देवाचा अवतार समजत असत. राजाच्या आज्ञा पाळणे पुण्यकर्म समजल्या जात. जो राजा राज्यात स्थिरता

आणतो आणि जैसे थे परिस्थितीचे रक्षण करतो तो राजा चांगला असे समजण्यात येत असे. त्यावेळी लोककल्याणकारी राज्य संकल्पना नव्हती. लोककल्याण, लोकांच्या अपेक्षा यापेक्षा राजाच्या इच्छांना अति महत्वाचे स्थान होते. राज्याविषयीची प्रत्येक गोष्ट राजा ठरवित असे. राजाच्या अवतीभोवती असणाऱ्या श्रेष्ठींना अधिक महत्व देण्यात येत असे. लोकशाही संस्थाच्या अभावामुळे, वृत्तपत्रे नसल्यामुळे मुक्त व स्वतंत्र देवाणघेवाण नव्हती. राजावर टिका होत नव्हती.

भारतीय राजांचा पराभव करुन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारताला वसाहत बनविले होते. ब्रिटिश अंमलाखाली भारतात राजकीय एकता आणि स्थिरता आली. ब्रिटिशांनी त्यांच्या वसाहतिक सम्राज्याचा विस्तार करण्यासाठी भारतीय राजांचा उपयोग करुन घेतला. राज्य आणि राज्ययंत्रणा यापासून लोक मात्र पूर्णपणे अलिप्त होते. प्रशासनाला ब्रिटिश शासनाची "पोलादी चौकट" समजण्यात येत असे. या प्रशासनाने भारतात कायदा सुव्यवस्था आणि स्थिरता आणली होती. ब्रिटिशांनी थोड्याफार प्रशासकीय सुधारणा केल्या होत्या परंतु त्यामुळे राज्याच्या स्वरुपामध्ये फारसा बदल झाला नाही. बिटिश राजवटीखाली असलेल्या भारतात संपूर्णपणे केंद्राकर्षी सत्ता होती. ब्रिटिश राजवटीतील भारतात लोकांना स्थान नव्हते. राज्य चालविण्यास मदत करतील असे कारकूण निर्माण करणे या उद्देशाने ब्रिटिशांनी इंग्रजी शिक्षणपध्दती सुरु केली होती. त्याचा फायदा चांगले कारकूण तयार करण्यास ब्रिटिशांना झालाच परंतु इंग्रजी शिक्षणामुळेच उदारमतवादी मूल्यांची भारतीयांना ओळख झाली. संपूर्ण भारतातील लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊ लागली होती. परकीय सत्ता आणि भारतीय यांच्यात हळूहळू संघर्षाचे वातावरण निर्माण झाले. त्यातूनच स्वातंत्र्यलढा उभा राहिला. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी स्वातंत्र्य लढा चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यलढयाचे नेतृत्व महात्मा गांधीकडे होते त्यावेळी गांधीवादी विचारसरणीचा उदय झाला. राज्य जबरदस्ती (coercion) याऐवजी लोकसंमती (consent) यावर आधारीत असावे, लोकांच्या वृत्तीमध्ये बदल करण्यात यावा हे गांधी विचार पुढे आले गांधींनी लोकांच्या सत्तेवर आधारीत "रामराज्य" ची कल्पना मांडली. राजकीय आणि आर्थिक विकेंद्रीकरण, नैतिक मुल्य, ग्रामीण राज्य, बलशाली राज्याऐवजी लोकसहकार्याने चालणारे शासन या संकल्पनांना गांधीविचारामध्ये महत्व होते.

स्वातंत्र्यानंतर भारतात राज्यासंबंधीचे गांधीविचार त्यावर राज्याची उभारणी न करता ब्रिटिश राजवटीमध्ये असलेली प्रशासकीय व्यवस्था तशीच ठेवण्यात आली. कारण स्वातंत्र्यानंतर भारतात कायदा सुव्यवस्था आणणे, स्थिरता आणणे ही मुख्य उद्दिष्ट्ये होती. ब्रिटिश राजवटीखालील वसाहतिक भारतातील राज्यव्यवस्था आणि स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील राज्यव्यवस्था या दोन्हीमध्ये वरवर साम्य दिसत असले तरी दोन्ही व्यवस्थांमध्ये मुख्यतः खालील फरक होता असे दिसते.

ब्रिटिश अंमलाखालील भारतीय वसाहतिक राज्यामध्ये ब्रिटिशांना राज्याची स्थिरता फक्त महत्वाची वाटत होती. भारतात स्वातंत्र्यानंतर कायदा सुव्यवस्था, स्थिरता आणणे या गोष्टींना प्राधान्य देण्यातच आले. शिवाय देशाचा आर्थिक विकास अति महत्वाचा समजण्यात आला. भारताचे आर्थिक शोषण करणे यावर ब्रिटिशांची आर्थिक धोरणे आधारीत होती. भारताचे आर्थिक शोषण करुन त्यांनी इंग्लंड मधील तिजोरीमध्ये भर घातली. भारतातील ग्रामीण व्यवस्था नष्ट केली. भारताला बाजारपेठ बनविले. कच्चा माल भारतातून स्वतःच्या देशात नेऊन तयार झालेला माल भारतात विकला. भारतामध्ये दारिद्र्य, बेकारी निर्माण होण्यासाठी ब्रिटिशांचे आर्थिक धोरण कारणीभूत झाले होते. स्वातंत्र्यानंतरच्या भारतामध्ये लोकशाही आणि घटनात्मक

शासनाची स्थापना झाली. राज्य लोकांचे आहे. या संकल्पनेला महत्व देण्यात आले. समता, स्वातंत्र्य, न्याय, मानवतावाद या मानवी मूल्यांना महत्व देण्यात आले. सत्तेचे विकेंद्रीकरण आणि ग्रामीण विकास करणे या गांधीविचारांचा स्विकार पंचायती राज्यव्यवस्थेच्या स्वरुपामध्ये आणि कुटीरोद्योगांच्या विकासाच्या स्वरुपात करण्यात आला. लोकशाही मार्गाने लोककल्याणकारी राज्य निर्माण करणे याला महत्व प्राप्त झाले.

## १८.२ स्वातंत्र्यांनंतर भारतीय राज्याची ध्यैय्य आणि उद्दिष्ट्ये -

भारताचा स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आलेल्या भारतीय राज्यामध्ये पाश्चात्य उदारमतवादी मूल्ये आणि भारतीय विचार याचे एकत्रीकरण दिसून येते. पाश्चात्य उदारमतवादी मूल्ये उदा. स्वातंत्र्य, समता, न्याय, घटनात्मकता या विचारांचा प्रभाव भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये होताच; त्याशिवाय सत्य, अहिंसा, नैतिकता या गांधीविचारांचा, तसेच समाजवादी विचारांचा प्रभाव होता.

ब्रिटिशकाळात ब्रिटिशांनी जी प्रशासकीय व्यवस्था निर्माण केली होती. (१९०९ चा कायदा, १९१९ व १९३५ चा कायदा) त्याचाही प्रभाव भारतीय राज्यघटनेवर दिसून येतो. भारतीय राज्याचे स्वरुप आणि राज्यघटनेचे तत्वज्ञान स्पष्ट करणाऱ्या भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेवरुन भारतीय राज्याची ध्येये व उद्दीष्ट स्पष्ट होतात. स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय राज्याची ध्यैय्ये आणि उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे होती.

**१) राजकीय लोकशाही आणणे** -

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेवरुन स्पष्ट होते की भारत लोकशाही राज्य आहे. 'लोकांचे सार्वभौमत्व' (Popular Sovereighty) महत्वाचे समजण्यात आले आहे. उद्देशपत्रिकेमध्ये "We the people of India" असा शब्दप्रयोग आहे. लोकांच्या मनातील परकेपणाची, राजकीय अलिप्ततेची भावना काढून टाकण्याच्या दृष्टीने असा शब्दप्रयोग केला आहे. कारण ब्रिटिश काळात राज्यकर्ते आणि लोक यांच्यात दरी होती. सार्वजनिक धोरण ठरवितांना लोकांचा विचार केला जात नव्हता. त्यामुळे ब्रिटिशांच्या सार्वजनिक धोरणाचे परिणाम लोकांना त्यावेळी सहन करावे लागत असे. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेने "भारतीय राज्य कायदेशीररित्या व राजकीय दृष्टीने भारतीय लोकांचे राज्य" आहे याची जाणीव लोकांना करुन दिली आहे.

लोकशाही राज्य मुख्यतः दोन तत्वांवर कार्य करते. एक म्हणजे नागरिकांना मूलभूत स्वातंत्र्य प्रदान करणे आणि दुसरे म्हणजे प्रशासकीय जबाबदारी नागरिकांवर सोपविणे. भारतीय राज्यात या दोन्ही गोष्टी दिसून येतात. राज्यघटनेतील "मूलभूत हक्क" भारतीय नागरिकांना मूलभूत हक्क व स्वातंत्र्ये प्रदान करते. नागरिकांच्या हक्कांना संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था, न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार याव्दारे संरक्षण देण्यात आले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शासन लोकांना जबाबदार आहे हे सांसदीय शासनपध्दतीचा स्विकार करुन स्पष्ट केले आहे. स्वतंत्र निवडणूक आयोगाव्दारे आयोजित स्वतंत्र व मुक्त वातावरणातील निवडणूका, प्रौढ मताधिकाराची तरतूद, लोकांना मत देण्याचा, निवडणूकीला उभे राहण्याचा अधिकार, राजकीय पक्ष स्थापन करण्याचा

अधिकार या सर्व तरतूदींमुळे भारतीय लोकशीही सक्रिय झाली आहे आणि वास्तवात आली आहे.

२) **धर्मनिरपेक्ष राज्य (Secular state)** - भारत अनेक धर्मीय देश आहे. भारतात "धर्मनिरपेक्षता" धोरणाचा स्विकार केला आहे. भारतात ब्रिटिश राजवटीत ब्रिटिशांनी धर्माचा साधन म्हणून उपयोग केला होता. धर्माच्या आधारावर स्वतंत्र मतदारसंघ निर्माण केले होते. हिंदू मुस्लिम यांच्यात फुटीरता निर्माण केली होती. हिंदू मुस्लिम धर्मीयांमध्ये अलगतेची बिजे पेरली होती. त्याचाच परिणाम म्हणजे धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झाली. स्वातंत्र्यानंतर भारतात धर्मनिरपेक्षता तत्व स्विकारण्यात आले. भारत धर्मातीत म्हणजे धर्मावर आधारीत राज्य नाही. प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. धर्माच्या आधारावर लोकांमध्ये भेदभाव न करता सर्व धर्माप्रति राज्याने समान दृष्टीकोन ठेवला आहे. प्रत्येकाला आपआपल्या धर्माप्रमाणे सण, उत्सव साजरे करण्याचे स्वातंत्र्य आहे. राज्याकडून सर्व धर्मांना समान वागणूक देण्यात येते. "कायद्याचे राज्य" आणि "कायद्यापुढे समानता" या तत्वांना महत्व आहे. धर्माची मान्यता आणि व्यक्तिस्वातंत्र्य यामध्ये संघर्ष उद्भवल्यास व्यक्तिस्वातंत्र्याला प्राधान्य देण्यात येते.

३) **राज्य सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. (State as an agent of social Change)** सर्व उदारमतवादी राज्यांमध्ये शांततेने आणि हळूहळू सामाजिक बदल करण्यासाठी राज्ययंत्रणेचा उपयोग हे तत्व स्विकारलेले आहे. स्वतंत्र भारतामध्ये अनेक अन्यायी सामाजिक चालीरिती नष्ट करण्यासाठी राज्याने कायदे केले. उदा. अस्पृश्यता पाळणे कायद्याव्दारे गुन्हा ठरविण्यात आला आहे. जातीभेद किंवा जातीच्या आधारावर अन्याय करणाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा करण्यासंबंधीचा कायदा करण्यात आला आहे. मागासलेल्या जातींचा सामाजिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. संसदेमध्ये आणि राज्याच्या कायदेमंडळामध्ये राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. हिंदू कोड बिलाच्या व्दारे स्त्रीपुरुष समानता (gender justice) आणि न्याय स्थापन करण्यात आला आहे. आंतरजातीय विवाह, घटस्फोट, विधवा पुर्नविवाह यादृष्टीने कायदे पास करण्यात आले आहे. म्हणजेच राज्याने कायदे करुन सामाजिक बदल केले आहेत आणि त्यादृष्टीने राज्य सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे असे दिसते.

४) **आर्थिक क्रियांमध्ये राज्याची भूमिका (States Role in Economic activities)** - १९७५ साली घटनादुरुस्ती करुन भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये "समाजवादी" Socialist) या शब्दाची भर घालण्यात आली. नियोजीत आर्थिक विकास, आर्थिक संस्थाचे राष्ट्रीयीकरण, संपत्तीचे पुर्नविभाजन, जड उद्योगधंदे सार्वजनिक क्षेत्राखाली आणून त्यामध्ये वाढ इत्यादी गोष्टी देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी आणि समाजवादी व्यवस्थेचा आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी राज्याने केल्या आहेत. सुरुवातीला स्वातंत्र्यानंतर भारतात मिश्रअर्थव्यवस्था स्विकारण्यात आली होती. खाजगी मालमत्ता जर सार्वजनिक उद्देशासाठी शासनाने घेतली तर "मोबदला" देण्याची तरतूद करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्राची वाढ करण्यात आली.

देशाच्या आर्थिक नियोजनामध्ये दोन मुख्य उद्दिष्टांना महत्व देण्यात आले. १) देशाचा जलद आर्थिक विकास करणे २) सामाजिक सेवा आणि न्याय (Social justice) प्रस्थापित करणे. सार्वजनिक क्षेत्रामध्ये नफ्यापेक्षा "सेवा" तत्वाला अधिक महत्व देण्यात आले. गरिबांची आर्थिक स्थिती सुधारावी. शासनाने अनेक कल्याणकारी योजना राबविण्यास घेतल्या आहेत. आंतरराष्ट्रीय आर्थिक अटीप्रमाणे देशाने सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातील उद्योगांना चालना दिली आहेत.

५) **लोककल्याणकारी राज्य (A welfare state) –**

आधुनिक भारताने लोककल्याणकारी राज्याचा स्विकार केला आहे. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांवरुन भारतीय राज्याचा आदर्श कल्याणकारी राज्य आहे हे स्पष्ट होते. मार्गदर्शक तत्वांचे उद्दिष्ट्ये कल्याणकारी राज्य निर्माण करणे आहे. कोणतेही शासन सत्तेवर आले तरी ते शासन मार्गदर्शक तत्वांप्रमाणे कार्य करण्यास नैतिक दृष्टीने बांधील आहेत. राज्यघटनेतील ४ थ्या भागात कलम ३९ ते ५७ मध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश आहे. या तत्वांमध्ये सामाजिक, आर्थिक शैक्षणिक आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्राचा समावेश आहे. राज्याची ध्येय्य उद्दिष्ट्ये ठरविण्याच्या दृष्टीने राज्यास मदत करण्याचे काम ही तत्वे करतात. राज्याला स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवता प्रस्थापित करण्यास ही तत्वे मदत करतात. काही टिकाकारांच्या मते या तत्वांचे स्वरुप नैतिक असल्यामुळे कल्याणकारी राज्य निर्माण करण्यास शिफारस करणे यापुरते कार्य ही तत्वे करतात. कारण मार्गदर्शक तत्वांना न्यायालयीन पाठबळ नाही. काही टिकाकारांच्या मते आंतरराष्ट्रीय संघर्ष शांततेने सोडवावेत यांसारखी काल्पनिक तत्वे मार्गदर्शक तत्वांमध्ये आहेत. मार्गदर्शक तत्वांमुळे नागरिकांप्रति राज्यावर सकारात्मक कार्याची जबाबदारी येते हे निश्चित.

६) **लष्कराचे अराजकीय स्वरुप (Non-Political army) –**

लष्कराला राजकारणापासून दूर ठेवून राज्याने लोकशाही परंपरेचे जतन केले आहे. लष्कराचे कार्य देशाचे संरक्षण करणे हे आहे, विशिष्ट राजकीय पक्षाच्या शासनाचे रक्षण करणे नाही. स्वातंत्र्यानंतर भारतीय लष्कराचा उपयोग फक्त देशाच्या संरक्षणासाठी करण्यात आला आहे. लष्कर व्यवस्था राजकारणापासून पूर्णपणे मुक्त आहे.

७) **सनदी नोकरशाही राजकारणापासून मुक्त आहे. (Neutral Civil servants)**

लष्कराप्रमाणेच सनदी नोकरशाही राजकारणापासून मुक्त ठेवण्यात आली आहे. जे सनदी नोकर सत्तेवर असलेल्या राजकारण्यांशी हातमिळवणी करतात अशा सनदी नोकरांना नवीन राजकीय पक्षाचे शासन सत्तेवर आले की विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. भारतीय प्रशासनाची आणि दैनंदिन प्रशासकीय कार्याची जबाबदारी सनदी नोकर करतात. कोणत्याही पक्षाचे शासन सत्तेवर असले तरी प्रशासकीय वर्गाला निपक्षपातीपणे प्रशासकीय कार्याची जबाबदारी पार पाडावी लागते.

८) **विविधता आणि अनेकता असलेले राज्य (Multicultural and pluralistic state)** - भारत विविधता असलेला देश आहे. धर्म, जात, वंश, प्रदेश, संस्कृति, भाषा इत्यादी बाबतीत भारतात विविधता आणि अनेकता आहे."विविधतेतून एकता" (Unity in diversity) निर्माण करणे राज्याचे उद्दिष्ट्य आहे. भारतीय राष्ट्रीयत्वाची भावना जी

लोकांमध्ये दिसून येते ती भावना लोकांवर कुणीही लादली नाही, तर एकतेची भावना लोकांमध्ये विकसित झाली आहे. भारतीय समाजातील सांस्कृतिक, भाषिक, वंशीय विविधता असलेल्या लोकांना घटनात्मक तरतुदींव्दारे संरक्षण देण्यात आले आहे उदा. समान नागरिकत्वाची तरतूद, एकेरी न्यायव्यवस्था, एकेरी सनदी नोकरशाही, केंद्र आणि राज्य यांच्यातील सहकार्य विषयी तरतुदी इत्यादी विविधतेतून एकता निर्माण करण्यास मदत करण्याच्या तरतुदी आहेत.

## १८.३ राज्यव्यवस्थेला आव्हाने (challenges to the State system)

भारतीय राज्यव्यवस्थेला अनेक सामाजिक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. सामाजिक संस्थावर सरंजामशाही (फ्युडल) मानसिकतेचा प्रभाव अजुनही दिसुन येतो. लोकशाही आदर्श आणि मूल्ये उदा. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय अजूनही भारतीय समाजात मूळ धरू शकली नाही. भारतीय समाजात सर्वसत्ताधारी वृत्ती, (फ्युडलवृत्ती) सरंजामशाही वृत्ती अजुनही आढळते. त्यामुळे लोकशाही मूल्ये रुजण्यास वेळ लागतो असे दिसते.

भारतातील आर्थिक विकासातून एक नवीन श्रीमंत वर्ग उदयास आला आहे. जो वर्ग 'संपत्तीचे विभाजन' या संकल्पनेला विरोध करतो. भारतीय समाजामध्ये अनेक धोकादायक प्रवाह उदयास आले आहेत. त्यांच्यावर वेळीच नियंत्रण ठेवले नाहीतर आणि प्रभावी प्रशासकीय उपाय केले नाही तर भारतीय गणराज्यात्मक लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता धोक्यात येऊ शकते.

### १) जातीयवाद -

भारतीय समाज व्यवस्था जातिव्यवस्थेवर आधारीत आहे हे ऐतिहासिक सत्य आहे जातीव्यवस्था नष्ट करण्यसाठी अनेक सामाजिक चळवळी आणि सुधारणा झाल्यात परंतु या चळवळी आपले उद्दीष्ट गाठण्याच्याबाबतीत अयशस्वी झाल्यात. जोपर्यंत जातीव्यवस्था जन्मावर आधारीत आहे तोपर्यंत वर्षानुवर्षे खालच्या जातीचा, वरच्या जातीचा असा भेदभाव होतच राहणार. जातीव्यवस्था अस्तित्वात असेपर्यत जातीवरून भेदभाव आणि खालच्या जातीची अवहेलना होत राहणार. तोपर्यंत सामाजिक प्रगती होणे शक्य नाही. जातीविरहीत व्यवस्था निर्माण करणे, समाजसुधारकांचे आणि विचारवंताचे ध्येय होते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारणामध्ये जातीला नवीन रुप प्राप्त झाले आहे. जातीवरून स्वतःची ओळख सांगून मते मिळविणे, निवडणूकीला उभे राहणे हे प्रमाण राजकरणात फारच वाढले आहे. निवडणूकींचा अभ्यास केल्यास असे दिसते की मतदानप्रक्रियेवर जात घटकाचा प्रभाव फारमोठ्या प्रमाणात आहे. वेगवेगळ्या जाती उपजाती आणि त्यांच्या संघटना, नेते आजच्या समाजात दिसतात. प्रत्येक राजकीय पक्ष निवडणूकीसांठी तिकीट देतांना आपल्या पक्षाची विचारसारणी बाजूला ठेवतात आणि जातीला प्राधान्य देऊन निवडणूकीचे तिकीट देतात. जातीय संघटनांचे नेते निवडणूकीसाठी कोण उमेदवार असावा ते ठरवितात. लोकशाही राजकारणासाठी ही गोष्ट अतिशय हानीकारक आहे.

जातिचा सकारात्मक विचार केल्यास असे आढळते की विशिष्ठ जाती आपआपल्या जातीच्या फायद्यासाठी काम करतात. त्या त्या जातीसमुहामध्ये एकता निर्माण होते. जातीवरून व्यक्तिला ओळख मिळते आणि सामाजिक संरक्षण मिळते. जातीय संघटनानी आपआपल्या जातीच्या लोकांची शैक्षणिक आणि आर्थिक प्रगती व्हावी या दृष्टीने प्रयत्न केल्यास विकासाला आणि  प्रगतीला हातभार लागेल.

जातीचा नकारात्मक दृष्टीने उपयोग केल्यास जातीचा गैरफायदा घेऊन राजकारण केल्यास त्यामुळे राष्ट्राची एकता धोक्यात येते. सुदृढ लोकशाही निर्माण होऊ शकत नाही. समाजामध्ये जातीच्या आधारावर ठिणगी टाकल्यास शत्रुत्व वाढते.  ज्या जाती संघटित नाही आणि संख्येने लहान गट आहेत त्यांना जातीच्या राजकारणामुळे त्रासच सहन करावा लागतो. प्रत्येक प्रांतातील वर्चस्व असलेली जात आपले वर्चस्व आणि राजकीय सत्ता वर्चस्वाच्या आधारावर मिळवित असते. या सर्व गोष्टी समता या तत्वाच्या विरोधी जाणाऱ्या आहेत.

जातीय गट अशा नेत्याच्या मार्गदर्शनाखाली असतात ज्यांचा दृष्टीकोन मागासलेली आणि संकुचित असतो. कोणत्याही परिस्थितीत या जातीय गटाच्या नेत्यांना आपल्या जातीची purity of caste ठेवायची असते. अशावेळी आंतरजातीय लग्नांना विरोध कोणत्याही किंमतीवर करण्यात येतो. उदा. आतंरजातीय विवाह करणाऱ्यांची हत्या करणे अशा कृत्यांना जातपंचायती ही सहकार्य देतात. अर्थात व्यक्ति स्वातंत्र्याचा यामध्ये बळी देण्यात येतो. लोकशाही व्यवस्था असलेला राज्यामध्ये असे घडणे दुःखद आहे.

आर्थिक आणि सामाजिक पाठबळ नसलेल्या जातीच्या लोकांना आजही अनेक  गोष्टींना तोंड द्यावे लागते. समाजातील जातीवरून ओळखीचा परिणाम म्हणजे दलीतांवरील अत्याचार होय. व्ही. पी. सिंग यांचे शासन असतांना राष्ट्राने जातीयुध्दाचा अनुभव घेतला होता. मंडल आयोगाचा रिपोर्ट अंमलबजावणीसाठी शासनाने पाऊल उचलून हे जातीयुध्द घडले होते. प्रत्येक जात, उपजाती, राखीव जागा मागतात त्यामुळे जातीविरहीत समाज स्थापन करणे हे एक स्वप्नच ठरत आहे. अनेकांच्या मते राखीव जागांमुळे सगळीकडे दर्जा आणि गुणात्मता खालावली आहे.

समाजातील विविध गटांमध्ये सहकार्य आणि समाजिक एकता निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला  पाहिजे. प्रत्येक जातीने स्वतःची वेगळेपणाची आणि उच्चनिचतेची भावना, सर्वोत्त्वतेची भावना सोडून एकत्रित यायला पाहिजे. परंतु प्रत्यक्षात असे दिसते की प्रत्येक जातीला आपल्यावर अन्याय होत आहे असे वाटते. वर्तमान सामाजिक व राजकीय व्यवस्थेमध्ये योग्य वाटा मिळत नाही असे त्यांना वाटते. अशा भावनेतूनच लहान घटनेतून व्यवस्थेविरुध्द संघर्ष उभा राहतो.

अशी असहनशीलता का विकसित होत आहे. दलीत समाजामध्ये नव्याने जागृकता निर्माण होत आहे काय ? विविधतेतून एकता निर्माण करण्याची प्रक्रिया अयशस्वी झाली कारण भारतीय समाजातील प्रत्येक जात, गट आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

अनेकता आणि विविधता असलेली लोकशाही रचना  मजबूत होईल तेंव्हा प्रत्येक विविधता असलेला गट आपला जीवनमार्ग शोधतील. त्यासाठी विविध गटांमध्ये काही मूलभूत प्रश्नावर एकी व्हायला पाहिजे. विविध जातीच्या गटांमध्ये एकमेकांविषयी आदर आणि समजुतदारपणा यायला पाहिजे. आज बंधुभावाच्या भावनेचा समाजात अभाव दिसतो. डॉ. आंबेडकर यांचे विधान याबाबतीत महत्त्वाचे आहे. " Rights are protectd not by law but by the social and moral conscience of the society. If the social conscience is such that it is prepared to recognize the rights which the law chooses to enact rights will be safe and secure. If they are opposed by the  community no Judiciary can guarantee them in real sense of the word " "हक्क कायद्याद्वारे सरंक्षित होत नाही तर समाजाच्या नैतिक आणि सामाजिक सद्सद्विवेकबुध्दीद्वारे संरक्षित होतात. कायद्याने केलेल्या हक्कांना सामाजिक सद्सद्विवेकबुध्दीही ओळखायला लागते तेव्हा हक्क सुरक्षित होतातच. समाजाने नाकारलेल्या हक्कांना कोणतीही न्यायव्यवस्था हमी देऊ शकत नाही." डॉ. आंबेडकर.

सामाजिक समता दूर्बल असेल आणि लोकशाही संकल्पना लोकांपासून दूर असेल तर सामाजिक न्याय फक्त कागदावरच अस्तित्वात राहतो. अलगतेच्या भावना असतील आणि इतर जमातीप्रति अनादर असेल तर समाज जाती उपाजातीमध्ये विभागलेला राहतो. राष्ट्रीय एकता साध्य होऊ शकत नाही, असे राष्ट्र दूर्बल होत जाते आणि एकमेकांविरूध्द युध्द लोक करतात असे दिसून येते.

२) **जमातवादाचे संकट** -

हिंदू, मुस्लीम एकता गांधीच्या जीवनाचे  ध्यैय होते आणि त्यासाठी त्यांनी आपले प्राणही गमावले होते. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान जवाहलाल नेहरू च्या नेतृत्वाखाली धर्मनिरपेक्षतेचा पाया घालण्यात आला आणि परिणामकारी प्रशासकीय उपायाद्वारे धर्मनिरपेक्ष राज्याला पोषक वातावरण ही भारतात होते. १९६७ साली नेहरुनंतरच्या काळात जमशेठपूर येथे धार्मिक दंगे झाले. त्यांनंतर छोट छोटे दंगे होत होते. १९८० नंतर हिंदूत्व  विचारांची  एक जमातवादी  संघटना उदयास आली. भारतात एकूणच धर्माचे राजकीयकिरण आणि राजकारणाचे सांप्रदायिकीकरण घडून आले आहे. वास्तविक धर्म व राजकारण वेगवेगळे घटक आहेत. परंतु वेगवेगळ्या धर्माचे गट उदा. विश्वहिंदू परिषद, मुस्लीम लीग, अकाली दल हे राजकारणात सक्रिय आहेत. सत्ताधाऱ्यांशी सौदेबाजी करून आपआपल्या धार्मिक गटाचे हितसंबंध जोपासण्याची वृत्ती लोकांमध्ये बळावली आहे. राजकीय श्रेष्ठींही लोकांच्या धार्मिक भावनांचा आणि धार्मिक गटांचा उपयोग करतात. धार्मिक गटांना आश्वासने, सवलती जाहीर करतात. त्यातूनच धार्मिक गटांमध्ये संशयाचे, अविश्वासाचे वातावरण तयार होते. सांप्रदायिकतावादी गट आणि जमातवादी गटांबरोबर राज्याची वागण्याची मऊ आणि वेगवेगळ्या प्रकारची वृत्ती आहे ती वृत्ती घटनात्मक आदर्शांच्या विरोधी जाणारी आहे. धर्मनिरपेक्ष राज्याचे टिकून राहणे त्यामुळे भविष्यात धोकादायक झाले आहे.

३) **फूटीरवादाची भावना (separatist tendencies)**- भारतीय राज्यव्यवस्थेला प्रादेशिकतेचा विकास आणि अलगतेच्या भावनांचा प्रसार यामुळे खूप मोठे आव्हान निर्माण झाले आहे. भाषेच्या आधाराव राज्यांची रचना केल्यानंतर विविध भाषीक गटांना लोकशाही

मध्ये जास्तीत जास्त सहभागी होता होईल आणि भारतीय संघराज्य व्यवस्था आणि राज्यांच्या कामकाजामध्ये लोकांना स्वत:ला व्यक्त करता येईल असा उद्देश होता. परंतु भाषीक रचनेच्या नकारात्मक प्रवाहांना उदा. भाषिक वाद, भाषीक अल्पसंख्याकांचा वाद, राष्ट्रीय प्रश्नांपेक्षा स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांना अति महत्त्व देणे यामुळे राष्ट्रीय एकतेला धोका आणि आव्हान निर्माण झाले आहे. राज्याराज्यामध्ये निर्माण झालेले वाद उदा. नदीच्या पाण्याच्या वाटपासंबंधी वाद, प्रदेशांचा असमतोल आर्थिक विकास इत्यादी प्रश्न हाताळण्यामध्ये केंद्रीय नेतृत्व अपयशी झाले आहे. केंद्रातील पक्ष आणि राज्यातील पक्ष यांच्यातील सत्तेसबंधीची गणिते या प्रश्नाला वेगळे वळण देत आहेत. प्रादेशिक अभिमान विरुध्द केंद्राचे वर्चस्व अशारितीने हे प्रश्न समोर आणले जात आहेत. यातूनच अलगतेच्या भावना राज्यांमध्ये वाढत आहेत. उदा. तामीळनाडू येथील द्रविडीय पक्षांना वाटते की केंद्रसरकारने श्रीलंका शासनाविरुध्द कडक करावाई करावी. स्थानीय तामीळ लोकांना सहानभूती श्रीलंकेचे शासन दाखवितात म्हणून त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करावी. जरी तसे करणे राष्ट्रीय हिताचे नसले तरी केंद्रशासनाने ते करावे असे या द्रिवडियन पक्षांना वाटते. जम्मूकाश्मीर, आसाम. उत्तरांचल या प्रदेशांना परकीय देशांचे पाठबळ असल्याचे दिसते. त्यामुळे या राज्यांमध्ये अलगतेची भावना विकसित होत आहे. या राज्यांमध्ये अलगतेची भावना व्यक्त करणारे जेव्हा दहशतवादी कृत्ये करता तेव्हा त्यांची कृत्ये थांबविण्यासाठी केंद्रशासनाला लष्कराचा उपयोग करावा लागतो. लष्कर दहशतवाद थांबविण्यासठी या प्रदेशामध्ये कार्य करतात तेव्हा बरेचदा त्यांच्याकडून तेथील निरागस लोकांवर अन्याय होतो. तेथील स्थानीय लोकांच्या मनात सैन्याविरूध्द भिती निर्माण होते. आणि राष्ट्रीय प्रवाहापासून ते दूर जातात त्यांच्यात अलगतेच्या वृत्ती आणखी बळावतात. कोणतेही राज्य लष्कराच्या बळावर आपल्या लोकांवर जास्त दिवस राज्य करु शकत नाही. भारताच्या सीमेलगत असलेल्या या सर्व राज्यातील लोकांच्या मनात भारतीय राज्याने विश्वास निर्माण करून मुख्य धोरणामध्ये त्यांना सामील करुन घ्यायला पाहिजे.

४) **भ्रष्टाचार –** प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार एखाद्या कॅन्सरप्रमाणे देशाला आतून पोखरत आहे. भारतात अतिशय उत्कृष्ठ प्रशासकीय रचना, कायदे असूनही भारतीय प्रशासन दोन दृष्टीने अयशस्वी झाले आहे. लोकांना चांगल्या गोष्टी देण्यामध्ये अयशस्वी झाले आहेत. स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे होऊनही लोकांचा शासकीय यंत्रणेवर विश्वास नाही. लोकांच्या दु:खापासून दूरत्व आणि प्रशासकीय विलंब या गोष्टीसाठी प्रशासकीय यंत्रणा प्रसिध्द आहे. बरेचदा शासनापासून कोणतीही मदत घेण्यापेक्षा शासनापासून दूर राहणे गरीब लोक पसंत करतात. शासन आणि कायदा सुव्यवस्था आणणारे पोलिस यांना घाबरून लोक राहतात.

प्रशासनाची रचना अभिजन स्वरुपाची आहे. लोकांची सेवा करण्यापेक्षा लोकांचे मालक बनून या संस्था कार्य करतात. राजकारणाच्या गुन्हेगारीमुळे प्रशासकीय नैतीकतेला अर्थ उरला नाही. प्रशासकीय नैतीकतेचे बिडबंन झाले आहे. शाककीय फंडाच्या दुरुपयोग आणि प्रशासकीय भ्रष्टाचार आति वाढला आहे. देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती उदा. कोळसा, खनिजे, नैसर्गिक गॅस यासंबंधीचे करार सत्तारूढ पक्षाच्या जवळच्या लोकांना दिले जातात. आणि तेही प्रस्थापित प्रक्रियेला बाजूला ठेवून असे वास्तव लक्षात येते. याबाबतीत गुन्हेगारी लक्षात आली की त्यावर थोडी चर्चा माध्यमांमध्ये होते परंतु त्या गुन्हेगारी विरुध्द कोणतीच कृती होत नाही. अस्तित्वात असलेल्या कायद्यातील लुपहोल्स चा आधार घेऊन अशा गुन्हेगारांचे रक्षण करण्यात येते. भ्रष्टाचाराचा कॅन्सर प्रशासन आणि शासनाच्या वरच्या

स्तरावर आहे. C.B.I. या शोध घेणाऱ्या एजन्सीचा बरेचदा सत्तारुध पक्ष विरोधकांना चूप बसविण्यासाठी दुरुपयोग करतात. अशातऱ्हेने भारताला सर्वबाजूने, सर्व सत्तावर भ्रष्टाचाराने पोखरले आहे.

५) लोकांना मूलभूत आर्थिक सुरक्षितता देण्याबाबतीत अयशस्वी (Failure to provide the basic economic security to the people) कोणत्याही शासनाच्या कार्याची योग्यता तेथील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा किती सुधारला यावरून ठरविण्यात येते. (UNESCO) युनेस्को यांनी दिलेल्या रिपोर्टप्रमाणे जीवनाचा दर्जा ठरविण्याचा जो स्तर आहे. त्या स्तरापेक्षाही खालच्या दर्जाचा स्तर बहुसंख्य भारतीयांच्या जीवनाचा आहे. योग्य किंमतीत अन्नधान्य, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्यविषयक सुविधा, स्वस्त दरात घरे, यापासून असंख्य भारतीय दूर आहेत. अजूनही बहुसंख्य लोकांची मुले शिक्षणापासून वंचित आहेत. बालमजूरी कायद्याप्रमाणे विरोधी असली तरी गरिबांची मुले बालमजुरी करूनच पोट भरतात. आईवडील मुलांना शाळेत पाठविण्यापेक्षा बालमजूरी द्वारे मिळकतीला हातभार याला पसंती देतात. शिक्षित बेकारांचे प्रमाण वाढले आहे. नविन आर्थिक धोरण आणि बाजरपेठेला महत्त्व देणारी आर्थिक रचना यामुळेही आर्थिक विकासाला फारशी चालना मिळाली नाही. या परिस्थितीतीमुळे लोकशाही विरोधी संघटना आणि गटांना सुपीक जग मिळते. उदा. नक्षलवादी चळवळ. दैनदिन घटनांमध्ये एनकाउन्टर, पोलीस अत्याचार, मानवी हक्क भंग रोजचेच झाले आहे. अशा गोष्टीमुळे गरीब लोकांचा शासनावरचा विश्वास उडतो आणि ते जहालवादी चळवळकडे आकर्षीत होतात. जहालवादी चळवळीविरुध्द शासनाची कारवाई होते. आर्थिक दृष्टीने शोषीत घटकां राज्याविरुध्द होणाऱ्या संघटीत हिंसाचाराला पाठिंबा देतात. शासन लोकांना मूलभूत आर्थिक गरजांची सुरक्षितता देण्याबाबतीत अयशस्वी झाल्यामुळे वरीलप्रकारचे आव्हान शासनापुढे निर्माण झालेले आहे.

## १८.४ राज्याचा लोकशाही अनुभव (State's Democratic experience)

ब्रिटीशांच्या राजवटीखाली भारतात वसाहतीचे राज्य सुरु झाले मर्यादीत मतदानाद्वारे आणि गव्हर्नर च्या व्हेटो पॉवर मुळे ब्रिटिशकाळात मर्यादीत प्रमाणात लोकशाहीचा प्रयोग झाला होता. अर्थात बहुसंख्य भारतीय या प्रयोगात नव्हते. लोकशाही संस्कृतीचा विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक वातावरण ब्रिटिशांच्या शासनाखाली नव्हते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि भारतीय राज्यघटनेच्या अमंलबजावणीनंतर प्रोढ मताधिकाराद्वारे खऱ्याअर्थाने लोकशाही भारतात आस्तित्वात आली. लोकशाहीमध्ये शांततेच्या मार्गाने शासनात बदल करता येतो. आतापर्यंत भारतात झालेल्या निवडणुकांनी हे सिध्द केले आहे. केंद्रामध्ये शासन वेगवेगळ्या पक्षाचे आले. याचाच अर्थ लोकांनी शासनाच्या कार्यावरून ते शासन कसे आहे हे लक्षात घेऊन शासन बदलले. हे लोकांच्या राजकीय परिपक्वतेचे लक्षण आहे. भारतीय लोकशाहीने ही राजकीय परिपक्वता दाखवून दिली आहे.

परंतु भारतीय लोकशाहीमध्ये काही दुर्बलता आणि दोष दिसून येतात. त्या दुर्बलता आणि दोष वेळीच सुधारले नाही तर भारतीय राजकीय व्यवस्था कोसळू शकते.

भारतातील निवडणूका अतिशय खर्चिक आहेत (costly) राजकीय पक्षाचा पराभव होणे किंवा जिंकणे त्यामध्ये पैशाची मुख्य भूमिका असते. राजकीय प्रक्रियामध्ये बेहिशोबी काळा पैसा अतोनांत दिसून येतो. त्याच्याशी राजकीय गुन्हेगारीचा जवळचा संबंध आहे. प्रसिध्द गुन्हेगार राजकीय क्षेत्रात प्रवेश करीत आहेत आणि ते पैसा आणि मसलपॉवर आधारावर निवडूनही येत आहेत असे दिसते. एकदा ते लोकांचे प्रतिनिधी झालेत की त्यांच्या विरूध्द असलेले खटले सुध्दा ड्रॉप केले जातात. पाहणीनुसार असे दिसून आले की ६०% लोकप्रतिनिधी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले आहेत उदा. बलात्कार, खून, किडनॅपिंग इत्यादी. अनेकांनी जातीयवाद घडवून हिंसाचांर घडवून आणला. त्यात हजारो लोकांनी प्राण गमावले आहेत. परंतु लोकांचे प्रतिनिधी म्हणून तरीही त्यांना सर्व विशेषाधिकारी मिळतात. शासकीय फंडाचा  जो फंड लोकांसाठी असतो त्याचा दुरुपयोग करणे ही राजकीय प्रतिनिधीची सवयच झाली आहे. संसदेच्या कार्याच्या वरुन शासनाची लोकांप्रति असलेली जबाबदारी दिसून येते. परंतु आतापर्यंत संसदेच्या कामकाजाचा अभ्यास केल्यास असे दिसते अगदी कमी वेळा संसदेने खरे कार्य केले आहे. बहुतेक वेळी संसदेच्या कामकाजामध्ये आरडाओरडा, एकमेकांवर  आरोप, सभापतीचा स्पीकर फेकणे आणि एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यांमध्ये संसदेचा वेळ घालवून शेवटी संसद तहकूब करणे हे संसदेच्या कामकाजाचे नेहमीचे चित्र दिसून येते. भारताची संसद "a talking shop" झाली आहे. स्वातंत्र्यानंतर सुरवातीच्या वर्षातील संसदेचे कार्य बघितल्यास संसदेतील चर्चा ऐकण्यासारख्या असायच्या, देशांतर्गत प्रश्न किंवा आतंरराष्ट्रीय धोरणांबाबत चर्चा होत असे. त्या चर्चांना आणि कामकाजाला दर्जा होता. लोकशाही प्रभावी होण्यासाठी तशा प्रकारची चर्चा आणि कामकाज संसदेमध्ये होणे आवश्यक आहे.

भारतीय लोकशाहीच्या वैचारीक आधाराला आतापर्यंत दोन प्रकारच्या हल्लांना तोंड द्यावे लागले आहे. पहिले पाहिजे १९५० साली साम्यवादाचे आव्हान. साम्यवादी भारत स्वतंत्र्य झाला आणि लोकांचे शासन प्रस्थापित झाले हे मान्य करण्यास तयार नव्हते. तेलगंणा या प्रदेशाचा उपयोग करुन साम्यवाद्यांनी तेथे हिंसाचार घडवून आणला.  एकप्रकारे भारतीय राज्याविरुध्द तो उठाव होता. त्यानंतर जवळजवळ दशकाने नक्षलबारी भागामध्ये नक्षलवादी चळवळीच्या स्वरुपामध्ये हा हल्ला होता. आर्थिक शोषण, उत्पन्नातील असमानता, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील वाढलेली दरी हे प्रश्न सोडविण्यास शासन अयशस्वी झाले आहे. बहुतेक नक्षलवादी सुशिक्षित परंतु बेकार तरुण होते. ग्रामीण भागामध्ये कल्याणकारी उपाययोजना अंमलात आणण्यामध्ये राज्य अयशस्वी झाले होते. आदीवासी राहत असलेला भाग इतर भागांपासून आणि लोकांपासून जवळ जवळ वेगळा होता. सामाजिक न्याय मागण्यासाठी नक्षलवादी धोरणांकडे हे आदीवासी भागातील लोक आकर्षित व्हायला लागले. न्याय देण्यासाठी शासन अयशस्वी झाल्यानंतर लवकर न्याय मिळवून देणाऱ्या नक्षलवादी चळवळीमध्ये ते सामील व्हायला लागले. नक्षलवादी चळवळी दडपून टाकण्यासाठी शासनाने अति हिंसाचार केला अर्थात याचाउलट परिणाम होऊन नक्षलवाद आणखीच बळावला उदा. बिहार, ओरीसा, महाराष्ट्र, आंध्र या भागामध्ये

भारतीय लोकशाही व्यवस्थेला दुसरे मोठे आव्हान म्हणजे (elected government itself) निवडून आलेले शासनच होय. जयप्रकाश नारायण यांनी लोकआंदोलन सुरु केले होते. कारण सर्वत्र भ्रष्टाचार आणि आर्थिक परिस्थितीमुळे अशांतता होती. सुरवातीला जयप्रकाश यांचे जनआंदोलन अराजकीय होते. परंतु हळुहळु त्या आंदोलनात क्राँग्रेसविरोधी राजकीय पक्ष सामील झाले. गुजराथ पासून या आंदोलनाला सुरवात झाली होती. असलेले शासन सत्तेवरून

काढून टाका आणि पुन्हा निवडणूका घ्या अशी त्यांची मागणी होती. इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना त्यांनी अंतर्गत आणीबाणीची घोषणाकेली होती. त्यावेळी अनेक नेत्यांना अटक करण्यात आली होती. सर्वप्रकारच्या चळवळी,संप कायदेशीरपणे बंद करण्यात आल्या होत्या. राष्ट्रीयस्वंयसेवकसंघावर (R.S.S.) बंदी घातली होती. अनेक क्रॉग्रेसव्यतिरिक्त शासने बरखास्त करण्यात आली होती. घटनेमध्ये दुरुस्ती करून लोकसभेचा कार्यकाल ६ वर्षांचा करण्यात आला होता. त्यानंतर लवकरच निवडणूका घेण्यात आल्या. कॉग्रेस पक्षाचा या निवडणूका मध्ये पराभव झाला. नविन राजकीय पक्षाचे शासन सत्तेवर आले. शांततेच्या मार्गाने लोकांनी शासन सत्तेमध्ये बदल केला. परंतु कॉग्रेसचा पराभव करुन आलेले जनता पक्षाचे शासन जास्त दिवस सत्तेवर टिकू शकले नाही. पुन्हा क्रॉग्रेस पक्षाचे शासन सत्तेवर आहे, आतापर्यंत भारतीय राज्यात झालेल्या उलथापालथीवरून एवढेत म्हणता येईल की लोकशाहीवर मर्यादा असूनही भारतात लोकशाही व्यवस्था रुजली आहे. यापुढे कोणत्याही राजकीय शक्तिला भारतीय लोकशाही संस्थामध्ये बदल करणे अशक्य आहे.

## १८.५ सारांश

भारतीय राज्यव्यवस्था अतिशय जुनी आहे. अनेक शतकांपासून विकसित झाली आहे. भारतीय राज्यव्यवस्था सुरवातीला राजेशाही स्वरुपात होती. श्रेष्ठी, सरंजामशाही असलेल्या भारतीय समाजात आधुनिक लोकशाहीचा उदय झाला. स्वातंत्र्यानंतर भारतात घटनासमतीद्वारे लोकशाही राज्यव्यवस्था आली. सार्वभौम, गणराज्यात्मक लोकशाहीने लोकसंमती वर आधारीस राज्याची स्थापना केली. भारतीय उद्देशपत्रिकेमध्ये त्याचा स्पष्ट उल्लेख आहे. मार्गदर्शक तत्वांच्या द्वारे लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्याची नैतिक जबाबदरी राज्याची आहे. उद्देशपत्रिकेमध्ये भारतीय राज्याचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

सामाजिक शक्तिंकडून राज्याला अनेकदा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. या सामाजिक शक्ति लोकशाही आदर्श समता आणि सामाजिक न्याय यांच्याशी जुळवून घेऊ शकल्या नाही त्यामुळे अनेकता असलेल्या समजात काही समस्या उद्भवल्या आहेत. मानवी हक्क सरंक्षित करण्याच्या बाबतीत राज्याचे कार्य पुरेसे नाही. नविन् आर्थिक धोरणाप्रमाणे बाजारपेठ, मुक्त व्यापार यामुळे राज्याचे मानवता, न्याय याकडे दुर्लक्ष झाले गरिब आणि असंघटीत मजूर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दयेवर जगतात असे दिसते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोजचेच झाले आहे. परकीय भांडवलदारांचा हस्तक्षेप नविन आर्थिक व्यवस्थेप्रमाणे वाढला आहे. नविन आर्थिक धोरण गरीबांपर्यत पोहचले नाही. लोककल्याणकारी कार्यापासून राज्य दूर जात आहे.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, जात आणि धर्माचा निवडणूकांवर प्रभाव या सर्व गोष्टीवरून भारतीय राज्य किती मजबूत आहे हे लक्षात येते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्याने लोकशाही रचना मजबूत ठेवली आहे. लोकपाल बिल करावे यासाठी अण्णा हजारे यांची आंदोलने, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे कार्य, माहितीचा आधिकार यामुळे लोकांमध्ये जागृकता येत आहे. सुशिक्षित आणि राजकीयदृष्टीने जागृक असलेले नागरिक भारतीय राज्यात पुर्नजीवन आणीत आहेत हे निश्चित.

## १८.६ प्रश्न

१) भारतीय लोकशाही कोणत्या आव्हानांना तोंड देत आहे भारतीय व्यवसथा मजबूत होण्याच्या दृष्टीने उपाय सुचवा

२) स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय राज्य, व्यवस्थेची तुलना करा. स्वातंत्र्यानंतरच्या राज्याविषयी लिहा.

३) राज्याघटेच्या आधारावर भारतीय राज्याचे पुर्नजीवन शक्य आहे काय ? घटनेचया मूलभूत तत्वज्ञानाच्या आधारावर स्पष्ट करा. भारतीय व्यवस्थेमद्ये कोणते बदल आवश्यक वाटतात ते लिहा.

❖❖❖❖